म. ग्रं. सं. ठाणे

विषय: शास्त्र

लेखक: शंकर रामचंद्र हलबकणे

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव: सृष्टपदार्थ नियम

१३ सं. क्र.

सृष्टपदार्थ नियम व सुधारणा. (शास्त्र)

২॥ ৩২৮
৬৬

# सृष्टपदार्थनियम

## आणि

# सुधारणा.

---

## पूर्वार्द्ध.

हा ग्रंथ

## शंकर रामचंद्र हतवळणे

ह्यांनीं तयार करून

तो

**मुंबईंत,**

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

---

या ग्रंथाची मालकी इसवी सन १८६७ चा आक्ट २५
अन्वयें नोंदिली आहे.

---

( या ग्रंथासंबंधी सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपलेकडे ठेविले आहेत. )

---

सन १८८९.

---

किंमत १॥ रुपये.

# प्रस्तावना.

सृष्टपदार्थनियम आणि सुधारणा हें ह्या ग्रंथाचें नांव आहे; परंतु ह्यावरून ग्रंथांतील विषयाचे स्वरूपाविषयीं चांगला बोध होणार नाहीं, ह्मणून याविषयीं खुलासा करणें अवश्य आहे.

पर्जन्य, भूकंप, ज्वालामुखी पर्वत, हवा, जमीन, नद्या, डोंगर, समुद्र, वादळें वगैरे सर्व सृष्टपदार्थविषयक कारणें होत. पाऊस पडला असतां पीक येतें व मनुष्यांचा चरितार्थ चालतो; परंतु तो न पडला तर दुष्काळ पडतो व मनुष्यांचे हाल होतात. त्यांच्या शरीरास व मनास स्वस्थता नसते. पाऊस त्यांच्या स्वाधीन नसतो; परंतु त्यांस पावसाचे आधीन राहवें लागतें. तात्पर्य ज्या लोकांस चरितार्थासाठीं पावसावर अवलंबून राहवें लागतें त्यांची कांहीं अंशीं परतंत्र स्थिति असते.

जमीन सुपीक असली ह्मणजे पुष्कळ पीक होतें व फार श्रम करण्याचें कारण पडत नाहीं. श्रम करण्याचें कारण पडत नसलें ह्मणजे आळस उत्पन्न होण्याचा संभव असतो. परंतु जमीन भिकार असली ह्मणजे जास्त श्रम करावे लागतात. श्रम करण्याची आवश्यकता असली ह्मणजे आळस उत्पन्न होण्याचा संभव कमी असतो. हें, देश व कोंकण येथील लोकांचे स्थिती-वरून समजतें. हवा चांगली असली ह्मणजे शरीरास व मनास सुख होतें व काम चांगलें होतें. भूकंप उत्पन्न झाले असतां वित्ताचीच काय, परंतु प्राणाचीही हानि होते व सुधारणेस धक्का बसतो. नद्यांना पूर येऊन खेडीं वाहून जातात व कधीं कधीं प्राणहानि होते. वादळानें वित्ताचा व प्राणाचा नाश होतो. देवी, पटकी वगैरे रोगांनीं अकालीं मरण येतें व मनांत चमत्कारिक कल्पनातरंग येतात. सर्प, व्याघ्र वगैरे हिंसक

प्राण्यांपासून जीवास अपाय होतो. यावरून सृष्टपदार्थविषयक कारणांचा व मनुष्याचा संबंध आहे किंवा नाहीं, व या कारणांपासून मनुष्यांचे शरीरावर व मनावर व यामुळें त्यांचे सुधारणेवर व्यापार होतो किंवा नाहीं हें समजेल. जे सृष्टपदार्थ आहेत त्यांपासून केव्हां केव्हां फायदा होतो व केव्हां केव्हां हानिही होते. परंतु त्यांपासून आपलें नुकसान न होऊं देतां फायदा मात्र करून घ्यावयाचा, त्यांच्या आधीन न राहतां त्यांस आपल्या आधीन ठेवावयाचें व त्यांचा अंमल आपल्या शरीरावर अथवा मनावर न होऊं देतां त्यांचें आकलन करण्याविषयीं सामर्थ्यसंचय करावयाचा हें सुधारणेचें फल होय; व मनाची दुर्बलता व परवशता न होऊं देतां बाह्यसृष्टि मनाच्या अंकित ठेवावयाची हें सुधारणेचें पर्यवसान होय. परंतु हें फल मिळण्यासाठीं अथवा हा उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं सृष्टपदार्थांचे धर्म व नियम कोणते व त्यांपासून काय कार्यें होतात हें समजणें अवश्य आहे. हें समजण्यास कांहीं साधन असावें अशा हेतूनें हा ग्रंथ हातीं घेण्याचें मनांत आलें.

सृष्टपदार्थांचे धर्म कोणते व तद्विषयक नियमांचे व्यापारांपासून काय कार्यें होतात हें समजावयास लागल्यापासून सुधारणेचे कामांत दिवसेंदिवस युरोपियन लोकांचें पाऊल पुढें आहे. त्यांनीं जे शोध केले आहेत त्यांमुळें लहान थोर, विद्वान अविद्वान, गरीब श्रीमान ह्या सर्वांस सुख होत आहे. ही गोष्ट मनांत आणिली असतां, व सृष्टपदार्थशास्त्राचें ज्ञान आह्मांस जसें असावें तसें नसल्यामुळें आमच्या सुधारणेची इमारत कच्ची राहून आमचें बरेंच नुकसान झालें व अद्यापि होत आहे ही गोष्ट मनांत आणितां, या शास्त्राचा अभ्यास करणें किती आवश्यक आहे हें समजून येईल. या शास्त्राचा

अभ्यास आमच्यांत जों जों अधिक अधिक वाढत जाईल, तों तों आमच्या कोत्या समजुती नाहींतशा होतील. धरणीकंप, साती, टोळधाड वगैरे सृष्टचमत्कार हे ईश्वरीक्षोभामुळें होतात किंवा कसें, ग्रहणें राहुकेतूंमुळें लागतात किंवा कसें, ह्या व दुसऱ्या गोष्टी कळून येतील; तात्पर्य, हल्लीं ज्या गोष्टी अथवा जे चमत्कार दैविक कारणांनीं घडून येतात असें पुष्कळ लोक समजतात, त्या गोष्टी अथवा ते चमत्कार तशा घडत नसून सृष्टपदार्थनियमांचे व्यापारामुळें घडून येतात, असें समजावयास लागून सुधारणेचा क्रम सुयंत्र चालेल. या शास्त्राचे अभ्यासाविषयीं गोडी उत्पन्न व्हावी व सुधारणेस आवश्यक गोष्ट जो चौकसपणा तो वाढावा असा हेतु आहे.

सुधारणेंत जो फेरफार होतो तो केवळ कृत्रिम कारणांनीं होत नाहीं. स्वाभाविक कारणांचा जोर कमी असतो असें नाहीं. देशाची बाल्यावस्था असतां ह्या कारणांचा जोर फार असतो. तेव्हां सुधारणेविषयीं विचार करतांना ह्या दोन्ही कारणांविषयीं विचार केला पाहिजे. परंतु हिंदुसुधारणेविषयीं विचार करितांना एकाच दिशेनें विचार केलेला आढळतो. दुसऱ्या दिशेनें ह्मणजे सृष्टपदार्थविषयक नियमांचे व्यापारापासून हिंदुस्थान देशांत काय परिणाम झाले याविषयीं मराठींत सविस्तर विचार केलेला दिसून येत नाहीं. देशाची बरी वाईट स्थिति होण्यास सृष्टपदार्थविषयक कारणें कितपत सहाय्यकारी असतात, व त्यांपासून काय कार्यें होतात, याविषयीं माहिती मिळून हिंदुस्थान देशाची स्थिति सुधारण्यास कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, ह्याचा विचार करण्यास या पुस्तकापासून थोडेंसें सहाय्य होईल अशी आशा आहे.

आपली सुधारणा ही विशेषेंकरून नवीन प्रजेच्या कर्तृत्वावर

अवलंबून आहे. या प्रजेची बुद्धि जागृत करून तीस विचार करण्याचें वळण लावण्यास, त्यांचा ज्यांच्यांशीं निकट संबंध असतो असे जे शिक्षक, त्यांना ह्या ग्रंथाचा परिचय झाल्यानें हें वळण लावून देण्यास थोडीशी मदत होईल असें वाटतें.

सुधारणेचा इतिहास ह्मणून बकल साहेबांनीं जो प्रसिद्ध ग्रंथ केला आहे त्याचा ह्या ग्रंथास मुख्य आधार आहे. शिवाय गिझो, ड्रेपर, मिल, मोक्षमुलर, मनु, हंबोल्ट वगैरे कांहीं ग्रंथकारांचे ग्रंथांचा आधार आहे. ह्याविषयीं टीपेंत उल्लेख केला आहे. हा ग्रंथ दक्षिणाप्राइझ कमेटीकडे पाठविला होता. ग्रंथ कमेटीस पसंत पडल्यावरून छापण्याची उमेद आली आहे. कमेटीचे सभासदांनीं जो अभिप्राय दिला आहे तो पुढें दिला आहे. सभासदांनीं व रा. रा. विनायक कोंडदेव ओक, रा. रा. गोविंद माधव पुंडलिक वगैरे कांहीं मित्रांनीं ज्या सूचना केल्या त्यांचा विचार केला आहे.

प्रकृत ग्रंथाचा विषय नवीन असल्यामुळें स्थलपरत्वें नवीन शब्दांची योजना करणें भाग पडलें आहे. ग्रंथ उपयुक्त व सुबोध व्हावा ह्मणून यत्न केला आहे. हा यत्न व वर ज्या हेतूंविषयीं निर्देश केला तो हेतु कितपत सिद्धीस गेला आहे हें सांगतां येत नाहीं.

या ठिकाणीं एक सूचना करणें अवश्य दिसतें. ती ही कीं, सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें अमुक कार्य झालें असें ठिकठिकाणीं ह्मटलें आहे, यावरून सृष्टपदार्थविषयक कारणांशिवाय इतर कारणांचें कांहींच सहाय्य नव्हतें असें ह्मणण्याचा आमचा हेतु नसून, सृष्टपदार्थविषयक कारणें हीं प्रधान कारणें होतीं व त्यांचा जोर फार होता असें ह्मणण्याचा आमचा हेतु आहे. हें लक्षांत ठेवून ग्रंथ वाचिला असतां अतिशयोक्तीबद्दल आह्मांकडे दोष येणार नाहीं.

# प्रस्तावना.

जो ग्रंथ व्हावयाचा त्याचा हा पूर्वभाग आहे. हा अल्प प्रयत्न लोकांस पसंत पडल्यास उत्तरभाग हातीं घेण्याचा विचार आहे. त्यांत सृष्टपदार्थचमत्कारांपासून मनाची दुर्बल स्थिति होऊन सुधारणेस कसा धक्का बसतो, याविषयीं हिंदुस्थानचे संबंधानें मुख्यत्वें विचार करण्याचा उद्देश आहे.

शेवटीं ज्या प्रसिद्ध ग्रंथकाराचा ह्या ग्रंथास मुख्य आधार आहे त्याचे, ज्या थोर ग्रंथकारांचे ग्रंथांचा उपयोग केला आहे त्यांचे, दक्षिणाप्राइझ कमेटीचे सभासदांचे व मित्रांचे आभार मानून, व ह्या ग्रंथांत स्थलपरत्वें जे दोष राहिले असतील ते कोणीं कळविले असतां अथवा नवीन सूचना केल्या असतां मेहेरबानी होईल असें सांगून हा लेख पुरा करितों.

धुळें, ता. २५ आगस्ट सन १८८९.

शं. रा. ह.

२TT 32८

## दक्षिणा प्राइझ् कमेटीचे सभासद ह्यांनीं ग्रंथावर जो अभिप्राय दिला आहे तोः—

Mr. Hatvalne in his preface says that the European nations have made rapid strides in civilization since they came to understand the operation of Physical laws. He then tries to impress on the readers the importance of the study of Physics. He has offered this book, therefore, to create in them a taste for this subject and science generally, to explain to the people how physical laws shape the condition of man and the different stages of civilization he is in.

Mr. Hatvalne has furnished bare facts of history and his inferences and conclusions, are, I may say, generally sound and logical though there may be some slight exceptions and deviations. It appears on a perusal of the book especially the foot—notes, that he has studied the subject with considerable care and has handed it in a masterly manner. It will be seen that he has consulted about fifty authors on the subject. But his main authority seems to be Buckle's History of civilization. Political Economy

and Physics are subjects prescribed for the curriculum of the Training Colleges and the study of such a book in connection with both these subjects would be most useful and salutary. It will encourage and call into full play the thinking powers of the young men attending the Training Colleges and I would strongly recommend that there being no such book published hitherto in Marathi within my hearing, Mr. Hatvalne's labours be liberally rewarded and his book published departmentally. The several members of the Book—Committee and especially Mr. Sohoni will, I hope, bear me out in my recommendations.

(Sd.) N. B. GODBOLE,
Ag. Marathi Translator. E. D.
and
Secretary Dakshina Prize Committee.

---

I have read with great interest and satisfaction the work under report and agree generally with the Secretary in his commendation of the author's hard work in connection with it. The essay is a very popular adaptation of Mr. Buckle's History of civilization chapter 2. Vol I. which treats of the influences exercised by physical laws or agents upon the organization of Civil Society and individual character. The author has not confined himself to Mr. Buckle's work, but has made free and intelligent use of Guizot's History of Civilization, Draper's Intellectual Development of Europe, Polar World, Tropical World, Humbolt's Cosmos, Smith's Wealth of Nations, Mill's and Fawcett's Political Economy,

Several histories of India, Smith's philosophy of health, Wonders of the World, Robertson's history of America and many other works. This is indication of much good work. The style for the most part is easy and the idiom correct. In the account given by the author of the Indian Civilization, he has shown much original research and independence. I think the work under report being almost the first of its sort, and indicating as it does much reading and work is certainly deserving of the Committee's patronage and I would award Rs. 250 to the author.

22-1-88. (Sd.) M. G. RANADE.

---

I have looked into Mr. Hatvalne's Book on "सृष्टपदार्थविषयक नियमांचे व्यापारापासून सुधारणेंत होणारे फेरफार." The subject is important. The investigation of the subject—what civilization is and how it can be developed has an important bearing on India, especially now when large and civilizing agencies are acting on and modifying the conditions of Indian life......Mr. Hatvalne's style is good. That he has laboured hard for collecting information is evident from his book. I, therefore, concur with the Secretary in his recommendation and believe that Rs. 250 be awarded to Mr. Hatvalne.

28-1-88 (Sd.) M. M. KUNTE.

---

I have read the Manuscript with interest. The subject which Mr. Hatvalne has taken up is yet new to native writers......He has collected his information from great authors and has rendered it into

Marathi in a clear and simple style, and I vote for a reward of Rs. 250 being paid.

7-2-88. (Sd.) N. B. DANDEKAR.

---

I have been able to read only the section on India. But even from that I feel myself in a position to state that this is one of the best books I have seen written in Marathi. Its general spirit is thoughtful. What the author says of the civilization of India is mostly true......I am decidedly of opinion that a prize of Rs. 250 should be awarded to the author.

R. G. BHANDARKAR.

The Prize is accordingly awarded.

R. G. BHANDARKAR,

President

---

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठें. |
|---|---|
| **भाग पहिला.** | **१–१४** |
| सृष्टपदार्थविषयक कारणें—हवा, अन्न, जमीन व सृष्टिचमत्कार. ... ... ... ... | १ |
| सृष्टिचमत्कार—भूकंप, पर्जन्य, टोळधाड, साती वगैरे. ... ... ... ... ... | १ |
| पर्यायाचे कारणाचें महत्त्व. ... ... ... | २ |
| सुधारणेस धनसंचयाची आवश्यकता ... | ३ |
| सृष्टपदार्थविषयक कारणांवरून धनाचें नियमन. ... ... ... ... ... | ४ |
| धनोत्पत्ति दोन गोष्टींवर अवलंबून असते—उत्साहपूर्वक व नियमित रीतीनें श्रम व सृष्टपदार्थांची विपुलता. ... ... ... | ५ |
| जमिनीची सुपीकता कशावर अवलंबून असते. | ५ |
| जमिनीची सांप्रत अनास्था. ... ... ... | ९ |
| हवेपासून कार्यें. ... ... ... ... | ११ |
| देश बाल्यावस्थेंत असतां सृष्टपदार्थविषयक कारणांचें प्राबल्य... ... ... ... | १३ |
| **भाग दुसरा.** | **(१४–८०)** |
| (अ) आशिया. ... ... ... ... | १४–३९ |
| आशियाचे उत्तर प्रदेशाविषयीं विचार. ... | १४ |
| सामोजदीज लोकांचें वर्णन. ... ... ... | १८ |
| आस्तजक लोकांविषयीं हकीकत. ... ... | २१ |

उत्तर प्रदेशांत राहणारे लोकांचे स्थितीवरून सुचलेले विचार.... ... ... ... २३
आशिया खंडाचा मध्य प्रदेश–चिनी तार्तरी, स्वतंत्र तार्तरी, तिबेट, इराण, आफगणिस्तान व अरबस्तान.... ... ... ... २४
गोबीचें रान.... ... ... ... ... २६
चिनी तार्तरी व स्वतंत्र तार्तरी ह्यांचें वर्णन.... २७
अरबस्तान. ... ... ... ... ... २९
अरबलोकांविषयीं विचार. ... ... ... ३३
इराण. ... ... ... ... ... ३७
आशिया खंडांत प्राचीन काळीं सुधारणा हिंदुस्थानांत झाली. ... ... ... ... ३९
(ब) आफ्रिका... ... ... ... ... ३९–५१
आफ्रिका खंडाची स्थिति. ... ... ... ४०
आफ्रिकेंतील प्रदेशांविषयीं शोध ... ... ४१
आफ्रिकेंतील सुधारणा. ... ... ... ४५
निग्रो लोक. ... ... ... ... ... ४५
आफ्रिकेंत सुधारणेस अडचणी. ... ... ४७
साहाराचें रान. ... ... ... ... ४८
सृष्टपदार्थविषयक कारणांमुळें आफ्रिकेची निकृष्ट स्थिति. ... ... ... ... ... ५०
(क) अमेरिका. ... ... ... ... ५१–८०
अमेरिकेचा शोध. ... ... ... ... ५२
हमबोल्ट ह्यानें केलेले शोध व मिळविलेली माहिती. ... ... ... ... ... ५६
उत्तर अमेरिकेचे उत्तर प्रदेशाविषयीं विचार. ५७

इस्किमो लोकांविषयीं विचार... ... ... ६०
उत्तर अमेरिकेचे मध्य प्रदेशाविषयीं विचार. ६३
उत्तर अमेरिकेचा दक्षिण प्रदेश. ... ... ६५
दक्षिण अमेरिका. ... ... ... ... ६६
दक्षिण अमेरिकेचा दक्षिण भाग. ... ... ६७
दक्षिण अमेरिकेचा उत्तर प्रदेश. ... ... ६९
लेनासचें रुक्ष व ओसाड मैदान. ... ... ६९
दक्षिण अमेरिकेचा मध्य प्रदेश—ब्रेझिल. ... ७१
ब्रेझिल देश सुपीक असून तेथें सुधारणा कां न-व्हती? ... ... ... ... ... ७२
व्यापारोपयोगी वायु.... ... ... ... ७२
ब्रेझिल देश अतिशय सुपीक कां? ... ... ७४
सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें ब्रेझिल देशांत काय स्थिति झाली. ... ... ... ७६
इंदियन लोक... ... ... ... ... ७८
सुधारणेस जीं बाधक कारणें त्यांविषयीं विचार करण्याची आवश्यकता.... ... ... ७९

भाग तिसरा. ८०–९१

युरोप खंडाविषयीं विचार. ... ... ... ,,
हवेपासून शरीरावर व मनावर परिणाम. ... ८१
ज्यू लोकांचें उदाहरण. ... ... ... ८१
समशीतोष्ण हवेंतील लोकांचें वर्चस्व. ... ८२
युरोपीय सुधारणेस हवा कारण कशी? ... ८४
युरोपांत हवेचें मान चांगलें असण्याचीं कारणें. ८४
हवा व मनुष्य यांमध्यें संबंध. ... ... ८६
भानगडीचा संबंध ह्मणजे काय? ... ... ८७

युरोपांतील सुधारणा व इतर तीन खंडांतील सुधारणा ह्यांविषयीं सामान्य विचार. ... ८८

**भाग चौथा.** ९१-११८

सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें धनाचे वांटणीचें नियमन. ... ... ... ... ... ९२
संपत्ति ही शक्ति आहे. ... ... ... ९३
धनाचे वांटणीविषयीं विचार. ... ... ९४
मजूरदारांचे संख्येस प्रतिबंध असण्याची जरूरी. ... ... ... ... ... ९७
धर्मसंबंधी समजुती. ... ... ... ... ९९
अन्नामुळें मजूरांचे संख्येंत फेरफार होतो. ... १०१
अन्नापासून कार्यें–शरीराची झीज भरून येणें व उष्मा उत्पन्न होणें. ... ... ... १०१
शरीरयंत्र. ... ... ... ... ... १०१
शरीराची झीज. ... ... ... ... १०५
शरीराची झीज भरून येण्यासाठीं व त्यांत उष्मा उत्पन्न होण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारच्या अन्नाची जरूरी कां? ... ... १०६
रक्तशुद्धि व तज्जन्य शरीरपोषण. ... ... १०७
त्वचेच्या द्वारें श्वासोच्छ्वास व त्यामुळें योगाभ्यास कसा. ... ... ... ... ... १०९
अन्नापासून होणाऱ्या कार्यांचा व मनुष्यांचा संबंध. ... ... ... ... ... ११०
हवेचा व धनाचे वांटणीचा संबंध. ... ... १११
थंड देशांत व उष्ण देशांत निरनिराळें अन्न. ११५
एकंदर हकीकतीवरून कोणते सिद्धांत ठरतात. ११६

भाग पांचवा. (११८–२५९)

(अ) हिंदुस्थान. ... ... ... ...(११८–२१७)

धनसंचय व धनाची वांटणी ह्याविषयींचे सिद्धांत हिंदुस्थानास कसे लागू पडतात. ... ११८

हिंदुस्थानची ख्याति कां? ... ... ... १२०

खरा इतिहास उपलब्ध नसल्यामुळें निरनिराळे तर्क. ... ... ... ... ... १२१

जुना इतिहास कां सांपडत नसावा?... ... १२२

ब्राह्मणांनीं बखरींचा नाश केला असेल कां? १२५

हिंदुस्थानचे प्राचीन इतिहासाचीं साधनें—पुराणादि ग्रंथ, ग्रीक व रोमन ग्रंथकार, नाणीं, शिलालेख व ताम्रपट. ... ... ... १२६

हिंदुस्थानची प्राचीन व युरोपांतील हल्लींची सुधारणा ह्यांची तुलना करणें बरोबर नाहीं. १२७

प्रोफेसर विलसन ह्यांचा अभिप्राय. ... ... १२८

हिंदुसुधारणा प्राचीन. ... ... ... १३०

हिंदुसुधारणेचें स्वरूप—मनुस्मृति, एलफिन्स्टन, थार्नटन ब्राईस, थामसन, मार्शमन ह्यांचे अभिप्राय. ... ... ... ...१३१–१३४

मिल साहेबांनीं आणिलेले आरोपाविषयीं विचार. ... ... ... ... ... १३४

हिंदूंचे आचरणाविषयीं परकीय लोकांचे अभिप्राय, व मनुस्मृति रामायण वगैरे ग्रंथांतील आधार. ... ... ... ...१३८–१४३

हिंदुसुधारणेविषयीं एलफिन्स्टन, सरटामस मनरो, बिशप हीबर व मोक्षमुलर ह्यांचा अभिप्राय... ... ... ... ...१४५–१५५

भाषेवरून सुधारणेचें अनुमान ... ... १५६
स्त्रियांचे स्थितीवरून सुधारणेविषयीं अनुमान; मनुस्मृति, भारत व बृहत्संहिता यांतील वचनें ... ... ... ... ...१६१–१६३
स्त्रियांची हीन स्थिति कां झाली? ... ... १६४
धर्म व नीति ह्यांवरून सुधारणेविषयीं अनुमान; मनुस्मृति, भगवद्गीता, रामायण, व गरुडपुराण ह्यांतील वचनें. ... ...१६५–१७०
हिंदुसुधारणा ज्या कारणांवरून लयास गेली त्यांविषयीं मतभेद; जुलूम, जातिभेद व मूर्तिपूजा हीं कारणें आहेत कां?... ... १७२
हिंदुस्थानची सुपीकता व तिजमुळें धनसंचय. ... ... ... ... ... १७४
हिंदुस्थानची हवा. ... ... ... ... १७५
प्राचीन हिंदूंचें खाण्याचें धान्य. ... ... १७८
अन्न, वस्त्र वगैरे आवश्यक गोष्टींची थोडक्यांत सोय व तिजमुळें लोकसंख्येची वृद्धि. ... १८०
लोकसंख्येचे वृद्धीमुळें मजूरीचा दर कमी. ... १८२
मजूरीचा दर व्याजाचे दरावरून व साऱ्यावरून समजतो. ... ... ... ... १८५
मनुस्मृति व मिताक्षरावरून व्याजाचे दराविषयीं माहिती. ... ... ... ... १८६
व्याजाचा दर कां वाढतो ह्याविषयीं विचार (मिल व फासेट ह्यांचा अभिप्राय)... ... १८८
व्याजाचा दर सावकारामुळें वाढतो कां?. ... १९२
साऱ्याचे बाबतींत मतभेद. ... ... ... १९२

साऱ्याचे बाबतींत पूर्वीची व्यवस्था.... ... १९३
व्याज व सारा जबर ह्मणून मजूरी कमी. ... १९५
एतद्देशीय संस्थानिक साऱ्याची सूट देतात... १९६
सूट देण्याची आवश्यकता; टाइम्स, बांबेग्याजीट, बांबेरिव्ह्यू पत्रांचा व लार्ड लिटन ह्यांचा अभिप्राय... ... ... ... ...१९८–२०२
गायरानें. ... ... ... ... ... २०२
हिंदुस्थान देश खरोखर श्रीमान होता कां?... २०४
भ्रांतिमूलक समजुतीपासून काय परिणाम झाले. २०४
हिंदुस्थान गरीब देश आहे.... ... ... २०७
स्वस्ताईमुळें संपत्तीचे वांटणींत न्यूनाधिक्य... २०९
थोडे लोकांचे हातीं अधिकार असणें हितावह नसतें. ... ... ... ... ... .२१०
स्वस्ताईमुळें सुस्ती व तृप्ति वाढली... ... २११
सृष्टपदार्थविषयक नियम हे कांहीं अंशीं जातिभेदास कारणीभूत. ... ... ... २१२
हिंदुस्थानची हवा दुर्बलता आणणारी आहे... २१६
(ब) मिसर देश. ... ... ... ...२१८–२४०
मिसर देशाचा राजकीय इतिहास. ... ... २१८
मिसर देशाची सुपीकता नील नदीमुळें होय... २२३
निर्वाहाचे साधनाविषयीं विचार. ... ... २२५
हवेविषयीं विचार. ... ... ... ... २२८
स्वस्त अन्नामुळें लोकसंख्येची वृद्धि व साधारण लोकांची निकृष्ट स्थिति... ... ... २३०
मिसर देशांतील मनोरे व दुसऱ्या इमारती... २३२
मिसर देशांतील जातिभेद. ... ... ... २३८

सामान्य विचार. ... ... ... ... २३९
(क) मेक्सिको व पेरू. ... ... ...२४०–२५९
मेक्सिकोंतील सुधारणेची माहिती. ... ... २४२
पेरूंतील सुधारणेविषयीं विचार. ... ... २४७
मेक्सिको व पेरू येथील जमिनीची सुपीकता व
उपजीविकेचें साधन. ... ... ... २५०
लोकस्थिति.... ... ... ... ... २५३
मेक्सिकोंतील मनोरे.... ... ... ... २५६
हिंदुस्थान, मिसर, मेक्सिको व पेरू ह्या देशां-
विषयीं सामान्य विचार.... ... ... २५८

# सृष्टपदार्थनियम आणि सुधारणा.

## भाग पहिला.

ज्या सृष्टपदार्थविषयक कारणांमुळें निरनिराळे राष्ट्रांचे सुधारणेंत फेरफार झालेला आहे, तीं कारणें कोणतीं, याविषयीं आपण विचार करावयास लागलों असतां, तीं मुख्यत्वेंकरून हवा, अन्न, जमीन, व सृष्टिचमत्कार हीं होत, असें आपणांस दिसून येईल.[1] हवेंत ज्याप्रमाणें फरक असेल, त्याप्रमाणें लोकांचे रीतीभातींत व यामुळें त्यांचे सुधारणेंत फरक दृष्टीस पडतो. सृष्टिचमत्कार ह्मणजे भूकंप, ज्वालामुखी पर्वत, पर्जन्य, विद्युल्लता, इंद्रधनुष्यें, डोंगर, नद्या, टोळधाड वगैरे देखावे पाहून निरनिराळे राष्ट्रांतील लोकांचे मनांत कल्पना येऊन, त्यांस विचाराच्या निरनिराळ्या संवयी लागल्या आहेत. सृष्टिचमत्कार अथवा सृष्टिवैभव ह्यांच्या अवलोकनानें मनुष्याची कल्पनाशक्ति उज्जीवित होऊन, ज्ञानाचे प्रसारास व्यत्यय आणणारा जो धर्मभोळेपणा त्याचा प्रादुर्भाव होतो. यावरून सृष्टिचमत्कार पाहूं नयेत, असें ह्मणण्याचा आमचा हेतु नाहीं. सृष्टिचमत्कार पाहून ते कसे होतात, त्यांपासून काय कार्यें होतात, हे चमत्कार भयंकर असल्यास त्यांचें आकलन कसें करावें, याविषयीं वि-

---

१– (अ) बकलकृत सुधारणेचा इतिहास भाग १. पृष्ठ ३९.

(ब) ड्रेपर्स इंटेलेक्चुअल डेवलपमेंट आफ् युरोप भाग १. पृष्ठ ११.

चार केल्याशिवाय ज्ञान पूर्णदशेस येणार नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे; परंतु या चमत्कारांपासून लोकांची प्रवृत्ति धर्मभोळेपणाकडे झाली, व ज्या देशाची बाल्यावस्था आहे, व जेथें हे चमत्कार वारंवार घडून येणारे व भयंकर असतात, त्या देशांत धर्मभोळेपणाचा जोर फार असतो, असें ह्मणण्याचा आमचा हेतु आहे. जसजशी सुधारणा होते तसतसा इतर कारणांमुळें सुधारणेंत फेरफार होतो हें खरें आहे; तथापि, देश बाल्यावस्थेंत असतां धर्मभोळेपणाचा जोर फार असल्यामुळें, सृष्टींतील चमत्कारांप्रमाणें लोकांचे स्वभावांत, धर्मांत, व ग्रंथांत कांहीं विशेष दिसून येतें; ही गोष्ट आपणांस प्राचीन ग्रंथांवरून कळून येते. ज्याप्रमाणें आपणांस सृष्टींतील चमत्कारांमुळें निरनिराळे राष्ट्रांचे स्थितींत प्रत्यक्ष रीतीनें बदल झालेला दिसून येतो, त्याप्रमाणें हवा, अन्न, व जमीन या तीन कारणांमुळें जरी प्रत्यक्ष कार्यें झालेलीं दिसून येत नाहींत, तरी, त्यांच्याही योगानें निरनिराळे राष्ट्रांचे सुधारणेंत फेरफार झालेले आहेत, असें आपणांस आढळून येतें. हवा, अन्न, व जमीन या कारणांमुळें प्रत्यक्ष कार्यें घडून येत नाहींत, त्यांपासून पर्यायानें कार्यें घडून येतात, एवढ्याच गोष्टीवरून त्यांविषयीं विचार न करणें हितावह नाहीं. पर्यायांचीं कारणें हीं फार महत्त्वाचीं असतात; त्यांपासून कालगतीनें[3] परिणाम होतात, ही गोष्ट खरी आहे; तथापि, त्याच कारणांमुळें तीं बलवत्तर होतात, ही गोष्ट ध्यानांत ठेवणें अवश्य आहे.

---

१– **(अ)** बकलकृत सुधारणेचा इतिहास भाग १. पृष्ठ ३९.
**(ब)** ड्रेपर्स इंटेलेक्चुअल डेवलपमेंट आफ् युरोप भाग १. पृष्ठ ३.

२–गिझोकृत सुधारणेचा इतिहास भाग १. पृष्ठ १०७.

३–गिझोकृत सुधारणेचा इतिहास भाग १. पृष्ठ १०८.

हवा, अन्न, व जमीन हीं तीन कारणें परस्परांवर बऱ्याच रीतीनें अवलंबून आहेत, ह्मणजे एखादे देशांत जें हवेचें मान असतें, त्याचा व त्याच देशांत जें धान्य पिकतें त्याचा निकट संबंध असतो; व ज्या जमिनींत धान्य पिकतें, त्या जमिनीची समुद्राचे पृष्ठभागापासून जशी उंची किंवा खोली असेल, त्याप्रमाणें त्या उंची किंवा खोलीमुळें, किंवा वातावरणाचे मानामुळें, धान्याचे गुण व अवगुण यांत फेरफार होणार आहेत.

कोणताही देश जरी आपण घेतला, तरी, तेथें हवा, धान्य, व जमीन यांपासून धनसंचय होणें हें पहिलें कार्य होय. हें कार्य फार महत्त्वाचें आहे. ज्ञानाची जसजशी वृद्धि होते, तसतशी धनाची[१] वृद्धि होते, असें पुष्कळवेळां आपल्या अनुभवास येतें, हें खरें आहे; तथापि, देश बाल्यावस्थेंत असतां ज्ञानाची वृद्धि होण्यापूर्वीं धनाचा संचय असला पाहिजे. कारण निर्वाहाची सोय असल्याशिवाय ज्ञान संपादन करण्यास सवड होत नाहीं, व ज्ञानाची अभिरुचिही लागणें कठीण आहे. जोंपावेतों प्रत्येक मनुष्य आपले निर्वाहाचे तजविजींत गुंतला आहे तोंपावेतों जें ज्ञान सुधारणेस अवश्य आहे, तें संपादन करण्याकडे त्याचें लक्ष लागत नाहीं. यावरून हें उघड आहे कीं, प्रथम धनसंचय असला पाहिजे. धन हें निर्वाहाचें साधन आहे, व निर्वाहाचे साधनाची उणीव दूर झाल्याशिवाय ज्ञान-

---

१–धन या शब्दांत फक्त रोख पैशाचाच समावेश होतो, असें नाहीं; तर धन म्हणजे जी वस्तु दिली असतां तिजबद्दल उलट मोबदला मिळतो तें. या व्याख्येप्रमाणें हवा ही धन नाहीं. कारण हवा ही सर्वत्र असल्यामुळें, ती विक्रेय वस्तु नाहीं; म्हणजे ती आपण विकत दिली असतां आपणांस कांहीं एक किंमत मिळणार नाहीं. त्याचप्रमाणें कित्येक ठिकाणीं पाणी पुष्कळ असल्यामुळें, त्याबद्दल कांहीं मोबदला मिळत नाहीं; अशा ठिकाणीं पाणी हें धन नाहीं.

प्राप्तीसाठीं सवड सांपडणें कठीण; व ही सवड असल्याशिवाय ज्ञानसंपादन करणें सहजरीत्या होणार नाहीं.

आपण कोणताही देश जरी उदाहरणार्थ घेतला, तरी, त्यांत श्रम करणारे व श्रम न करणारे लोक आढळतात. जे श्रम करणारे ह्मणजे धनोत्पादक असतात, त्यांस आपल्या श्रमाचें जें फल मिळतें त्यावर श्रम न करणारांस ह्मणजे धनानुत्पादकांस पोसावें लागतें. श्रम करणारे लोकांजवळ जो संचय असेल, तो जर स्वतःचे पोषणापुरताच असेल, तर शिलक कांहीं न राहिल्यामुळें भांडवल जमणार नाहीं. भांडवल नसेल तर, धनानुत्पादकांचें पोषण करण्यास साधन राहणार नाहीं. परंतु जो व्यय होत असेल, त्यापेक्षां जर संचय जास्ती असेल, तर कांहीं शिलक उरेल, व दरवर्षी ही वाढत जाऊन हिचें मोठें भांडवल जमेल; व हें भांडवल धनानुत्पादकांचें पोषण करण्यास साधन होईल. ही स्थिति प्राप्त झाली ह्मणजे, कित्येक सुखानें कालक्षेप करूं लागतात; व कित्येकांस विद्येची अभिरुचि लागून उपयुक्त ज्ञान संपादन करण्याचा छंद लागतो. असें होऊं लागलें ह्मणजे देशांत विद्वान लोक तयार होण्याचा संभव असतो; कारण जो संचय झाला असेल, त्यावर त्यांस निर्वाह करण्यास सांपडून ज्या विषयाकडे सवड नसल्यामुळें लक्ष पुरवितां आलें नाहीं, त्या विषयाकडे लक्ष पुरविण्यास वेळ सांपडतो.

अज्ञानदशेंत असणारे देशांत जें धन वाढत जातें, त्याचें नियमन त्या देशांतील सृष्टपदार्थविषयक कारणांवरून बरेंच होतें; ह्मणजे सृष्टपदार्थविषयक कारणांचा जसा कमजास्ती जोर असेल, त्याप्रमाणें धनाचें मान कमी किंवा जास्ती असणार आहे. धन वाढत जाऊन त्यास भांडवलाचें रूप येऊं ला-

---

१—बकलकृत सुधारणेचा इतिहास भाग १. पृष्ठ ४२

गलें ह्मणजे दुसरीं कारणें उत्पन्न होऊन, त्यांमुळेंही धनोत्पत्ती-च्चें नियमन होऊं लागतें; परंतु ही स्थिति प्राप्त होण्यापूर्वीं धनाची वृद्धि होणें ती दोन गोष्टींवर अवलंबून असते. एक उत्साहपूर्वक व नियमित रीतीनें श्रम करणें व दुसरी श्रम सफल होण्यास सृष्टपदार्थांची विपुलता असणें. श्रमाचें जें फल मिळतें तें जमिनीच्या सुपीकतेच्या मानाप्रमाणें मिळतें. जमिनीची सुपीकता[2] ही अंशतः खताचे मिश्रणाचे प्रमाणावर, अंशतः नद्यांचे[3]

१–बकलकृत सुधारणेचा इतिहास भाग १. पृष्ठ ४२.

२–नुसतें खत जमिनींत घातल्यानें जमीन सुपीक होते, असें नाहीं; तर जमिनींत खत घालण्यापूर्वीं जमिनीचा मगदूर किती आहे, याविषयीं विचार केला पाहिजे. प्रसिद्ध ब्यारन व्हानलिवि असें म्हणतात कीं, "ज्या वेळेस जमिनींतील निरानिराळीं द्रव्यें व खत यांमध्यें परस्पर योग्य प्रमाण असतें, त्या वेळेस शेतास खत हितावह होतें; कारण या प्रमाणावर पीक अवलंबून आहे."

ज्याप्रमाणें रोग्याची शरीरप्रकृति असेल, त्याप्रमाणें त्याचे खाण्याचे पदार्थांत बदल करणें जरूर आहे; याचप्रमाणें ज्याप्रकारचें धान्य अथवा दुसरे पदार्थ जमिनींत पिकवावयाचे असतील, त्या धान्यास अथवा पदार्थांस कोणतीं द्रव्यें अवश्य आहेत, व तीं जमिनींत आहेत किंवा नाहींत, असल्यास किती आहेत व नसल्यास किती घातलीं पाहिजेत, याविषयीं प्रथम विचार करणें अगत्याचें आहे. याविषयीं विचार न केला तर एखादें खनिज द्रव्य नसल्यामुळें देखील रोप नासून जाऊन फळ मिळणार नाहीं.

३–देशांत नद्या असण्यापासून शेतीस फार उपयोग होतो. कारण जें पाणी शेतीस पुरून बाकी राहतें, तें नद्या समुद्राला नेऊन मिळवितात, व त्यामुळें त्यांचे कांठावरील प्रदेश शुष्क राहून जमिनींतील द्रव्यें कुजून जात नाहींत. नद्यांचे प्रवाहाबरोबर जो चिखल वाहत आलेला असतो, तो कधीं कधीं समुद्राकडे वाहत जातो, किंवा त्यांचे कांठावर तसाच राहतो; व हा चिखल जमत जाऊन त्या ठिकाणीं सुपीक जमिनी

पाण्यानें किंवा दुसरे स्वाभाविक कारणांनीं किंवा कालव्यांचे[१] पाण्यानें जमिनींत जो ओलावा असेल त्यावर, व अंशतः उष्ण-

---

वनतात, हें आपणांस गोदावरी, भागीरथी, नील, आमेझान वगैरे नद्यांचे कांठचे प्रदेश पाहिल्यानें समजणार आहे.

नद्यांचे पाण्याचे ओलाव्यामुळें शेतीस उपयोग होऊन त्यांचे आसपासचे प्रदेशांतील हवेची तीव्रता कांहीं अंशीं कमी असते.

१—ज्या जमिनींत जिराइती पीक होतें, त्या जमिनीची सुधारणा कालव्याचे पाण्यापासून बरीच होते. जमिनींत जें पाणी सांचून राहिलेलें असतें, व जें पिकास अपायकारक असतें, तें पाणी कालव्याचे पाण्यांत मिळून वाहून जातें. जमिनींत पाणी सांठून तींत हवा जाण्यास जो प्रतिबंध झाला असतो, तो नाहींसा झाल्यामुळें, वातावरणांतील हवा जमिनीच्या रंध्रांमधून अधीक खोल जाते; व या योगानें रोपांच्या मुळ्या खोल जातात, व त्यामुळें हवेचे द्वारें जमिनीस पुष्कळ पोषक द्रव्य मिळतें.

कालव्याचे पाण्यापासून वर सांगितलेले नफे होतात हें खरें आहे, परंतु हे नफे फार दिवस असतात असें नाहीं. कांहीं कालपर्यंत जमिनींतून दरवर्षी दोनदां किंवा तीनदांही पीक काढितां येतें. परंतु कांहीं वर्षे लोटलीं म्हणजे जमीन फारच निकस होते. ज्या जमिनींत पूर्वी गहूं पिकत होता, त्या जमिनींत तांदूळ होऊं लागला आहे, असें अनुभवांतीं समजलें आहे. याचें कारण असें आहे कीं, दोनदां अथवा तीनदां पिकें काढिल्यानें जमिनींतील खनिज द्रव्यें लवकर संपत जाऊन रोपांस जीं पोषक द्रव्यें अवश्य पाहिजेत, तीं मिळत नाहींशीं होतात. जीं द्रव्यें जमिनींत असणें जरूर आहेत, तीं जमिनींत घालण्याविषयीं योग्य तजवीज न ठेविली तर, कालव्यापासून तादृश फायदा होणार नाहीं. ज्याप्रमाणें हजारों वर्षे जमिनीपासून उत्पन्न आपणांस मिळत गेलें, त्याप्रमाणें जमिनींत पोषक द्रव्यें टाकण्याविषयीं तजवीज न करितां मिळत जाईल, हें मानणें चुकीचें आहे.

तेचे मानांवर व वातावरणांतील ओलसरपणावर अवलंबून

१–जमिनींतील द्रव्यें हीं प्रथम संयुक्त स्थितींत असतात. परंतु ओलावा, उष्णता, व वातावरणांतील हवा, यांपासून त्यांची संयुक्त स्थिति जाऊन त्यांचें पृथक्करण होतें; व ही स्थिति प्राप्त झाली म्हणजे, रोपांच्या आंगीं जी केशाकर्षण शक्ति असते, तिजमुळें तीं द्रव्यें रोपांस मिळून रोपें वाढतात.

बीजांत जीवनशक्ति असते; परंतु ती दिसून येत नाहीं. बीं जमिनींत पेरल्यानंतर उष्णता व ओलावा ह्यांचे योगानें त्यास जागृतावस्था येते; परंतु त्यास खनिज द्रव्यें वगैरे मिळालीं पाहिजेत.

२–जें पाणी झाडांस अथवा रोपांस मिळालें असतें, तें पाणी वाफेच्या रूपानें पानांचे द्वारें बाहेर जातें; परंतु पानें वातावरणांतील जो ओलावा शोषून घेतात, तो मुळ्यांपर्यंत जाऊन झाडांचें व रोपांचें पोषण होतें. वातावरणांत जो ओलावा असतो, तो सर्व ठिकाणीं सारखा असतो असें नाहीं. विषुववृत्ताजवळील प्रांतांत फार असतो; व जसजसें आपण विषुववृत्ताचे उत्तरेस अथवा दक्षिणेस ध्रुवाकडे जावें, तसतसा हा ओलावा कमी कमी होत जातो, असें आढळतें. याचें कारण असें आहे कीं, विषुववृत्ताजवळील प्रांतांत अतिशय उष्णता असल्यामुळें त्या ठिकाणीं समुद्राचे पाण्याची अथवा नद्यांचे पाण्याची त्वरित व पुष्कळ वाफ होते. विषुववृत्तापासून पलीकडे जसजसें जावें तसतशी उष्णता कमी असल्यामुळें वाफ कमी असते. त्याचप्रमाणें जे देश समुद्रापासून बरेच अंतरावर असतात तेथेंही ओलावा कमी असतो. कारण, समुद्राचे पाण्याची जी वाफ होत असते, ती समुद्राजवळील प्रदेशांतच जिरते, व तिजपासून त्या प्रांतांस मात्र फायदा होतो.

झाडें लावण्याविषयीं जें कित्येक विद्वानांचें मत आहे, त्यांतील उद्देश इतकाच आहे कीं, झाडांचीं पानें ओलावा शोषून घेऊन तो मुळ्यांपर्यंत नेऊन पोंचवितात. हा ओलावा बराच जमत गेला म्हणजे, पाझर सुटून त्याचे झरे होतात; व सभोंवतालचे प्रदेशांत ओलावा पसरून तो पुन्हा रोपांस मिळतो. झाडें हीं पर्ज्यन्याकर्षी होत; म्हणजे पर्जन्य आपलेकडे ओढून घेणें हा त्यांचा धर्म आहे. झाडांच्या पानांची राख जमि-

असते. आतां हीं जीं कारणें सांगितलीं, त्यांविषयींचे नियम समजण्यास रोपांचें स्वरूप व त्यांचे घटकावयवांचें स्वरूप कसें

---

नींत टाकिली असतां जमिनीस एका प्रकारचें पोषक द्रव्य मिळतें. झाडांवर पक्षी बसून धान्य वगैरे खाऊन टाकितात अशा झाडांच्या संबंधानें कांहीं अडचणी आहेत; परंतु तोट्यां पेक्षां नफे फार आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे.

१–कोणत्या एखाद्या रोपांत घटकावयव कोणते आहेत, हें आपणांस पाहावयाचें असल्यास, एखादें रोप अथवा त्याचा कांहीं भाग जाळला असतां, तें आपणांस समजणार आहे. जो अंश जळून जातो, तो सेंद्रिय व जो अंश जळणारा नसतो तो निरिंद्रिय होय. सेंद्रिय अंश हा मुख्यत्वेंकरून वातावरणापासून प्राप्त होतो. त्यांत चार शुद्ध पदार्थ असतात. (१) प्राणवायु (ऑक्सिजन), (२) जलोत्पादक वायु (हैड्रोजन), (३) अंगारवायु (कारबान) व (४) तार्क्ष्य (नैत्रोजन). निरिंद्रिय अंश हा जमिनीचे गर्भातून प्राप्त होतो. यांतील मुख्य शुद्ध पदार्थ ८ आहेत; १ पोटाश, २ क्षार (सोडा) ३ चुना (लाईम) ४ म्याग्निशिया, ५ प्रकाशदाम्ल (फास्फरिक आसिद) ६ सिलिसिक आसिद, ७ गंधकाम्ल (सल्फ्युरिक आसिद), ८ हरिद्वर्ण (क्लोराईन).

निरिंद्रिय अंश हा मुळ्यांचे द्वारें रोपांस मिळतो. सेंद्रिय व निरिंद्रिय हे दोन अंश मिळून रोपांचें भोज्य होतें. अंगाराम्ल (कारबानिक आसिद) हा रोपांस आवश्यक आहे. हा अंगारवायु व प्राणवायु या दोहोंचा संयोग होऊन मिळतो. नुसता अंगारवायु किंवा प्राणवायु रोपांशीं संमीलन पावत नाहीं. रोपांस अंगाराम्ल मिळाला म्हणजे, तीं अंगाराचेंच ग्रहण करितात, व प्राणवायु सोडून देतात. म्हणून आपणांस नेहमीं प्राणवायु मिळतो.

जलोत्पादक वायु व प्राणवायु हे उदकरूपानें रोपांस मिळतात; व हे दोन वायु मिळाल्यामुळें रोपांस निरनिराळे अवयव येऊं लागतात. जमिनींत जें खनिज द्रव्य असतें, त्याचें विक्लेदन म्हणजे पृथक्करण झाल्याशिवाय तें रोपांस उपयोगीं पडत नाहीं. विक्लेदन करणें हा पाण्याचा धर्म आहे, म्हणून पाणी फार महत्त्वाचें मानिलें आहे.

आहे, या घटकावयवांचा परस्परांशीं संबंध कसा आहे, व त्यापासून काय कार्य होतें, हें समजणें फार अगत्याचें आहे. शिवाय रोपांत कोणकोणते शुद्ध पदार्थ आहेत, ते कोठून प्राप्त होतात, त्यांचा रोपांशीं कसा संयोग होतो, व रोपें कोणकोणत्या द्रव्यांच्या सहायानें फार फलप्रद होतात, याविषयीं माहिती आपणांस असावी लागते. ही माहिती असल्याशिवाय शेतीची सुधारणा होणें कठीण आहे. ही माहिती जशी असावी तशी नसल्यामुळें या देशांतील जमीन दिवसेंदिवस निकस होत आहे, व जर जमिनीची मशागत झाली नाहीं तर, तिची फारच दुर्दशा होऊन शेतकरी लोकांस व त्यांबरोबर दुसरे लोकांस हाल भोगावे लागतील. ज्याप्रमाणें शेतकऱ्यांचे हातून जमिनीची निगा रहावी, त्याप्रमाणें राहत नाहीं. त्यांस जी माहिती असते, ती अगदींच सामान्य प्रतीची असते. परंतु तेवढ्याच माहितीनें पुढें निर्वाह लागण्यासारखा नाहीं. पूर्वापार जी वहिवाट चालत आलेली असते, तीस अनुसरून त्यांचें वर्तन असतें. जमिनीपासून जें उत्पन्न होतें, त्यांतील उत्तम अंश तो स्वतःकरितां ठेवितो; मध्यम अंश गुराढोरांस देतो; व भूस, राख, कोंडा, केरकचरा हीं जमिनीच्या वांट्यास येतात; व तीं ही तीस पुष्कळ व वेळच्यावेळेस मिळत नाहींत. जमिनींतील

---

अमोनिआ हा, तार्क्ष्य व जलोत्पादक वायु या दोहोंमिळून झालेला असतो. हा पावसाचे पाण्यांत स्पष्ट दिसून येतो. प्राणी व वनस्पति हीं कुजून पडत असल्यामुळें, तो वातावरणांत नेहमीं असतो. शिवाय तो ज्वालामुखी पर्वतापासूनही मिळतो. वनस्पतींस अमोनियांतील तार्क्ष्य मिळाला असतां, त्यापासून वनस्पतींच्या अंगी पौष्टिकपणा येतो, असें विद्वानांचें म्हणणें आहे.

रोपांत खनिज द्रव्य फार थोडें म्हणजे शेंकडा ५ असतें, तथापि, तें रोपांस अवश्य असून, त्यापासून कार्यही महत्त्वाचें होतें.

जीं खनिज द्रव्यें दरवर्षी नाहींशीं होतात, तीं जमिनीस पुनः मिळाल्याशिवाय जमिनीची सुपीकता राहणें कठीण. हल्लीं जी जमिनीची निकृष्टावस्था झाली आहे, तिजबद्दल सर्व दोष शेतकऱ्यांस देणें वाजवी नाहीं. कारण, जमिनीपासून जें फल मिळतें, त्याचा तो एकटाच उपभोग घेत नाहीं. या फलाचे दुसरे वांटेकरी आहेत, व तेही अंशतः दोषास पात्र आहेत.

आह्मीं जमिनीचे सुपीकतेचीं जीं कारणें वर सांगितलीं, त्यांपासून जमीन सुपीक कशी होते, याविषयीं विचार करणें हा प्रकृत ग्रंथाचा विषय नाहीं. या देशांत जमीन पुष्कळ असल्यामुळें या विषयाकडे प्राचीन आर्य लोकांस लक्ष पुरविण्याचें कारण नव्हतें; परंतु प्रस्तुतची स्थिति तशी नाहीं. या विषयाकडे या देशांतील विद्वानांचें जितकें लक्ष असणें आवश्यक आहे, तितकें लक्ष नाहीं, हें येथें सांगणें जरूर आहे. युरोपांतील व अमेरिकेंतील विद्वान लोकांनीं या विषयाविषयीं पुष्कळ विचार करून अनेक शोध केले आहेत. त्यायोगानें तिकडील जमिनीचें उत्पन्न दिवसेंदिवस वाढत आहे. जे पदार्थ पूर्वीं तिकडे पिकत नव्हते, त्यांपैकीं कांहीं आतां पिकूं लागले आहेत. आमच्यासाठीं ज्या वेळेस दुसरे लोक तयारी करून ठेवितात, त्यावेळेस केव्हां केव्हां आह्मी पुढें सरसावतों. आम्हांस दुसऱ्यानें जरी सांगितलें, तरी कित्येकवेळां आह्मी वेळेवर शुद्धीवर येत नाहीं. या देशांत निरनिराळ्या प्रकारची जमीन असल्यामुळें, कोणते नवीन पदार्थ पिकवावयाचे, याविषयीं प्रतीति पाहण्यास उत्तम साधन आहे. परंतु दुसऱ्यानें प्रतीति पाहून त्यास नफा होत असला तरी, आह्मी कित्येक वेळां जागच्या जागीं स्वस्थ असतों. आह्मीं उद्योग केला तर ज्या जिनसांची इतर देशांतील लोकांस जरुरी आहे, त्या येथें पिकवितां येतील

असें प्रतीतीअंतीं कळून आलें आहे. परंतु उद्योग करावा कोणीं? प्रतीति पहावी कोणीं? हें विपर्यांतर झालें. असो.

उत्साहपूर्वक व नियमित रीतीनें श्रम करणें हें धनसंचयाचें कारण आहे, हें आह्मीं वर सांगितलें आहे. परंतु अंगांत उत्साह व नियमितपणा असणें हें बरेच अंशीं हवेच्या मानावर अवलंबून आहे. ज्या देशांत हवा थोडीशी गरम आहे, त्या देशांतील लोकांस ज्याप्रमाणें उत्साहानें काम करितां येतें, त्याप्रमाणें उष्ण हवेंतील लोकांच्यानें उत्साहपूर्वक श्रम करवत नाहीं, हें अनुभवसिद्ध आहे. उष्ण काळांत आपल्या हातून जसे श्रम व्हावेत तसे होत नाहींत. अंगांत सुस्ती येऊन काम करण्याविषयीं उत्साह नसतो. परंतु हवेंत थंडावा येत चालला ह्मणजे, काम करण्यास अधिक हुशारी येऊन, जास्ती काम करितां येतें; ह्मणून ज्या लोकांस उत्साहपूर्वक व जास्त श्रम करावयास सांपडतें, त्या लोकांची स्थिति, ज्या लोकांस उष्णतेच्या प्रखरतेमुळें कसून व आनंदानें काम करितां येत नाहीं, त्यांचे स्थितीपेक्षां चांगली असली पाहिजे, हें उघड आहे. इतकेंच कीं, या दोन्हीही लोकांची स्थिति इतर गोष्टींमध्यें सारखी असली पाहिजे.

मनुष्याचे हातून हवेच्या मानाप्रमाणें कमजास्ती श्रम हो-

---

१–( अ ) बकल-कृत सुधारणेचा इतिहास. भाग १. पृ. ४२,४३

( ब ) आपणांस हवेंत जो फेरफार दिसून येतो, त्याचीं कारणें येणेंप्रमाणें ( १ ) सूर्याचे उष्णतेचें मान; ( २ ) देशाची अथवा त्यांतील प्रदेशाची समुद्राचे पृष्ठभागापासून उंची; ( ३ ) देशांत असणारे पर्वतांची दिशा व ज्या ठिकाणीं ते पर्वत असतील तें ठिकाण; ( ४ ) देशांत वाहणारे वायूंची दिशा; ( ५ ) जमिनीची ( शेतीचे संबंधानें ) स्थिति; ( ६ ) जमिनीचें अथवा पाण्याचें मान; ( ७ ) जमिनीचा उतार अथवा तिची चढण.

तात एवढेंच नाहीं, तर त्याचे नियमितपणाचे संवयींमध्येंही कमजास्तपणा दिसून येतो. ज्याप्रमाणें समशीतोष्ण कटिबंधांतील लोकांस एकसारखें व नियमितपणानें काम करावयास सांपडतें, त्याप्रमाणें शीत कटिबंधांतील लोकांस करावयास सांपडत नाहीं. याचें कारण उघड आहे. तें हें कीं, शीत कटिबंधांत अतिशय थंडी असल्यामुळें घराबाहेर जाऊन काम करण्यास अडचण पडते. जरी मनुष्यांस घराबाहेर जाऊन काम करण्याची इच्छा असली, तरी, तीव्र थंडीमुळें ही इच्छा जागचे जागीं राहून त्यांस घरीं बसणें भाग पडतें. यामुळें त्यांस थोडे श्रम करितां येऊन फळही थोडेंच मिळतें. त्यांस कमी श्रम करण्याची संवय लागून त्यांचे स्थितींत बदल होतो. दुसरें असें कीं, शीत कटिबंधांत ऋतुमानही चमत्कारिक असतें. पृथ्वी आपले आंसाभोंवतीं फिरत असतां, प्रत्येक फेरींत उत्तर ध्रुववृत्तापासून दक्षिण ध्रुववृत्तापर्यंत, ह्मणजे समशीतोष्ण व उष्ण कटिबंधांत, दिवस व रात्र हीं दोन्हीं रोज असतात. शीत कटिबंधांतील प्रांतांत दिवस व रात्र हीं दोन्हीं कांहीं कालपर्यंत असतात. पृथ्वीच्या आपल्या आंसाभोंवतीं बऱ्याच फेऱ्या होईपर्यंत सूर्य क्षितिजाखालीं असतो, ह्मणून तेथें सूर्यप्रकाश कांहीं कालपर्यंत मुळींच नसतो. त्याचप्रमाणें पृथ्वीच्या आपल्या आंसाभोंवतीं कांहीं फेऱ्या होत तोंपर्यंत, सूर्य क्षितिजावर असतो, त्यामुळें तेथें रात्र बिलकूल नसते. ध्रुवस्थानीं तर, सहा महिने रात्र व सहा महिने दिवस असें मान असतें. ऋतूंमध्यें हा जो चमत्कार दिसून येतो, त्यामुळें काम करणारे लोकांस कधीं थोडा वेळ व कधीं फार वेळ काम करणें भाग पडतें; कधीं कधीं तर त्यांस मुदलींच काम करावयास

---

१–गिझोकृत सुधारणेचा इतिहास. भा. १. पृ. ६८.

सांपडत नाहीं. ऋतूंविषयीं हा जो अनियमितपणा सांगितला, त्यामुळें मनुष्यांस स्वाभाविक रीतीनें अनियमितपणाच्या संवयी जडतात; व ज्यांस एकसारखें व नियमितपणानें काम करण्याची संवय लागली असते, त्यांस ज्याप्रमाणें काम करण्यास हुशारी व उत्साह हीं असतात, त्याप्रमाणें जेथें हवेचें मान अनियमित असतें, तेथील लोकांस साधारणपणें तितका उत्साह नसतो; ह्मणून त्यांचे हातून काम माफक होऊन त्यांस फलही त्याप्रमाणें माफकच मिळतें.

ज्या कारणांमुळें धनोत्पत्तीचें नियमन होतें, तीं हीं होत हें वर सांगितलेल्या विचारांवरून दिसून येईल. देश बाल्यावस्थेंत असतां मात्र, या कारणांचा फार जोर असतो. जसजशी लोकांची स्थिति सुधारते, तसतशीं दुसरीं कारणें उत्पन्न होतात, व त्यांचा वर सांगितलेल्या कारणांइतका, अथवा कधींकधीं त्यांहीपेक्षां जास्त जोर असतो. ही गोष्ट आह्मीं चांगली लक्षांत ठेविली पाहिजे. देश बाल्यावस्थेंत असतां, धनोत्पत्ति कशी होते, याविषयीं आपण विचार केला असतां, आपणांस कळून येतें कीं, ती जमीन व हवा यांजवर अवलंबून असते. आह्मीं वर सांगितलें आहे कीं, ज्याप्रमाणें जमीन असेल, त्याप्रमाणें श्रमाचें फल मिळतें; व ज्याप्रमाणें हवेचें मान असेल, त्याप्रमाणें उत्साहपूर्वक व नियमित रीतीनें काम करितां येतें, किंवा अनुत्साहानें व अनियमित रीतीनें काम करणें भाग पडतें. हा सिद्धांत कोणत्याही देशास लागू करून पाहिला असतां, त्याचा खरेपणा कळून येतो. या दोन गोष्टींपैकीं एखादे गोष्टीची अनुकूलता असल्याशिवाय, कोणत्याही देशाची सुधारणा झाली नाहीं, असें इतिहासावरून समजतें. आह्मीं जो सिद्धांत सांगितला, तो बरोबर आहे किंवा नाहीं, व दोन

गोष्टींपैकीं कोणत्या गोष्टीचे अनुकूलतेमुळें निरनिराळ्या खंडांत सुधारणा झाली, हें पहाण्यासाठीं आपण निरनिराळे खंडांविषयीं साधारण विचार करूं. प्रथम आशिया, आफ्रिका व अमेरिका या तीन खंडांविषयीं अनुक्रमें विचार करून नंतर युरोप खंडाविषयीं विचार करूं.

---

## भाग दुसरा.

**आशिया.**—ज्या ठिकाणीं जमीन चांगली असते व हवाही साधारण बरी असते, त्या ठिकाणीं मनुष्यास वाटेल तशी व्यवस्था करितां येते; तो जमिनींतून अनेक पदार्थ उत्पन्न करितो; हिंसक पशु अथवा दुसरे प्राणी यांचा नाश करून आपलें ठाणें वसवितो. सारांश अशा ठिकाणीं आपणास ज्या ज्या वस्तूंपासून उपयोग होईल असें त्यास वाटतें, त्या त्या वस्तूंपासून तो आपल्या श्रमानें व बुद्धिकौशल्यानें उपयोग करून घेतो; व या भूतलावरील सर्व पदार्थ अथवा प्राणी यांपेक्षां आपण श्रेष्ठ आहों, हें सिद्ध करून दाखवितो. परंतु ज्या ओसाड प्रदेशांत नेहमीं कडक थंडी अथवा ऊन असतें, त्या ठिकाणीं त्याची स्थिति कांहीं अंशीं चमत्कारिक असते. अशा ठिकाणीं तो कोळी, पारधी, अथवा मेंढपाळ या स्थितींत दारिद्र्यानें पीडलेला व अज्ञानानें ग्रासलेला असा दृष्टीस पडतो. सृष्टपदार्थविषयक नियमांपासून जीं कार्यें होतात, त्यांपुढें त्याचें फारसें चालत नाहीं. ही गोष्ट शेंकडों वर्षांच्या अनुभवावरून व इतिहासावरून कळून आलेली आहे. ही गोष्ट आशिया खंडास कशी लागू पडते, हें आपण पाहूं. आशिया खंडांतील उत्तर प्रदेश हा बहुतेक शीतकटिबंधांत असल्यामुळें, त्या ठिकाणीं थंडी फार; हिंवाळा वर्षांतून आठ किंवा नऊ महिने असतो. उत्तरे-

कडून थंड वारा नेहमीं वाहत असतो. तो इतक्या सोसाट्याचा असतो कीं, रोपेंही जमीनदोस्त होतात. या ठिकाणीं झाडें[1] वगैरे फारशीं दृष्टीस पडत नाहींत. येथें मुख्य वनस्पति ह्मटल्या ह्मणजे गवत व शेवाळ ह्या होत. हिंवाळ्यास सुरवात झाली ह्मणजे चोहोंकडे बर्फ[2] पसरूं लागतें. नद्या व सरोवरें हीं बर्फानें भरून जातात. आशियाखंडाचे ईशान्येकडील प्रांतांशिवाय इतर ठिकाणीं हें चोहोंकडे[3] असतें. ज्याप्रमाणें आपण जमिनीचे तुकडे पाहतों, त्याप्रमाणें येथें बर्फाचे तुकडे पसरलेले दृष्टीस पडतात, व हे उत्तरेकडून दक्षिणेकडे ढकलत ढकलत येत असल्यामुळें, मनुष्यें, श्वापदें, व पक्षी हीं दक्षिण प्रदेशांत कोठें

१–पोलर वर्ल्ड. पृष्ठ. ४.

२–ज्या वेळेस वर्फाचे तुकडे उत्तरेकडून दक्षिणेकडे येतात, त्या वेळेस त्यांची जाडी १० पासून १५ फूट असते. नंतर या तुकड्यांवर आणखी बर्फ येऊन पडतें. तें ४० पासून ५० फूट उंच असतें. पृष्ठभागावरील बर्फ उन्हानें वितळून तेथें सरोवरें बनतात.

३–आशियाचे उत्तरेकडील प्रांतांत थंडी अतिशय असल्यामुळें उत्तर महासागर हा थंडीचे दिवसांत गोठून जावा असें आपणांस वाटेल; परंतु अशी स्थिति नसते. याचें कारण असें आहे कीं, उत्तर महासागरांत जे प्रवाह नेहमीं सुरू असतात, त्यांच्या योगानें पाणी जागच्या जागीं न राहतां, इकडून तिकडे वाहत असतें. यामुळें अयनवृत्तांतील उष्णप्रवाह हे ध्रुवाकडे जातात, व ध्रुवाकडील प्रवाह हे विषुववृत्ताकडे जात असतात. याकारणामुळें सर्वत्र पाणी गोठत नाहीं. शिवाय दुसरें कारण असें आहे कीं, बर्फ हें उत्तम प्रकारचें उष्णतावाहक नाहीं. बर्फ १० पासून १५ फूट उंचीचें बनलें म्हणजे त्याचे खालचे पाण्याचें बर्फ फारच सावकाश होतें. जर खालचे पाण्याचें बर्फ जलद झालें असतें, तर प्राण्यांस उत्तर महासागरांत मुळींच राहतां आलें नसतें. परंतु या महासागरांत सील, वालरस, देवमासा हे राहतात. मासे पाण्याशिवाय राहत नाहींत, म्हणून बर्फाखालीं पाणी असलेंच पाहिजे, हें उघड आहे.

तरी निवाऱ्याचे ठिकाणीं जाऊन राहतात. ही स्थिति आठ किंवा नऊ महिने असते. या काळांत तेथें घुबडें अथवा कोल्हे यांच्या ओरडण्याशिवाय दुसरा ध्वनि क्वचित् ऐकूं येतो.

आशियाचे उत्तर प्रदेशाचा कांहीं भाग केवळ ओसाड मैदान आहे, व कांहीं भाग केवळ रान आहे. वैराण प्रदेश हा विशेष विस्तीर्ण आहे. पुष्कळ जमीन अशी असल्यामुळें, लागवडीस आलेली जमीन थोडी आहे. आलीकडे हें रान जाळण्याविषयीं प्रयत्न चालू आहे. परंतु या ठिकाणची जमीन शेतकीच्या उपयोगी पडण्यास बरींच वर्षें लोटलीं पाहिजेत. सुधारणेस ज्या गोष्टी आवश्यक, त्यांपैकीं एकीचीही अनुकूलता नसल्यामुळें येथें सुधारणा झाली नाहीं. माणसांस आपला जीव थंडीवाऱ्यापासून बचावतां बचावतां पुरे पुरेसें होतें. वाऱ्याचा सोसाटा एकसारखा चालू असतो, ह्मणून त्यांस शरीराचें रक्षण करण्यास बहुत आयास पडतात. चोहोंकडे बर्फ पसरतें यामुळें, त्यांस दुसरीकडे जाणें भाग पडतें; व त्यांस एके ठिकाणीं फार दिवस रहावयास सांपडत नाहीं, ह्मणून चांगला सं-

१—या रानांतील झाडांविषयीं हा चमत्कार दृष्टीस पडतो कीं, झाडें लावून जरी पुष्कळ वर्षें झालीं आहेत, तरीं तीं लावून फार दिवस झाले नाहींत असें वाटतें. जसजसें आपण उत्तरेकडे जावें, तसतशीं झाडें अधिकाधिक ठेंगणीं दृष्टीस पडतात. जीं झाडें उत्तर अमेरिकेंतील ग्रेटबेअर नांवाच्या सरोवराच्या कांठीं आहेत, त्यांचीं खोडें होण्यास सुमारें ४०० वर्षें लागतात. या रानाविषयीं दुसरा चमत्कार असा दृष्टीस पडतो कीं, येथें विषारी वनस्पति मुळींच नाहींत. कांटेरी झाडें फारच क्वचित्. विषारी सर्प झाडींतून सर्पटतांना दृष्टीस पडत नाहींत. अयनवृत्तांतील झाडींत पक्ष्यांचा ध्वनि जसा एकसारखा ऐकूं येतो, तसा येथें ऐकूं येत नाहीं. माकडें अथवा रावू हीं या झाडांवरून त्या झाडांवर उड्या मारितांना दिसत नाहींत.

च्चय करितां येत नाहीं. निर्वाहाची तजवीज जेमतेम झाली ह्मणजे मिळविली अशी स्थिति या ठिकाणीं[1] फार प्राचीन कालापासून आहे; ह्मणून येथील लोक दरिद्री, भोळसर, व अज्ञान आहेत. आशियाचे उत्तर प्रदेशांत अनेक जातींचे लोक राहतात. त्यांपैकीं सामोजदीज, आस्तजक, जकूत[2], तुंगुसी[3], मंडश्र्यु, व चक्चु

---

१–या ठिकाणीं अशी स्थिति असतां, मनुष्य वांचतो तरी कसा, असें उष्ण हवेंतील लोकांस वाटेल. परंतु याचें कारण असें आहे कीं, या ठिकाणीं लोंकरीचीं जनावरें पुष्कळ असल्यामुळें लोंकरीचीं वस्त्रें लोक पांघरतात, घरें ठेंगणीं बांधितात, व विस्तव पेटवून शेकत बसतात. शिवाय मनुष्याचे शरीराचा असा कांहीं चमत्कार आहे कीं, हवेंत ज्या ज्या–प्रमाणें बदल होतो, त्या त्याप्रमाणें त्याच्या संवयींत बदल होतो. या ठिकाणीं थंडी असल्यामुळें, हवेंत उष्णता कमी असते. जसजसें उष्णतेचें मान कमी होतें, तसतसें शरीरांतील उष्णतेचें मान जास्ती वाढतें. कारण हवेंतील परमाणु थंडीमुळें घन होतात. प्राणवायु फुप्फूसांत जास्ती जातो; या योगानें शरीरांतील उष्णतेचा व्यापार विशेष त्वरेनें चालू होतो, म्हणून भूक चांगली लागते; व पशुपक्ष्यांचें मांस खावयास मिळाल्यानें शरीरांत रक्ताचा संचय होऊन शरीतांत उष्णता चांगली असते.

२–जकूत, जकाहिरी व चक्चु हे मूळचे राहणारे लोक होत. हे लीना नदीच्या पूर्व प्रदेशांत राहत असत. तुंगुसी लोकांनीं यांस हाकून देऊन ते तेथें राहूं लागले. परंतु कोस्याक्स लोकांनीं तुंगुसी लोकांवर स्वाऱ्या करून त्यांचा प्रांत इ. सन १६४० त काबीज केला. जकूत लोकांचा प्रांत विस्तीर्ण असतां, त्यांची संख्या सुमारें २०००० आहे. त्यांची संपत्ति म्हटली म्हणजे घोडे. ते गाड्या वाहून उदरनिर्वाह करितात. ज्यांचे पाशीं घोडीं नसतात ते कुत्रीं बाळगतात. ते कोणत्या तरी ओढ्याचे कांठीं राहतात, व माशांवर आपली उपजीविका करितात.

३–या लोकांची संख्या ३०००० आहे; व ही देवी व दुसरे रोगानें कमी होत आहे. ज्याप्रमाणें जकूत लोकांची संपत्ति घोडे व गुरें, त्याप्रमाणें तुंगुसी लोकांची संपत्ति घोडेच आहे. ज्यांजवळ घोडे नाहींत,

हे मुख्य होत. आह्मी या सर्वांविषयींची हकीगत देत नाहीं. यांपैकीं सामोजदीज, व आस्तजक यांविषयीं मात्र हकीकत देतों. इजवरून इतर जातींचे लोकांचे स्थितीविषयीं साधारण अनुमान करितां येईल.

सामोजदीज हे रशिया व पश्चिम सायबेरिया यांमध्यें जो प्रांत आहे त्यांत राहतात. ते आपलेबरोबर रेंदियराचे कळप घेऊन पांढऱ्या समुद्राचे पूर्व किनाऱ्यापासून चतंगा नदीचे तीरापर्यंत भटकत फिरतात; अथवा ओबी व एनिसी या दोन नद्यांचे दरम्यान जीं विस्तीर्ण रानें आहेत, त्यांत पारध करून उपजीविका करितात. हे दारिद्र्यानें अगदीं पीडून गेले आहेत. कित्येकांस तर उपास काढावे लागतात. ही स्थिति फार दिवसांपासून चालू आहे. ज्याप्रमाणें या ठिकाणीं झाडें तीव्र हवेमुळें ठेंगणीं दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें लोकही ठेंगणे आहेत. त्यांस हवेपासून अतिशयित त्रास होत असल्यामुळें, व सृष्टीच्या उग्र स्वरूपामुळें जगांतील व्यवहारांत त्यांचें फारसें लक्ष नसतें. ज्याप्रमाणें सभोंवतालचा प्रदेश उदास दिसतो, त्याप्रमाणें लोकांची वृत्तिही उदासीन दिसते. त्यांस वारंवार उपास काढावे लागतात, यामुळें त्यांस मरणाचें भय फारसें वाटत नाहीं. त्यांची संपत्ति ह्मटली ह्मणजे, रेंदीयर होय. ते रेंदीयरांच्या कातड्यांचीं वस्त्रें करून थंडीपासून आपले शरीराचें संरक्षण करितात. हे लोक धर्मभोळे आहेत. ज्याप्रमाणें पूर्वीं प्रत्येक देशांत

---

ते कोळ्यांचें काम करितात. यांचा धर्म म्हटला म्हणजे शामानिजम. हे मृतांस पुरीत नाहींत. त्यांना पेट्यांत घालून त्या पेट्या दोन झाडांना टांगून ठेवितात.

१–पोलर वर्ल्ड. पृष्ठ. १९३.

२–देव आहे असें हे लोक मानितात. त्यास नम ही संज्ञा आहे. याशिवाय आणखी दैवतें आहेत. यांचें मुख्य दैवत वैगाट्स बेटांत आ-

धर्मप्रवर्तकांचें वजन असे, त्याप्रमाणें यांच्यांत तदिवी ह्मणजे पंचाक्षरी लोकांचें वजन फार आहे. रेंदीयर हरवला असतां, अथवा कोणी मनुष्य आजारी पडला असतां, ते पंचाक्षऱ्यास बोलावून त्याकडून प्रार्थना वगैरे आन्हिक करवितात. तदिबी हे, व ज्यांस एकाएकीं मरण येतें ते, अमर होऊन राहतात, असा त्यांचा समज आहे. [1]भुतें आहेत व तीं मनुष्यांस त्रास देतात, असें हे लोक मानितात. जीवंत असतां ज्याप्रमाणें आपले इष्टमित्र व्यवहार करीत असत, त्याप्रमाणें मरणानंतरही ते तसाच व्यवहार करितात, असा त्यांचा समज आहे. ते मृताचे थड[2]ग्याजवळ गाडी, भाला, स्वयंपाकाचीं भांडीं, चूल व कुऱ्हाड

---

हे. हें दगडाचें असून पुण्यांतील सोन्या म्हसोबाप्रमाणें चिंचोळें आहे. हे लोक त्याच्या आकृतीसारख्या दुसऱ्या मूर्ति करून त्यांस भजतात. ते त्यांस रेंदीयराच्या कातड्यांचा पोषाक घालितात. या लोकांत ही कुलदेवता आहेत. ते त्यांस हहे म्हणतात. जेव्हां त्यांस दैवतांचें कारण पडतें, तेव्हां त्यांस ते तंबूंत, किंवा कुरणाचे मैदानांत, किंवा नदीचे कांठावर ठेवून त्यांचे तोंडांस रक्त किंवा तेल फांसितात; व मासे अथवा मांस यांनीं भरलेलें ताट त्यांपुढें ठेवितात.

१—ते भुतांना तदेबसिओ म्हणतात. आपणांस यांपासून त्रास होऊं नये म्हणून ते पंचाक्षऱ्यास बोलावितात. तो अंगांत आणितो. तो आपले अंगांत आणण्यापूर्वीं रेंदीयराच्या कातड्याचा झगा घालतो. तो तांबडा कपडा घेऊन त्यानें आपलें तोंड व डोळे झांकतो. त्याचे पोटावर ताट चकचकत असतें. अशा थाटानें हातांत पडघम घेऊन, तो भुतांना हाका मारितो. पडघम वाजत असतांना, त्याचा शिष्य गात असतो. पडघम वाजविणें बंद झाल्यावर पंचाक्षरी मोठ्यानें किंकाळी फोडतो; व पडघम जोरानें वाजवितो. तो डोळे लाल करून व तोंडाला फेस आणून मग डेल्फि येथील पिथियाप्रमाणें बोलूं लागतो. हा ज्याप्रमाणें सांगेल, त्याप्रमाणें लोक मग उपाय करितात.

२—मृताचे नातेवाईक हे मृताचे उत्तरक्रियेच्या वेळीं व नंतर रेंदी-

असें सामान ठेवितात. एखाद्या मनुष्यानें आपला गुन्हा केला असावा, असा संशय सामोजदी यास आला असतां तो वहिमी मनुष्यास शपथ वाहण्यास सांगतो. त्याचे जवळ लांकडाच्या अथवा दगडाच्या प्रतिमा नसल्यास, तो मातीची किंवा बर्फाची प्रतिमा करून तिजजवळ वहिमी मनुष्यास घेऊन जातो; व एक कुत्रा बली देऊन तो ती प्रतिमा फोडतो; व "जर तूं गुन्हा केला असशील तर या कुत्र्याप्रमाणें मरशील," असें बोलतो. मग वहिमी मनुष्य जर खरोखर गुन्हेगार असला तर, बहुतकरून कबूल होतो.

सामोजदी लोकांविषयीं जी ही माहिती दिली, तिजवरून या लोकांची कशी स्थिति आहे हें समजणार आहे. ख्रिस्ती मिशनरी लोकांनीं व बौद्धधर्मानुयायी लोकांनीं या लोकांची सुधारणा करण्याविषयीं बहुत यत्न केले, परंतु ते सर्व निर्फळ झाले. नवीन सुधारणा करणें हें त्यांस आवडत नाहीं. जे लोक जुलमानें गांजले असतात, त्यांची ज्याप्रमाणें संशयी वृत्ति असते, त्याप्रमाणें हे लोक संशयी आहेत. या लोकांचा प्रदेश विस्तीर्ण असतां लोकसंख्या फारच कमी आहे; व तीही दिवसेंदिवस उत्तरअमेरिकेंतील इंदियन लोकांप्रमाणें कमी होत आहे.

---

यर मारून त्याची आहुती देतात. राजपुत्र अथवा मोठा मनुष्य मेला असतां ते त्याची प्रतिमा करून ती तंबूंत ठेवितात, व तिची पूजा करितात. हे लोक हा क्रम तीन वर्षें चालवितात. नंतर ते ती प्रतिमा पुरतात.

१–मोठी शपथ म्हटली म्हणजे रेंदीयराच्या नाकाची. ज्याप्रमाणें आपल्या देशांत गाय हें पवित्र जनावर मानितात, त्याप्रमाणें सायबेरियांतील निरनिराळे जातींचे लोक रेंदीयर यास पवित्र मानितात.

२–युरोप व आशिया या दोन खंडांत मिळून १०००० सामोजदीज आहेत. दांड रशियन लोक यांवर स्वाऱ्या करितात; व त्यांची कत्तल उडवितात; यामुळें त्यांची संख्या कमी होत आहे.

आतां आस्तजक लोकांविषयीं थोडें सांगून आशियाचे मध्य प्रदेशाविषयीं आपण विचार करूं.

युरोपांतील ज्या प्रवाशांनीं ओबी नदी पाहिली आहे, ते ह्मणतात कीं, पृथ्वीवर ज्या नद्या आहेत, त्यांपैकीं ओबी नदीच्या कांठचा प्रदेश फारच उदास दिसतो. हिचें पाणी गढूळ, हिच्या कांठचा प्रदेश दलदलीचा व ओसाड आहे. ह्या प्रदेशांत बगळे व बदकें यांशिवाय दुसरे प्राणी क्वचित् दृष्टीस पडतात. ह्या नदीच्या सभोंवतालच्या प्रदेशांत आस्तजक लोक राहतात. ते नदींतील मासे मारून आपली उपजीविका करितात. परंतु ज्या वेळेस वसंत ऋतूंत बर्फ वितळून नदीला पूर येतो, व पाणी चोहोंकडे मैदानभर पसरतें, त्या वेळेस आस्तजक लोकांस कोठेंतरी रानांत जाणें भाग पडतें. रानांत क्षुधा भागविण्याची त्यांस मारामार पडते. पाणी कमी होऊं लागलें ह्मणजे हे पुनः नदीच्या कांठीं आपल्या झोंपड्या बांधतात. जे फक्त मासे मारूनच निर्वाह करितात त्यांची तर फारच निकृष्टावस्था आहे. ते दरिद्री, आळशी, व व्यसनी असे आहेत. तेथील रशियन वसाहत करणारे लोक आस्तजक लोकांस माल उधार देतात व त्याबद्दल त्यांपासून मासे घेतात.

ओबी नदीच्या कांठच्या प्रदेशांतील जमीन व पाणी यांची मालकी रशियन सरकारानें आस्तजक लोकांकडे ठेविली आहे. परंतु रशियन व्यापारी हे त्यांस चैन पडूं देत नाहींत. जरी रशियन सरकारानें आलीकडे कांहीं कायदे केले आहेत, तरी व्यापारी लोकांच्या काव्यापुढें मूर्खपणाचें व अज्ञानाचें कांहीं

१–सालमन व स्टर्जिअन हे मासे त्यांचें धन होय; व येणेंकरून ते कराची अथवा कर्जाची भरपाई करितात; किंवा ऐषआरामाचे पदार्थ विकत घेतात. जे साधारण मासे असतील, ते ते आपणांकरितां व आपल्या इमानी कुत्र्यांकरितां ठेवितात. बहुधा ते हे मासे कच्चेच खातात.

चालत नाहीं. हिंवाळा लागला ह्मणजे आर्टिक महासागरांतून जो वाऱ्याचा सोसाटा चालला असतो, त्यापासून आपला बचाव करावयासाठीं आस्तजक लोक रानांत जाऊन राहतात. तेथें ते खज्या वगैरे प्राणी मारून आपला निर्वाह करितात. परंतु त्यांचें मुख्य भक्ष्य मासे असल्यामुळें, ते माशांचा संग्रह अगोदरच करून ठेवितात. दक्षिणेकडील प्रदेशांत जे आस्तजक जाऊन राहिले आहेत ते जमीन नांगरतात; गुरें राखतात; किंवा गाड्या वाहून निर्वाह करितात. ज्याप्रमाणें सामोजदी लोकांस सुधारणा करण्याचें आवडत नाहीं, त्याप्रमाणें आस्तजक लोकांसही सुधारणा करण्याचें आवडत नाहीं. त्यांस वाटतें कीं, आपल्या मुलांस लिहितां वाचतां येऊं लागलें ह्मणजे, त्यांची वृत्ति आपल्यासारखी राहणार नाहीं. ते आपणांस ह्यातारपणीं पोसणार नाहींत. तंटे वगैरे उपस्थित झाले असतां, स्टार्शिना ह्मणजे वडील माणूस हा त्यांचा निकाल करितो. स्टार्शिनाचा ठराव पक्षकारांस पसंत न पडल्यास पक्षकार राजपुत्राला[1] हकीकत कळवितात. हे राजपुत्र मोठे श्रीमंत असतात

---

१–राजपुत्र हा किताब रशियाची चक्रवर्तिनी दुसरी क्याथराईन हिनें दिला आहे. रशियन कामगार जें सांगतील, तें त्यांस ऐकावें लागतें. आवडोर्स्क व वरिसो या ठिकाणीं ज्या वेळेस जत्रा भरते, त्या वेळेस त्यांस हजर राहवें लागतें. कारण, आस्तजक लोकांस जी लोंकरीची खंडणी दरवर्षी रशियन सरकारास द्यावी लागते, तिजबद्दलची जबाबदारी राजपुत्रांवर असते.

आवडोर्स्क येथें जी जत्रा भरते, ती हिंवाळ्यास सुरवात झाली म्हणजे भरूं लागते. ती फेब्रुआरी महिन्यापर्यंत असते. सरकारास खंडणीबद्दल जी लोंकर द्यावी लागते, ती दिल्याशिवाय अथवा हमी दिल्याशिवाय सरकार जत्रा सुरू करूं देत नाहीं. आस्तजक लोक रेंदीयराचीं कातडीं, मांस, स्टरजिअन मासे वगैरे जिनसा देऊन, कणीक, भाकरी,

अथवा त्यांचा पोषाक उत्तम असतो असें नाहीं. तेथील इतर लोकांप्रमाणेंच त्यांची राहण्याची वगैरे रीत असते; व त्यांस रोजच्या निर्वाहाकरितां पारध करावी लागते; किंवा मासे मारण्यासाठीं खटपट करावी लागते.

बाप मोठा श्रीमंत असेल तर, ५० रेंदीयर घेतल्याशिवाय तो आपली मुलगी वरास देत नाहीं. कोळी लोक तर कोणी थोड्या खड्या दिल्या ह्मणजे, त्यास आपली मुलगी देतात.

अशी ज्या ठिकाणीं स्थिति आहे, तेथें लोकांची अवस्था कशी असेल, याची सहज कल्पना करितां येईल. ज्याप्रमाणें सामोजदी लोकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे, त्याप्रमाणें यांचीही होत आहे. देश ओसाड असल्यामुळें जेथें निर्वाहाची पंचाईत पडते, तेथें सुधारणा होणें किती कठीण आहे हें वरील हकीकतीवरून समजेल. दारिद्र्यापासून अज्ञान, अज्ञानापासून भोळसरपणा, असे अनेक परिणाम होऊन, या प्रदेशांतील लोकांची अतिशयित निकृष्टावस्था झाली आहे. जोंपावेतों आस्तजक, सामोजदीज, अथवा जकुत लोक हे सृष्टपदार्थविषयक नियमांचा जोर कमी करण्याविषयीं यत्न न करितां, याच प्रदेशांत राहतील, तोंपावेतों त्यांची कधींही सुधारणा व्हावयाची नाहीं. जोंपावेतों मंडश्च्यु लोक याच प्रदेशांत रहात होते, तोंपावेतों, त्यांची ही निकृष्टावस्था होती. परंतु त्यांनीं सत्रावे शतकांत चीन देशावर स्वाऱ्या करून तो [1] काबीज केला.

---

तंबाखू, भांडीं, सुऱ्या, चाकू, सुया, कांचेचे मणी वगैरे जिनसा खरेदी करितात. फेब्रुआरी महिना संपल्यावर आस्तजक लोक पुनः रानांत जातात व पारध वगैरे व्यवसाय सुरू करितात.

१–मंडश्च्यु लोकांचा बादशहा हा इ० स० १६४४ त चीनच्या गादीवर बसला.

स्वदेशांत असतां, ज्या लोकांचें रशियन लोकांपुढें चालत नसे, ते लोक ४० कोट लोकांवर सत्ता चालवीत आहेत. ही आश्चर्याची गोष्ट आहे, असें कित्येकांस प्रथमदर्शनीं वाटेल. परंतु विचार केला असतां, यांत फारसें आश्चर्य नाहीं, असें दिसून येईल. कारण, त्यांस सृष्टपदार्थविषयक नियमांचे व्यापारामुळें उत्साह व हिंमत यांचा तादृश उपयोग होत नसे. स्वदेशांतील जमीन ओसाड असल्यामुळें, त्यांस निर्वाहाची पंचाईत पडे; व यामुळें त्यांस सुधारणा करण्यास अडचण येत असे. परंतु चीन देशांत जमीन सुपीक असल्यामुळें, त्यांस या ठिकाणीं सुधारणा करण्यास फारसे आयास पडले नाहींत. स्वदेशांत असतां, त्यांस लिहितां वाचतां देखील येत नसे; परंतु हल्लीं पेकिनचे दरबारांत त्यांची भाषा चालू आहे, व या भाषेंत अनेक ग्रंथ होऊं लागले आहेत. अस्तु. या एकंदर हकिकतीवरून आशियाचे उत्तर प्रदेशांतील लोकांची सुधारणा कां झाली नाहीं व या ठिकाणीं जोंपावेतों सृष्टपदार्थविषयक नियमांचा असाच अम्मल राहील, तोंपावेतों सुधारणा होण्याचा संभव किती आहे, हें लक्षांत येईल. हा प्रांत रशियन लोकांनीं काबीज केल्यास बरींच वर्षें झालीं, परंतु मूळच्या लोकांची फार दिवसांपासून जी स्थिति होती, तींत तादृश बदल झाला नाहीं, एवढें सांगून आशिया खंडाचे मध्यप्रदेशाची स्थिति कशी आहे हें आह्मी सांगावयास लागतों.

आशियाचा मध्यप्रदेश हा उंचवट्याचें मैदान आहे. यांत चिनी तार्तरी, स्वतंत्र तार्तरी, तिबेट[१], इराण, आफगाणिस्तान,

---

१–तिबेटाचें मैदान हें समुद्राचे पृष्ठभागापासून १५००० पासून १६००० फूट उंच आहे; आफगाणिस्तानचें ६५०० फूट उंच आहे; व इराणचें ३००० पासून ४००० पर्यंत आहे. उंचवट्याचीं मैदानें हीं

व अरबस्तान हे देश आहेत. हा प्रदेश विस्तीर्ण असून यांत लोकसंख्या फारच थोडी आहे. या प्रदेशांत सुपीक जमीन थोडे ठिकाणीं आहे. बहुतेक प्रदेश डोंगराळ आहे. कित्येक ठिकाणीं विस्तीर्ण रानें आहेत; यामुळें लोकांस परस्परांशीं दळणवळण ठेवण्यास फार अडचण आहे. या प्रदेशाविषयीं

---

बहुतकरून देशाचे मध्यभागीं असतात. यांस बहुधा पर्वतांच्या रांगांचा आश्रय असतो. वर जीं मैदानें सांगितलीं तशीं इतर ठिकाणीं आहेत. दक्षिण अमेरिकेंत किटो, टिटिकाका, व पास्को; उत्तर अमेरिकेंत अट्टा; आफ्रिकेंत साहारा व आबिसिनिया; व युरोपांत स्पेन, बाव्हेरिया व नार्वेचा दक्षिण प्रदेश. पर्वतांपासून वातावरण व वनस्पति यांवर जें कार्य होतें तेंच कार्य उंचवट्याचे मैदानांपासून होतें; म्हणजे जे प्रदेश अशा मैदानांवर असतात तेथील हवा त्याच प्रदेशांचे अक्षवृत्तावर असणाऱ्या प्रदेशांपेक्षां थंड असते.

१–चिनी तार्तरी या देशाची लांबी १८०० मैल आहे; परंतु लोकसंख्या ६० पासून ७० लाख आहे. स्वतंत्र तार्तरीची दक्षिणोत्तर लांबी १५०० मैल व पूर्वपश्चिम रुंदी १००० मैल आहे; परंतु लोकसंख्या ६० लाख आहे.

२–मध्य आशियाविषयींची जी माहिती रशियन प्रवाशांनीं प्रसिद्ध केली, ती फारच अपुरती आहे. चिनी लोकांपासून या प्रदेशाविषयीं माहिती मिळावयाची; परंतु ही माहिती चिनी लोकांच्या संशयी स्वभावामुळें व अज्ञानामुळें उपलब्ध होणें कठीण आहे. मार्कोपोलो यानें या प्रदेशांत १३ वे शतकाचे शेवटीं प्रवास करून बरीच माहिती प्रसिद्ध केली आहे. आलीकडे जरबिलान, बेल व पालस यांनीं या प्रदेशांत जाऊन आपले प्रवासाविषयीं हकीकत दिली आहे, तथापि, या विस्तीर्ण प्रदेशाविषयीं बरीच माहिती मिळावयाची राहिली आहे. व्हांबेरी साहेब यांनीं या प्रदेशांत प्रवास करून बरीच माहिती मिळविली; परंतु हिजपासून शास्त्रीय विषयास तादृश मदत होत नाहीं. रशियन लोक हिंदुस्थानाकडे हळूहळू येत चालले आहेत व त्यांस प्रतिबंध न केला तर, ते हिंदुस्थानावर येतील हें दाखविण्याचे हेतूनें ही

जशी माहिती पाहिजे, तशी जरी मिळत नाहीं, तरी, जी उपलब्ध आहे, तिजवरून या प्रदेशांतील सुधारणेविषयीं साधारण अनुमान करितां येईल. चिनी तार्तरी हा प्रदेश बहुतकरून ओसाड आहे. यांत गोबीचें[1] विस्तीर्ण रान आहे. यांत मधून मधून सुपीक प्रदेश आहे; परंतु तो फारच थोडा. या सुपीक प्रदेशाशिवाय बाकीच्या ठिकाणीं गवत उगवतें. हें चांगलेंसें नसतें. यांत सरोवरें व झरे आहेत. परंतु जमीन खारट असल्यामुळें पाणी इतकें खारट आहे कीं, तें पिण्याचे उपयोगीं नाहीं. याच रानाचे कांहीं भागांत नुसती वाळू आहे; व कांहीं ठिकाणीं मीठ आहे. या रानांतून जाण्यास वाहन उंट होय. चिनी तार्तरी व दक्षिण युरोपांतील प्रांत हे जरी एकाच अक्षवृत्तावर आहेत,

---

मिळविली आहे. नुकतेंच जें सीमा ठरविण्यासाठीं कमिशन बसलें होतें, त्यानें बरीच माहिती मिळविली असावी. ही माहिती प्रसिद्ध झाली असतां बराच उपयोग होईल. ही माहिती मिळविण्याचें श्रेय हिंदुलोकांपैकीं कोणी घेईल काय? या प्रदेशांतच आर्य लोकांचें मूळचें ठिकाण होतें, असें आलीकडील पंडित म्हणतात. मूळ ठिकाणाविषयीं माहिती असणें किती आवश्यक आहे, हें सांगावयास नको. ही माहिती मिळण्यासाठीं परदेशीय लोकांचे तोंडाकडे पहात बसण्यापेक्षां आमच्यांपैकीं कांहींनीं हिंमत धरून माहिती मिळविण्याचा उद्योग करणें हें फार अगत्याचें आहे.

१—गोबीचें रान १५०० मैल लांब आहे; व त्याची रुंदी पांच पासून सातशें मैल आहे. गोबी यास शमो हेंही नांव आहे. गोबी हा मांगोलियन शब्द आहे. याचा अर्थ रान असा आहे. शमो हा चिनी भाषेंतला शब्द आहे. याचा अर्थ वाळूचा समुद्र. हें रान समुद्राचे पृष्ठभागापासून फार उंच असल्यामुळें व विषुववृत्तापासून फार लांब असल्यामुळें आफ्रिकेंतील साहारा अथवा अरबस्तानांतील रान यांप्रमाणें येथें उष्णता नाहीं.

तरी, ज्याप्रमाणें युरोपाचे उत्तरेकडील प्रांतांत थंडी असते, त्याप्रमाणें या ठिकाणीं थंडी असते. चिनी तार्तरी हा प्रदेश रुक्ष आहे. या ठिकाणीं पाऊस क्वचित् पडतो. यामुळें येथील लोकांस जमिनीचे उत्पन्नावर निर्वाह करण्यास अडचण आहे. जमिनींत गुरांच्या उपयोगी चारा मात्र उगवतो; ह्मणून लोक मेंढ्यांचे कळप राखून आपला निर्वाह करितात; किंवा पारध करून उपजीविका करितात. त्यांस प्रसंग पडल्यास घोड्याचें व उंटाचें मांस खाऊन रहावें लागतें. एके ठिकाणचा चारा सरला असतां, अथवा पारधीचीं जनावरें खलास झालीं असतां, लोकांस स्थलांतर करावें लागतें. यामुळें त्यांस फार दिवसांपासून भटकण्याच्या संवयी लागल्या आहेत. शेतीवर निर्वाह करण्यास बरोबर साधन नसल्यामुळें, येथील लोकांचें लक्ष शेतीकडे नाहीं. या देशांत फारशीं शहरें नाहींत. याचेंही कारण हेंच आहे. लोकांस श्रमानें निर्वाह करणें भाग पडत असल्यामुळें ते सशक्त आहेत; व पारध करणें धोक्याचें काम असल्यामुळें, व पारधीवर निर्वाह करणें जरूर पडतें ह्मणून, लोकांचे आंगीं धीटपणा स्वाभाविक रीतीनें आहे. जरी सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें त्या लोकांत हे गुण आहेत, तरी, त्याच नियमांमुळें धनसंचय होत नाहीं; यामुळें लोक रानटी स्थितींत आहेत.

आह्मीं चिनई तार्तरीविषयीं जी ही हकीकत सांगितली, तिजप्रमाणें स्वतंत्र तार्तरीची स्थिति आहे. हा प्रांत इतिहासांत विशेष प्रसिद्ध आहे. या प्रदेशांत प्राचीन काळीं इराणी लोकांचा अंमल होता. त्यानंतर ग्रीक लोकांनीं हा प्रांत काबीज केला. जंगीजखान व टायमरलेन यांनीं या ठिकाणीं राज्य स्थापन केलें. इराणी लोकांचा धर्मसंस्थापक झोरोआस्टर हा बाक्ट्रिआनांत जन्मला. स्वतंत्र तार्तरी यांत विस्तीर्ण व रुक्ष

मैदानें आहेत. कांहीं ठिकाणीं दऱ्या, टेंकड्या व उंच पर्वत आहेत. शेतीचे उपयोगी जमीन थोडी आहे. पाण्याचा जसा पुरवठा असावा तसा नसल्यामुळें शेतीचें काम चालवितां येत नाहीं. या ठिकाणचे मूळचे लोक ताजिक[२] हे होत. तार्तर लोकांनीं त्यांस सहावे शतकांत जिंकिले; व त्यांचे प्रदेशास तार्तरी हें नांव दिलें. याच प्रांतांतून तार्तर लोकांच्या सैन्याच्या टोळ्या चोहोंकडे जाऊन त्यांनीं प्रांतांचे प्रांत उद्वस्त केले. तार्तर लोक हे भटकणारे आहेत. ज्या ठिकाणीं हे वास करितात, त्या ठिकाणीं ते पारधीवर निर्वाह करून अथवा धनगर बनून राहतात. भटकण्याचे संवयीमुळें त्यांस स्वस्थपणें बसून काम करण्याची इच्छा नसते. त्यांचा काळ मेंढ्यांचे व गुरांचे कळपांविषयीं व्यवस्था करण्यांत व घोड्याची व पारधीची तर्तूद ठेवण्यांत जातो. ज्या अर्थीं हे शेतीवगैरे करीत नाहींत त्या अर्थीं त्यांस पारध करून निर्वाह करावा लागतो. "ज्या ठिकाणीं धोका तें ठिकाण यशाचें स्थान होय; पारध करण्यास विशेष धैर्य लागतें ह्मणून अशा स्थितींत मनुष्यांस लढाईचें सहजच शिक्षण मिळतें," असें जें

१– आशियांतील मैदानांस स्टेपी म्हणतात. या रुक्ष मैदानांविषयीं विख्यात आलेक्झांदर व्हान हमबोल्ट म्हणतो कीं, ज्याप्रमाणें अफाट समुद्र पाहून मनुष्याचे मनांत भूतलाचे अमर्यादपणाविषयीं कल्पना येते, त्याप्रमाणें हें स्टेपी पाहून तीच कल्पना येते. समुद्रांतील मासे वगैरे प्राणी, व पर्वतप्राय लाटा पाहून मनास कांहीं तरी आनंद वाटतो; परंतु एखादा तारा तुटून त्याचा चुराडा व्हावा व तो ज्याप्रमाणें विशोभित दिसावा त्याप्रमाणें स्टेपी हें भणभणीत व ओसाड दिसतें.

युरोपांतीलही मैदानांस स्टेपी ही संज्ञा आहे. या मैदानांत नेदरलंड ( समुद्राचे पृष्ठभागाखालचा प्रदेश ), डेनमार्क, जर्मनीचा उत्तरप्रदेश, व रशिया या देशांचा समावेश होतो.

२– उत्तरेकडील प्रांतांत किरगुसी हे राहतात; व दक्षिणेकडे उजबेक हे राहतात.

गिबन साहेब यांनीं ह्मटलें आहे तें यथार्थ आहे. हें शिक्षण तार्तर लोकांस मिळाल्यामुळें ते शूरत्वाविषयीं प्रसिद्ध आहेत. हे जोंपावेतों स्वदेशांत होते, तोंपावेतों त्यांची फारशी सुधारणा झाली नाहीं; परंतु त्यांनीं निरनिराळे वेळीं सायबेरीया, चीन, युरोप, व हिंदुस्थान, यांवर स्वाऱ्या करून धन संपादन केलें; व जसजसा धनाचा संचय होत गेला, तसतशी त्यांस सुधारणा करितां आली. जंगीजखानाचा अंमल होण्यापूर्वीं, तार्तरी देशांत नांव घेण्यासारखें एकही शहर नव्हतें. जंगीजखान व तैमूरलंग यांनींच समरकंद शहरास रंगरूपास आणिलें. यांचेच कारकीर्दींत स्वतंत्र तार्तरींत जे प्रदेश मोडत त्यांत कांहीं सुधारणा असे. फार्शी व अरबी भाषांचा उत्कर्षही यांचेच कारकीर्दींत होऊं लागला. तैमूरलंगाचा नातू उलूकबेग हा मोठा जोतिषी होता; व खरिसमचा स्त्रान हा इतिहासकार होता. यांचे वेळची सुधारणा आतां दिसत नाहीं. विद्येची अभिरुचि प्रस्तुतचे तार्तर लोकांस नाहीं. ते मूळपदाकडे हळूहळू ढकलत चालले आहेत.

आतां अरबस्तानाविषयीं थोडक्यांत माहिती सांगून, मध्य आशियाविषयींचा विचार पुरा करूं. तिबेट[1] व आफगाणिस्तान[2]

---

१–पृथ्वीचे पाठीवर जे देश आहेत त्यांपैकीं तिबेट देशाचा देखावा चमत्कारिक आहे. बहुतेक ठिकाणीं डोंगर व रानें हीं दृष्टीस पडतात. यावरून या देशावर ईश्वरी अवकृपाच आहे कीं काय असा भास होतो. हा प्रांत चिनी सरकारचे ताब्यांत आहे. या देशाचे इतिहासांत विशेष अशी कांहींच गोष्ट दिसून येत नाहीं. या देशाकडे राज्यकारस्थानी पुरुषांचें लक्ष आजपावेतों गेलें नाहीं. आलीकडे यावर व्यापारी लोकांचा डोळा आहे.

२–आफगाणिस्तानांत सीस्तनचें मोठें रान आहे. हें अरबस्तानांतील रानाप्रमाणेंच आहे. आफगाणिस्तान व बलुचिस्तान हे देश सम-

यांविषयीं विशेष विचार करण्याचें कारण नाहीं. कारण, वर जें सांगितलें आहे त्यावरून साधारण अनुमान करितां येईल.

अरबस्तान देशाचा कांहीं प्रदेश सुपीक आहे; तथापि, ब-हुतेक भाग ओसाड रान आहे. हें रान नुसतें सपाट मैदान आहे असें नाहीं. कांहीं ठिकाणीं पर्वतांच्या रांगा आहेत. या देशांत पाण्याचें फारच दुर्भिक्ष आहे. वर्षोंचीं वर्षें पावसावांचून कोरडीं जातात. यामुळें नद्यांना पाणी नसतें. नद्या ह्मणण्यासा-रख्या फार आहेत असें नाहीं. ज्या आहेत त्यांतील मोठ्या

---

शीतोष्ण कटिबंधांत आहेत. म्हणून या ठिकाणीं हवेचें मान चांगलें अ-सावें, परंतु उंचवट्याचे प्रदेशांत थंडी मनस्वी असते; व शहरांत उष्णता ही तितकी असते. उंचवट्याचे पूर्व प्रदेशांत जीं उघाडीचीं मैदानें आहेत त्या ठिकाणीं, जगांतील अतिशय उष्ण प्रदेशांत जितकी उष्णता असते, तितकी उष्णता असते; व थंडीच्या दिवसांत कित्येक महिनेपर्यंत जमि-नीवर बर्फ असतें. आफगाणिस्तान देश हा फ्रान्स देशाएवढा आहे. याचा चार पंचमांश भाग खडकाळ व डोंगराळ आहे. येथून परदेशास पाठविण्यासारखी मोठी जिन्नस लोंकर आहे. जर हा प्रांत सुपीक असता, तर यावर परराजांच्या उड्या पडून तो परतंत्र झाला असता; परंतु या ठिकाणीं कांहीं पिकत नसल्यामुळें, या प्रांतावर स्वारी करून तो निरंतर हस्तगत करण्याचें कोणाचे मनांत येत नाहीं. इंग्लिश लो-कांनीं हा प्रांत इ. स. १८३९ त काबीज केला होता; व पुनः १८७९ त काबीज केला; परंतु या देशापासून फारसा फायदा न होतां उलट तोटा होईल असें त्यांस वाटलें. हा प्रांत शेतीचे उपयोगी नाहीं. ह्यांत कांहीं फळफळावळ व जवस वगैरे कांहीं धान्यें पिकतात. या ठिकाणीं व्यापार फार थोडा आहे. कारण, या ठिकाणीं कांहींच पिकत नाहीं; व प्रदेश खडकाळ असल्यामुळें व्यापार चालण्यासही त्रास पडतो. उंट व खेचरें हीं व्यापाराच्या जिनसा नेण्याचीं व आणण्याचीं साधनें होत. परंतु लो-कांजवळ धनाचा संचय नसल्यामुळें लोक उंट व खेचरें भाड्यानें देतात. तात्पर्य, आफगाणिस्तानाचा जो उपयोग आहे, तो हिंदुस्थानाच्या सरह-द्दीच्या संबंधानें आहे.

नदीची लांबी २०० मैल आहे. पावसाळ्यांत मात्र येथील नद्यांना पाणी असतें. पावसाळा संपून गेल्यावर व हवेंतील गारठा मोडल्यावर त्यांचें पाणी आटून जातें. मग ज्या थोड्या विहिरी डोंगराजवळ आहेत, त्यांवर लोकांस गुजारा करावा लागतो. गवतानें व झाडपाल्यानें हिरवी जागा थोडे ठिकाणीं दृष्टीस पडते; व ही नसती तर, अरबस्तानचे बरेच भागांत वस्ती नसती. अरबस्तानांतील मध्य प्रदेश हा केवळ रान आहे. ज्याप्रमाणें आफ्रिकेंत साहारा व इराणांत खारट रान, त्याप्रमाणें अरबस्तानांतील हें रान होय. या रानांत मधून मधून हिरवळीच्या जागा आहेत; परंतु बाकीचा भाग वालुकामय आहे. जेव्हां ही वाळू सूर्यकिरणांनीं तापते, तेव्हां या प्रदेशांतून प्रवास करणें किती त्रासदायक आहे याविषयीं कल्पना करितां येईल. रानामधून चाललें असतां, कित्येक दिवसपर्यंत विहीर दृष्टीस पडत नाहीं; किंवा डोळ्यांला लावायाला पाणी, किंवा बसावयाला सावली मिळत नाहीं; एवढेच प्रवाशाचे हाल होतात असें नाहीं. वारा[1] सुटून वाळूचे कण डोळ्यांत जातात व ते अंगाला सपासप लागून शरीराचे हाल होतात. याविषयीं डाक्टर शा असें ह्मणतो कीं, ज्या वेळेस या रानांतील वाऱ्यामुळें वाळू उसळते, त्या वेळेस क्षुब्ध समुद्राप्रमाणें देखावा दिसतो. वाळू उसळून पर्वतासारखे ढीग होतात; व व्यापाराकरितां रानांतून प्रवास करणारे लोक त्याखालीं दबून जातात. या उष्ण[2] वाऱ्याचा जोर इतका असतो कीं, प्रवाशांना रानांतून जातां येत नाहीं; नद्यांतून नावा चालत

---

१–या वाऱ्यास सायमूम म्हणतात. हा वारा सुटण्यापूर्वीं हवेंत तांबडेपणा दिसूं लागतो.

२–वंडर्स आफ् दी वर्ल्ड ( सृष्टींतील चमत्कार ) पृष्ठें. २७४, २७५, २७६.

नाहींत; व तोंड जरी मिटून धरिलें, तरी, प्रवाशांच्या तोंडांत वाळू गेल्याशिवाय राहत नाहीं; या वाऱ्यानें झाडांचीं पानें करपून जातात व घास जिरून जाऊन लागलींच मनुष्यांस ताप येतो. केव्हां केव्हां सायमूमशिवाय दुसरा उष्ण वारा वाहत असतो. यास अरब लोक सामियल ह्मणतात. याविषयीं प्रसिद्ध प्रवाशी व फ्रेंच राजाचे पुस्तकालयाचा रक्षक एम् थिवनाट असें सांगतो कीं, १७ वें शतक संपण्याचे सुमारास मी सुएझचे आखातापासून केरोकडे जात असतां, या वाऱ्यापासून मला फार त्रास झाला. हा एक दिवसपर्यंत चालू होता. लोक आदले वर्षीं मक्केच्या यात्रेस जात असतां त्यांपैकीं २००० लोक एका रात्रींत या वाऱ्यानें मेले. या ठिकाणीं कोणी राहत नाहीं असें नाहीं. या रानांत बिडौन हे लोक राहतात. जरी त्यांस रानांत राहून चांगल्या रीतीनें निर्वाह करावयास सांपडत नाहीं, तरी त्यांस स्वतंत्रतेनें रहावयास सांपडतें यामुळें, ते मोठ्या आनंदांत असतात. रान सोडून दुसरे ठिकाणीं त्यांस जावेंसें वाटत नाहीं. त्यांस लुटालूट करण्याचें वाईट वाटत नाहीं. लुटालूट करून निर्वाह करणें हें धोक्याचें काम आहे. ह्मणून त्यांचे आंगीं धीटपणा स्वभावतः आहे. त्यांस रानांतून जातांना कित्येक वेळां उपास काढावे लागतात. उदरनिर्वाहाचे पदार्थ मिळण्याचे अनिश्चितपणामुळें, व रानांतील पारधीवर राहण्याचे संवयीमुळें त्यांस मृत्यूचें फारसें भय वाटत नाहीं. या प्रांतांत

१–या ठिकाणीं दोन प्रकारचे लोक राहतात. खेड्याचे लोक व रानचे लोक. खेड्याचे लोक शेती व व्यापार करून असतात; व रानचे लोक गुरांचे कळप राखून अथवा लुटालूट करून अथवा पारध करून निर्वाह करितात. त्यांचा असा समज आहे कीं, "मुकुटांच्या ऐवजीं पागोटीं, भिंती व किल्ले यांबद्दल तंबू, लंदकांबद्दल तरवार, कायद्याऐवजीं कविता, हीं आपल्या वांट्यास आलीं आहेत."

बिडौन लोकांस उंट फार उपयोगी पडतो; व त्यांस उंटाच्या योगानें आपली स्वतंत्रता कायम ठेवितां येते. लोकर व समुद्रांतील मासे यांमुळें आशिया व उत्तर अमेरिका ह्यांच्या उत्तर प्रदेशांतील लोकांची स्वतंत्रता जाऊन त्यांस आतां दास्यांत रहावें लागत आहे. परंतु अरबस्तानच्या ओसाड व भणभणीत रानांत कांहींच पिकत नसल्यामुळें, लोकांची स्वतंत्रता कायम आहे. पूर्वीं अरबस्तानदेश परदेशाचे सत्तेखालीं गेल्याचें इतिहासावरून दिसत नाहीं. सेसॉस्टिस्, सायरस, पांपी, व ट्रेजन यांनीं अरबस्तान जिंकण्याविषयीं यत्न केला; व त्याचा कांहीं भाग लुटून फस्त केला; परंतु त्यांस जिंकितां आला नाहीं. शिकंदर बादशहानें खिस्ती शकापूर्वीं ३२३ त या प्रांतावर स्वारी करण्याचें मनांत आणून तयारी चालविली होती; परंतु त्याचे अकालिक मरणानें ह्या स्वारीचा बेत तसाच राहिला. जरी या स्वारींत त्यास यश आलें असतें, तरी त्यास तादृश फायदा झाला नसता. अशा प्रकारें सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें अरब लोकांची फार दिवसपर्यंत स्वतंत्रता कायम राहिली. अरबलोक हालअपेष्टा सोसून आपल्या प्रदेशांत रहावयास तयार आहेत, ह्मणून त्यांस स्वतंत्रतेचा उपभोग घेतां येतो. सर जान माल्कम या प्रांताविषयीं असें ह्मणतो कीं, "जे लोक उपास व हालअपेष्टा सोसून आयुष्यक्रमण करण्यास कबूल असतात, त्यांस स्वातंत्र्य निश्चयेंकरून मिळतें. रानें व पर्वत हीं स्वतंत्र व शूर लोकांचीं वसतिस्थानें होत; जे अशा ठिकाणीं राहण्यास खुषी असतात, त्यांवर हल्ला क्वचित् येतो; कारण महत्त्वाकांक्षी लोकांस धन व वैभव यांची इच्छा असते. ज्या देशांत कितीही श्रम केले तरी, ह्मणण्यासारखें धन मिळणार नाहीं, अथवा ज्या ठिकाणचे लोक कधींही गुलामासारखे नम्र असावयाचे नाहींत, तो देश

कावीज करून महत्त्वाकांक्षी लोकांचें समाधान होणार नाहीं." अरब लोकांचा मुलूख केवळ ओसाड असल्यामुळें परराज्याचे हल्ले येत नाहींत, असें समजायाचें नाहीं, तर ज्यांस कळप राखून निर्वाह करावा लागतो, ते लोक उत्तम शिपाई बनतात, असें प्रसिद्ध इतिहासकार गिबन यानें जें ह्मटलें आहे, तें अरब लोकांस लागू पडतें; व त्यांचे शूरत्वामुळें त्यांवर परराष्ट्रांना हल्ला करावा, असें वाटत नसेल असेंही समजलें पाहिजे. आतां सृष्टपदार्थविषयक नियमांचे वैशिष्ट्यामुळें, जरी त्यांचे आंगीं शूरत्व, धिमेपणा वगैरे गुण उत्तम वास करीत आहेत, तरी त्याच नियमांमुळें त्यांच्या कांहीं चमत्कारिक समजुती झाल्या आहेत; व त्या समजुतींमुळें त्यांचें व इतर लोकांचें नुकसान झालें, व अद्यापि होत आहे. याविषयीं गिबन यानें जो अभिप्राय प्रदर्शित केला आहे तो समर्पक आहे. तो ह्मणतो, "इतर लोकांपासून अरब लोक पृथक् राहत असल्यामुळें हा परकी व हा शत्रु असा भेद मानण्याची त्यांस मुळींच संवय नाहीं. त्यांचे देशांतील जमीन भिकार असल्यामुळें त्यांच्यांत एक चमत्कारिक ह्मण आहे. ही ह्मण खरी आहे असें ते मानितात; व या ह्मणीप्रमाणें ते अद्यापि चालतात. ते ह्मणतात कीं, पृथ्वीची वांटणी झाली त्या वेळेस उत्तम व सुपीक प्रदेश हे इतर लोकांस देण्यांत आले; व आह्मांस ओसाड प्रदेश मिळाला आहे; तेव्हां वडिलोपार्जित मिळकतीचा जो हिस्सा अन्यायामुळें दुसऱ्याच्या वांटणीस गेला आहे, तो हद्दपार केलेले इस्माएलच्या वंशजांस कपटानें अथवा जुलमानें परत मिळविण्याचा हक्क आहे." या वरील हकीकतीवरून अरब लोकांची सुधारणा कशी होती हें समजणार आहे. जोंपावेतों अरब लोक स्वदेशांतच होते, तोंपावेतों त्यांचे शौर्याचा व धिमेपणा-

चा कांहींच उपयोग झाला नाहीं. स्वदेशांत असतां, त्यांस उदरनिर्वाहाची देखील पंचाईत पडत असे. दारिद्य हें अज्ञानाचें फल होय. जों जों देश दरिद्र दशेप्रत येतो, तों तों त्याची हळूहळू निकृष्टावस्था होत जाते असा नियम आहे. ज्याप्रमाणें हा नियम इतर कित्येक देशांस लागू पडलेला आपण पहातों, त्याप्रमाणें तो सहावे शतकापर्यंत अरबस्तानासही लागू होता; परंतु अरब लोकांनीं रखरखीत प्रदेश सोडून सातवे शतकांत इराणावर स्वारी केली. आठवे शतकांत स्पेन देशाकडे वळून त्याचा बराच भाग हस्तगत केला; व ते तेथचे अधिपति बनले. त्यांनीं नववे शतकांत पंजाबावर स्वारी केली; व हळूहळू हिंदुस्थानाचा कांहीं प्रदेश हस्तगत करून त्या ठिकाणीं ते राहूं लागले. याच शतकांत ते युरोपांतील देश, मादागास्कर, पूर्वआफ्रिका, हिंदुस्थान, व चीन देश यांबरोबर व्यापार करूं लागले; व ज्ञान आणि धन यांचा संचय व प्रसार करूं लागले. अरब लोक हे स्वभावतः शूर आहेत हें आह्मीं सांगितलेंच आहे. त्यांतून धर्माची स्फूर्ति त्यांचे अंगांत संचार करूं लागली; त्यामुळें त्यांनीं आपला धर्म व कायदे ह्यांचा प्रसार अर्ध्या आशियांत, आफ्रिकखंडांत व युरोपाचे बऱ्याच भागांत केला. स्पेन, मिसर व बगदाद येथील खलीपांनीं शास्त्रांचा व कलांचा प्रसार केला; व युरोपांतील त्यावेळचे राष्ट्रांपेक्षां यांचें बरेंच पुढें पाऊल होतें. जोंपावेतों अरब लोक स्वदेशांत होते, तोंपावेतों ते रानटी होते. परंतु सभोंवतालचा प्रांत जिंकून जसजसा ते धनसंचय करूं लागले, तसतशी त्यांची सुधारणा होऊं लागली. समरकंदापासून कार्डोव्हापर्यंत जो विस्तीर्ण प्रदेश आहे तो त्यांनीं काबीज केला. त्या ठिकाणीं

---

१–पिंकर्टनकृत अर्वाचीन भूगोल. पृष्ठ. ४८५.

त्यांची स्थिति सुधारत चालली. स्वदेशांत असतां अरब लोकांस मेंढ्यांचे कळप राखून उदरनिर्वाह करावा लागत असे. परंतु त्यांनीं कावीज केलेल्या प्रांतांत राज्य स्थापन करून ते त्याचे स्वामी बनले; त्यांनीं मोठमोठालीं शहरें वसविलीं; व शाळा व पुस्तकालयें स्थापन केलीं. त्यांनीं अरबी भाषेचा प्रसार समरकंदापासून आफ्रिकेचे मध्य प्रदेशापर्यंत केला. ही [1] भाषा बऱ्याच प्रौढ दशेप्रत जाऊन पोंचली आहे. त्यांनीं चरक व शुश्रूत या वैद्यक ग्रंथांचें संस्कृतांतून अरबी भाषेंत भाषांतर केलें. कालिफ अबदुल रहमान यानें कार्डोव्हा येथें वनस्पतिसंग्रहासाठीं एक बाग केली. अरब लोकांनीं ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करून त्याचा फैलाव केला. त्यांनीं आर्यभट्टाचे बीजगणिताचें [2] भाषांतर करून त्याचा अभ्यास केला व स्पेन देशांत त्याचा प्रसार केला. अरब लोकांस जी ज्योतिषशास्त्राची गोडी [3] लागली, तीही आर्य लोकांचे सहवासामुळें

---

१–अरबी भाषेंत शब्दसंग्रह असा झाला आहे कीं, मध या अर्थाचे ८०; साप या अर्थाचे २००; सिंह या अर्थाचे ५००; व उंट, व तरवार या अर्थाचे १००० शब्द आहेत.

२–अरबी गणिती महंमद बेनसेन यानें खलिफ अलमामन याचे आज्ञेवरून बीजगणिताचें संक्षिप्त भाषांतर केलें.

३–कित्येकांचें असें मत आहे कीं, आर्य लोकांमध्यें जो ज्योतिषशास्त्राचा प्रसार झाला त्यास अरब लोक कारण होत. असें मानण्यास सबळ प्रमाण दिसत नाहीं. सहावे शतकापर्यंत अरब लोकांची रानटी स्थिति होती. यापूर्वी त्यांची सुधारणा झाल्याविषयीं कोठें आढळून येत नाहीं. परंतु आर्य भट्ट इ० स० ४७६ त जन्मला. तो मोठा ज्योतिषी होता. या वेळीं हिंदुस्थानांत ज्योतिषशास्त्राचा बराच अभ्यास चालू होता असेंही आढळतें; तेव्हां कांहीं विशेष सबळ प्रमाण मिळेपर्यंत वरील समजूत चुकीची आहे असें मानण्यास हरकत नाहीं. अरबस्तानांत

लागली असावी; व या शास्त्रांत ते निपुण होण्यास त्यांस स्वदेशांतील स्वच्छ आकाशापासून बरीच मदत झाली असावी. अरब लोकांनीं दशचिन्हसंख्यापद्धति ही हिंदू लोकांपाशीं शिकून तिचा प्रसार बगदादपासून कार्डोव्हापर्यंत केला.

या एकंदर हकीकतीवरून मध्य आशियाची सुधारणा होण्यास सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें कसा व्यत्यय आला हें लक्षांत येईल. प्राचीन काळीं इराणी लोक, आसिरियन लोक व बाबिलोनियन लोक यांची सुधारणा झाली होती असें आपण वाचतों, परंतु जी सुधारणा झाली ती अंशतः जमिनीचे सुपीकतेमुळें झाली होती, व अंशतः या लोकांनीं पर ठिकाणीं स्वाऱ्या करून जसजसा धनाचा संचय केला, तसतशी हळूहळू त्यांस आपली सुधारणा करितां आली. ईराणांत[1] सर्व ठिकाणीं जमीन सुपीक आहे असें नाहीं. कांहीं ठिकाणीं खारट[2] रानें

---

आकाश स्वच्छ असतें, एवढ्याच गोष्टीवरून कित्येकांचा असा समज झाला आहे कीं, हिंदु लोकांस अरब लोकांपासून ज्योतिषांतील मूलतत्वें समजलीं असावीं. नुसतें आकाश स्वच्छ असलें म्हणजे ज्योतिषांत गति होऊन सिद्धांत ठरवितां येतात असें नाहीं. अमेरिका खंडांत क्यूमाना, कोरो व पेटा येथील आकाश, मिसरदेश, अरबस्तान व बुखारा येथील आकाशापेक्षां नेहमीं स्वच्छ असतें. परंतु त्या ठिकाणीं ज्योतिषाचें अज्ञान होतें. प्रसिद्ध अरबी गणिती अबदुल रहिमान हा ज्योतिषाचा अभ्यास करण्याकरितां हिंदुस्थानांत आल्याचें समजतें. आतां अरब लोकांनीं या शास्त्राचा प्रसार केला, व त्यांत ते निष्णात झाले, ही गोष्ट खरी मानिली तरी, एवढ्यावरून हिंदु लोकांनीं त्यांपासून हें शास्त्र घेतलें असें होत नाहीं.

१—इराणांत पाऊस फारसा नाहीं. घिलन व माझंदेरन या प्रांतांशिवाय इतर ठिकाणीं पावसाची हाकाहाक आहे. यामुळें पाण्याची कमताई फार.

२—या ठिकाणीं जें मोठें खारट रान आहे, त्याची पूर्वपश्चिम लांबी ७०० मैल आहे; व दक्षिणोत्तर रुंदी २५० मैल आहे.

आहेत; व कांहीं ठिकाणीं डोंगराळ व खडकाळ मुलूख आहे; परंतु सुपीक जमिनीवर निर्वाह करावयास सांपडेल, असा कांहीं प्रदेश असल्यामुळें प्राचीन काळीं सुधारणा होण्यास अडचण पडली नाहीं. मध्य आशियांत हा प्रांत बराच सुपीक असल्यामुळें या ठिकाणीं सुधारणा झाली खरी, परंतु त्याच कारणामुळें वेळोंवेळीं अनेक परराष्ट्रांचे हल्ले येऊन सुधारणेस अडथळा होत गेला. जशी वेळोंवेळीं इराणांत राज्यक्रांति[१]

१–इराणांत ज्या उलाढाली झाल्या त्या:—

( १ ) सिथियन लोकांची स्वारी. ही स्वारी केव्हां झाली, हें खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं; तथापि, ती ख्रिस्ती शकापूर्वी २००० वर्षांच्या सुमारास झाली असावी.

( २ ) ब्याक्ट्रिआनाचा राजा झोरोआस्टर याचें स्वामित्व.

( ३ ) सायरस ख्रिस्ती शका पूर्वी ५५७.

( ४ ) शिकंदर बादशहानें ख्रि० श० पू० ३२८ त हें राज्य धुळीस मिळविलें.

( ५ ) पार्थियन राज्य ख्रि. श. पू. २४८.

( ६ ) आर्थोक्झरसिस इ. स. २२०.

( ७ ) मुसलमान लोकांची स्वारी. इ. स. ६३६.

( ८ ) बोनिया घराण्याची सत्ता. इ. स. ९३४.

( ९ ) तेरावे व चौदावे शतकांत जंगीजखान व तैमुरलंग यांच्या स्वाऱ्या. तैमूर यानें इस्पहान हें शहर इ. स. १३८७ त घेतलें; त्या वेळेस त्यानें आपले शिपायांस तें लुटण्यास सांगितलें; व ७०००० लोकांची कत्तल उडविली.

( १० ) सोफी घराण्याची सत्ता १५०१.

( ११ ) शहा अबसचें राज्य १५८६.

( १२ ) आफगाण लोकांची स्वारी. १७२२.

( १३ ) नादिरशहाची कारकीर्द.

अशा प्रकारें अनेक उलाढाली झाल्या. आम्हीं त्यांपैकीं मुख्य मुख्य सांगितल्या. नादिरशहाचे मरणानंतर अनेक उलाढाली झाल्या.

होत गेली, तशी इतर थोड्याच ठिकाणीं झाली असेल. ग्रीक, अरब, मोंगल, तार्तर व आफगाण लोकांनीं या देशावर धनाचे लालचीनें स्वाऱ्या करून हा देश उद्वस्त केला; यामुळें पूर्वीं जी थोडीबहुत सुधारणा या ठिकाणीं दृष्टीस पडत होती ती नाहींशी होऊन आतां या देशाची निकृष्ट स्थिति आहे. मध्यें कोठें शहा अबसचे वेळेस पुनः कांहीं सुधारणा झळकूं लागली होती; परंतु आतां तीही नाहींशी झाली आहे.

आशिया खंडांत प्राचीनकाळीं सुधारणा झाली ती सुपीक प्रदेशांत झाली. हा प्रदेश आशियाचे दक्षिणेकडील होय व तो मुख्यत्वें हिंदुस्थान देश होय. या कारणामुळें हिंदुस्थानांत कशी सुधारणा झाली, याविषयीं सविस्तर हकीकत सांगणें अगत्याचें होय; व त्याविषयींचा विचार निराळे भागांत करण्याचा आमचा हेतु आहे. ज्याप्रमाणें आशिया खंडाचा स्थूल विचार केला, त्याप्रमाणें आफ्रिका खंडाचा विचार करूं.

**आफ्रिका**—आफ्रिका[1] खंड जरी विस्तीर्ण आहे, तरी, त्यांत लोकसंख्या[2] फारच थोडी आहे. तत्त्ववेत्त्यांचे दृष्टीनें अथवा

---

१—आफ्रिका हें नांव प्यूनिक भाषेंतील शब्द फेरिका म्हणजे धान्याचें कणीस यापासून पडलेलें असावें असें कित्येकांचें म्हणणें आहे. प्राचीनकालीं जे प्रदेश माहीत होते, त्यांचे व विशेषेंकरून भूमध्य समुद्राचे किनाऱ्यावरील प्रदेशांचे सुपीकतेस उद्देशून हें नांव पडलें असावें. कांहीं ह्मणतात कीं, हव्हार्का म्हणजे बार्काचा जो प्रदेश त्यावेळीं फार भरभराटींत होता, त्यावरून आफ्रिका हें नांव पडलें असावें. परंतु हिब्रू भाषेंतील शब्द फ्रेका म्हणजे तुटक असलेला, याशब्दापासून हें नांव पडलेलें असावें हें सयुक्तिक दिसतें. कारण, आफ्रिकाखंड हें आशियाखंडापासून तुटक आहे; व हिब्रू भाषेंतील शब्द फ्रेका व प्रस्तुतचें नांव आफ्रिका हीं कांहीं अंशीं जुळतात.

२—आफ्रिका खंडाची लांबी सुमारें ५००० मैल असून रुंदी ४६०० मैल आहे, परंतु लोकसंख्या सुमारें २० कोट आहे.

राज्यकारस्थानी पुरुषांचे दृष्टीनें हें खंड फारसें महत्त्वाचें नाहीं. परंतु कित्येक गोष्टींमुळें प्राचीन काळीं या खंडाकडे लोकांचें लक्ष लागलें होतें; व आलीकडे ज्या कित्येक गोष्टी घडून आल्या, त्यांमुळें युरोपियन लोकांचें अधिकाधिक लक्ष लागलें आहे. युरोपियन पंडितांचे मतें आफ्रिका खंड हें शास्त्रांचें जन्मस्थान होय. मिसरदेश व कार्थेज, ग्रीस व रोम, हनिबाल व सिपिओ, या नांवांचा महिमा वाचून संतोष होतो. परंतु अर्वाचीन काळीं जो अज्ञानांधकार पसरला, त्या योगानें दुःख होतें. आफ्रिका खंडांतील प्रदेशांचा शोध लावण्याविषयीं, व तेथें वसाहती करण्याविषयीं, युरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांचा दीर्घ प्रयत्न चालू आहे. परंतु बऱ्याच भागाविषयीं अद्यापि माहिती नाहीं, व मध्य प्रदेशाविषयीं तर अंधार आहे; तथापि, या कारणांमुळें लोकांची जिज्ञासा कमी न होतां, उलट वृद्धिंगत होत आहे. आपल्या जन्मभूमीचे ठिकाणापेक्षां या ठिकाणीं सृष्टीचा देखावा भिन्न असल्यामुळें, या खंडाविषयीं चांगली माहिती असावी असें युरोपियन लोकांस वाटूं लागलें आहे. येथील लोकांस गुलाम करून विकण्याचा मध्यें जो प्रघात पडला होता, तो बंद करण्याविषयीं कित्येक सद्गृहस्थांचे मनांत आल्यामुळें, या खंडाकडे त्यांचें लक्ष लागलें; व व्यापाराच्या जिनसा खपण्यास व स्वदेशांतील लोकसंख्या कमी होऊन तीस निर्वाहाचें साधन मिळण्यास सवड सांपडावी या हेतूनें, युरोपियन लोक विशेष लक्ष देऊं लागले आहेत. अस्तु. प्राचीन काळचे लोकांस मिसर देश व भूमध्य समुद्राचे किनाऱ्यावरील प्रदेश ह्यांशिवाय आफ्रिकेंतील इतर प्रदेशांविषयीं फारच थोडी माहिती होती; किंबहुना नाहीं ह्मटली तरी चालेल. धर्माचा प्रसार करण्याविषयीं उत्कंठा, व नवीन नवीन शोध करून व्यापार

करण्याची इच्छा जागृत होईपर्यंत, युरोप खंडाची सुप्तावस्था कायम होती; व पूर्वोक्त प्रदेशांशिवाय आफ्रिकेचे इतर भागांविषयीं युरोपियन लोकांस माहिती नव्हती. प्राचीन कालीं कंबायसेस[१], शिकंदर[२] बादशाहा, टालमी व रोमन[३] लोक यांनीं आफ्रिकेंत स्वाऱ्या करून कांहीं प्रदेशांचा शोध लाविला. परंतु आफ्रिकेविषयींचे माहितींत ह्मणण्यासारखा फरक पडला नाहीं. रोमन लोकांचें राज्य रसातलास जाऊन जेव्हां मु-

१–कंबायसेस यानें आपलें सैन्य मिसर देशाचे दक्षिणेस व नैऋत्येकडे पाठविलें. हें सैन्य पाठविण्याचा हेतु, देश काबीज करावा असा जरी होता, तरी, आफ्रिका खंडांत आहे तरी काय हें माहीत व्हावें, असा ही त्याचा हेतु होता. कंबायसेस यानें आपल्या सैन्याची एक टोळी दक्षिणेकडील इथिओपियन लोकांवर पाठविली, व दुसरी लिबियाचे रानांत आमोनियन लोक राहत होते त्यांवर पाठविली. या सैन्यास अनेक दुःखें सोसावीं लागलीं. पहिले टोळीस यश न येतां, ती थीब्स येथें परत आली. दुसरे टोळीस आमन शहर सांपडलें नाहीं व तीही मिसर देशास परत आली नाहीं. अशा प्रकारें कंबायसेस यानें केलेल्या स्वाऱ्यांचा परिणाम झाला.

२–शिकंदर बादशहा हा, देश काबीज करीत करीत मेंफिस येथें येऊन पोंचल्यावर, त्यास जुपिटर अमनचे देवळांत जाऊन दर्शन घेण्याची व जुपिटरचे आपण पुत्र आहों, असें म्हणवून घेण्याची इच्छा झाली. ज्यांनीं आफ्रिकेंतील प्रदेशांविषयीं आपलेपूर्वी शोध लावण्याचा यत्न केला होता, त्यांची अवस्था काय झाली होती, हें तरुण राजपुत्रास माहीत नव्हतें असें नाहीं. परंतु हा दैवाचा लाडका असल्यामुळें त्यानें वाटेच्या अडचणीस जुमानलें नाहीं. दैवयोगानें त्याचे सैन्यास पाणी मिळून तें वचावलें व त्याचा मनोरथ सिद्धीस गेला.

३–रोमन लोकांनीं भूमध्य समुद्राचे किनाऱ्यावरील प्रदेशांस लागून जें रान आहे त्यांत दोन स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यांपासून जरी फारसा फायदा झाला नाहीं, तरी, पहिले व दुसरे शतकांत आफ्रिकेविषयीं लोकांस जास्ती माहिती झाली.

सलमान लोकांचा अभ्युदय होऊं लागला, तेव्हां आफ्रिकेविषयीं अधिकाधिक माहिती मिळूं लागली. मुसलमानी धर्म व राज्यरीति यांपासून अखेर परिणाम जरी वाईट झाला, तरी प्रथम उपयोग झाला असें ह्मटलें असतां चालेल. मुसलमान लोकांचा हेतु धर्माचा प्रसार करणें व देश काबीज करणें हा असल्यामुळें, सुधारणेच्या संबंधानें जितका फायदा व्हावा तितका झाला नाहीं. परंतु सर्व युरोपभर सुमारें १००० वर्षेपर्यंत जो अज्ञानांधकार पसरला होता तो जाऊन हळूहळू जसजसे सुधारणेचे किरण पुनः फांकूं लागले, तसतसे नवीन शोध करण्याविषयीं लोकांची इच्छा जागृत होऊन ती बलवत्तर होऊं लागली. हे

---

१—ज्या वेळेस अरब लोकांनीं आफ्रिकेंत पाय टाकिला, त्या वेळेस त्यांस व्यापारवृद्धीसाठीं व देश काबीज करण्यासाठीं सभोंवतालचे प्रदेशाविषयीं माहिती मिळविण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. इतर लोकांना आफ्रिकेंत ज्या अडचणी येत होत्या, त्यांचें अरब लोकांस कांहीं वाटलें नाहीं. कारण, त्यांचे देशांत याच अडचणी येत असल्यामुळें ते त्यांत सरावलेले होते. अरब लोकांनीं उंटाच्या सहाय्यानें आफ्रिकेचे विस्तीर्ण रानामधून एक मार्ग काढिला. उत्तरेकडे बार्कांचे हद्दीपर्यंत जाऊन नंतर ते दक्षिणेस फैजान व आगेडीसचे ओसीसमध्यें गेले. या ठिकाणीं त्यांस कांहींसा सुपीक प्रदेश सांपडला. अशा धाडशी लोकांनीं आफ्रिकेंत जाऊन जी माहिती आणिली तिजमुळें, व विशेषेंकरून त्यांनीं आणिलेले सोन्यामुळें लोभ उत्पन्न होऊन हजारों लोक आफ्रिकेंत जाऊं लागले; व १२ वे शतकापूर्वीं नायजर नदीचे कांठचे प्रदेशांत मुसलमानी राज्याची स्थापना झाली. तांबड्या समुद्रापासून तों नायजर नदीचे कांठच्या प्रदेशापर्यंत जो विस्तीर्ण मुलूख आहे, त्यापैकीं बऱ्याच प्रदेशाचा त्यांनीं शोध लाविला. आबिसिनिया व न्युबिया या देशांत त्यांचा शिरकाव झाला नाहीं. कारण, त्या ठिकाणीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला होता; व ख्रिस्ती लोकांनीं मुसलमान लोकांबरोबर लढाया करून त्यांचा शिरकाव होऊं दिला नाहीं.

नवीन शोध करण्याचें काम प्रथम पोर्तुगीज लोकांनीं हातीं धरिलें. हल्लींचे काळीं तत्त्व समजून सिद्धांत ठरविण्याचे हेतूनें अथवा परोपकार करण्याचे बुद्धीनें जशीं अचाट कृत्यें होत आहेत, तशीं पंधरावे शतकांत लोभामुळें व धर्माचे वेडामुळें करण्यांत आलीं होतीं. आफ्रिकेचे पूर्व प्रदेशांत पेस्टर जान या नांवाचा

---

१—पोर्तुगीज देशाचा राजा पहिला जॉन यानें बार्वेरीचे पश्चिमेक-डील प्रदेशाचा शोध लावण्यासाठीं कांहीं जहाजें पाठविलीं. इ. स. १४१९ त हेनरी राजानें ( जॉनचे मुलानें ) मदिरा बेटें शोधून का-ढिलीं. यानंतर आफ्रिकेचा शोध लावण्याचे कामास इतकें महत्त्व आलें होतें कीं, धर्माध्यक्ष चवथा यूजीन यानें नन भूशिरापासून तों हिंदुस्थाना-पर्यंत पोर्तुगीज लोक जे प्रांत काबीज करतील, त्यांचे स्वामित्वाची त्यांस सनद करून दिली. इ. स. १४४६ त पोर्तुगीज लोकांनीं केप-व्हर्ड बेटाचा शोध लाविला. त्यांस साहाराचे किनाऱ्याचे बाजूनें गलबतें हांकारीत असतां वाळू व आकाश हीं काय तीं दृष्टीस पडूं लागलीं; म्ह-णून त्यांस त्या मार्गानें जाण्याची इच्छा झाली नाहीं; परंतु ब्ल्यांको भू-शिरापलीकडे गेल्यावर त्यांस सुपीक प्रदेश दिसूं लागला; व जेव्हां त्यांस सेनिगाल व ग्यांबिया यांचे मुखाजवळचे प्रदेशांत सोनें व हस्ती-दंत हीं सांपडलीं, तेव्हां ह्या ठिकाणीं वसाहत करावी व हा देश का-बीज करावा, असें त्यांस वाटूं लागलें. या दोन नद्यांचे दरम्यान जो प्रदेश आहे त्या ठिकाणीं जालफ लोक राहत होते. या लोकांवर जे राजपुत्र राज्य करीत होते, त्यांपैकीं एक पदच्युत झाला होता. त्यानें पोर्तुगीज लोकांपाशीं मदत मागितली; परंतु पोर्तुगीज लोकांचे अरमा-रावर जो मुख्य कप्तान होता त्याचें व राजपुत्राचें कांहीं कारणांवरून वैमनस्य आल्यामुळें कप्तानानें राजपुत्रास जिवें मारिलें.

२—पोर्तुगीज लोकांनीं पेस्टर जॉनविषयीं माहिती मिळण्यासाठीं निरनिराळे राजपुत्रांकडे वकील पाठविले; परंतु त्यांस पेस्टर जॉनवि-षयीं शोध लागला नाहीं. तथापि, त्यांनीं आफ्रिकेंत बराच प्रवेश करून त्यासंबंधीं बरीच माहिती मिळविली. परंतु ही माहिती दुसऱ्या राष्ट्रांस

कोणी सिद्ध पुरुष राहत आहे, असें पोर्तुगीज लोकांस समजल्या- वर, या पुरुषाच्या तपास लावण्याचें त्यांचे मनांत आलें; व त्यांनीं पश्चिमेकडून पूर्वेकडे जाण्याचा क्रम आरंभिला. कित्येक सुवर्णाचें आशेनें जाऊं लागले. पोर्तुगीज लोकांनंतर फ्रेंच व इंग्लिश लोकांनीं कांहीं शोध लाविले. इंग्लंडांत जी आफ्रिकन[1] असोशिएशन नांवाची सभा स्थापन झाली होती, तिनें आपले खर्चानें हुशार व धाडशी लोकांस पाठवून आफ्रिकेंतील मध्य प्रदेशाविषयीं माहिती मिळवून ती प्रसिद्ध केली. या निरनि- राळे लोकांचे उद्योगानें आज आपणांस जी माहिती उपलब्ध आहे, तिजवरून कळतें कीं, नीलनदीच्या पाण्यानें भिजून जो प्रदेश सुपीक झाला आहे त्याशिवाय, अथवा ज्या प्रदेशांत एकदां कार्थेज शहरानें नांव गाजविलें, व युटिका भरभराटीस आली, त्या प्रदेशाशिवाय, आफ्रिकेचे कोणतेही भागांत सुधा-

---

मिळाली असतां, तेथील लोकांच्या उड्या पडतील असें समजून, त्यांनीं कांहीं काळपर्यंत ती प्रसिद्ध केली नाहीं. त्यांनीं सुवर्ण किनाऱ्यावर मि- नास नांवाचा किल्ला बांधिला; व तेथून ते मध्य प्रदेशांत स्वाऱ्या क- रीत असत. नंतर त्यांनीं इ. स. १४८४ त कोंगो नदीचा शोध ला- विला. इ. स. १४९३ त बार्थलेम्युडाईज यानें केप ऑफ् गुड्होपचा शोध लाविला. वास्कोदिगामा हा केप ऑफ् गुड्होपवरून झांजीबार बेटापर्यंत गेला व नंतर तेथून हिंदुस्थानामध्यें गेला.

१—आफ्रिकन असोशिएशन ही सभा इ. स. १७८८ त स्थापन झाली. या सभेनें प्रथम लेडयर्ड, ल्यूकस, मेजर हटन, मंगोपार्क, व हार्निमन यांस एका मागून एक असे पाठविले; व सेनिगांबिया व नाय- जर ह्या नद्यांचा शोध लाविला. या लोकांस आफ्रिकेंत बरेच हाल का- ढावे लागले. कित्येक तर प्राणासही मुकले. ल्यूकस यास मोरोक्कोमध्यें तीन वर्षें कैदेंत दिवस काढावे लागले. राजपुत्रास नजराणा न मिळा- ल्यामुळें त्यानें मंगोपार्क याला नदींत बुडविलें. मंगोपार्क यानें नायजर नदीचा शोध लावण्याचें श्रेय घेतलें.

रणा झाली नाहीं; सुधारणेस एकाही देशाची मदत मिळाली नाहीं; निग्रो अथवा काफर लोकांपैकीं एकही मनुष्य उदयास आला नाहीं; या विस्तृत प्रदेशांत एकही नवीन शोध झाला नाहीं; फार काय, एखादे शास्त्रांत अथवा कलेंत निपुण असा एकही मनुष्य निपजला नाहीं. अज्ञानाची व रानटीपणाची जी स्थिति हजारों वर्षांपासून चालत आलेली होती, तींत फारसा बदल दृष्टीस पडला नाहीं. युरोप खंडांत सुधारणेचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडत असून, त्याचे लगत जें आफ्रिकाखंड तें अज्ञानांधकारांत असावें, याविषयीं कित्येकांस आश्चर्य वाटतें; व त्यांचा असा समज झाला आहे कीं, आफ्रिकन लोक हे मंद बुद्धीचे आहेत. परंतु आलीकडे कित्येक प्रवाशी व ख्रिस्ती-धर्मोपदेशक आफ्रिका खंडांत प्रवास करून आले आहेत. ते ह्मणतात कीं, आफ्रिकन लोकांस हिंमत व उत्साह हीं आहेत; ते धूर्त असून त्यांचे आंगीं व्यापार करण्याचें शहाणपण आहे; ते राहण्याकरितां झोंपड्या बांधूं लागले आहेत; ते निर्वाहा-करितां हळूहळू शेतीचें काम करूं लागले आहेत. कित्येक प्रवाशी हे झुलू, बेचुअन व म्यांडिंगो यांचे बुद्धीविषयीं वाखाणणी करितात. आफ्रिकेच्चे मूळचे राहणारे लोकांस गहन विषयांवर विचार करणें आवडत नाहीं, हें जरी खरें आहे, तरी, त्यांची स्मरणशक्ति चांगली आहे असें ह्मणतात. व्हे लोकां-शिवाय कोणत्याही जातींत लेखन कलेची सुरवात झालेली नव्हती. आफ्रिकन लोकांत कांहीं साधु व कांहीं शहाणे होऊन गेले, परंतु त्यांचीं चरित्रें लिहून ठेविलेलीं नसल्यामुळें त्यांविषयीं आज आपणांस माहिती नाहीं. निग्रो लोक मंद बुद्धीचे आहेत, असा जो ग्रह झालेला आहे, तो, जे निग्रो गुलाम झाले आहेत, अथवा जे नीचावस्थेप्रत आलेले आहेत, त्यांची स्थिति पाहून झाला असावा. कोणत्याही सु-

धारलेल्या देशांत गेलें तरी, तेथें सर्वच लोक चांगले दृष्टीस पडतात असें नाहीं. परंतु जेवढे वाईट दृष्टीस पडतात, तेवढ्यांवरूनच जसें चांगल्याची परीक्षा करणें बरोबर नाहीं, तसेंच निग्रोंच्या हलक्या जातींवरून सर्व निग्रोंची परीक्षा करणें बरोबर नाहीं. खोंड, भिल्ल, महार व मांग, यांवरून हिंदु लोकांच्या सुधारणेविषयीं मत देणें जितकें न्याय्य आहे, अथवा लंडन शहरांतील गटारांत लोळणारे मूर्ख लोकांवरून इंग्लिश लोकांचे नीतीविषयीं अभिप्राय देणें जितकें न्याय्य आहे, तितकेंच निग्रोंतील हलक्या जातींचे लोकांवरून एकंदर निग्रोंविषयीं मत देणें न्याय्य आहे. निग्रो लोकांविषयीं, अथवा दुसरे लोकांचे सुधारणेविषयीं विचार करणारे लोक सुधारणेचीं जीं दोन अंगें, त्यांविषयीं विचार न करितां, एकाच अंगाविषयीं विचार करून मत देतात, हें अविचाराचें आहे. सुधारणेंत जो फेरफार होत असतो, तो ज्याप्रमाणें अंतःकारणांनीं होतो, त्याप्रमाणें बाह्य कारणांनीं होतो. बाह्य कारणांचा जोर कमी असतो असें नाहीं. आफ्रिका खंडांत सुधारणा झाली नाहीं, याचें कारण हें कीं, या ठिकाणीं सृष्टपदार्थविषयक नियमांचा विशेष अंमल आहे. येथील लोकांस या

---

१—जगांतील प्रदेशांपेक्षां आफ्रिकेंत पाण्याचे संबंधानें फार कमी सोय आहे. या खंडाचा तीन चतुर्थांश भाग हा उष्ण कटिबंधांत असल्यामुळें येथील हवा फारच उष्ण असते. पश्चिम व पूर्व किनाऱ्याकडे उतार आहे; व येथील हवा निरोगी नाहीं. साहारामध्यें सायमूम, गिनीमध्यें हर्मोटन व मिसर देशामध्यें प्लेग या नांवांनीं प्रसिद्ध असणारे वारे नेहमीं वाहत असतात. साहारा, गिनी व सेनिग्यांबिया हे प्रदेश तर भूतलावर अति उष्ण प्रदेश होत. आफ्रिकेंतील उष्णतेचीं कारणें अशीं आहेत कीं, या खंडाचा निमे भाग विषुववृत्ताचे उत्तरेस व निमे दक्षिणेस असा आहे; या खंडांत उंचवट्याचे प्रदेश फार थोडे; येथें पाण्याचें दुर्भिक्ष फार आहे.

नियमांचे व्यापारापासून जीं कार्यें झालीं, त्यांचें आकलन करितां आलें नाहीं. ह्या खंडाची रचना व मध्यप्रदेशांत जाण्या येण्याची अडचण, ह्या पुष्कळ अंशीं आफ्रिकाखंडाचे सुधारणेस आड आलेल्या आहेत. युरोपांत अनेक बंदरें, अनेक संयोगीभूमि, व आखातें आहेत. त्याप्रमाणें आफ्रिकेंत यांपैकीं एकही ह्मणण्यासारखी सोय नाहीं. अयनवृत्तांतील किनाऱ्यावरचा प्रदेश रानानें व्यापलेला अथवा दलदलीचा असल्यामुळें, तो मनुष्यांस फारसा उपयोगाचा नाहीं. समुद्राच्या योगानें व्यापार सुलभ होतो एवढेंच नाहीं, तर दुसरे राष्ट्रांबरोबर निकट दळणवळण पडत गेल्यामुळें, मनुष्याची कल्पनाही वाढत जाते. समुद्र हा एका देशांतून दुसऱ्या देशांत माल नेण्यास व आणण्यास उत्तम साधन आहे एवढेंच नाहीं, तर सुधारणेचा प्रवेश एका देशांतून दुसऱ्या देशांत होण्यासही उत्तम साधन आहे. परंतु आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यासरसा वारा फार सुरू असतो, व आटलांटिक महासागराकडून गिनीच्या आखाताकडे सोसाट्याचा वारा वाहत असतो; या गोष्टींमुळें व या खंडाचे किनाऱ्याची जी नैसर्गिक स्थिति आहे तिजमुळें जहाजें किनाऱ्याजवळ येणें हें धोक्याचें काम आहे. आफ्रिकेचे मध्यभागीं जे अडथळे आहेत, त्यांमुळें मध्यभागीं दळणवळण ठेवितां येत नाहीं. सौदन हा प्रदेश कांहींसा सुपीक आहे, परंतु भूमध्य, समुद्र व सौदन यांचे दरम्यान साहारा नामक विस्तीर्ण वालुकामय प्रदेश आहे. या रानाविषयीं विचार केला असतां आफ्रिकेंत सुधारणेस व्य-

---

१–हें रान नील नदीपासून सेनिगाल नदीपर्यंत व टिम्बक्टूपासून अटलस पर्वताचे दक्षिणेकडील उतार प्रदेशापर्यंत पसरलेलें आहे. या रानाची लांबी २००० मैल व रुंदी ९०० मैल आहे. या रानाचे दक्षिणेकडील सीमेपर्यंत कोणत्याही प्रवाशानें प्रवास केला नाहीं. प्रवाशी

त्यय येण्यास केवढाल्या अडचणी आहेत हें समजेल. हें रान

लोकांनीं जे रस्ते काढिले आहेत, त्यांशिवाय कोणी दुसऱ्या रस्त्यानें या रानाचे मध्यभागांत गेला नाहीं. साहारा हें सपाट वालुकामय मैदान असावें, अशी लोकांची प्रथम समजूत होती. परंतु आलीकडील शोधांवरून असें समजतें कीं, या रानांत कांहीं ठिकाणीं उंचवट्याचीं मैदानें आहेत; कांहीं ठिकाणीं दगडांनीं व्यापिलेला प्रदेश आहे; व कांहीं ठिकाणीं मोठमोठाले खळगे आहेत. पश्चिमेकडील प्रदेशांत वाळू आहे. वाऱ्याचे योगानें वाळूचे ढीग एका फुटापासून चारशें फुटांपर्यंत उंच होतात. उत्तरेकडील प्रदेशांत जे खळगे आहेत, त्या ठिकाणीं जें पावसाचें पाणी अटलस पर्वतावरून वाहत येतें तें सांचतें.

उत्तरेकडील प्रदेशांत मधून मधून ओसीस ( हिरवी चार जमीन ) दृष्टीस पडते. ओसीसशिवाय इतर ठिकाणीं वनस्पति दिसत नाहींत. प्रवाशास साऱ्या वाटभर श्वापदें, पक्षी, अथवा किडे हीं दृष्टीस पडत नाहींत. वर पहावें तों स्वच्छ आकाश व प्रज्वलित सूर्यकिरण व खालीं सटासट उडणारी वाळू, उघडे खडक व मैदानें. अशा या भयाण प्रदेशांत दुर्दैवानें एखादे वेळेस जवळ असलेली पिण्याचे पाण्याची पिशवी फुटली असतां, मृत्यूच येईल, अशी प्रवाशास भीति उत्पन्न होते. उन्हाळ्यांत सूर्यकिरण लंब असतात. अशा वेळेस या रूक्ष मैदानांत आगीची भट्टी पेटली आहे कीं काय असें वाटतें. एवढ्यानेंच प्रवाशांची हालअपेष्टा संपते असें नाहीं. ज्याप्रमाणें चोहोंकडून वारा येऊं लागला म्हणजे समुद्राचें पाणी उसळूं लागतें, त्याप्रमाणें या रानांत वाळू उसळते. वाळूचे कण वर जातात व वाऱ्याचे योगानें निरनिराळे होतात; व पुनः त्यांचें संमीलन होतें. हें संपल्यावर बहुत करून वादळ सुटतें. वादळ सुटल्यावर उंटाच्यानें पुढें पाऊल टाकवत नाहीं. अरब प्रवाशी पाण्याच्या पिशव्या एकावरएक रचून ठेवितात; व घोंगड्या वगैरे गुंडाळून घेऊन जो माल आणिला असेल, त्याचे आड स्वस्थ बसतात. हें वादळ (सायमूम) फार वेळ राहिलें तर, त्यामुळें जितका त्रास सोसावा लागतो, तितका दुसरा कशापासून सोसावा लागत नसेल. सायमूम

फार लांबवर पसरलें असल्यामुळें, सौदन येथील सुपीकतेपासून लोकांस व्हावा तसा उपयोग होत नाहीं; व युरोपांतील व्यापाऱ्यांसही या ठिकाणीं जाण्याची पंचाईत पडते. एके ठिकाणीं ओसाड वालुकामय मैदान, तर दुसरे ठिकाणीं पाणथळ जमीन; एके ठिकाणीं पर्वतांच्या उंच उंच रांगा, तर दुसरे ठिकाणीं खोल खोल दऱ्या, अशी स्थिति आहे. हवा अतिशयित उष्ण असल्यामुळें मनुष्याचे अंगाची नेहमीं लाही लाही होत असते; हीं व अशाच प्रकारचीं जीं दुसरीं कारणें आहेत, त्यायोगानें आफ्रिकेच्या सुधारणेस बराच व्यत्यय आलेला आहे; व मुख्यत्वेंकरून याच कारणांनीं आफ्रिकेंतील बरेच लोकांचे कपाळीं दास्य आलें आहे.

---

पासून ओंठ फुटून रक्त येऊं लागतें. शोष पडतो. अंगाचा दाह होतो. अंग फुटतें व भेगांतून वारीक माती शिरते. मनुष्य असे हाल होऊन मरतो. अशीं मेलेलीं मनुष्यें पुष्कळ दृष्टीस पडतात. कोणी वाटसरू या वाटेनें गेल्यास तो प्रेतावर माती टाकितो. परंतु वाऱ्यानें ती माती दूर होऊन प्रेतें पुन: उघडीं पडतात; कांहीं दिवसांनीं फक्त हाडें मात्र दिसतात. साहारा हें जगांतील मैदानांपैकीं फार मोठें व प्रसिद्ध मैदान आहे. या मैदानांतून प्रवास करितांना उंटाचा फार उपयोग होतो असें आम्हीं वर सांगितलें आहे. परंतु इ. स. १८०५ त टिंवक्टूपासून टाफिलेटकडे जाण्याकरितां प्रवाशांची मंडळी निघाली व पाणी न मिळाल्यामुळें २००० लोक व १८०० उंट मरण पावले. असे या ठिकाणीं हाल होतात.

या रानांत जे रहिवाशी आहेत, त्यांचें घरीं बसून निर्वाह करूं म्हटलें तर चालत नाहीं. कारण, या ओसाड प्रदेशांत कांहींच पिकत नाहीं. लोकांस उपजीविकेकरितां भटकत फिरावें लागतें. या रानांत भटकणारे लोक ट्युआरेग व टिबु हे आहेत. त्यांस आपले बरोबर उंट व मेंढ्या घेऊन गवत व चारा यांचे शोधार्थ नेहमीं भटकत फिरावें लागतें. भटकण्याचा हा क्रम नेहमीं सुरू असतो.

जरी आपण आफ्रिकेचे कोणतेही भागाविषयीं विचार केला तरी, तेथें अज्ञान व दारिद्य हीं दोन्हीं आहेत, असें समजून येतें. पूर्वीं सुधारणा मिसर देशांत व उत्तरेकडील दुसरे भागांत मात्र झाली होती. आफ्रिकेंत सृष्टपदार्थविषयक नियमांचा विशेष जोर असल्यामुळें, लोकांची फारच निकृष्ट स्थिति झालेली आहे. सृष्टीचें उग्र स्वरूप, हवेची तीव्रता, व दुसऱ्या अडचणी ह्यामुळें लोकांस धनाचा संचय करून सुधारणा करितां आली नाहीं. त्यांस या अडचणी दूर करितां येत नसल्यामुळें दिवसेंदिवस युरोपखंडांतील लोकांचें त्यांवर अधिकाधिक वर्चस्व होऊं लागलें आहे; व ज्याप्रमाणें अमेरिकेची स्थिति झाली, व आशियाची होत आहे, त्याप्रमाणें आफ्रिकेची स्थिति होणार. युरोपियन लोकांचें पाऊल या ठिकाणीं रुतत चाललें आहे; व तें एकदां रुतलें ह्मणजे पुनः निघणें दुरापस्त गोष्ट होय.

---

१–आफ्रिकेंत वस्ती करून व्यापार वाढविण्याविषयीं इंग्लिश, इतालियन व जर्मन लोकांचा प्रयत्न चालू आहे.

इतालियन लोकांनीं शोआ येथें एक सैन्य पाठविलें आहे. दुसरें सोमली बंदर येथें झेला या मार्गानें जात आहे. शोआचा राजा मेनिलेक हा झेला येथें यावयाचा आहे. या स्वारीचा असा उद्देश आहे कीं, इताली देशांत जो माल तयार होतो तो मध्यप्रदेशांत वसाहत करून खपण्यास साधन मिळावें. शिवाय शोआ येथें ज्या जिनसा तयार होतात, त्या इतर देशांत खपवाव्या. शोआ येथून ज्या जिनसा बाहेर गांवीं पाठवावयाच्या त्याः–काफी, कापूस, द्राक्षें, सोन्याची माती, हस्तीदंत वगैरे आहेत. इताली देशांत जी लोकसंख्या वाढत चालली आहे, तीसही कोठें तरी थारा मिळावा म्हणून वसाहतीचें काम सुरू आहे. झेला येथें आपला वकील ठेवण्याविषयीं इतालियन लोकांचा विचार आहे. परंतु असें केलें असतां इंग्लिश लोकांस वाईट वाटेल, म्हणून ते मागें घेत आहेत. मध्यप्रदेशांत व्यापार करण्याविषयीं इतालियन धर्मोपदेशक मिसाई यास मेनिलेक यानें परवानगी दिली आहे.

मिसरदेशांत कोणत्या कारणामुळें सुधारणा झाली, याविषयीं सविस्तर विचार निराळे भागांत करूं.

**अमेरिका**—ज्याप्रमाणें आशियाखंडाची प्राचीनत्वाविषयीं,

---

इतालियन लोकांची ही हालचाल पाहून व स्ट्रौड येथें सर मायकेएल हिक्सबीच यांनीं जें भाषण केलें, त्यावरून जर्मन लोकांचेही मनांत वसाहत करून व्यापार करण्याविषयीं येऊं लागलें आहे. हिंदुस्थानचे व्यापारांत जें नुकसान होईल, तें भरून मिळण्याकरितां ज्याप्रमाणें आफ्रिकेंत म्यांचेस्ट्रियन लोकांचा प्रयत्न चालू आहे, त्याप्रमाणें जर्मन लोकांचाही प्रयत्न चालू आहे. कारण, दक्षिण अमेरिकेंत युनायटेड स्टेटस् देशांतील लोकांचा व्यापार चालू झाल्यामुळें, जर्मन लोकांचें नुकसान होत आहे. जर्मन सरकारानें आफ्रिकेंत स्वाऱ्या पाठविण्याकरितां ७०,००० मार्कसची रक्कम बजेटांत घातली आहे.

१–इ. स. १४९२ त कोलंबसानें अमेरिका खंडाचा शोध लावल्यावर ओजेडो या नांवाचा जो गृहस्थ कोलंबसाबरोबर प्रथम होता, त्यानें इ. स. १४९९ त पुनः सफर केली. ओजेडोबरोबर यावेळीं अमेरिगो व्हेस्पुशीअस या नांवाचा गृहस्थ होता. तो मुख्य खलाशाचें काम करीत असे. तो फ्लारेन्स येथील राहणारा होता. युरोपांत परत आल्यावर अमेरिकेविषयीं जी माहिती त्यास मिळाली होती, ती त्यानें प्रथम प्रसिद्ध केली; व अमेरिका खंड हें आपण शोधून काढिलें असें त्यानें जाहीर केलें. अमेरिगोनें जी माहिती प्रसिद्ध केली, ती पश्चिम गोलार्धाविषयीं प्रथमचीच असल्यामुळें तिचा फार त्वरित प्रसार झाला. लोक ती मोठ्या हौसेनें वाचूं लागले; व ज्या देशाचा शोध अमेरिगोनें लाविला म्हणून लोकांचा समज झाला, त्यास त्यांनीं अमेरिका हें नांव दिलें. अशी अमेरिका या शब्दाची चमत्कारिक व्युत्पत्ति आहे. वास्तविक पाहतां, अमेरिगोनें विशेष कांहीं एक केलें होतें असें नाहीं. ज्युलियस सीझर व नेपोलियन यांसारखे जे रणधुरंधर होऊन गेले, त्यांस देखील जो मान मिळाला नाहीं, तो अमेरिगो ठगास सहज मिळाला! विशेष श्रम न करितां लोकांचे डोळ्यांत धूळ घालून मान मिळविणारे असे जगांत अमेरिगोसारखे आणखी लोक सांपडतील.

व युरोप खंडाची मानसिक श्रेष्ठत्वाविषयीं ख्याति आहे, त्याप्रमाणें मोठमोठाल्या नद्या व सरोवरें, उंच व विशाल पर्वत, भव्य व भयंकर देखावे, यांविषयीं अमेरिकेची ख्याति आहे. इतर खंडांचे मानानें पाहतां, अमेरिका खंडाचा विस्तार[1] फार आहे; परंतु येथें लोकसंख्या फारच थोडी आहे. या खंडांत युरोपियन लोकांच्या वसाहती होऊं लागण्यापूर्वी हें खंड निर्जनवनाप्रमाणें होतें. हिंदुस्थान देश सुवर्ण भूमि आहे, असा पंधरावे शतकांत युरोपियन लोकांचा समज होऊन, या देशाचा शोध लावून तो हस्तगत करण्याविषयीं त्यांस इच्छा झाली; व हिंदुस्थानाचा मार्ग पश्चिमेकडे आहे, असें त्यांस वाटल्यावरून खलाशी व दुसरे धाडशी लोक सुवर्णाचे आशेनें पश्चिमेकडे लांबवर जहाजें हांकारूं लागले. परंतु त्यांस हिंदुस्थान देश न सांपडतां, ज्या खंडाचा शोध पूर्वी लागला नव्हता, त्या खंडाचा शोध लागला. पंधरावें शतक संपण्याचे सुमारास अथवा सोळावे शतकाचे प्रारंभापासून युरोपांतील हजारों लोक कोणी सरकारच्या त्रासामुळें, कोणी धर्माचा छल होऊं नये ह्मणून, कोणी लोभामुळें व कोणी जिज्ञासेमुळें तेथें गेले. अमेरिकेंत सोनें सांपडतें असें समजल्यावर, स्पानिश, पोर्तुगीज, इंग्लिश व फ्रेंच हे एकामागून एक अमेरिका खंडावर जास्तच उड्या टाकूं लागले. ह्यामुळें नवीनें[2] नवीन शोध लावण्याचें काम झपा-

---

१–अमेरिकेची लांबी सुमारें १०,००० मैल व रुंदी सुमारें ३,२०० मैल आहे. परंतु युरोपियन लोक येथें वसाहत करूं लागण्यापूर्वी लोकसंख्या एक कोट देखील नव्हती.

२–कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावण्यापूर्वी नार्वेजिअन लोक हे अमेरिकेंत गेले होते, असें आतां सर्वानुमतें ठरलें आहे. अमेरिकेंतील प्रदेशांचा खालीं लिहिल्याप्रमाणें शोध लागत गेला.

त्यानें चालू झालें. हिंदुस्थानास जाण्यास पश्चिमेकडे मार्ग सां-

---

इ. स. ९८२ त नार्वेजिअन लोकांनीं ग्रीनलंड बेटाचा शोध लावून त्या ठिकाणीं वसाहत केली.

इ. स. १००३ त नार्वेजिअन लोकांनीं न्यूफौंडलंड बेटाचा प्रदेश व्हिनलंड याचा शोध लाविला व त्या ठिकाणीं वसाहत केली.

इ. स. १४९२ ता० ३ आगष्ट रोजीं कोलंबस स्पेन देशाहून निघाला, तों ता० १२ आक्टोबर रोजीं त्यास बाहामा बेटांपैकीं सान साल्व्हादोर या नांवाचें बेट प्रथम लागलें.

इ. स. १४९३ त कोलंबसानें दुसरी सफर केली. तींत त्यास क्यारिबी बेटांचा शोध लागला. त्यानें सेंट डामिंगो या नांवाचें शहर वसविलें.

इ. स. १४९८ व १५०२ त कोलंबसानें तिसरी व चवथी सफर केली. या सफरींत त्यानें त्रिनिदाद व पोर्टोबेलो ह्यांचा शोध लाविला.

इ. स. १४९९ त दुसरे सफरीचे वेळीं कोलंबसाचेबरोबर ओजेडो नांवाचा जो कामगार होता, तो आपलेबरोबर चार जहाजें व कांहीं धाडशी लोक घेऊन अमेरिकेस गेला.

इ. स. १५०० त वास्कोडिगामा हा हिंदुस्थानदेश सांपडल्याची व तेथील संपत्तीची खबर घेऊन लिसबन शहरास परत आल्यावर, हिंदुस्थान देश आपले हस्तगत करून घ्यावा, असें पोर्तुगीज सरकारचे मनांत आलें; व या कामाकरितां त्यांनीं एक आरमार तयार करवून त्यावर डान पेड्रो केब्राल यास मुख्य नेमिलें. आफ्रिकेचे किनाऱ्या किनाऱ्यानें जहाजें हाकारतांना समोरून वारा येऊन, जहाजें नीट चालत नसत, हें केब्राल यास माहीत होतें; म्हणून त्यानें आपलीं जहाजें किनाऱ्याकिनाऱ्यानें न हांकारितां, थोडीं उजवे बाजूनें हांकलीं. परंतु यामुळें त्यास हिंदुस्थान न सांपडून तो ब्रेझिलचे आग्नेयीस लागला.

इ. स. १४९७ त नवीन जमिनीचा शोध लावून त्या खालसा करण्याकरितां इंग्लंडाचा राजा सातवा हेन्री यानें जान क्याबट (व्हेनिशन) या नांवचे मनुष्यास सनद दिली. क्याबट यास एक मोठें बेट लागलें; त्यास त्यानें प्रायमा व्हिस्टा हें नांव दिलें. परंतु खलाशांनीं या

पडेल या आशेनें शोध करीत असतां, प्रथम अमेरिकेविषयीं अनेक शोध लागले. शेवटीं पश्चिमेकडे हिंदुस्थानचा मार्ग सांपडला नाहीं; ह्मणून लोक मार्गाचे शोधार्थ उत्तरेकडे जाऊं लागले. जरी हिंदुस्थानचा शोध लागला नाहीं, तरी, अमेरिकेचे बहुतेक प्रदेशाचा शोध लागला. अमेरिकेंतील रहिवाशी लोकांचे अंगावर सोनें व रुपें पाहून, स्प्यानिश लोकांचा लोभ जागृत होऊं लागला. त्यांनीं हें सोनें कोठें सांपडतें, याचा तपास लावण्याचा क्रम चालविला. सोन्यामुळें मूळच्या लोकांस किती हाल सोसावे लागले हें येथें सांगण्याचें कारण नाहीं. सोन्यामुळें लोक स्वतंत्रतेस व प्राणास मुकले, एवढें सांगितलें असतां बस आहे. स्प्यानिश लोकांनीं सोन्याच्या शोधार्थ लोक पाठविले, व कार्टिझ व पिझारो यांनीं मेक्सिको व

---

बेटास न्यूफौंडलंड हें नांव दिलें; व हल्लीं हेंच नांव चालू आहे. यानंतर सर हंप्रे जिलबर्ट, राले, जान डेविस, हडसन, बाफिन, कुक, हर्न व म्यार्किंजी यांनीं निरनिराळे प्रदेशांचा शोध लाविला.

इ. स. १५३४ त फ्रान्स देशाचा राजा पहिला फ्रान्सिस यानें जाकीस कार्टीयर यास अमेरिकेंत पाठविलें. त्यानें सेन्ट लॉरेन्स नदीचा व सेन्ट लारेन्स आखाताचा शोध लाविला. त्यास हीं दोन्हीं सेंट लॉरेन्स नांवाचे उत्सवाचे दिवशीं सांपडलीं; म्हणून त्यानें लॉरेन्स या साधूचें नांव त्यांस दिलें. फ्रेंच लोकांनीं इ. स. १६०८ पर्यंत अमेरिकेंत महत्त्वाचें कांहीं काम केलें नाहीं. परंतु इ. स. १६०८ त डीपी येथील एक व्यापारी चांपलेन यानें सेंट लॉरेन्स व सेंट चार्लस् या नद्यांचे दरम्यान जो प्रदेश आहे त्यांत वसाहत केली, व क्वीबेक हें शहर वसविलें.

१–धर्माध्यक्ष हा जगांतील सर्व प्रदेशांचा स्वामी; त्यास पाहिजे तो मुलूख देण्याचा अधिकार आहे; व धर्माध्यक्षानें जो प्रांत दिला असेल, त्यावर सत्ता चालविण्याचे कामीं कोणी अटकाव केला असतां, त्यास शासन करण्याचा आपणांस अधिकार आहे, अशा समजुतीनें स्प्यानिश लोकांनीं इ. स. १५१९ त कार्टिज व पिझारो यांना देश काबीज कर-

पेरू हीं दोन राज्यें अनुक्रमें कावीज केलीं. प्रथम अमेरिकेंतील बरेच प्रांतांवर पोर्तुगीज व स्प्यानिश यांचें स्वामित्व होतें. नंतर इंग्लिश व फ्रेंच हे त्याचे वांटेकरी झाले. परंतु ज्या लोकांनीं हळूहळू वसाहती केल्या, त्यांनीं स्वदेशाशीं आपला संबंध तोडून टाकिला व तेच स्वतंत्र बनले आहेत. त्यांनीं अमेरिकेंतील मूळच्या लोकांस पादाक्रांत करून सर्व मुलूख आपले ताब्यांत घेतला आहे. या राष्ट्रांनीं निरनिराळे वेळीं आपल्या खर्चानें लोक पाठवून मध्यप्रदेशाविषयीं, तेथील लोकांविषयीं, व नद्यांचे उगमांविषयीं माहिती आणविली. युनायटेड स्टेट्स सरकारानें मेजर पाईक¹, कपतान लुई व क्लार्क² यांना मिसिसिपी व मिजावरी या नद्यांचे उगमांचा शोध लावण्याकरितां पाठविलें. स्प्यानिश सरकारानें दक्षिण अमेरिकेचे मध्य प्रदेशाची माहिती आणविली. ही माहिती राज्यव्यवस्थेच्या उपयोगीं पडण्यासारखी होती. परंतु तीही प्रसिद्ध झाली नव्हती. ज्या लोकांस शास्त्रीय विषयांची अभिरुचि नव्हती, त्या लोकांचे हातीं राज्यसूत्रें असल्यामुळें, जी माहिती मिळणें अवश्य होतें ती बरेच दिवस उपलब्ध नव्हती. परंतु डॉन डीअर क्विजो याचे हातीं राज्यकारभार आल्यापासून स्प्यानिश लो-

---

ण्याकरितां पाठविलें. कार्टिज यानें मेक्सिकोवर स्वारी करून तो इ. स. १५२१ त हस्तगत केला. पिझारो यानें इ. स. १५३० त पेरूवर स्वारी केली.

१–मेजर पाईक हा मिजावरी व मिसिसिपी यांचा जेथें संगम होतो तेथून ता० ९ आगष्ट सन १८०५ रोजीं निघाला; व मिसिसिपीचा शोध लावून ९ महिन्यांनीं परत आला.

२–कपतान लुई व क्लार्क हे इ. स. १८०४ चे मे महिन्यांत मिजावरी व मिसिसिपी या नद्यांचे संगमाचे ठिकाणापासून निघाले. त्यांनीं मिजावरी व तिच्या मुख्य शाखा यांचा शोध लावून ते ९००० मैल प्रवास करून परत आले.

कांची कोती समजूत, त्यांचा हेकटपणा व त्यांमधील मत्सरभाव हीं हळूहळू नाहींतशीं होऊन, ज्या गोष्टींची माहिती असणें फार महत्त्वाचें आहे, त्या गोष्टींविषयीं माहिती मिळविण्याचा उद्योग सुरू झाला. ब्यारन व्हॉन हमबोल्ट यास या प्रांतांत शोध लावण्याविषयीं स्प्यानिश सरकारची परवानगी मिळाली. ब्यारन व्हॉन हमबोल्ट यानें जे शोध केले व जी माहिती मिळविली ती फारच उपयुक्त होती. हवेंत जो बदल होतो तो कशानें होतो, पाण्यांत हवेचें मान कसें असतें व जमिनीवर कसें असतें, वातावरणाचे मानावरून पाण्याचें अथवा इतर प्रवाही पदार्थांचें गुरुत्व किंवा त्यांचा जोर वगैरे हीं कशीं समजतात यांविषयीं; समुद्राचा खारटपणा, समुद्रांतील प्राणी, खनिजद्रव्यें व वनस्पति, समुद्राचे प्रवाह याविषयीं; हवेपासून प्राणिमात्रावर कशीं कार्यें होतात याविषयीं; जमिनीचें स्वरूप, जमिनीवरील वनस्पति, व पर्वतांची दिशा हीं ज्याप्रमाणें असतील त्याप्रमाणें प्रदेशाचा देखावा कसा पालटतो; निरनिराळे अक्षांशांत निरनिराळे राष्ट्रांचे स्थितींत सृष्टपदार्थविषयक नियमांचे अनुकूलतेप्रमाणें अथवा प्रतिकूलतेप्रमाणें कसा फेरफार होतो; या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टींविषयीं, हमबोल्ट यानें माहिती मिळवून प्रसिद्ध केली; व ज्या गोष्टींविषयीं फक्त शास्त्रीलोक विचार करीत, त्या गोष्टींविषयीं इतर लोकांसही ती माहिती वाचून आवड उत्पन्न होऊं लागली. अस्तु. स्प्यानिश, पोर्तुगीज, इंग्लिश व फ्रेंच या लोकांचे उद्योगानें आज जी आपणांस अमेरिकेविषयीं माहिती उपलब्ध आहे, तिजवरून समजतें कीं, युरोपियन लोक अमेरिकेंत जाण्यापूर्वीं, मेक्सिको व पेरू या दोन देशांत कांहीं सुधारणा होती. बाकीच्या ठिकाणीं रानटी स्थिति होती. अमेरिका खंड एवढें विस्तीर्ण असतां, फक्त

मेक्सिका व पेरू याच ठिकाणीं सुधारणा कां असावी, अशी प्रथमदर्शनीं शंका येते, परंतु देशाची बाल्यावस्था असतां सृष्ट-पदार्थविषयक नियमांचा कसा जोर असतो, व त्यांपासून काय कार्यें होतात हें लक्षांत आणिलें असतां, या शंकेचें कांहीं अंशीं निवारण होईल. आह्मीं मागें सांगितलेंच आहे कीं, धनाचा संचय असल्याशिवाय सुधारणा होत नाहीं; व धनाचा संचय हा, सृष्टपदार्थविषयक नियमांपासून होणारे कार्यांची जशी अनुकूलता अथवा प्रतिकूलता असेल, त्याप्रमाणें जास्ती किंवा कमी होणार आहे. अमेरिकेंत मेक्सिको व पेरू यांशिवाय करून बाकीच्या ठिकाणीं सुधारणा न होण्याचें मुख्य कारण हें कीं, ज्याप्रमाणें मेक्सिको व पेरू या ठिकाणीं सृष्टपदार्थविषयक नियमांची अनुकूलता धनाचा संचय करण्यास होती, त्याप्रमाणें इतर ठिकाणीं नव्हती. आतां अशी स्थिति होती किंवा नव्हती, हें पहाण्याकरितां आपण प्रथम उत्तर अमेरिकेविषयीं व नंतर दक्षिण अमेरिकेविषयीं विचार करूं.

उत्तर अमेरिका खंडाचा उत्तरेकडील प्रदेश हा शीत कटिबंधांत असल्यामुळें या ठिकाणीं थंडी फार असते. हा प्रदेश ओसाड आहे. या विस्तीर्ण प्रदेशांत रशियन अमेरिका[१], ग्रेट

---

१–रशियन अमेरिका फारच ओसाड आहे. बेहरिंग सामुद्रधुनींत प्रवेश करितांच खलाशांस हवेचे संबंधानें बदल झालेला दिसून येतो. या सामुद्रधुनीचे किनाऱ्यावरील प्रदेशांत ज्वालामुखी पर्वतांचे लोळ चोहोंकडे पसरत असल्यामुळें, लोकांस येथें राहण्याची पंचाईत पडते. परंतु समुद्रांत व्हेल, वालरस, सील वगैरे मोठ मोठाले पुष्कळ मासे असल्यामुळें, मूळचे लोकांस निर्वाह करावयास सांपडतो. परंतु उपजीविकेचें साधन हेंच मूळचे लोकांचे नाशास कारण झालें. कारण, हे प्राणी येथें नसते तर लोकांची स्वतंत्रता कायम असती. व्हेल, पाण्यांतील अस्वल, वालरस वगैरे प्राणी या ठिकाणीं नसते तर मास्को शह-

बेअर सरोवराचे सभोंवतालचा प्रदेश, हडसन आखातासभोंवतालचा प्रदेश व ग्रीनलंड१ हीं येतात. यांत अनेक जातींचे

---

रांतील लोंकरीचा व्यापार करणारे लोक, सितका अथवा जकोन येथपर्यंत येण्याचा क्वचित् संभव होता. रशियन लोकांचे जुलमापासून यांची सुटका झाल्या दिवसापासून यांची संख्या हळूहळू वाढत आहे.

इ. स. १८६८ त युनायटेड स्टेटस् सरकारानें रशियन अमेरिका हा देश रशियन सरकारापासून विकत घेतला. हा मुलूख ओसाड आहे खरा, तथापि, या ठिकाणीं लोंकरीचें व माशांचें उत्पन्न बरें होतें.

आलायास्का हा रशियन अमेरिकेचा एक भाग आहे. याची राजधानी सितका. या ठिकाणीं पूर्वी ८०० लोक होते. येथें आतां ३,००० झाले आहेत. हा प्रांत युनायटेड स्टेटस् सरकाराकडे जाण्यापूर्वी, प्रत्येक मनुष्य १८ वर्षांचा झाला म्हणजे, त्यास ३ वर्षेपर्यंत लोंकरीचा व्यापार करणारे मंडळीचे चाकरीस राहवें लागत असे. युनायटेड स्टेटस् सरकारचे अमलाखालीं या प्रदेशाची उत्तरोत्तर सुधारणा होईल अशी आशा आहे. सृष्टपदार्थविषयक नियमांचा विशेष जोर असतां मनाची स्थिति पालटते किंवा नाहीं, हें या प्रदेशांतील लोकांचे उदाहरणावरून दिसून येतें. बिशप इव्हान विनिआमिनो यानें या प्रदेशांत १० वर्षे घालविलीं. त्याचा अभिप्राय असा आहे कीं, हे लोक परस्परांशीं फारसे भांडत नाहींत. त्यांचा धिमेपणा फार चमत्कारिक आहे. हे अत्यानंद कधींही दाखवीत नाहींत. जरी बरेच दिवस एखादे मुलास खावयास मिळालें नाहीं, तरी कोणीं एखादा तुकडा दिला असतां तो तो मोठ्या उत्साहानें व आनंदानें घेण्यासाठीं धांवत येत नाहीं.

१—ऐस्लंडवासी गन्बजार्न यानें इ. स. ९७० त ग्रीनलंड बेटाचा प्रथम शोध लाविला. गन्बजार्न याचे मागून इरिकरांडो हा इ. स. ९८२ त ग्रीनलंड बेटास लागला. हा ज्या प्रदेशास लागला, तो त्यास ऐस्लंडपेक्षां अधिक हिरवा दिसला, ह्मणून त्यानें त्यास ग्रीनलंड हें नांव दिलें. इरिक यानें जी माहिती प्रसिद्ध केली, तिजमुळें पुष्कळ लोकांनीं या ठिकाणीं येऊन वसाहत केली. नार्वेचा पहिला राजा ओलफ यानें या ठिकाणीं एक धर्मोपदेशक पाठवून येथील वसाहत करणारे लोकांस

लोक राहतात. त्यांपैकीं आल्यूट, इस्किमो, क्री इंडियन, टिनी इं-डियन, ग्रीनलंडर हे मुख्य होत. या सर्व लोकांचे स्थितीविषयीं विचार करण्याचें येथें कारण नाहीं. या ठिकाणीं आह्मी इ-

---

ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. १६ वे शतकांत इंग्लंडाहून बऱ्याच मं-डळ्या या प्रदेशाचा शोध लावण्याकरितां पाठविल्या. परंतु त्यांस यश आलें नाहीं. शेवटीं डेन्मार्क देशचे राजाचे आश्रयानें, हन्सइजिरी याने या ठिकाणीं वसाहत करून बरेच लोकांस ख्रिस्ती केलें.

ग्रीनलंड बेट हें फार विस्तीर्ण आहे. याचे उत्तरेकडील प्रदेशाचा अद्यापि शोध लागला नाहीं. या बेटाचे उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत एक पर्वताची रांग आहे. यावर अक्षयीं बर्फ असतें. यामुळें पूर्व व पश्चिम यांमध्यें दळणवळण ठेवण्यास व्यत्यय येतो. ग्रीनलंड बेट हें खडकाळ व ओसाड आहे. हें बेट उत्तरेकडे असल्यामुळें हिम कटिबंधांतील थंडीचा कडकपणा वगैरे या ठिकाणीं आहे. या ठिकाणची जमीन वर्षातून बरेच दिवस बर्फानें आच्छादित असते. दऱ्यांमध्यें बर्फ पसरतें, व त्यावरून जो वारा वाहतो तो फारच थंड असतो. समुद्राचे बाजूनें जो वारा येतो, त्याबरोबर उन्हाळ्यांत पाऊस येतो व एरवीं बर्फ येतें. वसंत ऋतूंत व पावसाळ्यांत वारा फार जोरानें वाहतो. ज्यावेळीं पाऊस पडतो, त्या-वेळीं मेघगर्जना क्वचित् ऐकूं येते. वीज केव्हां केव्हां मात्र दृष्टीस पडते. ग्रीनलंडर लोक पारध करून उपजीविका करितात. पारधीचीं जनावरें रेंदियर, पांढरें अस्वल, खोकड व ससे. ग्रीनलंडर लोक हे दर वर्षास १० पासून १२ हजारपर्यंत रेंदियर मारतात. ते त्यांचे कातड्यांपैकीं निमें कातडीं आपले उपयोगाकरितां ठेवून, बाकीचीं बाहेर गांवीं पाठ-वितात. त्यांचें वस्त्रप्रावरण ह्मटलें ह्मणजे रेंदियराचीं अथवा डाग नांवाच्या माशाचीं कातडीं होत. त्यांचा नेहमींचा व्यवसाय ह्मटला ह्मणजे पारध करणें व मासे मारणें. उपजीविकेकरितां ज्या कलांची आवश्यकता आहे, त्या मात्र त्यांस माहीत आहेत. अशी ज्या ठिकाणीं स्थिति आहे, त्या ठि-काणीं सुधारणा होण्यास किती अडचण आहे हें सांगावयास नको. या लोकांची स्थिति सुधारावी ह्मणून ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं पुष्कळ यत्न केले, परंतु त्यांस ह्मणण्यासारखें यश आलें नाहीं.

स्किमो लोकांविषयीं मात्र हकीकत सांगतों. अमेरिका खंडांत युरोपियन लोक येण्यापूर्वी उत्तरेकडील प्रदेशांत सुधारणा कशी होती हें, इस्किमो लोकांची हकीकत वाचिल्यानें समजणार आहे.

इस्किमो लोक ग्रीनलंड व लाब्रेडोरपासून आल्यूशन पर्वताचे हद्दीपर्यंत जो किनाऱ्यावरील प्रदेश त्यांत राहतात. यांच्या कांहीं जाती दक्षिण प्रदेशांत राहतात. या लोकांचा प्रदेश हा बहुतकरून ओसाड आहे. या ठिकाणीं रानझाडें देखील उत्पन्न होत नाहींत. येथें उत्तर महासागराकडून एक सारखा थंड वारा वाहत असतो, यामुळें शेंवाळ व एका प्रकारचें गवत मात्र उगवतें. यांवर थोडक्याच लोकांचा उदरनिर्वाह होतो. इस्किमो लोकांस फक्त जमिनीचे उत्पन्नावर निर्वाह करणें भाग पडतें तर, त्यांची स्थिति कठीण असती. परंतु समुद्र जवळ असल्यामुळें, त्यांतील मासे वगैरे प्राण्यांवर त्यांस उदरनिर्वाह करावयास सांपडतो. ते समुद्रापासून फार अंतरावर राहत नाहींत. पूर्वेस डेन्स व इंग्लिश व पश्चिमेस रशियन लोकांचें सान्निध्य आहे तथापि, त्यांचे रीतिभातींत फरक पडला नाहीं. इस्किमो लोक हिरवेंच मांस खातात. ते इंडियन लोकांचा पाठलाग करून, जेथें ते सांपडतात तेथें त्यांस मारितात. जेव्हां उन्हाळ्यांत हंस व बदकें हीं किनाऱ्यावर येतात, तेव्हां त्यांस मारून त्यांवर ते उपजीविका करितात. ते वसंत ऋतूंत सील माशाची पारध करून निर्वाह करितात. ते गाडीला कुत्रे जोडून प्रवास करितात.

यांस कायदे कानू कांहीं नाहींत; तथापि, यांचें वर्तन उच्छृंखळपणाचें नाहीं. यांमध्यें जे अधिक धीट असतात त्यांस मान असतो. जोंपावतों कुटुंबाचे वाहकास पारध करण्याची

ताकद असते, तोंपावतों त्यास मान असतो. पुढें तो बायकांच्या मंडळींत असतो. तंट्याचा निकाल करावयाचा झाल्यास, दोन्ही पक्षकार एकमेकांस ठोसे मारितात. हा क्रम दोघांपैकीं एक हरेपर्यंत चालतो. दुसरा प्रकार असा कीं, कोडतांत दोन्ही पक्षकारांनीं एकमेकांस बऱ्याच शिव्या दिल्यावर, व एकमेकांची मन मानेल तितकी निर्भर्त्सना केल्यावर अंजीकोक[1] हे निकाल सांगतात. अंजीकोक हे वैद्यकीचें व जादुगिरीचें काम करितात, ह्मणून त्यांस फार मान मिळतो.

देव एक आहे, अशाविषयीं इस्किमो लोकांस कल्पना सुद्धां नाहीं. भुतें हीं देवता आहेत असें ते मानितात; व भुतांबरोबर अंजीकोक बोलतात असा त्यांचा समज आहे. ग्रीन लंड येथील ख्रिस्ती धर्मोपदेशक मंडळीनें त्यांच्या वेड्या समजुती जाऊन त्यांची सुधारणा व्हावी ह्मणून अनेक वेळां यत्न केला; परंतु त्यांत त्यांस यश आलें नाहीं. इस्किमो लोक सुशील आहेत, तथापि, ह्मातारे व अशक्त यांना ते क्रूरपणें वागवितात. प्रवास करीत असतां, त्यांस ते वाटेंतच सोडून चालते होतात. ह्मातान्यांचा अथवा अशक्तांचा कांहीं उपयोग नाहीं व हे खावयास मात्र काळ होतील असें त्यांस वाटतें. कोणी पाहुणा आला असतां, त्याच्या वस्तु चोरण्याविषयीं त्यांस कांहीं वाईट वाटत नाहीं; व चोरी करतांना ते सांपडले असतां त्याचीही त्यांस लाज वाटत नाहीं. शिकार अथवा पारध करून जें ते मिळवितात त्यापैकीं कांहीं निर्वाहाकरितां ठेवून, हाडें, तेल वगैरे जि-

---

१–अंजीकोक ह्मणजे पाद्री अथवा धर्माध्यक्ष हे भविष्य सांगतात व औषध देतात. हे सुऱ्या गिळतात व शरीराचे निरनिराळे भागांतून दगड काढून दाखवितात, असा इस्किमो लोकांचा समज आहे. ह्यांची कांहीं एक विशेष प्रकारची भाषा आहे.

२–इस्किमो लोक उन्हाळा लागला ह्मणजे गाडी जुंपून तींत, सील

नसा ते विकतात व त्यांबद्दल मणी, सुया, वगैरे जिनसा घेतात.

आह्मीं इस्किमो लोकांविषयीं जी हकीकत दिली, तिजवरून या विस्तीर्ण प्रदेशांत धनाचा संचय होण्यास व सुधारणा होण्यास कशी अडचण आहे हें समजेल. आह्मीं मागें सांगितलेंच आहे कीं, पारध करून उपजीविका करणें हें काम सोपें व सुखाचें नाहीं. पारध करण्यासाठीं जीव वारंवार धोक्यांत घालावा लागतो. यापासून अंगीं धीटपणा येतो; परंतु कधीं कधीं जीवाची हानि होते. पारध सर्वकाळ सारखी मिळते असें नाहीं. वालरस, सील वगैरे प्राणी सर्व ऋतूंत सांपडतात असें नाहीं. येथें अन्न मिळण्याची मारामार पडत असते तथापि, तें एकदां मिळालें ह्मणजे बेताबातानें खाऊन त्याची जशी नीट व्यवस्था ठेवावी तशी ते ठेवीत नाहींत. त्यांस निर्वाहासाठीं एकसारखे श्रम करावे लागतात, व थंड हवेंत राहवें लागतें ह्मणून त्यांस आपणांपेक्षां जास्ती अन्न लागतें; जास्ती अन्न लागतें ह्मणून, ते जो थोडा बहुत संचय करतात, तो संपून जाऊन त्यांस उपास काढावे लागतात.

ज्याप्रमाणें इस्किमो लोकांस सृष्टपदार्थविषयक नियमांचे प्रतिकूलतेमुळें धनाचा संचय करण्यास अडचण येते, त्याप्रमाणें क्री इंदियन, टिनी इंदियन, वगैरे ज्या जाती या विस्तीर्ण प्रदेशांत राहतात, त्यांसही अडचण येते. उत्तर अमेरिकेचे उत्तर प्रदेशांत सृष्टपदार्थविषयक नियमांचा अंमल असल्यामुळें, या

---

माशाचें तेल, व्हेल माशाचीं हाडें, सील माशाचीं कातडीं टाकून कोलवील नदीकडे जातात. या ठिकाणीं कोटझीबु सौंडपासून आलेले इस्किमो यांस भेटतात. त्यांस ते या वस्तु देऊन त्यांपासून तांब्याचीं भांडीं, सुऱ्या, तंबाखू, मणी वगैरे पदार्थ घेतात. हा व्यवहार १० दिवस चालतो. या दिवसांत ते फारशी झोंप घेत नाहींत.

ठिकाणीं मूळच्या लोकांची सुधारणा झाली नाहीं. जोंपावेतों हा अंमल कायम राहील, तोंपावेतों येथील लोकांची सुधारणा होण्यास अडचण पडेल, एवढेंच सांगून आपण उत्तर अमेरिकेच्या मध्य प्रदेशाविषयीं विचार करूं.

देश सुपीक असण्यास ज्या गोष्टींची अनुकूलता असली पाहिजे, त्यांविषयीं आह्मीं पहिले भागांत निरूपण केलें आहे. त्या गोष्टी मुख्यत्वेंकरून उष्णता व ओलसरपणा ह्या होत. ज्या मानानें या दोन गोष्टींची अनुकूलता असते त्या मानानें देश कमी किंवा जास्ती सुपीक असतो. ज्या ठिकाणीं उष्णता[1] फार असून त्या मानानें ओलावा बराच असतो, त्याठिकाणीं जमीन फार सुपीक असते; व उष्णता व ओलावा हीं कमी असलीं तर जमीन कमी सुपीक असते असा साधारण नियम आहे. या नियमास कांहीं ठिकाणीं अपवाद सांपडतील; परंतु ते स्थानविशिष्ट कारणांमुळें असतील. अशीं स्थळें खेरीजकरून या नियमाची सार्वत्रिक[2] व्याप्ति आहे. आतां हा नियम उत्तर अमेरिकेचे मध्य प्रदेशास लागू करून पाहतां असें दिसून येतें कीं, या प्रदेशांत ज्या नद्या आहेत, त्या बहुत करून पूर्वेकडील[3] बाजूकडे आहेत; या ठिकाणीं बऱ्याच नद्या असल्याकारणानें, या बाजूचे प्रदेशांत चांगला[4] ओलावा आहे. परंतु या ठिकाणीं उष्णता

---

१—उष्णता व ओलावा हीं स्वाभाविक असोत किंवा कृत्रिम उपायांनीं प्राप्त झालेलीं असोत.

२—बकलकृत सुधारणेचा इतिहास भा. १ पृष्ठ ९६.

३—ओहिओ, टेनेसी, कनेक्टिकट, हडसन, देलावेर, सक्विहाना, पोतोम्याक, सव्हाना, अपेलाचिकोला, पर्ल, मिसिसिपी, रेड, अर्कन्सास, मिजावरी व सेंटलॉरेन्स.

४—मिसिसिपी व तिच्या शाखा ह्यांनीं १०९९००० औरस चौरस मैल प्रदेश भिजलेला आहे ही गोष्ट मनांत आणितां, या बाजूस ओ-

फारशी नाहीं. ओलावा पूर्वेकडील प्रदेशांत आहे व उष्णता पश्चिमेकडील प्रदेशांत[3] आहे. ही स्थिति १६ वे शतकापर्यंत पूर्णपणें दृष्टीस पडत होती; ह्मणून या प्रदेशांतील जमीन सुपीक नव्हती. या कारणानें १६ वे शतकापूर्वीं या ठिकाणीं सुधारणा झाली नाहीं. या शतकापासून या ठिकाणीं युरोपांतील राष्ट्रांनीं वसाहती केल्या आहेत व आतां या ठिकाणची स्थिति निराळी आहे. या ठिकाणीं गहूं, कापूस, वगैरे जिनसा चांगल्या पिकतात. या ठिकाणचे कापसासारखा कापूस खुद्द हिंदुस्थानांत होत नाहीं. हें सर्व तेथील लोकांचे कृतीचें फळ आहे. असो. सुपीक-

---

लावा किती आहे, याची सहज कल्पना करितां येईल. मिसिसिपी नदीचे मुखापासून ३,००० मैल पर्यंत जहाजें चालतात.

१–आटलांटिक महासागराच्या पलीकडच्या बाजूकडील प्रांतांत, ह्मणजे अमेरिकेचे पूर्व किनाऱ्यावरील प्रदेशांत, हवेचें मान एकाएकीं बदलतें. हा बदल आटलांटिक महासागरावरून जो वारा वाहत येतो त्यामुळें होतो. या वाऱ्याच्यायोगानें थोड्या कालांत पाण्याचें बर्फ बनतें, व वातावरण बर्फाचे परमाणूंनीं व्यापून जातें.

२–(अ) बकलकृत सुधारणेचा इतिहास. भा. १ पृष्ठ ९८.

(ब) प्रोग्रेसिव जिआग्रफी पृ. ६२१.

३–युरोपखंडाच्या पश्चिमेस जितकी उष्णता असते तितकीच अमेरिकेच्या पश्चिमेस असते. परंतु पूर्व व मध्य प्रदेशांत हवा थंड असते. याचें कारण असें आहे कीं, राकी पर्वताची उंच रांग ही पश्चिमेस पसरली असल्यामुळें पश्चिमेकडून जो उष्ण वारा वाहत असतो त्यास प्रतिबंध होतो; उत्तर अमेरिकेचा बराच प्रदेश हा उत्तर ध्रुवाजवळ आहे; या खंडाचा बहुतेक भाग उष्ण कटिबंधांत नसून उंचवट्याचा आहे; व उत्तरेस पर्वत नसल्यामुळें उत्तरध्रुव महासागराकडून जो थंड वारा वाहत असतो त्यास बिलकूल प्रतिबंध होत नाहीं. कानडांतील विस्तीर्ण सरोवरांचा उत्तर किनारा हा लंदनच्या दक्षिणेस येईल, परंतु येथें वर्षांतून सहा महिने बर्फ असतें.

तेचीं जीं दोन कारणें त्यांची अनुकूलता मेक्सिकोचे उत्तरेकडील प्रदेशांत नव्हती; ह्मणजे एके ठिकाणीं ओलावा होता तर उष्णतेचें मान कमी होतें; दुसरे बाजूस उष्णता होती परंतु ओलावा नव्हता. यामुळें संपत्तीचा संचय न होऊन लोकांची स्थिति जशीची तशीच फार दिवस होती. सोळाव्या शतकांत युरोपियन लोक येथें आल्यावर या प्रांतांत सुधारणा होऊं लागली. आतां या सुधारणेचा महिमा काय आहे हें आपणांस माहीत आहे. अमेरिकेचा हा भाग आतां सुधारणेचे संबंधानें प्रतियुरोप बनला आहे. या ठिकाणची पूर्वींची स्थिति व हल्लींची स्थिति याविषयीं विचार केला असतां मनुष्याची शक्ति किती आहे, व त्यास आपले प्रयत्नानें काय करितां येतें हें समजतें.

२० व्या अक्षवृत्ताचे दक्षिणेस, उत्तर अमेरिका खंड हें पनामाच्या संयोगीभूमीपर्यंत चिंचोळें होत गेलें आहे. हा प्रदेश चिंचोळा असल्यामुळें या प्रदेशास समुद्राचे पाण्याचे वाफेचा ओलावा सांपडतो; व हा प्रदेश विषुववृत्ताजवळ असल्यामुळें या ठिकाणीं उष्णता चांगली असते. उत्तर अमेरिकेंत या दोन गोष्टींची अनुकूलता मुख्यत्वेंकरून याच ठिकाणीं आहे; ह्मणून याच ठिकाणीं युरोपियन लोकांस सुधारणा[1] झालेली दिसून आली. हा प्रदेश मेक्सिको हा होय.

क्यालिफोर्निया व कोलंबिया यांचे दक्षिण भागांतील वालुकामय मैदानें हीं उष्णतेमुळें रखरखीत आहेत. यांत ओलावा असता तर, या ठिकाणीं ही सुधारणा झाली असती यांत संशय नाहीं. परंतु सुपीकतेस कारणीभूत ज्या मुख्य दोन गोष्टी, त्यांची मेक्सिकोशिवाय उत्तर अमेरिकेचे इतर भागांत चांगलीशी अनुकूलता नसल्यामुळें, त्या ठिकाणीं सुधारणेस चांगला

---

१—बकलकृत सुधारणेचा इतिहास भा. १ पृ. ९९ व १००.

थारा मिळाला नाहीं; व उत्तर अमेरिकेंत मेक्सिकोशिवाय आपणांस एकही देश सुधारलेला आढळला नाहीं, याचेंही हेंच कारण आहे. ज्या सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें उत्तर अमेरिकेंत सुधारणेचें नियमन झालें त्यांविषयीं एथपर्यंत निरूपण झालें. आतां दक्षिण अमेरिकेविषयीं स्थूल विचार करणें राहिलें.

दक्षिण अमेरिकेचा दक्षिण प्रदेश हा, उत्तर ध्रुववृत्तांतील प्रांतांपेक्षां जास्ती ओसाड आहे. या ठिकाणीं धीट इस्किमो लोकांप्रमाणें सील अथवा वालरस धरणारे अथवा सामोजदी अथवा लाप लोकांप्रमाणें रेन्दियरांचे कळप राखणारे लोक दिसत नाहींत. हें ठिकाण भणभणीत व ओसाड मैदान असल्यामुळें, येथें फारशी वस्ती नाहीं. उन्हाळ्यांतील पुष्पामुळें उत्तर ध्रुव समुद्रांत प्रवास करणारांस आनंद वाटतो. परंतु कॉकबर्न बेटाच्या पलीकडे कोणत्याही प्रकारचे रोप दिसत नाहीं. उत्तरेके-

---

१–उत्तर ध्रुवाकडे वनस्पति कां असाव्या व दक्षिण ध्रुवाकडे तितक्याच अंशावर त्या कां नसाव्या अशी शंका येते; परंतु अशी स्थिति असण्याचें कारण असें आहे कीं, उत्तर ध्रुवाकडे जमीन फार व दक्षिण ध्रुवाकडे पाणी फार आहे. उत्तरेकडील समुद्रांत जमिनीचीं बरींच टोंकें जाऊन समुद्राला त्यांचें वलयच पडलें आहे. सायबेरियाचीं मैदानें व हडसनच्या उपसागराजवळील प्रांत सूर्यकिरणांनीं तापतात; व उष्णतेचा संचय होऊन ती बाहेर पडूं लागते. यामुळें या प्रदेशांत झाडें वगैरे दृष्टीस पडतात. ग्रीनलंड अथवा स्पिट्झबर्जेन ह्यांचे पश्चिम किनाऱ्यासारखे जे डोंगराळ प्रदेश आहेत, त्यांजवळ पर्वतासारखे बर्फाचे ढीगचे ढीग असतात. दक्षिणेकडे हे साधारण उंच प्रदेशावरही होतात. उत्तरेकडून जो थंड वारा वाहत असतो त्याची मर्यादित व्याप्ति असते. दक्षिणेकडून जो वारा वाहत असतो त्यास जमीन, डोंगर वगैरे पासून अडथळा होत नसल्यामुळें तो मोकळा वाहतो. उत्तरेकडील प्रदेशांत आखात प्र-

डील प्रदेशांत शेवाळ अथवा गवत तरी दृष्टीस पडतें. या ठिकाणीं तें सुद्धां दृष्टीस पडत नाहीं.

दक्षिण अमेरिकेचे दक्षिणेस पाटेगोनियाचा देश आहे. ह्याचेमधून उंच पर्वतांची रांग गेली आहे. पश्चिमेकडील प्रदेशांत एकसारखा थंड वारा वाहत असतो. ह्याचे किनाऱ्यावर पाणी आपटत असतें, यामुळें या ठिकाणीं नेहमीं धुकें असतें. पूर्वेकडील प्रदेश ओसाड आहे. पश्चिमेकडून जो वारा वाहत असतो, तो शुष्क असतो, व अंदीज पर्वतावरून हा वारा येईपर्यंत यांतील ओलावा नाहींसा होतो; यामुळें हा प्रदेश अतिशयित नापीक आहे. नदीच्या कांठावर मात्र हिरवी जागा दृष्टीस पडते. वातावरणांतील शुष्कपणामुळें, प्रवाशास कित्येक दिवस पाण्यावांचून काढावे लागतात. येथें झरे वगैरे क्वचित् दृष्टीस पडतात; जे

---

वाहांचा ( गल्फस्ट्रीमचा ) कांहीं तरी उबारा सांपडतो; दक्षिणेकडील प्रदेशास हा बिलकूल मिळत नाहीं; यामुळें दक्षिणप्रदेशांत रोपें वगैरे दृष्टीस पडत नाहींत.

हिम कटिबंधाविषयींची ही माहिती आपणास कुक, स्मिथ, सर जेम्स रास वगैरे प्रवाशांचे लेखांवरून मिळते.

कुक हा वादळामुळें हार्न नांवाच्या भूशिरास लागला; व त्याने इ. स. १६०० त शटलंड बेटाचा शोध लाविला. परंतु दक्षिण प्रांतांत काय आहे, याविषयींची माहिती इ. स. १७७४ पर्यंत नव्हती. यावर्षी कुक यानें सफर करून बरीच माहिती मिळविली. याचे मागून स्मिथ साहेबानें न्यू इंग्लंड बेटाचा शोध लाविला. या नंतर इ. स. १८२१ त रशियन लाजारेफ यानें पाल दी फर्स्ट व आलेक्झांदर या बेटांचा शोध लाविला. यानंतर क्यापटन वेडेल, बिस्को, ड्यूमांटडीयर, विली, सर जेम्स रॉस वगैरे गृहस्थांनीं अनेक शोध केले. या सर्वांत सर जेम्स रॉस हा दक्षिणेकडे बराच लांब गेला. हा इ. स. १८४१ त सफर करावयास निघाला; व यानें फ्रांक्लीन, प्यारी वगैरे बेटांचा शोध लाविला.

आहेत ते खारट आहेत, व त्यांपासून तहान भागत नाहीं. ज्याप्रमाणें उत्तरेकडे रेंदियर, त्याप्रमाणें या ठिकाणीं ग्वायांनाको हा पशु होय. येथील लोकांस पारध केल्याशिवाय उपजीविका करितां येत नाहीं. यांजमधील मुख्यास कारीक्वेन ह्मणतात,

१–पाटेगोनियांत इंदियन लोकांचे जातींपैकीं एका जातीचे लोक राहतात. त्यांचा पोषाक ग्वायानाकोचे कातड्याचा केलेला झगा होय. हा प्राचीन ग्रीक व रोमन लोकांचे झग्याप्रमाणें लांब असतो. यास ते म्याजुही ह्मणतात. अचिकेनट हें त्यांचे भाषेंतील देवाचें नांव होय. याशिवाय दुसरीं दैवतें आहेत; व त्यांचें सांत्वन वगैरे करणें झाल्यास, ते पंचाक्षऱ्यास बोलावतात. पुढें काय होणार हें आपणांस समजतें असें सांगून, पंचाक्षरी हे लोकांस फसवितात. परंतु लोक भिकारी असल्यामुळें, त्यांस या धंद्यांत फारशी किफायत होत नाहीं. पंचाक्षरी हे वैद्याचेंही काम करितात. प्याटेगोनियांतील इंदियन लोकांचा असा समज आहे कीं, ज्या व्याधींपासून प्राणीमात्रास त्रास सोसावा लागतो, त्या भुतांपसून होतात. यांच्यांत धर्मभोळेपणाचा एक चमत्कारिक मासला आहे. तो असा कीं, हे लोक बहुत करून आपले केस कापीत नाहींत; कापलेच तर, ते नदींत टाकून देतात, अथवा जाळून टाकतात. कारण, त्यांस असें भय वाटतें कीं, आपला केस दुष्ट जादुगाराचे हातीं लागला असतां, तो आपलें नुकसान करील.

नदीचे कांठानें प्रवास करीत असतां, प्रवाहाबरोबर झाडांचीं खोडें दृष्टीस पडलीं म्हणजे, त्यांस ते भुतें आहेत असें समजून, मोठ्यानें हाका मारितात. हीं खोडें हळूहळू वाहूं लागलीं तर, अथवा भोंवऱ्यांत सांपडलीं तर त्यांस वाटतें कीं, तीं आपलें म्हणणें ऐकावयास स्तब्ध उभीं राहिलीं आहेत. मग ते त्यांस नवस करितात. हत्यारें, दागिने व कधींकधीं घोड्यांचे हात पाय बांधून त्यांस पाण्यांत टाकून देतात. असें केल्यानें आपल्यावरचीं अरिष्टें टळून आपणांस पुढच्या जन्मीं स्वर्ग प्राप्त होईल असें त्यांस वाटतें.

२–कारास्केन ही पदवी वंशपरंपरेनें प्राप्त होत नाहीं. बापाचे मागून मुलास ही पदवी मिळविणें झाल्यास, आपल्या अंगीं वक्तृत्व,

व त्यास ही पारध केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. जेथें देशांतील मुख्य पुरुषास निर्वाहाकरितां रानांतून भटकत फिरावें लागतें, तेथें लोकांची स्थिति कशी असते, याची सहज कल्पना करितां येईल. ज्या ठिकाणीं पारध केल्याशिवाय निर्वाहाचें दुसरें साधन नसतें, त्याठिकाणीं लोकांची स्थिति नेहमीं रानटी असते, असें इतिहासावरून दिसून येतें. ज्या प्रदेशांत गवत उगवण्याची देखील मारामार, त्या प्रदेशांत अज्ञान स्थितींत निर्वाहाचे पदार्थ उत्पन्न होण्याचा संभव अगदीं थोडा आहे. दक्षिण अमेरिकेचा उत्तर प्रदेश हाही बहुत करून रुक्ष आहे. ज्याप्रमाणें आफ्रिकेंत साहाराचे रानामुळें सुधारणेस व्यत्यय आला, त्याप्रमाणें लेनॉसचे मैदानामुळें या ठिकाणीं पुष्कळ अंशीं व्यत्यय आला

---

धैर्य व उदारपणा हे गुण आहेत, असें मुलास दाखवावें लागतें. मुलाचे अंगीं हे जर गुण नसतील, तर शहाणपणाविषयीं ज्याची विशेष ख्याति असते त्यास ही पदवी मिळते.

१–लेनासचे रुक्ष व ओसाड मैदान हें दक्षिण अमेरिकेचे उत्तर प्रदेशांत आहे. हें मैदान सुमारें २५०,००० औरस चौरस मैल आहे. जर्मनी व हालंड यांतील मैदानें यापुढें कांहींच नाहींत. हें मैदान विषुववृत्ताजवळ असल्यामुळें या ठिकाणीं ऊन अतिशयित कडक असतें. या कारणानें या ठिकाणीं मनुष्यांची फारशी वस्ती नाहीं. सायबेरियांतील एकांतवासांत रेंदियरांचीं कातडीं पांघरून थंडीपासून बचाव करितां येतो. परंतु लेनासचे रखरखीत मैदानांत सूर्यकिरणांपासून व तापलेल्या जमिनीपासून बचाव करण्यास मारशिया जातीचे ताडवृक्षांशिवाय दुसरा उपाय नाहीं. हे ताडवृक्ष जवळ जवळ असते तरी प्रवाशांस सुख झालें असतें. येथें वाऱ्यामुळें धूळ उडून ती ओसाड मैदानभर पसरते; व जी वाळू उडत असते, ती डोळ्यांत जाऊन प्रवाशांस जमिनीवर बेशुद्ध पडावें लागतें. तहानेनें घसा कोरडा पडतो; वक्रीभवनामुळें मृगजलाचा देखावा उत्पन्न होऊन समुद्रासारखा देखावा दिसूं लागतो; व श्वापदें व प्रवाशी पाण्याचे आशेनें लांबवर जाऊन परत येतात. ज्याप्रमाणें

असें ह्मटलें असतां चालेल. एवढेंच सांगून आह्मी दक्षिण अमेरिकेचे मध्य प्रदेशाविषयीं विचार करावयास लागतों.

---

ध्रुवाकडील प्रांतांत अतिशयित थंडीमुळें नाडी साफ चालत नाहीं, त्याप्रमाणें अतिशयित उष्णतेमुळें या ठिकाणीं नाडी साफ वाहत नाहीं. सुसरी व दुसरे प्राणी हे कोरडे पडलेल्या डबक्यांचे चिखलांत दडून वसतात. कांहीं प्राणी नदीच्या कांठीं किंवा लांबच्या रानांत जाऊन राहतात. वरू एकमेकांवर आपटतात. घर्षणानें त्यांतून अग्नि उत्पन्न होतो; व त्याचा प्रसार होऊन गवत जळून फस्त होतें. या प्रांतांत स्कांवर्गेन यानें प्रवास केला; व या ठिकाणीं जी स्थिति आहे, तिजविषयीं तो ह्मणतो कीं, "आम्ही या मैदानांत फार लांबवर गेलों नाहीं तोंच, आम्हांस आग्नेयी दिशेकडे धुराचे लोळ आकाशांत दिसूं लागले. आमचेबरोबर कांहीं इंदियन लोक होते. त्यांनीं आम्हांस पाऊल लवकर उचलावयास सांगितलें, परंतु इंदियन लोकांस भय वाटलें असेल असें आम्हांस वाटलें. परंतु पुरा अर्धा तास लोटला नाहीं तोंच, आमच्यावर संकट ओढावलें आहे असें आम्हांस कळून आलें. आम्ही चोहोंकडे पाहूं लागलों; परंतु आम्हांस डबकीं कोठें दिसलीं नाहींत. आमचेकडे धुराचा लोळ येत आहे हें आम्हीं पाहिलें; व वरू तटातट तुटत आहेत हें आम्हीं ऐकिलें. आमचेबरोबर जे लोक होते त्यांस उंचवट्याची जागा दैववशात् दिसली. या जागेवर आम्ही गेलों, परंतु आमचे मागोमाग मृत्यु येत आहे कीं काय असें आम्हांस वाटूं लागलें. जर आम्हांस उंचवट्याचे जागेवर चढून जाण्यास पळभर उशीर लागला असता, तर, प्रवासाची हकीकत सांगावयास मी जीवंत राहिलों नसतों. कारण, धुराचा लोळ आमचे तोंडांत जाऊन आम्ही गुदमरून मेलों असतों. आम्ही, ज्या दिशेकडून धुराचा लोळ येत होता, त्या दिशेकडे पाठ करून, व परमेश्वरावर भरंवसा ठेवून, काय होतें तें पाहत बसलों. आम्ही ज्या टेंकडीवर उभे होतों, त्या टेंकडीवरील गवत जळून गेलें. परंतु ईश्वरीकृपेनें आमचा बचाव झाला."

स्कांवर्गेन यानें जी ही स्थिति सांगितली ती पावसाळा लागेपर्यंत असते. नंतर पावसाळा लागला म्हणजे प्राणी पुनः येऊन वास करूं लागतात.

उत्तर अमेरिकेचा पूर्व प्रदेश हा पश्चिमेकडील प्रदेशापेक्षां अधिक थंड आहे, हें आह्मीं मागें सांगितलेंच आहे; परंतु दक्षिण अमेरिकेंत याहून भिन्न स्थिति आहे. विषुववृत्ताचे उत्तरेस पूर्वेकडील प्रांत हा पश्चिमेकडील प्रांतापेक्षां अधिक थंड आहे. परंतु विषुववृत्ताचे दक्षिणेस पूर्वेकडील प्रांत हा पश्चिमेकडील प्रांतापेक्षां जास्त उष्ण आहे. ज्याप्रमाणें उत्तर अमेरिकेचा पूर्व प्रदेश हा नद्यांचे पाण्यानें भिजलेला आहे, त्याप्रमाणें दक्षिण अमेरिकेचा पूर्व प्रदेश व मध्य प्रदेश हे मोठ मोठाल्या नद्यांचे पाण्यानें भिज-

---

नद्यांना पाणी येऊन त्या वाहूं लागतात. चोहोंकडे डबकीं सांचतात. त्यांत सुसरी वगैरे येऊन राहतात. ज्या वेळेस स्पानिश लोक लेनास मैदानांत प्रथम आले, त्या वेळेस त्या ठिकाणीं मनुष्यांची फारशी वस्ती नव्हती. या मैदानांत ताडवृक्षांचीं फळें नसतीं तर, या ठिकाणीं एकही मनुष्य दृष्टीस पडला नसता. अलीकडे दहा पंधरा कोसांच्या अंतरानें कांहीं खेडीं वसलेलीं दृष्टीस पडतात. ही स्थिति युरोपियन लोक या प्रांतांत जाऊन सुमारें ३५० वर्षे होत आलीं तेव्हां दृष्टीस पडते. यावरून या ठिकाणीं पूर्वीं कशी स्थिति असेल व येथें सुधारणा कां झाली नाहीं, याचें अनुमान करितां येईल.

१–हा प्रदेश ब्रेझिल देश होय. या ठिकाणीं पुष्कळ नद्या आहेत. ब्रेझिल देशांत ज्या विशेष गोष्टी दृष्टीस पडतात त्यांपैकीं ही एक होय. या ठिकाणीं ज्या नद्या आहेत त्या–मदिरा अथवा वुड, टोपेजास, क्झिंगुई, ट्युकंटाईन, रायो सेंट फ्रान्सिस्को, रायो ग्रांडी, आमेझान व तिच्या शाखा, न्यु आलागा, इका, यपुरा, जुले, जुरूआ, टेफी, कोआरी, व पुरुस. आमेझान व तिच्या शाखांमिळून भिजलेला प्रदेश सुमारें २३, ३०,००० औरस चौरस मैल म्हणजे युरोपखंडाचे दोन तृतीयांशायेवढा अथवा सुमारें हिंदुस्थानचे क्षेत्रफळायेवढा आहे, इतकें सांगितले म्हणजे, या ठिकाणीं ओलावा किती आहे याची कल्पना होईल. आमेझान नदीचें मुख ४८ कोस रुंद आहे; व हिचे मुखापासून ११०० कोसपर्यंत तारवें चालतात. लापलाटा नदीचे मुख १५० मैल रुंद आहे.

लेले असल्यामुळें, या ठिकाणीं ओलावा पुष्कळ असतो. हे दोन्ही प्रदेश विषुववृत्ताजवळ असल्यामुळें याठिकाणीं उष्णताही फार असते; व उष्णता व ओलावा हीं दोन्हींही या प्रदेशांत आहेत ह्मणून हा भाग फारच सुपीक आहे.

आह्मीं मागें जो सिद्धांत सांगितला, त्याप्रमाणें पाहतां, इतर सुपीक प्रदेशांत ज्याप्रमाणें सुधारणा झाली, त्याप्रमाणें याही प्रदेशांत सुधारणा व्हावी, असें प्रथमदर्शनीं वाटण्यास कारण आहे. परंतु हा प्रदेश सुपीक असून या ठिकाणीं सुधारणा झाली नाहीं, व मूळचे लोक रानटीच स्थितींत राहिले, यावरून सुधारणेस कांहीं तरी बाधक कारण असलें पाहिजे हें उघड आहे. कांहीं बाधक कारणाचा जोर नसता तर, दक्षिण अमेरिकेंतील हा प्रदेश सुधारणेचें स्थान असतें यांत संशय नाहीं. दक्षिण अमेरिकेंतील या प्रदेशांत ज्या कारणामुळें सुधारणेस अडथळा येऊन लोकांस रानटी स्थितींत राहवें लागलें, तें कारण मुख्यत्वेंकरून व्यापारोपयोगी वायु हें होय.

या वाऱ्याची[2] गति विषुववृत्ताचे दक्षिणेस २८ अंश, व उत्त-

१–बकलकृत सुधारणेचा इतिहास. भा. १ पृ. १०१,१०२.

२–ट्रेडवुइंडस म्हणजे व्यापारोपयोगी वायु ह्याच्या योगानें, जहाजें चालण्यास जरी अडथळा येतो, तरी या वाऱ्यापासून जो नफा आहे, तो हा आहे कीं, उष्ण कटिबंधांतील उष्ण हवा ही शीत कटिबंधांत जाऊन तेथील लोकांस कांहीं उष्णता प्राप्त होते; व शीत कटिबंधांतील थंड हवा ही उष्ण कटिबंधांत जाऊन तेथील लोकांस थंड हवेचें सुख मिळतें. उष्णतेचा व थंडीचा जोर कमी झाल्यामुळें, पृथ्वीचा बराच प्रदेश राहण्यास योग्य झाला आहे. या वाऱ्याची कोणते ठिकाणीं फार गति असते, कोणते ठिकाणीं कमी असते व हा वारा कोणत्या दिशेनें वाहत असतो, याविषयींची माहिती खलाशी लोकांस फार उपयोगाची आहे. आलीकडे थोड्या दिवसांत जलमार्गानें पुष्कळ प्रवास करितां येतो, याचें मुख्य कारण, ही माहिती हें होय.

रेस २८ अंश आहे. ह्या विस्तीर्ण प्रदेशांत कांहीं जमीन फारच सुपीक आहे. हा वारा उष्णकटिबंध व ध्रुववृत्त यांमध्यें एकसारखा वाहत असतो. ह्याचें कारण असें आहे कीं, उष्ण-कटिबंधांतील पृथ्वीचा भाग सूर्यकिरणांनीं तापतो; व त्यामुळें तेथील हवा तापून तिचे परमाणु हलके होऊन प्रसरण पावतात. हे परमाणु प्रसरण पावूं लागल्यामुळें, अर्थात् दक्षिणेकडून जी थंड व जड हवा येत असते, ती उष्ण हवेस हटवूं लागते. पृथ्वी फिरत नसती तर, ज्याप्रमाणें व्यापारोपयोगी वायूची प्रथम गति असते, त्याप्रमाणें नंतरही असती; ह्मणजे उष्णकटिबंधाचे उत्तरेस दक्षिणेकडे, व त्याच कटिबंधाचे दक्षिणेस उत्तरेकडे. परंतु पृथ्वी आपल्या आंसाभोंवतीं पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरत असते; ह्मणून या वाऱ्याची मूळची गति जाऊन त्यास निराळी गति मिळते; व ज्या अर्थीं इतर ठिकाणांपेक्षां विषुववृत्ताजवळ पृथ्वीची फार गति आहे, त्या अर्थीं, या वाऱ्याची गति विषुववृत्ताचे उत्तरेस ईशान्येकडून, व विषुववृत्ताचे दक्षिणेस आग्नेयीकडून असते. व्यापारोपयोगी वायु ह्मणजे काय व त्याची गति कशी असते याविषयीं येथें माहिती देण्याचें कारण नाहीं. या वाऱ्यापासून दक्षिण अमेरिकेंत काय कार्यें झालीं, व त्यामुळें सुधारणेस कसा व्यत्यय आला, याविषयीं आपणांस मुख्यत्वें विचार करावयाचा आहे.

व्यापारोपयोगी वायु हा अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर वाहत असतो. हा पूर्वेकडून अट्लांटिक महासागरास उल्लंघून जमिनीकडे वाहत असतो. हा वारा शुष्क असतो असें नाहीं. ह्यांत वाफेचें फारच संमिश्रण असतें. हा वारा अट्लांटिक समुद्रावरून येत असतां त्यांत ही वाफ मिश्रित होते, व वाफेनें युक्त असा हा वारा पश्चिमेकडे वाहूं लागतो. परंतु

मध्यंतरीं ह्याची गति कुंठित होते. कारण, अंदीज[1] पर्वताची जी उंच रांग पसरलेली आहे तिजवर हा वारा आपटतो; व यांतील वाफ जमा होऊन वृष्टि सुरू होते. मोठमोठाले प्रवाह चालून भयंकर पूर येतात. शिवाय ब्रेझीलमध्यें नद्यांचे पाण्याचा विपुल पुरवठा आहे. येथें अशा प्रकारें ओलावा असल्यामुळें व हा देश उष्ण असल्यामुळें हा अतिशयित सुपीक झाला आहे. असा सुपीक प्रदेश भूतलावर[2] एकही नाहीं. हिंदुस्थान व मिसर हे देश सुपीक आहेत, परंतु ब्रेझील देशाशीं ताडून पाहतां कमी सुपीक आहेत. पश्चिम खंडांत जीं रोपें व झाडें आहेत तीं सर्व ब्रेझील देशांत सांपडतात. वनस्पति व झाडपाला ह्यांनीं हिरवीं चार झालेलीं मैदानें, व किर्र व भयंकर झाड्यांनीं व्यापलेले डोंगर हीं ब्रेझील देशांत फार दृष्टीस पडतात. सृष्टींत जे उत्तम पदार्थ आहेत ते अमेझान नदीचे पाण्यानें भिजलेल्या प्रदेशांत सांपडतात. आंबे[3], केळीं, चिंच, नारळ वगैरे फळफळावळींचीं झाडें किती आहेत यांची तर गणतीच नाहीं. निरनिराळ्या प्रकारच्या उपयुक्त औषधि अथवा दुसऱ्या प्रकारच्या वनस्पति[4] इतक्या आहेत कीं, तितक्या दुसरे देशांत सांपडणें कठीण. ब्रेझील देशांतील झाडी इतकी दाट व किर्र आहे कीं, तींत

---

१–अंदीज हें नांव पेरुवियन भाषेंतील एका शब्दावरून पडलें आहे; ह्याचा अर्थ शिसें अथवा तांबें असा आहे.

अंदीज पर्वतांत ज्वालामुखी पर्वत फार आहेत. त्यांपैकीं मुख्य व अतिशय उंच कोटोपाक्सि, आंटिसाना व पिंचिंचा हे होत. कोटोपाक्सि हा फारच भयंकर आहे. अंदीज पर्वतांत धरणीकंपही होतात. या पर्वताची लांबी ४४०० मैल असून रुंदी २५० मैल आहे.

२–प्रोग्रेमिव जिआग्रफी. पृ. ७६३.

३–पिंकर्टनकृत अर्वाचीन भूगोल. पृ. ७३७.

४–ट्रापिकल वर्ल्ड. पृ. ४८.

दिवसास सूर्य किरण दिसण्याची मारामार. या झाडांतले वृक्ष जितके उंच आहेत तितके हिंदुस्थानांत देखील नाहींत. वृक्षासभोंवतीं वेलींचें वेष्टण असून, त्याही वृक्षा इतक्या उंच जातात, अथवा झाडांच्या फांद्यांत गुंतून पुनः खालीं उतरतात, व जमिनींत जाऊन पुनः वर पूर्ववत् चढूं लागतात. येणेंकरून चोहोंकडे एकच जाळें होऊन मनुष्यास अथवा श्वापदास जाण्याची पंचाईत पडते. झाडांचीं पानें फारच चित्रविचित्र आहेत. या झाडांचे शेंड्यांवर पक्षी नेहमीं मधुर शब्द करीत असतात. झाडांवर ज्या वेली पसरलेल्या असतात त्यांवर कोट्यवधि कीटक वास करितात. या झाडांमधून टिपकेदार साप व सरडे नेहमीं संचार करीत असतात; व कोणत्याही गोष्टीची उणीव पडूं नये ह्मणून, या रानासभोंवतीं विस्तीर्ण कुरणें पसरलेलीं असून त्यांत गुरें चरतात; व त्यांच्या लगत जीं मैदानें आहेत त्यांत क्रूर व हिंसक पशु वास करितात.

ब्रेझील देशांतील जमीन फार सुपीक असल्यामुळें तेथें कापूस, काफी, साखर, गहूं, मका, तांदूळ वगैरे उत्तम उत्तम जिनसा पिकतात. ह्या ठिकाणीं जशीं इमारतीचीं अथवा दुसरीं लांकडें होतात तशीं इतर ठिकाणीं होत नाहींत. तात्पर्य, श्रीमंत लोकांस ऐषआरामासाठीं अथवा गोरगरीबांस निर्वाहासाठीं जे पदार्थ लागतात, ते सर्व ह्या ठिकाणीं थोडक्या श्रमानें व थोडक्या पैशानें उपलब्ध आहेत. ब्रेझील देशांत हवा चांगली आहे व येथील जमीन सुपीक आहे; येथें सर्वकाळ नद्यांना पाणी असतें; येथें सोनें, हिरे वगैरे मौल्यवान् धातु आहेत. असें असून येथील मूळचे लोकांची स्थिति फारच निकृष्ट आहे. ते अन्न अन्न करीत हिंडतात असें नाहीं, तरी, युरोपियन लोक ह्या ठिकाणीं येऊं लागण्यापूर्वीं, लोकांमध्यें

१–ट्रापिकल वर्ल्ड पृ. ४९.

सुधारणेचीं चिन्हें कांहींच दिसत नव्हतीं. ह्याचें मुख्य कारण येथील अप्रतिम सृष्टिवैभव हें होय. या अप्रतिम वैभवाचे तेजापुढें मनुष्याचे वैभवाचें कांहींच तेज पडत नाहीं. ह्या वैभवाचे अवलोकनानें मनुष्याचे मनामध्यें कांहीं चमत्कारिक कल्पनातरंग येऊं लागतात; व आपण यःकश्चित् व आपली कृति पोरकट असें त्यास वाटावयास लागतें. कल्पना उद्दीपित होऊन मनांत नवीन नवीन भयें उत्पन्न होतात. सर्व सृष्टि आपणास प्रतिकूल आहे असें त्यास वाटतें. स्तब्धता व एकांतपणा यांमुळें मनास उदासीनता येते. नुसता पाला हालला कीं, साप सरसरला कीं काय असें वाटतें. खरी स्थिति काय आहे, हें समजून घेऊन अडचण दूर करूं ह्मटलें तर अनेक अडथळे येतात. झाडांच्या खोडांसभोंवतीं वेलींचें इतकें वेष्टण असतें कीं, झाडांवर चढून त्यांचीं पुष्पें कशीं आहेत हें देखील सुलभ रीतीनें पाहतां येत नाहीं. पावसाळ्यांत तर कांहीं विलक्षण स्थिति असते. चोहोंकडे धुकें पसरतें यामुळें चिलटें अतिशयित असतात; खेंकडे व बेडूक ह्यांचे ओरडण्याशिवाय दुसरा ध्वनि क्वचित् ऐकूं येतो; वादळ सुटतें; वृक्ष एकमेकांवर आपटतात; विजा चमकून मेघगर्जना होते; झाडें उपटून पडतात; व श्वापदें भयानें ओरडूं लागतात. तात्पर्य, ह्या ठिकाणीं सृष्टिवैभवाचा इतका जोर आहे कीं, तो कमी करून आपली सरशी करण्यास साधारण मनुष्यास कठीण पडतें. सृष्टीचे तेजानें मनुष्याचें[1] तेज अगदीं लोपून जातें. यामुळें विशेषेंकरून या ठिकाणीं लोक रानटी अवस्थेंत राहिले. येथें सृष्टीचें औदार्य पूर्णपणें वास करीत आहे असें आह्मीं वर सांगितलेंच आहे; परंतु ह्या औदार्यामुळें सुधारणेस जे अडथळे आले त्यांचें निवारण येथील

१.—बकलकृत सुधारणेचा इतिहास. भा. १ पृ. १०५.

लोकांस करितां आलें नाहीं. ज्याप्रमाणें प्रथमतः प्रत्येक देशांतील लोकांस जोखमीचीं कामें करणें आवडत नसतें त्याप्रमाणें येथील मूळचे लोकांची स्थिति होती. नद्या, पर्वत, अरण्यें आदिकरून अडथळे येथें असल्यामुळें, परस्परांशीं दळणवळण ठेवण्यास अडचण आली. कलांची माहिती नसल्यामुळें ह्या ठिकाणच्या लोकांस साधारण अडचणींचें देखील निवारण करितां आलें नाहीं. येथील लोकांस ज्या अडचणी आहेत त्या सामान्य आहेत असें नाहीं. या अडचणी दूर करण्याविषयीं तीनशें वर्षें युरोपियन लोकांचा सतत प्रयत्न चालू आहे, तरी देखील, या अडचणी दूर झाल्या नाहींत. फक्त किनाऱ्यावरील भागांत त्या बऱ्याच दूर झाल्या आहेत. परंतु देशाचे मध्य भागांत ह्या अद्यापि कायम आहेत. ज्या ठिकाणीं युरोपियन लोकांचे प्रयत्नानें देखील सुधारणा करण्यास कठीण पडतें, त्या ठिकाणीं मूळचे लोकांस ह्या अडचणींपासून किती त्रास सोसावा लागला असेल हें समजणार आहे. अमेरिकेच्या या प्रदेशाविषयीं ब्यारन हम्बोल्ट ह्मणतो कीं, "या प्रदेशाविषयीं आपण लक्षपूर्वक विचार करावयास लागलों ह्मणजे, आपले मनांत अशी कल्पना येते कीं, ज्या वेळेस पृथ्वीवर हळूहळू लोकवस्ती होऊं लागून सामाजिक स्थितीचा उद्भव होऊं लागला, त्या कालांत आपण आहों असा भास होतो. प्राचीन महाद्वीपांत धनगरी स्थिति जाऊन लोक शेतकरी बनतात हें आपण पाहतों. परंतु नवीन जगांत (अमेरिकेंत) हा क्रम दृष्टीस पडत नाहीं. झाडपाल्यामुळें इंदियन लोकांस पारध करण्यास अडचणी येतात. नद्या ह्या समुद्राचे बाहूप्रमाणें असून त्या खोल असल्यामुळें, कित्येक महिनेपर्यंत मासे धरण्यास व्यत्यय येतो. जमीन इतकी सुपीक आहे कीं, कांटेकुटे जाळून

तांत थोडेंसें बीं टाकिलें कीं काम होतें." जमीन सुपीक असल्यामुळें येथील लोक सुखांत असावेत असें आपणांस वाटतें खरें; परंतु आह्मीं वर जे विचार सांगितले, त्यामुळें लोकांची स्थिति उलट दिसून येते. ज्याप्रमाणें अरब आपला तंबू घेऊन चाऱ्याच्या शोधार्थ भटकत फिरतो, त्याप्रमाणें येथील इंदियन लोक बरोबर बीं व कांहीं शेतीचीं हत्यारें घेऊन भटकत फिरत असतात; व ही संवय त्यांना फार दिवसांपासून लागली असल्यामुळें एके ठिकाणीं बसून श्रम करणें त्यांस आवडत नाहीं. हेंडरसन साहेब ब्रेझीलमध्यें राहणाऱ्या इंदियन लोकांविषयीं लिहितो कीं, "येथील इंदियन लोकांच्या अनेक जाति आहेत. त्यांचा वेळ मुख्यत्वेंकरून पारध करण्यांत, किंवा मध गोळा करण्यांत, किंवा जीं फळें सृष्टीचे औदार्यामुळें आपोआप प्राप्त होतात तीं जमा करण्यांत जातो. त्यांच्यांत राज्यव्यवस्था कोणत्याही प्रकारची नाहीं. प्रत्येक जातीचा स्वतंत्र नायक असतो; परंतु ज्या वेळेस शत्रूचा हल्ला होतो त्या वेळेस मात्र तें त्याचें नायकत्व चालतें. त्या लोकांनीं तोंड रंगविण्याची व लांकडांचे दागिने घालण्याची चाल अद्याप सोडली नाहीं; त्यांस कलाकौशल्याची माहिती नाहीं; त्यांस सुधारणा करणें आवडत नाहीं व त्यांस जंगलांत राहून दिवस काढणें बरें वाटतें. हे लोक फार आळशी आहेत. त्यांस निर्वाहाचे तजविजीशिवाय जन्मभर दुसरा विचार सुचत नाहीं. सुऱ्या वगैरे थोड्या किमतीचे पदार्थ घेऊन सोन्याचे तुकडे देण्यास ते तयार असतात. ब्रेझीलच्या बंदरांत त्यांपैकीं फारच थोडे लोक दृष्टीस पडतात. त्यांस हंसतांना मीं कधीं पाहिलें नाहीं."

ब्रेझील देशाविषयीं जी हकीकत आह्मीं सांगितली, तिजवरून ब्रेझील देश सुपीक असतां त्यांत सुधारणा कां झाली नाहीं, व

ज्या वेळेस प्रथम युरोपियन लोकांनीं या देशाचा शोध लाविला, त्या वेळेस त्यांस येथील लोकांची जी स्थिति दिसून आली, तिजपेक्षां त्यांची चांगली स्थिति कां नव्हती हें समजणार आहे. परंतु ब्रेझीलचे पश्चिमेस जो देश आहे, तो जरी त्याच अक्षांशांत आहे, तरी, त्या ठिकाणीं निराळी स्थिति असल्यामुळें, निराळीं कार्यें दृष्टीस पडतात. हा देश पेरूचें राज्य होय. दक्षिण अमेरिकेंत सुधारणेचें एवढेंच काय तें स्थान होतें. ब्रेझील देशांत हवा उष्ण आहे, व या ठिकाणीं दोन कारणांनीं ओलावा उपलब्ध आहे. एक प्रचंड नद्यांचे पाण्याचा व दुसरा व्यापारोपयोगी वायु ह्या बरोबर जी वाफ येत असते तिचा. या दोहोंचे संयोगामुळें ब्रेझील देशांतील जमीन अतिशय सुपीक आहे; व यामुळें पुष्कळ नुकसान झालें. कारण, सृष्टीचें औदार्य हें बेताचें असेल, तर मात्र अज्ञानदशेंत असणारे लोकांस त्याचें आकलन करितां येतें. जर हें औदार्य आटोक्यांत आणण्यासारखें नसेल, तर, औदार्यापासून नफा होणें एकीकडे राहून, उलट नुकसान मात्र होतें, हें ब्रेझीलची जी हकीकत आह्मीं दिली आहे तिजवरून कळून येतें. देशाची जसजशी सुधारणा होते, तसतसे अधिकाधिक उपाय सुचून, सृष्टीचे औदार्याचें आकलन करितां येऊन त्यापासून आपणांस नफा करून घेतां येतो. मनुष्याचे बुद्धिबलानें व उद्योगानें जे शोध होत आहेत, त्या योगानें पुष्कळ अडचणी दूर होत आहेत, व त्यास सृष्टीचे औदार्याचा उपयोग करतां येतो. परंतु जर लोक अज्ञान असून औदार्य अतिशय आहे, तर तेंच औदार्य नाशास कारण होऊन सुधारणेस व्यत्यय येतो. ब्रेझील देशांत जितकें सृष्टीचें औदार्य आहे तितकें आशिआ, युरोप, आफ्रिका व उत्तर अमेरिका या खंडांतील कोणतेही देशांत नाहीं;

यामुळें त्या खंडांतील लोकांस त्याचें आकलन करितां आलें व त्या ठिकाणीं सुधारणेस व्यत्यय न येतां उलट मदत मात्र झाली. यावरून असें एक अनुमान करावयाचें कीं, ज्या सृष्टपदार्थविषयक कारणांमुळें निरानिराळे देशांचे सुधारणेंत फरक होतो, त्या कारणांविषयीं विचार करितांना, त्या देशांत सृष्टीचें औदार्य आहे किंवा कसें, एवढ्याच गोष्टीविषयीं विचार केला ह्मणजे काम झालें असें नाहीं, तर, जें औदार्य असेल, त्याचें आपणांस सहज रीतीनें आकलन करितां येईल किंवा नाहीं, याही गोष्टीविषयीं विचार करणें अगत्याचें आहे. कारण, याविषयीं विचार न केला तर, आपला सिद्धांत चुकून ज्याप्रमाणें ब्रेझील देशाविषयीं प्रथम भलता ग्रह होतो, त्याप्रमाणें चुकीचा ग्रह होण्याचा संभव आहे. अस्तु. हें जें अनुमान आह्मीं सांगितलें तें पेरू व मेक्सिको या दोन देशांस लागू करुन पाहतां, आपणांस असें दिसून येतें कीं, या दोन देशांत जरी सृष्टीचें औदार्य आहे, तरी, तें बेताचें असल्यामुळें, त्याचें आकलन करण्यास लोकांस फारसा त्रास झाला नाहीं; ह्मणून या ठिकाणीं मात्र सुधारणा झाली. आतां या दोन देशांत सुधारणा कशी झाली याविषयीं विचार केला पाहिजे. ज्या भागांत आह्मीं हिंदुस्थान व मिसर देश या दोन देशांविषयीं विचार करण्याचें योजिलें आहे, त्याच भागांत या दोन देशांत सुधारणा कशी झाली, ती कशा प्रकारची होती व ती कशी लयास गेली, याविषयीं थोडक्यांत सांगण्याचा आमचा विचार आहे.

---

## भाग ३ रा.

**युरोप.**—प्राचीनकाळीं आशिया, आफ्रिका व अमेरिका

ह्या तीन खंडांत जी सुधारणा झाली तीस मुख्यत्वेंकरून जमिनीची सुपीकता कारण होती ह्याविषयीं एथपर्यंत आपण विचार केला; परंतु युरोप खंडांत जी सुधारणा झाली ती या खंडांत हवेचें मान चांगलें असल्यामुळें झाली ह्याविषयीं या भागांत विचार करावयाचा आहे. सुधारणा होण्यास हवा कारणीभूत असते ह्याविषयीं कित्येकांस आश्चर्य वाटेल. प्रवाशी, इतिहासकार व तत्त्ववेत्ते ह्यांमध्यें देखील या घटकेपर्यंत ह्याविषयाचे संबंधानें बराच मतभेद दिसून येतो. परंतु थोडा विचार केला असतां, हवा ही बरेच अंशीं सुधारणेस कारणीभूत असते हें कळून येईल. ज्याप्रमाणें हवेपासून मनुष्याचे शरीरावर व्यापार होऊन शारीरस्थितींत फरक पडतो, त्याप्रमाणें मनाच्या स्थितींतही बदल होतो; कारण शरीर व मन ह्यांचे परस्परांवर नेहमीं व्यापार सुरू असतात. हवेपासून शरीरावर कसा व्यापार होऊन त्यांत बदल होतो हें हिंदुस्थानांतील निरनिराळे भागांत राहणारे बंगाली, रजपूत, मद्रासी, मराठे व गुजराथी ह्या लोकांचे स्थितीवरून समजतें; व ही गोष्ट ज्यू लोकांच्या उदाहरणावरून विशेष व्यक्त होते. ज्यू लोक पृथ्वीच्या पाठीवर बहुतेक ठिकाणीं पसरले आहेत; परंतु इंग्लंदांत जे ज्यू स्थाइक झाले आहेत ते गोरे आहेत; पोर्तुगाल देशांतले पिंगट वर्णाचे; अमेरिकेंतले तांबूस वर्णाचे; व मिसर देशांतले कृष्ण वर्णाचे दिसून येतात. असा प्रकार कां असावा? ज्यू लोक भिन्न ज्ञातीचे लोकांशीं शरीरसंबंध ठेवीत असल्यामुळें हा प्रकार दृष्टीस पडतो असें ह्मणावें तर, ते इतर लोकांबरोबर मुळींच संबंध करीत नाहींत. हवेशिवाय इतर कारणांमुळें हा प्रकार दिसून येतो असें मानिलें तर, हीं कारणें इंग्लंदांतील ज्यूंस जशीं लागू आहेत, तशीं इतर ठिकाणचे ज्यूंसही लागू असलीं

पाहिजेत. आशिया व युरोप ह्या दोन खंडांचे उत्तर प्रदेशांत अतिशयित थंडी आहे व ह्या ठिकाणचे लोक समशीतोष्ण हवें-तील लोकांपेक्षां ठेंगणे आहेत, हें लापलंडर्स व सामोजदीज लोकांचें वर्णन वाचिलें असतां लक्षांत येतें. हे लोक शरीरा-नेंच कुरटे आहेत असें नाहीं, तर, मनानें ही कुरटे आहेत. हवेपासून ज्याप्रमाणें पर्यायानें कार्यें घडतात, त्याप्रमाणें प्रत्यक्ष-ही कार्यें आपल्या अनुभवास येतात. ज्याप्रमाणें हवेचें मान असतें त्याप्रमाणें शरीरप्रकृतींत सदृढता अथवा अशक्तता असते. ज्या लोकांनीं निरनिराळे ठिकाणचे हवेचा अनुभव घेतला आहे त्यांस ही गोष्ट लवकर कळणार आहे; अथवा एकाच ठिकाणीं असणारे लोकांसही निरनिराळ्या ऋतुमानांप्रमाणें देखील शरीरप्रकृतींत बदल होतो हें थोडें बहुत अनुभवास आल्यावांचून राहत नाहीं. इतर सर्व गोष्टी सारख्या अस ल्यास, उष्ण देशांतील लोक समशीतोष्ण देशांतील लोकांप्र-माणें सदृढ नसतात असा साधारण नियम आहे. उष्णतेच्या प्रखरतेमुळें शरीरांत शिथिलता उत्पन्न होऊन शरीर दुर्बल होतें व शरीराचे दुर्बलतेपासून मनाची दुर्बलता होते.

चिनी अथवा हिंदु लोक हे बरेच सुधारलेले असून, दुर्बल कां असावेत व त्यांचेच शेजारील महंमदानुयायी मोंगल, तार्तर, व पठाण हे सदृढ कां असावेत ? समशीतोष्ण हवेंतील लोकां-नींच वेळोवेळीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून हिंदु लोकांचें राज्य उद्ध्वस्त केलें. समशीतोष्ण हवेंतील लोकांनींच अमेरि-केंतील इंदियन लोकांस पादाक्रांत केलें. पठाण, मोंगल अ-थवा तार्तर हे आपले देशांत सदृढ व शूर होते; तेच हिंदुस्था-नांत अशक्त व दुर्बल होऊन, त्यांस त्यांचेच बंधूंनीं जिंकिलें हें इतिहासावरून समजतें. यावरून उष्ण हवेंतील लोक कधींही

वर डोकें काढणार नाहींत असें ह्मणण्याचा आमचा हेतु नाहीं. उष्ण हवेंतील लोकांचे कपाळीं नेहमीं दास्यच राहील असेंही कोणी समजूं नये. सुधारणेच्या प्रभावानें निराळें कार्य होण्याचा संभव आहे. ज्याप्रमाणें अतिशयित उष्णतेमुळें दुर्बलता उत्पन्न होते त्याप्रमाणें अतिशयित थंडीमुळेंही हें कार्य घडून येतें असा सिद्धांत आहे. यास कांहीं अपवाद सांपडतात हें खरें आहे, परंतु एकंदर स्थूल विचार केला असतां, या नियमाची बरीच व्यापकता दिसून येते. अतिशयित उष्ण हवेमुळें सुस्ती उत्पन्न होऊन काम करण्यास हुशारी नसते. त्याचप्रमाणें अतिशयित थंडीमुळें बधिरता उत्पन्न होते, ह्मणून तेंच कार्य घडून येतें. याचसाठीं स्वस्थ बसून जे उद्योग होतात ते विशेषेंकरून करण्याची हिंदुलोकांस संवय लागली आहे. श्रम करण्याचें जरी कित्येकांचे मनांत आलें, तरी, उष्णतेमुळें नेटानें काम करितां येत नाहीं. सुधारणेचे संबंधानें हिंदु लोकांचे जे व्यवसाय चालू असतात ते मुख्यत्वेंकरून स्वस्थ घरीं बसून चालतात. बाहेरचे जे व्यवसाय करावयाचे ते फक्त उदरभरणार्थ. हे जे विचार सांगितले त्यांवरून हवेपासून कशीं कार्यें होतात हें लक्षांत येणार आहे. हवेपासून पर्यायानेंहीं कार्यें घडून सुधारणेंत बदल होतो; परंतु याविषयीं विचार करण्याचें कारण नाहीं. युरोपांत जी सुधारणा झाली तीस हवा कारण होती असें आह्मीं वर सांगितलें; यावरून सुधारणेस दुसरे कोणतेही गोष्टीची मदत नव्हती असें ह्मणण्याचा आमचा बिलकुल हेतु नाहीं. दुसरे कारणांची मदत होती. नुसती हवेची अनुकूलता असून दुसरे गोष्टींची मदत नसेल तर, सुधारणा होईल किंवा नाहीं याविषयीं शंका नलगे. इतर गोष्टींची जी मदत होती ती कांहीं अंशीं असून हवेची चांगली अनुकूलता असल्यामुळें सुधारणेस

हवा बरेच अंशीं कारणीभूत झाली असें ह्मणण्याचा आमचा हेतु आहे. हवेचे मानांत ज्याप्रमाणें फेरफार असतो त्याप्रमाणें श्रम करणारे लोकांस काम करावयास सांपडून, श्रमाचे फलांत फेरफार असतो असें आह्मीं मागें सांगितलें आहे. आशिया, आफ्रिका व अमेरिका, या तीन खंडांत जी सुधारणा झाली, ती जमिनीचे सुपीकतेवर अवलंबून होती हेंही आह्मीं मागील भागांत सांगितलें आहे. युरोपखंडांत हवेची अनुकूलता असल्यामुळें, श्रम करणारे लोकांस उत्साहपूर्वक व नियमित रीतीनें श्रम करावयास सांपडतात. या खंडाचा बराच भाग समशीतोष्ण कटिबंधांत असल्यामुळें येथें हवा चांगली असते. शिवाय उपसागर व आखातें हीं देशाचे बरेच भागांत गेलीं असल्यामुळें थंडीचा जोर कमी होऊन उष्णतेची प्रखरता कमी झाली आहे; व या खंडाचे उत्तरेस उत्तरध्रुव समुद्र, पश्चिमेस अटलांटिक महासागर, व दक्षिणेस भूमध्य समुद्र, हे यांतील बहुतेक देशांच्या बरेच जवळ असल्याकारणानें, थंडी व उष्णता या दोन्हींचा जोर कमी होऊन वर्षांतून बहुतेक महिन्यांत हवेचें मान बरें असतें. आशियाखंडामुळें थंड, आफ्रिकाखंडामुळें उष्ण व अटलांटिक महासागरामुळें एकसारखें, असें यूरोप खंडांतील हवेचें मान बनलें आहे. मध्य आशिआचे उंचवट्याचे मैदानावरून जो वारा वाहत असतो त्यापासून युरोप खंडाचे

---

१—युरोपाचे दक्षिणेस भूमध्य समुद्र नसता तर, साहाराचे रखरखीत रानावरून जो उष्ण वारा वाहत असतो, त्यापासून दक्षिणेकडील प्रदेशांस फार त्रास सोसावा लागला असता; परंतु हा समुद्र असल्यामुळें, उष्णतेचा जोर कमी होऊन, दक्षिणेकडील प्रदेशांस उबारा मात्र मिळतो. (ह्यूजकृत भूगोल पृष्ठ ३२) ह्या समुद्राचें क्षेत्रफळ ८,७०,००० चौरस मैल आहे.

पूर्व प्रदेशाचा बचाव होत नसल्यामुळें हे प्रदेश पश्चिमेकडील प्रदेशापेक्षां विशेष थंड आहेत. युरल पर्वत हा विशेष उंच असता तर पूर्वेकडून येणाऱ्या वाऱ्यास अडथळा झाला असता.

युरोप खंडाची हवा चांगली आहे असें आह्मीं ह्मटलें, यावरून या खंडांतील प्रत्येक देशाची हवा चांगली आहे असें कोणीं समजूं नये. आह्मीं साधारणपणें स्थूलमान सांगितलें. नॉर्वे व स्वीडन या देशांत तीव्र थंडी असते; व स्पेन व पोर्तुगाल या देशांत उष्णता बरीच असते. ही उष्णता आफ्रिका खंडांतील साहाराचे रखरखीत रानावरून सोलान या नांवाचा वारा वाहत असतो त्यामुळें असते. या चार देशांत शेतीचें काम नेटानें चालवितां येत नाहीं. स्पेन व पोर्तुगाल ह्या देशांत उष्णतेमुळें श्रम करण्यास व्यत्यय येतो, ह्मणून जमिनीची निगा नीट ठेवितां येत नाहीं. ह्या दोन देशांत उष्णतेमुळें व हवेचे शुष्कपणामुळें श्रम करण्यास जसा व्यत्यय येतो, तसा नॉर्वे व स्वीडन या देशांत थंड हवेमुळें व दिनमान कमी असल्यामुळें श्रम करण्यास व्यत्यय येतो. या चार राष्ट्रांतील लोकांत इतर गोष्टींमध्यें जरी आपणांस फरक दिसून येतो, तरी ह्यांत अस्थिरता हें व्यंग सारखें दृष्टीस पडतें; व विशेषेंकरून या कारणामुळें या राष्ट्रांची स्थिति, युरोप खंडांतील इतर देशांचे स्थितीहून भिन्न आहे असें दिसून येतें. आशिया, आफ्रिका व अमेरिका या तीन खंडांत जी सुधारणा झाली, ती जमीन व जमिनींतील उत्पन्न यांमध्यें जो संबंध त्यावर अवलंबून होती; ह्मणजे एका सृष्टपदार्थविषयक कारणाचा दुसरे सृष्टपदार्थावर जो व्यापार घडतो त्यावर अवलंबून होती. युरोपांतील सुधारणा ही हवा व श्रम करणारे यांमध्यें जो संबंध त्यावर अवलंबून होती; ह्मणजे एका

१–बकलकृत सुधारणेचा इतिहास. पृ. ४३,४४.

बाह्य सृष्टपदार्थविषयक कारणाचा मनुष्याचे शरीरावर व मनावर जो व्यापार घडतो त्यावर अवलंबून होती. आतां हे जे दोन प्रकारचे संबंध सांगितले, त्यांपैकीं पहिले प्रकारचा संबंध हा साधा असल्यामुळें, मनुष्याचे उद्योगास व्यत्यय येण्याचा कमी संभव असतो. ज्या ठिकाणीं हा संबंध दृष्टीस पडतो त्या ठिकाणीं सुधारणेचा प्रादुर्भाव लवकर होतो. आपणांस आशिया, आफ्रिका व अमेरिका या तीन खंडांतील सुपीक प्रदेशांत अगोदर सुधारणा झालेली आढळून आली, याचेंही हेंच मुख्य कारण आहे. हवा व मनुष्य यांमध्यें जो संबंध आहे तो भानगडीचा असल्यामुळें, मनुष्याचे उद्योगास प्रत्येक पाउलीं अडचणी येऊन, त्यास आपला मार्ग पुढें काढण्यास व्यत्यय येतो; यामुळें त्याची सुधारणा लवकर होत नाहीं. आतां, ही जी अडचण येते, तिजपासून फायदा होत नाहीं असें नाहीं. मनुष्यास या अडचणीमुळें विशेष बुद्धि खर्चावी लागते; व ही कोणते प्रकारें दूर होऊन आपला मार्ग सुलभ होईल, या विषयीं उपाय योजावे लागतात. असें झाल्यानें त्यास स्थिरपणें श्रम करण्याची संवय लागून कालेंकरून फायदा होतो. अशा रीतीनें जी त्याची सुधारणा होते, ती सावकाश परंतु दृढ व चिरस्थायी अशी होते. आह्मीं हे जे विचार सांगितले, ते युरोप खंडाचे सुधारणेस लागू पडतात. या खंडाचे सुधारणेस मुख्यत्वें हवा कारणीभूत होती. हवा व मनुष्य यांमध्यें जो संबंध आहे तो भानगडीचा आहे; तेव्हां अर्थात् युरोप खंडांत सुधारणेचा प्रादुर्भाव मागाहून होऊन ती सावकाश होत गेली; व ती बरेच दिवस टिकेल असें मानण्यास हरकत नाहीं. युरोपांतील सुधारणेशीं मनुष्याचा संबंध जितका होता, तितका इतर खंडांतील सुधारणेशीं नव्हता. इतर खंडांत

जमिनीचे सुपीकतेमुळें थोडे श्रम केले असतां चालत असे. युरोप खंडांत इतर खंडांच्या मानानें पाहतां, सुपीकतेचें मान फारच कमी होतें; यामुळें मनुष्यास स्वतःच्या श्रमावर फार अवलंबून राहवें लागलें. एवढेंच कीं, हवा अनुकूल असल्यामुळें, ह्या खंडांतील लोकांस उत्साहपूर्वक व नियमित रीतीनें श्रम करावयास सांपडत असे. नुसत्या श्रमानें फायदा लवकर होण्याचा कमी संभव असतो; परंतु कालेंकरून यापासून फायदा होतो यांत संशय नाहीं.

हवा व मनुष्य यांमध्यें जो संबंध आहे तो भानगडीचा आहे असें आह्मीं वर सांगितलें; परंतु भानगडीचा संबंध ह्मणजे काय ? यापासून काय समजावें ? याविषयीं कित्येकांस शंका येईल; ह्मणून याविषयीं खुलासा करणें जरूर आहे. सुपीकतेचे अनुकूलतेमुळें, आशिया, आफ्रिका व अमेरिका या तीन खंडांत मनुष्याचे श्रमाचा ओघ एका मार्गानें वाहला; शेती करून निर्वाह करणें सुलभ पडूं लागलें, ह्मणून उद्योगाचा ओघ शेतीकडे होता. या धंद्याकडे प्राचीन कालीं लोकांचें विशेष लक्ष लागण्याचें कारण कीं, यांत शांतता फार असते व यांत त्रास कमी असून स्वतंत्रताही बरीच असते. उष्ण हवेंतील लोकांस, जितका बाहेरचा ताप अथवा त्रास नसतो, व जितकी शांतता असते तितकें स्वाभाविक रीतीनें विशेष सुख वाटतें. शेतीचे धंद्यांत ह्या सर्व गोष्टी उपलब्ध होण्यासारख्या असल्यामुळें लोकांचें लक्ष शेतीकडे होतें. शेती करून जर निर्वाहाचें साधन मिळत आहे, तर दुसऱ्या प्रकारचे उद्योग करण्याविषयीं फारशी इच्छा होणार नाहीं. यावरून या तीन खंडांत दुसरे प्रकारचे उद्योग चालू नव्हते असें ह्मणण्याचा आमचा हेतु नाहीं; परंतु स्थूल दृष्टीनें पाहिलें असतां, शेतीकडे

कल फार होता; व यामुळें या तीन खंडांचे सुधारणेंत आपणांस युरोप खंडाचे सुधारणेचे मानानें कमी वैचित्र्य दिसून येतें; व राज्यव्यवहार, आचार वगैरे गोष्टींत जो प्रकार फार प्राचीन कालापासून दृष्टीस पडत होता, तोच प्रकार बरींच वर्षे लोटलीं तथापि दृष्टीस पडत होता; इतकेंच कीं, साधारण गोष्टींत मात्र फरक दृष्टीस पडे. असा ज्या ठिकाणीं प्रकार दृष्टीस पडतो, त्या ठिकाणीं सुधारणा फार दिवस कधींही टिकावयाची नाहीं. कारण, मनुष्याचे उद्योग व गरजा हीं दिवसेंदिवस वाढत असतात. परंतु पूर्वीच्या प्रकारांत बदल केल्याशिवाय गरजा भागविणें कठिण असतें. ज्याप्रमाणें बाह्य कारणांत बदल होत जातो त्याप्रमाणें कित्येक वेळां मनाचे स्थितींतही बदल करावा लागतो. बाह्य कारणांत नेहमीं फेरफार होत असतो व या कारणांचा जोर कमी असतो असें नाहीं. बाह्य कारणांत फेरफार होत असतां आपण आपल्या स्थितींत बदल केला नाहीं, व जो एक प्रकार पूर्वापार चालत आला असेल, त्याचेंच अवलंबन केलें तर, बाह्य कारणांचा जोर जास्ती झाल्यास, जी सुधारणा असेल तीस धक्का बसेल; व कालेंकरून ती लयास जाण्याचा संभव आहे.

आतां युरोपाविषयीं विचार केला असतां, तेथें हवा व मनुष्य यांचा संबंध असल्यामुळें व मनुष्याची शक्ति ही सृष्टीचे शक्तीपेक्षां अधिक असल्यामुळें निराळा प्रकार दृष्टीस पडतो. मनुष्याची शक्ति कोठें अकुंठित होईल, याविषयीं आजच आपणास कांहीं खात्रीनें अनुमान करितां येत नाहीं. पंधरावे शतकापूर्वीची युरोप खंडाची स्थिति व प्रस्तुतची स्थिति, यांमध्यें तुलना केली असतां, तेथें ज्ञानाचा संचय किती झाला आहे;

१—बकलकृत सुधारणेचा इतिहास. पृ. ५०,५१.

अडचणी किती दूर झाल्या आहेत; सोयी किती वृद्धिंगत झाल्या आहेत; व ज्या सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें इतर खंडांत नुकसान होऊन सुधारणेस धक्का बसला, त्या नियमांचें आकलन करून, त्यांचा जोर युरोपस्थ लोकांनीं किती कमी केला आहे हें समजणार आहे. दरवर्षी जे नवीन नवीन शोध होत आहेत व नवीन नवीन कल्पना व विचार निघत आहेत, त्यांविषयीं विचार केला असतां, मनुष्याचे मनाचा प्रभाव, त्याची शक्ति व त्याची कृति हीं कोठपर्यंत जाऊन पोंहोंचतील हें आज समजत नाहीं. जी गोष्ट काल अशक्य वाटत होती ती आज शक्य वाटूं लागत आहे. जी गोष्ट करावयास काल अडचण पडत असे ती आज सहज रीतीनें करितां येऊं लागली आहे. जों जों सुधारणेचा क्रम पुढें चालत आहे तों तों मनुष्यास अधिकाधिक कल्पना सुचत आहेत.

युरोपांतील सुधारणा ही मनुष्याचे उद्योगावर अवलंबून होती, यामुळें तेथें निरनिराळे उद्योगांचा प्रादुर्भाव होऊं लागला; व उद्योग करण्यास समुद्र आदिकरून साधनें असल्यामुळें, धनाचा संचय करावयास सांपडला इतकेंच नाहीं, तर, धीटपणा, धाडस, धिमेपणा वगैरे गुण लोकांत आपोआप येऊन सुधारणा स्थिरपणें होत गेली. युरोपाची सुधारणा ही एक दोन शतकांत झालेली नाहीं. रोमन लोकांचें राज्य रसातलास जाऊन कांहीं वर्षेपर्यंत चोहोंकडे बराच अंधःकार पसरला. १२ वे शतकापासून सुधारणेची प्रभा थोडी झळकूं लागली. लोक सुप्तावस्थेंतून जागृत होऊं लागले. व्यापार व कलाकौशल्यांची वृद्धि करण्याविषयीं त्यांस इच्छा होऊं लागली. व्यापारामुळें इतर खंडांतील देशांशीं दळणवळण पडूं लागल्यामुळें अधिकाधिक धन व ज्ञान मिळविण्याविषयीं त्यांची इच्छा बलवत्तर होत चालली. इतर

देश पाहून जें ज्ञान अथवा जी माहिती संपादन केली होती तिचा प्रसार आपले देशांत करून, ती लोकांस उपलब्ध होईल अशाविषयीं यत्न सुरू झाला. अशा रीतीनें १२ वे शतकापासून १५ वे शतकापर्यंत युरोपांत चोहोंकडे गर्दी उसळून गेली होती. १६ वे शतकापासून चालू शतकापर्यंत, जें पूर्वी संपादन केलें होतें तें दृढ करण्याविषयीं उद्योग चालू आहे. हे जे सर्व प्रकार झाले, ते निमूटपणें चालले होते असें नाहीं. युरोपांत हल्लीं जें आपण सुधारणेचें फल पाहत आहों, तें अनेक तंटे व अनेक लढाया होऊन, जेव्हां लक्षावधि लोकांची प्राणहानि झाली तेव्हां प्राप्त झालें आहे. ही सुधारणा मनुष्याचे श्रमावर अवलंबून होती हें आह्मी वर सांगितलेंच आहे. धन संपादन करण्यास निरनिराळे प्रकारचे उद्योग करावे लागतात. ज्यास जीं साधनें उपलब्ध होतीं तो त्या साधनांचा उपयोग करी; यामुळें निरनिराळे उद्योग व मनाचे निरानिराळे कल दिसून येऊं लागले. उद्योगाचे जे निरनिराळे प्रकार त्यांचें परस्परांवर संघर्षण होऊन तंटे बखेडे माजूं लागले. या तंट्यानें त्या वेळेस जरी बरेंच नुकसान झालें तरी त्यामुळें पुढें फार नफा झाला. तो असा कीं, राज्यप्रवर्तक अथवा धर्मप्रवर्तक यांपासून इतर खंडांत जो जुलूम होत असे तो उत्तरोत्तर कमी होऊं लागला. इतर खंडांत निरनिराळे प्रकारांचा एकाच वेळीं जोर नसे. राज्यरीतीची जी एक व्यवस्था पूर्वापार चालत आली होती तींत बदल नव्हता. धर्मसंबंधानेंही साधारणपणें कांहीं अंशीं हाच प्रकार होता, यामुळें हरएक गोष्टींत एकसत्ताप्रकार होऊन जुलूम होऊं लागला व सुधारणेस धक्का बसला. युरोपांत एकाच वेळीं अनेक प्रकारांचा जोर असे. यामुळें जरी प्रथम तंटे झाले तरी कालेंकरून ते कमी होत जाऊन सर्व

प्रकार एकाच वेळीं सुरळीतपणें चालूं लागले. प्रजासत्तात्मक राजसत्तात्मक वगैरे राज्याचे प्रकार एकाच वेळीं सुयंत्र चालत आहेत हें आपण सांप्रत पाहत आहों. त्याचप्रमाणें धर्मसंबंधानें अथवा इतर गोष्टींचे संबंधानें विचार होय.

ज्याप्रमाणें दोन पदार्थांचें परस्परांवर संघर्षण होऊन त्यांचा खरबरीतपणा कमी होतो, त्याप्रमाणें या निरनिराळे प्रकारांचा एकमेकांवर व्यापार होऊन, निरनिराळे प्रकारांचें मिश्रण होऊं लागलें. यामुळेंच युरोपांतील सुधारणा भानगडीची होती असें आह्मीं ह्मटलें.

ज्याप्रमाणें सृष्टींत अनेक पदार्थ एकमेकां शेजारीं वास करितात, त्यांचें मिश्रण होतें, त्यांचें एकमेकांवर संघर्षण होतें व शेवटीं ते पुनः पूर्व ठिकाणीं वास करूं लागतात, त्याप्रमाणें युरोपांतील सुधारणेची गोष्ट होती. निरनिराळीं मतें, निरनिराळे व्यवहार, आचार, विचार व राज्यरीति यांचें संमिश्रण होऊन, ज्यांस जसा फायदा करून घ्यावासें वाटतें तसा ते करून घेतात. त्यामध्यें कधीं कधीं कलह होतात; परंतु पुनः ते जागच्या जागीं शांतपणें वास करितात. आह्मीं ही जी भानगडीची स्थिति सांगितली, तिजमुळें सुधारणेचा प्रवाह प्रथम सावकाश वाहूं लागला, तथापि, तो मुरत मुरत जाऊन आपला मार्ग पुढेंच क्रमीत आहे. इतकीं वर्षें लोटलीं तथापि, हा ज्याअर्थीं मागें हटला नाहीं, त्याअर्थीं हा प्रवाह असाच पुढें जाईल असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

---

## भाग ४ था.

आह्मीं मागील तीन भागांत जो विचार सांगितला, तो ध-

---

१–गिझोकृत सुधारणेचा इतिहास. भाग १ पृ. २६.

नोत्पत्तीस हवा व जमीन ही निरनिराळे प्रकारें कशी कारणीभूत झाली आहे याविषयींचा झाला. परंतु फक्त धनोत्पत्तीविषयीं विचार केल्यानें आपलें काम आटोपलें असें नाहीं. सुधारणेविषयीं विचार करितांना, धनोत्पत्तीविषयींचा विचार जितका महत्त्वाचा आहे, तितकाच, किंबहुना त्याहून जास्ती महत्त्वाचे गोष्टीचा विचार करणें राहिला आहे. तो धनाचे वांटणीविषयीं होय. धनाची सिद्धता झाल्यानंतर त्याची कशी वांटणी करावयाची अथवा ती कशी होते, व तीस कोणते नियम लागू आहेत याविषयीं प्रश्न उत्पन्न होतो. देशाची बरीच सुधारणा झाली असतां, धनाची वांटणी ही कोणते गोष्टींवर अवलंबून आहे याविषयीं आपण विचार करावयास लागलों असतां, ती निरनिराळे कारणांवर अवलंबून आहे व तिचें मनुष्याचे कृतीनें नियमन होतें असें आपणांस कळून येतें. या कारणांविषयीं अद्याप बराच मतभेद दिसून येतो. परंतु आपणांस देशाचे सुधारलेले स्थितीविषयीं विचार करावयाचा नाहीं. देशाची बाल्यावस्था असतां, धनोत्पत्तीस कोणते नियम लागू आहेत याविषयींचा विचार ज्याप्रमाणें मागील भागांत झाला, त्याप्रमाणें याच स्थितींत वांटणीचे संबंधानें कोणते नियम लागू आहेत, याविषयीं विचार करणें आहे. देशाची बाल्यावस्था असतां ज्याप्रमाणें धनसंचयास सृष्टपदार्थविषयक नियम लागू आहेत त्याप्रमाणें या[1] नियमांवरून धनाचे वांटणीचेंही नियमन होतें हें सिद्ध करून दाखवावयाचें आहे. सृष्टपदार्थविषयक नियमांवरून धनोत्पत्तीचें नियमन होतें, हें अर्थशास्त्रकारांस संमत आहे; परंतु कित्येकांचें असें मत आहे कीं, धनाचे वांटणीचें नियमन हें फक्त मानवी[2] कृतीनें

१–बकलकृत सुधारणेचा इतिहास भाग १. पृ. ५२.

२–फासेटकृत अर्थशास्त्र. पृ. ९९; मिलकृत अर्थशास्त्र पृ. २४४.

होतें. पदार्थ एकदां निर्माण झाले ह्मणजे, व्यक्तिमात्रास अथवा व्यक्तिसमूहास त्यांची पाहिजे तशी व्यवस्था करितां येते. आतां धनाचे वांटणीस सृष्टपदार्थविषयक नियम लागू आहेत इतकेंच नाहीं, तर या नियमांचें इतकें प्राबल्य दिसून येतें कीं, त्यामुळें भूतलावरील बरेच लोक नेहमीं दारिद्र्यावस्थेंत आहेत असें आपणांस दिसून येतें. जर या नियमांचे कार्यापासून बरेच लोकांस हाल भोगावे लागत आहेत, तर, या नियमांविषयीं विचार करणें किती महत्त्वाचें व किती अगत्याचें आहे हें सांगावयास नको.

मिस्तर हॉब्स् यांचें असें ह्मणणें आहे कीं, संपत्ति ही एका प्रकारची शक्ति आहे. परंतु जो पुरुष ही संपत्ति मिळवितो अथवा ज्यास ती प्राप्त होते, त्यास मुलकी अथवा लष्करी अधिकार प्राप्त होतोच असें कोणीं समजूं नये. कदाचित् या संपत्तीमुळें मनुष्यास दोन्हीही प्रकारचे अधिकार प्राप्त होतील. परंतु जवळ संपत्ति असली ह्मणजे, यांपैकीं एक अथवा दोन्ही अधिकार मिळतातच असें नाहीं. ज्यांजवळ संपत्ति असते, त्यास दुसऱ्याचे श्रम अथवा बाजारांत दुसऱ्याचे श्रमाचें जें फल उपलब्ध असतें तें विकत घेण्याचें सामर्थ्य असतें. ज्याप्रमाणें हें सामर्थ्य कमी किंवा जास्त असतें, त्याप्रमाणें त्या मनुष्याची संपत्ति कमी किंवा जास्त समजावयाची; व या सामर्थ्याप्रमाणें लोकदृष्ट्या त्याची योग्यता कमी किंवा जास्ती असते. ही स्थिति प्राप्त झाली ह्मणजे, उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे स्वाभाविक रीतीनें लोकांचे वर्ग होऊं लागतात. आतां, या शक्तीविषयीं विचार केला असतां, हे निरनिराळे वर्ग झाल्यापासून काय कार्य होतें हें आपणांस समजणार आहे.

---

१—स्मिथकृत वेल्थ् आफ् नेशन्स् ( राष्ट्रांची संपत्ति ) पृ. १३.

धनोत्पत्तीस तीन गोष्टींची आवश्यकता असते. श्रम, भांडवल व जमीन. भांडवल ह्मणजे बरेच दिवस श्रम करून जें फल संचित केलें असतें तें. जमीन ह्मणजे जी सामुग्री व जीं साधनें सृष्टींत उपलब्ध असतात तीं; मग हीं साधनें पृथ्वीच्या गर्भांतून प्राप्त होवोत अथवा पृष्ठभागावर प्राप्त होवोत. श्रम, भांडवल व जमीन यांपैकीं प्रत्येक निरनिराळे मनुष्याजवळ असणार आहे; ह्मणून धनांची वांटणी हीही तीन निरनिराळे प्रकारचे लोकांमध्यें होणार आहे. ते लोक जमिनीचे मालक, भांडवलवाले व धनोत्पादक श्रम करणारे हे होत. हे तीन वर्ग मिळून अर्थशास्त्रकारांचे मताप्रमाणें समाज होतो. जरी संपत्तीची वांटणी या तीन प्रकारचे लोकांमध्यें होते, तरी सर्व देशांत हे तीन निरनिराळे प्रकार दृष्टीस पडतात असें नाहीं. इंग्लंड, स्कॉटलंड व बेलजिअम या देशांत व हालंदचे कांहीं प्रदेशांत मात्र संपत्तीची वांटणी ही तीन निरनिराळे प्रकारचे लोकांमध्यें होते. साधारण रीतीनें पाहतां, एकाच मनुष्याजवळ दोन्हीं अथवा कांहीं ठिकाणीं तिन्ही गोष्टी अस-

१–मिलकृत अर्थशास्त्र पृ. २८७.

२–ज्या तीन गोष्टी धनोत्पत्तीस अवश्य आहेत त्यांपैकीं दोन गोष्टी एकाच मनुष्यापाशीं असतात; म्हणजे, एकाच मनुष्याची जमीन असून त्याजवळ भांडवलही असतें. जमिनीचा मालक हा खुद्द श्रम करणाऱ्या मनुष्याबरोबर करार करून त्यास भांडवल पुरवितो. हा प्रकार फ्रान्स देशांत राज्यक्रांति होण्यापूर्वीं सुरू होता. ज्या ठिकाणीं जमीन ही शेतकऱ्याची नसते त्या ठिकाणीं हा प्रकार अद्याप दृष्टीस पडतो. हा प्रकार इटली देशांतील बहुतेक सपाट प्रदेशांत दृष्टीस पडतो. कित्येक ठिकाणीं श्रम करणारे मनुष्याची जमीन नसते परंतु त्याजवळ थोडें बहुत भांडवल असतें. जमिनीचा मालक हा भांडवल पुरवीत नाहीं. हा प्रकार आयर्लंड, हिंदुस्थान व आशियांतील कांहीं प्रदेश ह्यांत दृष्टीस

तात; व संपत्तीची वांटणी ही दोन प्रकारचे लोकांमध्यें होते अथवा तिचा उपभोग घेणारा एकटाच असतो.

आह्मीं हा जो विचार सांगितला तो अर्थशास्त्रकारांचा होय. आपण धनाचे वांटणीविषयीं साधारण विचार करावयास लागलों असतां, आपणांस असें दिसून येतें कीं, धनाची सिद्धता होऊन त्याचा संचय होऊं लागला ह्मणजे, त्याची वांटणी दोन प्रकारचे लोकांमध्यें होते. एक श्रम करणारे व दुसरे श्रम न करणारे. श्रम करणारे लोकांस श्रमाबद्दल जो मोबदला मिळतो त्यास मजूरी ह्मणतात; व श्रमाची योजना करणारे, ह्मणजे, जे भांडवल पुरवितात, त्यांस भांडवलाबद्दल जो मोबदला मिळतो त्यास नफा ह्मणतात. कांहीं काल लोटल्यावर, आपणांस निराळा एक वर्ग दृष्टीस पडतो. हा संचय करणारे लोकांचा होय. हे लोक जातीनें श्रम करणारे नसतात किंवा श्रमाची योजनाही करीत नाहींत. हे श्रमयोजकांस संचित धन उसनवार देतात व ह्यांस याबद्दल जो मोबदला मिळतो त्यास व्याज ह्मणतात. यांस जें व्याज मिळतें, तें

---

पडतो. हिंदुस्थानांत जमिनीची मालकी ही बहुतेक ठिकाणीं सरकाराकडे आहे. शेतकरी लोक हे आपले स्वतःचे श्रमानें व भांडवलानें जमिनीची लागवड करितात व सरकारास मालकीबद्दल सारा देतात. कोठें कोठें सरकार नियमित सारा ठरवून जमीन दुसरे लोकांस देतें; व हे लोक भाड्यानें शेतकऱ्यांस पुनः जमीन देतात.

३—धनोत्पत्तीस लागणाऱ्या तिन्हीही गोष्टी या एकाच मनुष्याजवळ असतात. अशा लोकांस पेजंट प्रोप्राएटर म्हणतात. हे युनायटेडस्टेट्सचे उत्तरेकडील प्रदेश, फ्रान्स देशाचा बराच भाग, स्वित्सरलंड, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, जर्मनींतील कांहीं प्रदेश व इटलीचे बहुतेक प्रदेश या ठिकाणीं आढळतात.

श्रमयोजकांस जो नफा मिळतो त्यापैकीं एक अंश होय. तेव्हां जी वांटणी होते ती येणें प्रमाणें:—व्याज, नफा व मजुरी. परंतु ही जी वांटणी होते ती नंतरची, ह्मणजे, ज्या वेळेस धनाचा बराच संचय झाला आहे त्या वेळची होय. परंतु ज्या वेळेविषयीं आपणांस विचार करावयाचा आहे त्या वेळेस हा वर्ग निराळा असा नसतो. मागाहून जी व्यवस्था होते तिजविषयीं आपणांस विचार करावयाचा नाहीं. श्रम करणारे व श्रमयोजक यांमध्यें संचित धनाची वांटणी कशी होते याविषयीं आपणांस प्रस्तुत विचार करावयाचा आहे.

श्रम करणारे लोकांस श्रमाबद्दल जी मजूरी मिळते ती त्यांचे श्रमाची किंमत आहे; व ज्याप्रमाणें इतर जिनसांचे किंमतींत फेरफार होतो त्याप्रमाणें मजूरीचे दरांतही फेरफार होतो. ज्याप्रमाणें इतर जिनसांची किंमत ही, मागणी व पुरवठा यांवर अवलंबून असते त्याप्रमाणें मजूरी ही मागणी व पुरवठा यांवर अवलंबून असते; [२] ह्मणजे, लोकसंख्या व भांडवल यांमधील जें प्रमाण त्यावर अवलंबून असते. लोकसंख्या ह्मणजे, श्रम करणारे लोकांची संख्या असा या ठिकाणीं अर्थ समजावयाचा; व भांडवल ह्मणजे, श्रम विकत घेण्याकरितां जें धन खर्ची घालावयाचें तें. देशांत जो धनाचा संचय होत असतो त्याची श्रम करणारे लोकांस फारशी मातबरी नाहीं; किंवा मजूरीक-

१–कोणतेही मनुष्यास एखादे उद्योगांत जो फायदा मिळतो तो तीन गोष्टीमिळून झालेला असतो:—

(१) संचयाबद्दल मोबदला.

(२) तोट्याचे जोखमीबद्दल मोबदला.

(३) देखरेख करण्याचे श्रमाबद्दल मजूरी. (फासेटकृत अर्थशास्त्र. पृष्ठ १४६.)

२–मिलकृत अर्थशास्त्र पृष्ठ ४०९; फासेटकृत अर्थशास्त्र पृ. १२८.

रितां ह्मणून त्यांमध्यें वांटून देण्यासाठीं जें भांडवल निराळें काढून ठेविलें असतें त्याचीही फारशी मातबरी नाहीं. जें भांडवल वांटून द्यावयाचें व ज्या लोकांमध्यें हें वांटून द्यावयाचें, त्यांमध्यें असणारें प्रमाण हें श्रम करणारे लोकांस फार महत्त्वाचें आहे. हें प्रमाण श्रम करणारे लोकांस फायदेशीर होईल अशा प्रकारें यांत फेरफार केल्याशिवाय, श्रम करणारे लोकांची स्थिति कधींही सुधारावयाची नाहीं. हें प्रमाण फायदेशीर होण्याविषयीं तजवीज न करितां, अन्य रीतीनें जे प्रयत्न करण्यांत येतात ते निर्फळ होत. या अन्य प्रयत्नांपासून श्रम करणारांचे स्थितींत कधींही फेरफार व्हावयाचा नाहीं.

जर देशाची संपत्ति वाढून, भांडवलाचा बराच संचय झाला असतांही मजूरीचा दर वाढला नाहीं, तर, मजूरदारांची संख्या जास्ती वाढल्यामुळें हा दर वाढला नाहीं असें समजलें पाहिजे; व जोंपावेतों मजूरदारांची संख्या कोणत्याही गोष्टीवरून कमी होणार नाहीं, तोंपावेतों, मजूरदारांस देशांतील धन वाढल्यामुळें तादृश फायदा होणार नाहीं. याकरितां मजूरदारांचे संख्येस प्रतिबंध असणें हें त्यांस व देशास इष्ट होय. हें ह्मणणें कित्येक

---

१–मिलकृत अर्थशास्त्र. पृष्ठ. ४१७.

२–मि. माल्थस यांनीं बरेच श्रम करून लोकसंख्या या विषयावर एक निबंध लिहिला आहे. तो फारच महत्त्वाचा आहे. हे साहेब म्हणतात कीं, लोकसंख्येला दोन प्रकारचे प्रतिबंध असतात. एक प्रत्यक्ष म्हणजे दुष्काळ, रोग व लढाया यांपासून लोकसंख्या कमी होते. दुसरा प्रतिबंधक म्हणजे शहाणपणाचा प्रतिबंध. तो असा कीं, प्रत्येक सुधारलेल्या देशांत कांहीं लोक लवकर लग्नें करीत नाहींत. कारण, असें केल्यापासून संतति वाढत नाहीं व यामुळें आपणांस सुखानें राहतां येतें असें त्यांस वाटतें. युरोपांतील कांहीं देशांत व आशियाचे बहुतेक देशांत पूर्वीं लोकसंख्या कमी होत असे. ती दुष्काळ, लढाया, मुलांची

कोत्या समजुतीचे लोकांस चमत्कारिक व कठोरसें दिसेल. परंतु या देशांत लोकसंख्या वाढत गेल्यामुळें, श्रम करणारे लोकांची व देशाची किती हानि झाली, व अद्याप होत आहे, याविषयीं विचार केला असतां असा प्रतिबंध असणें इष्ट आहे किंवा नाहीं हें समजणार आहे.

जोंपावेतों लागवडीस न आलेली अशी बरीच जमीन देशांत असते, तोंपावेतों, लोकसंख्येला प्रतिबंध नसला तर चालण्यासारखा आहे. पूर्वीं असा प्रतिबंध ठेवण्याचें कारण नसे. कारण, पुष्कळ जमीन लागवडीस आलेली नव्हती व मनुष्याच्या गरजाही बेताबाताच्या होत्या. परंतु हल्लींची स्थिति याहून उलट आहे. सांप्रत देशांत स्वस्थता आहे; साती वगैरे रोगांवर औषधिउपाय माहीत असल्यामुळें या रोगांपासून फारसे लोक मरत नाहींत; दिवसेंदिवस गरजा वाढत चालल्या आहेत, यामुळें चांगल्या रीतीनें निर्वाह करण्यास बराच खर्च लागतो; अशा स्थितींत लोकसंख्येवर कांहीं प्रतिबंध ठेवण्याविषयीं यत्न न केला तर, अनिष्ट कार्यें उत्पन्न होतील हें सांगावयास नको. श्रम करणारे लोकांची स्थिति चांगली नाहीं ह्मणून दुःख प्रदर्शित करणारे पुष्कळ निघतात. परंतु खरोखर

---

जोगवण निष्काळजीनें करणें, भयंकर रोगांवर औषधांविषयीं अज्ञान वगैरे गोष्टींमुळें होत असे. जरी हा एका प्रकारचा प्रतिबंध आहे, तरी त्यापासून जितका फायदा व्हावा तितका होत नाहीं. शिवाय अशा प्रकारचा प्रतिबंध हा प्रशंसनीय आहे असें नाहीं. दुसरा प्रतिबंध हा हितकर असून उत्तम आहे. नॉर्वे देशांत असा नियम आहे कीं, नवरा व बायको या उभयतांजवळ कांहीं पैसे असल्याचें दिसून आल्याशिवाय, लग्न करण्याविषयीं त्यांस परवानगी मिळावयाची नाहीं. स्विझरलंड देशांत पुरुष ३० वर्षांचा व स्त्री २५ वर्षांची होईपर्यंत लग्न करीत नाहींत.

जे उपाय केले पाहिजेत, ते मनःपूर्वक करणारे फारसे निघत नाहींत. कित्येकांचे मनांत हे उपाय करण्याविषयीं येतें; परंतु ते लोकापवादाला भिऊन जागच्याजागीं स्वस्थ बसतात.

धर्मसंबंधीं ज्या कित्येक चमत्कारिक समजुतींमुळें हिंदुस्थान-देशाचें अहित झालें, त्यांपैकीं लग्नाचे व धर्मादायाचे बाबतीं-तील समजूत ही एक होय. ही समजूत पूर्वीं इतकी नडत नसे. कारण, धान्य मुबलक असल्यामुळें लोकांस भिकारी लो-कांचें पोषण करण्यास अवघड वाटत नसे. परंतु या चुकीमुळें भिकाऱ्यांची संख्या वाढूं लागली. आतां, जेव्हां धान्य महाग होऊं लागलें आहे तेव्हां लोकांचे डोळे उघडत चालले आहेत; परंतु अद्यापि चांगले उघडले नाहींत. अविचारानें धर्मादाय करण्याची, व दोन हातांचे चार हात होत असल्यास, द्रव्यद्वारें हस्तें परहस्तें मदत करण्याची वाईट चाल अझून मोडली नाहीं.

प्रत्येक मनुष्यास या जगांत राहण्याचा हक्क आहे हें खरें आहे; तथापि, आपण लग्न करावें व दुसऱ्यांनीं आपल्या मुलांचें पोषण करावें असें ह्मणण्याचा कोणासही हक्क नाहीं. ज्या लो-कांस दुसऱ्याचे सहायाशिवाय स्वतःचें पोषण करितां येत नाहीं त्या लोकांस लग्न करण्यास, व अशक्त व दरिद्री प्रजा निर्माण करण्यास मदत करणें हें किती अविचाराचें आहे! परंतु या देशांत व अन्य देशांत असल्या लोकांचे शेंकडों पुर-स्कर्ते आहेत. वंशपरंपरेनें भिक्षा मागणारे लोकांस काम क-रावयास लावणें हें देखील कित्येक धार्मिक ह्मणविणारे लोकांस आवडत नाहीं. आमचें इतकेंच ह्मणणें आहे कीं, जो धर्मा-दाय करावयाचा, त्यापासून लोकांस चांगल्या संवयी लागून त्यांचें कल्याण होईल, अशा प्रकारें जर धर्म न केला, तर, दा-नाचा जो वास्तविक हेतु आहे, तो न साधतां व्यर्थ व्यय केल्या-सारखें होणार आहे. अस्तु.

एखादे देशांत धनाची कांहीं एक रक्कम ही श्रमयोजक व श्रम करणारे यांमध्यें वांटून द्यावयाची आहे, अशी आपण कल्पना करूं. आतां श्रमकरणारे लोकांची संख्या जसजशी वाढत जाते तसतसा मजूरीचा दर कमी होतो; व केव्हां केव्हां दुसऱ्या ज्या कित्येक कारणांमुळें मजूरीचे दरांत फेरफार होतो, त्या कारणांविषयींचा विचार एकीकडे ठेविला असतां, मजूरीविषयीं विचार करणें हें मजूरदारांचे संख्येविषयीं विचार करणें आहे. कारण, मजूरीचा दर हा, ज्या भांडवलांतून मजूरी द्यावयाची, तें भांडवल जसें असेल तसा असणार आहे, तथापि, भांडवलाला जास्ती मागण्या येत असून, त्याप्रमाणें तें वाढत गेलें नाहीं तर, मजूरदारांची संख्या जशी वाढत जाईल, तशी प्रत्येक मजूरास कमी मजूरी मिळणार आहे. ज्या भांडवलांतून मजूरी द्यावयाची तें भांडवल कसें वाढवावें व तें वाढविण्यास कोणत्या गोष्टींची अनुकूलता असली पाहिजे, याविषयींचा विचार जरी महत्त्वाचा आहे, तथापि, तो विचार

---

१—ज्या कित्येक कारणांमुळें मजूरीचे दरांत फेरफार असतो तीं कारणें:—

( १ ) धंदा मनाजोगता असणें किंवा नसणें.

( २ ) काम शिकण्यास येणारी अडचण अथवा लागणारा खर्च; अथवा हें शिक्षण मिळण्याचे बावतींत पडणारे थोडे श्रम व लागणारा थोडा खर्च.

( ३ ) धंद्याची शाश्वती अथवा त्याचा अनिश्चितपणा.

( ४ ) श्रमकरणारे लोकांवर कमी जास्ती विश्वास ठेवण्याची आवश्यकता.

( ५ ) धंद्यांत यश येण्याचा संभव अथवा असंभव. स्मिथकृत वेल्थ आफ् नेशन्स ( राष्ट्रांची संपत्ति ). पृष्ठ. ५३.

करण्याचा प्रकृत ग्रंथाचा विषय नाहीं. कोणत्या सृष्टपदार्थविषयक कारणांमुळें मजूरदारांची संख्या वाढत जाऊन त्यांचा भरणा जास्ती होतो, व त्यामुळें मजूरीचा दर कमी होतो, याविषयीं आपणांस विचार करावयाचा आहे.

जीं सृष्टपदार्थविषयक कारणें आहेत, त्यांपैकीं भोज्य (अन्न) हें एक होय. या योगानें मजूरांचे संख्येंत फेरफार होतो. दोन निरनिराळे देश हे इतर गोष्टींनीं सारखे आहेत, परंतु त्यांत फरक इतकाच आहे कीं, एकांत भोज्य स्वस्त असून विपुल आहे, व दुसऱ्या देशांत त्याचा सांठा थोडा असून तें महाग आहे अशी आपण कल्पना करूं. आतां, ज्या देशांत तें स्वस्त असून पुष्कळ आहे, तेथील लोकसंख्या, ज्या देशांत तें पुष्कळ नसून महाग आहे, त्या देशापेक्षां त्वरित वाढत जाते. इतकेंच कीं, दोन्ही देशांतील लोकांचे राहण्याचें मान मात्र सारखें असलें पाहिजे. ज्या सालीं धान्याचा भाव स्वस्त असतो, त्या सालीं, ज्या वर्षी हा भाव महाग असतो त्या वर्षापेक्षां जास्ती लग्नें होतात, हें अनुभवावरून प्रत्येकास माहीत असेल. ज्या देशांत लोकसंख्या लवकर वाढत जाते त्या देशांत मजूरीचा दर हा, ज्या देशांत ती तितकी वाढत नाहीं त्या देशांतील मजूरीचे दरापेक्षां कमी होत जातो. यावरून निरनिराळे देशांत, ज्या सृष्टपदार्थविषयक नियमांवर उपजीविकेच्या पदार्थांचा पुरवठा, व यामुळें मजूरीचा दर हीं अवलंबून असतात त्या नियमांचा विचार करणें हें प्रस्तुत महत्त्वाचें आहे.

आपण जें अन्न खातों त्यापासून शरीररक्षणास अवश्य अशीं दोन कार्यें निष्पन्न होतात. एक कित्येक कारणांमुळें शारीरयंत्राची जी नेहमीं झीज होत असते तिची दुरुस्ती होणें, व दुसरें रुधिराभिसरण वगैरे क्रिया सुरळीत चालण्यास,

व शरीरांतील दूषित अंश बाहेर पडण्यास, जो उष्मा अवश्य लागतो तो उत्पन्न होणें. मनुष्याचें शरीर हें एक नाजुक यंत्र आहे. ज्याप्रमाणें यंत्रास गति दिली असतां, तें चालून

---

१–मनुष्याचे रक्ताचें मान ९९°, पक्ष्यांचें १०६° पासून १०८° व सरपटणाऱ्या जनावरांचें ८४° पासून ८६° असतें. ज्याप्रमाणें तापविलेल्या पदार्थाची उष्णता नाहींशी होते, त्याप्रमाणें प्राण्यांचे शरीरांतील उष्णता बाहेर पडून ती अगदीं नाहींशी झाली असती. परंतु केश, लोंकर, पर वगैरे साधनांमुळें उष्णता त्वरित बाहेर पडण्यास अडचण असते. शरीरांतील उष्मा हा ज्याप्रमाणें अन्नानें कायम ठेवितां येतो, त्याप्रमाणें तो निवाऱ्याची जागा, शेकशेगडी वगैरे उपचारांनीं अंशतः कायम ठेवितां येतो.

२–शरीरास यंत्र म्हणण्याचें कारण, ज्याप्रमाणें आपण एरवींचें यंत्र पाहतों त्याप्रमाणें शरीर हें यंत्र आहे. दुसऱ्या यंत्रास गति दिली असतां, ज्याप्रमाणें त्याचा व्यापार अस्खलित रीतीनें चालतो, त्याप्रमाणें शरीरास अवश्य लागणारे पदार्थ वेळचे वेळेवर मिळत गेल्यानें, हें यंत्रही बरेच दिवस टिकाव धरितें. शरीरयंत्राप्रमाणें नाजुक यंत्र दुसरें नाहीं. हें यंत्र नाजुक असण्याचें कारण हें कीं, त्यांत वायूचा अंश फार असतो. शरीर हें मुख्यत्वेंकरून तार्क्ष्य, प्राणवायु, उदकजनकवायु, अंगारवायु, प्रकाशद्, क्यालशम् सोडियम् ( वज्रक्षार ) पोटाशम् ( पात्रक्षा ), म्याग्निशम् ( विरेचनक्षार ) व लोह, हे शुद्ध पदार्थमिळून झालेलें आहे. हे शुद्ध पदार्थ निरनिराळ्या प्रमाणांनीं संयोग पावतात. ह्या शुद्ध पदार्थांपैकीं तार्क्ष्याचा अंश शरीरांत विशेष असतो. शरीरयंत्रास गति मिळून ज्या क्रिया नेहमीं चालू असतात, त्या बाह्य पदार्थांचे सहायावांचून होत नाहींत. ते पदार्थ हवा, पाणी, उष्णता, थंडी, विद्युत् व उजेड हे होत. ज्या योगानें शरीरांत सेंद्रिय क्रिया चालतात, ते रक्ताशय, फुफ्फुसें, पक्काशय, आंतडीं, यकृत्, पांक्रिया ( अन्नपचनरसोत्पादक इंद्रिय ) व प्लीहा हे होत. सेंद्रिय व्यापारामुळें प्राणाचें रक्षण होतें व ऐच्छिक क्रियेच्या व्यापारामुळें शुद्धि उत्पन्न होते. सेंद्रिय व्यापार हे सतत चालू अस-

झिजत जातें, त्याप्रमाणें शरीरयंत्र हें नेहमीं झिजत जातें.

---

तात. यांस विसावा म्हणून कायतो माहीत नाहीं. परंतु ऐच्छिक क्रियेचे व्यापार थांबून थांबून चालतात. यास विसावा जरूर लागतो. रक्ताशयाचा व्यापार कधीं बंद होतांना कोणी पाहिलें आहे काय? जरी २४ तासांत त्याचे १ लाख ठोके बसतात, तरी त्याचा व्यापार बंद न पडतां, वर्षांच वर्षे त्याचा हा क्रम सुरू असतो. त्याचप्रमाणें फुप्फुसांची गोष्ट होय. हीं नेहमीं हवा आंत घेत असतात व बाहेर टाकीत असतात. जे सेंद्रिय व्यापार चालू असतात ते परस्परांवर अवलंबून असतात, म्हणजे रुधिराभिसरणाशिवाय अन्नरसक्रिया व्हावयाची नाहीं; अन्नरसक्रियेशिवाय पचनक्रिया होत नाहीं; पचनक्रियेशिवाय पोषणक्रिया होत नाहीं; व पोषणक्रियेशिवाय रुधिराभिसरण होत नाहीं. या निरनिराळ्या क्रियांसाठीं शरीरांत निरनिराळी तजवीज केली आहे. फक्त पचनक्रियेविषयींच विचार केला असतां, शरीररचना किती चमत्कारिक आहे हें आपणांस कळून येईल. या क्रियेसाठीं पांच मुख्य भाग आहेत. शिवाय पुष्कळ सहाय्यकारी अवयव आहेत. १ तोंड २ अन्ननलिका ३ पक्वाशय ४ लहान आंतडीं ( ह्या नळ्या आहेत ) ५ मोठालीं आंतडीं ( ह्या मोठाल्या नळ्या आहेत ). प्रथम दांतांनीं अन्नाचें पिष्ट होतें व श्लेष्मोत्पादक पिंडांतून थुंका येऊन या पिष्टास ओलावा मिळतो. थुंक्यांत पाणी व क्षार असल्यामुळें अन्न मऊ होऊन गिळण्यास योग्य होतें; शिवाय यापासून पचनक्रियेस सहाय होतें. दांतांनीं अन्नाचें पिष्ट झाल्यावर व थुंक्यानें मऊ झाल्यावर मग त्याचा गोळा बनतो. जोंपावेतों ही क्रिया चालते, तोंपावेतों तोंडाचें द्वार बंद असतें. पुढून ओंठ, बाजूंनीं गाल, खालून जीभ व मागून टाळा, अशा रीतीनें चोहोंकडून कडेकोट बंदोबस्त असल्यामुळें अन्नास बाहेर जातां येत नाहीं. हें अन्न जीभ गोळा करून टाळ्याच्या सहाय्यानें अन्नमार्गामध्यें नेऊन सोडते. अन्नमार्ग ही तोंडाजवळच एक पिशवी आहे. हिच्या पुढच्या अंगास वायु येण्यास व जाण्यास नळी आहे. तिला श्वासमार्ग म्हणतात. या पिशवीचे दोन्ही बाजूंस दोन नळ्या आहेत. यांतूनच श्रवणेंद्रियाकडे वायु जाण्याची वाट आहे;

यास इंग्रजींत युस्टेचिअन ट्यूब्स म्हणतात. पिशवीच्या वरच्या बाजूस नाकाकडे जाण्यास मार्ग आहे. पिशवीला लागून खालीं एक नलिका आहे. ही पक्काशयास जोडलेली आहे. जोंपावेतों या पिशवींत अन्न असतें, तोंपावेतों हवेस फुप्फूसांत जातां येत नाहीं. याचसाठीं अन्न या पिशवींतून खालीं लवकर उतरलें पाहिजे. अन्न या पिशवीखालील अन्ननलिकेमधून पक्काशयांत जातें. प्रथम आपण जो घास घेतों तो पक्काशयांत गेल्यावर त्यास पक्काशयाच्या स्नायूंच्या विलक्षण शक्तीमुळें पक्काशयाच्या आंतील त्वचेच्या बाजूनें जाण्यास गति मिळते; हा घास बाजूनें जात जात मध्यभागीं येतो; नंतर त्याचे मागें दुसरा, तिसरा, चवथा अशा रीतीनें शेवटचा घास मध्यभागीं येतो. याप्रमाणें घासाची फेरी होत असतां, पक्काशयाच्या रक्तवाहिन्या फुगतात व त्यामुळें पक्काशयाच्या त्वचेपासून एक स्राव निंघूं लागतो; यास जठराग्नि ( अन्नाशयांत अन्नपचनार्थ उत्पन्न झालेला रस ) म्हणतात. हा रस अशी क्रिया चालत असल्यानें पूर्णपणें अन्नाशीं मिसळतो. या रसाच्या योगानें पचन होण्यासारखा अन्नांतील कठीण अंश विरघळून जातो व अन्नाचा नवीन प्रवाही पदार्थ बनतो; यास आमरस म्हणतात. हा रस लहान आंतड्यांचे वरचे भागांत जाऊन तेथें त्याचें, पित्त व पांक्रियाचा रस यांशीं मिश्रण होऊन अन्नरस होतो. अन्नरस लहान आंतड्यांत जाऊन त्याचें शोषण अन्नरसवाहिन्या करतात. सर्वांत मोठी जी वाहिनी तिजमध्यें या वाहिन्या हा अन्नरस नेऊन सोडितात. ही वाहिनी हा रस रक्ताशयाकडे जाणाऱ्या अशुद्ध रक्तवाहिनींत नेते; येथें त्याचें अशुद्ध रक्ताशीं मिश्रण होतें; नंतर हें अशुद्ध रक्त रक्ताशयांतून फुप्फूसाकडे जातें; येथें अशुद्ध रक्तांत असणाऱ्या अंगारवायूचा, श्वासाबरोबर आलेल्या प्राणवायूशीं संयोग होतो; व संयोगापासून उत्पन्न झालेला अंगाराम्लवायु उच्छ्वासाबरोबर बाहेर जातो; येणेंकरून अशुद्ध रक्ताचें शुद्ध रक्त बनतें; येथून हें रक्त पुनः रक्ताशयांत जाऊन तेथून शुद्ध रक्तवाहिन्याचे द्वारें शरीराचें पोषण होतें. अन्नाचा अवशिष्ट घाणेरडा अंश मलद्वारें बाहेर पडतो.

सेन्द्रियक्रिया, व भाषण, गमन, श्रवण, दर्शन व मनन वगैरे ज्या ऐच्छिक क्रिया नेहमीं चालू असतात, त्यांमुळें शरीरांतील अंश घामावाटे, फुप्फूसावाटे व शरीरांतील दुसरीं जीं द्वारें आहेत, त्या द्वारें नेहमीं जाऊन, शरीराची झीज नेहमीं चालू असते. प्रतीतीअंतीं[1] असें समजतें कीं, २४ तासांत साधारण मनुष्याची सहापासून सात पौंडांपर्यंत झीज होते; व सशक्त[2] व निरोगी लोकांनीं एक तास काम केलें असतां, त्यांचें शरीर वजनांत पांच पौंड कमी भरतें. हटन व डांडर्स यांचें असें मत आहे कीं, जो मनुष्य घराबाहेर काबाडकष्टाचें काम करण्यास लागला आहे, त्यास ३५० टन ओझें एक फूट वर उचलण्यास जो जोर लागतो, तितका शरीरांतील जोर दररोज नाहींसा होतो. मनुष्याच्या शरीरांतील अवश्य व्यापार चालले असतां, १३३ टन ओझें एक फूट उंच उचलण्यास जो जोर लागतो, तितका जोर नित्य खर्ची[3] पडतो.

ही जी शरीराची झीज होते तिची दुरुस्ती मुख्यत्वेंकरून अन्नानें होते. ही झीज भरून येण्याकरितां शरीरांत नेहमीं अनेक क्रिया चालू असतात. प्रत्येक क्षणीं जुने परिमाणु शरीरांतून बाहेर पडतात व नवीन परिमाणु शरीरांत प्रवेश करितात. अशा रीतीनें शरीराची झीज होऊन तें नाश पावलें असतें; परंतु तें नाश न पावतां अन्नानें पूर्ववत् कायम राहतें. मानसिक व स्नायुविषयक शक्ति ही अन्नानेंच कायम राहते.

१–धनकोटी राजूकृत आरोग्यशास्त्र. पृष्ठ. ४५.

२–स्मिथ्स् फिलाजफी आफ् हेल्थ (आरोग्यशास्त्र) भा. २ पृष्ठ. ३३५.

३–जानस्टनकृत कृषिकर्मांतर्गत रसायन भूगर्भशास्त्राचीं मूलतत्वें पृष्ठ. ४६२.

४–स्मिथ. फिलासफी. हेल्थ. भा. १ पृष्ठ. २४.

५–जानस्टनकृत कृषिकर्मांतर्गत रसायन व भूगर्भशास्त्र. पृष्ठ. ४५९.

ज्या प्रमाणें शरीराची झीज होऊं नये ह्मणून दुरुस्ती करावी लागते, त्याप्रमाणें शरीररक्षणाकरितां उष्मा असावा लागतो. हा उष्मा उत्पन्न होण्याकरितां शरीरांत दहनक्रिया सुरू असली पाहिजे. ही दहनक्रिया सुरू ठेवण्याकरितां इंधन लागतें. हें इंधन अन्नच होय.

शरीराची झीज भरून येणें व शरीरयंत्राचे गतीसाठीं उष्मा उत्पन्न करणें, हीं जीं दोन निरनिराळे प्रकारचीं कार्यें, त्यांकरितां निरनिराळे प्रकारचे अन्नाची जरुरी असते. शरीरांतील उष्णता कायम ठेवण्यास, ज्या पदार्थांत तार्क्ष्यवायु नसतो, त्या पदार्थांची आवश्यकता असते; व शरीरयंत्राची जी झीज होते, ती न होऊं देण्यासाठीं, ज्या पदार्थांत तार्क्ष्य असतो, त्या पदार्थांची जरुरी असते.

हें सर्वांस माहीत आहे कीं, प्रत्येक खेपेस जो आपण श्वास घेतों, त्याबरोबर आपण प्राणवायूचें नेहमीं ग्रहण करीत अ-

---

१–तार्क्ष्यव्यतिरिक्त पदार्थ–लोणी अथवा तूप, खोबरेल तेल व वनस्पतींपासून जें तेल प्राप्य आहे तें.

२–तार्क्ष्ययुक्त पदार्थ–दूध, दहीं, मांस, अंडीं, डाळी व गहुं (धनकोटी राजकृत आरोग्यशास्त्र. पृ. ५२,५३). तार्क्ष्ययुक्त अन्नांत प्राणवायु, उदकजनकवायु, अंगारवायु व तार्क्ष्यवायु असतात. तार्क्ष्यव्यतिरिक्त अन्नांत प्राणवायु, अंगारवायु व उदकजनकवायु हे असतात. कोण कोणते शुद्ध पदार्थमिळून आपलें शरीर बनलें आहे, हें मागें टिपेंत सांगितलें आहे; तेव्हां ज्या अन्नांत हे शुद्ध पदार्थ आहेत तें अन्न खाणें जरूर आहे हें सांगण्यास नको. अन्नांत उत्तम अन्न दूध व अंडीं आहेत असें विद्वानांचें मत आहे. गव्हांत तार्क्ष्य फार असतो म्हणून तो मांसवर्धक आहे; यांत चरबी उत्पन्न करणारें साधन व खनिज द्रव्यें हीं असतात. बैल, मेंढी, घोडा, गाढव व डुकर यांचे मांसांत तार्क्ष्य असून चरबीचीं क्षारक द्रव्यें असतात.

सतो. हा वायु फुप्फूसांत प्रवेश करितो; व फुप्फूसांत जें रक्त येत असतें त्यांतील अंगारवायूशीं संयोग पावतो. अंगारवायु व प्राणवायु यांचे संयोगापासून अंगाराम्ल हें संयोगजन्य फल होऊन, शरीरास लागणारी उष्णता उत्पन्न होते व तिजपासून शरीराचें संरक्षण होतें.

---

१–प्राणवायु व अंगारवायु यांपासून जें संयोगजन्य फल व्हावयाचें, तें फुप्फूसांत होत नसून, शरीरांत ज्या केशाकर्षिणी धमन्या आहेत त्यांत होतें; म्हणून अंगाराम्लवायु हा या धमन्यांत उत्पन्न होऊन, याच ठिकाणीं उष्णता उत्पन्न होते; व या ठिकाणाहून चोहोंकडे तिचा प्रसार होतो. अंगाराम्ल उत्पन्न झाल्यावर, तो केशाकर्षिणी धमन्यांतून केशाकर्षिणी शिरांत जातो; व त्या त्यास फुप्फूसांत नेऊन पोंचवितात. तो फुप्फूसांतून बाहेर पडतो. फुप्फूसांत ज्या क्रिया होतात त्या प्राणवायु घेणें व अंगाराम्ल बाहेर टाकणें या होत. फुप्फूस हें या दोन वायूंचे जाण्यायेण्याचें द्वार होय.

रक्तशुद्धि व तज्जन्य शारीरपोषण ह्या क्रिया फुप्फूसांच्या होत. रक्त शुद्ध होण्याकरितां अंगाराम्लवायु बाहेर टाकणें व प्राणवायु आंत घेणें हा व्यापार फुप्फूसांत चालत असतो. अशाच प्रकारची क्रिया कांहीं अंशीं आपल्या शरीराचे त्वचेचे द्वारें होत असते. ज्याप्रमाणें फुप्फूसांतील रक्तवाहिन्या व हवा यांमध्यें एक पातळ त्वचा आहे त्याप्रमाणेंच शरीराचे त्वचेची गोष्ट आहे; म्हणजे हिचे आंतील बाजूस रक्तवाहिन्या पसरलेल्या आहेत व बाहेर प्राणवायुयुक्त हवा आहेच. ज्याप्रमाणें फुप्फूसांत श्वासोच्छ्वास क्रिया चालून रक्तशुद्धि वगैरे क्रिया चालतात त्याचप्रमाणें कांहीं प्रमाणानें त्वचेसही हा धर्म लागू आहे. कांहीं प्रमाणानें म्हणण्याचें कारण कीं, शरीराची त्वचा ही जाड असल्यामुळें बाहेरील हवेस शरीरांत जाण्यास थोडासा अडथळा होतो; म्हणून या द्वारें शरीरांत हवा कमी जाते व त्यांतील दूषित अंश कमी बाहेर पडतो. फुप्फूसांतील त्वचा ही पातळ असल्या कारणानें सृष्टिनियमाप्रमाणें हवेस या मार्गानें सहज जातां येतें. श्वासोच्छ्वास करणें हें फुप्फूसाचें काम आहे,

आपण जो प्राणवायु ग्रहण करितों त्याचें व तार्क्ष्य वायूचें

---

व त्वचेच्या द्वारें जो श्वासोच्छ्वास चालू असतो त्याचें प्रमाण जरी फुप्फुसांपेक्षां कमी आहे, तरी, कांहीं विशेष कारणांमुळें फुप्फुसांचे क्रियेंत व्यत्यय आला असतां, त्यांचें काम त्वचेवर पडल्यामुळें तिच्यांतून बाहेर पडणाऱ्या अंगाराम्लाचें प्रमाण जास्ती असतें. ही गोष्ट कित्येकांस अनुभवावरूनही माहीत असेल. उन्हाळ्यांत नाकतोंड दाबून स्वस्थ बसलें तर, कित्येकांचे अंगास दरदरून घाम फुटतो, म्हणजे फुप्फुसांची क्रिया बंद झाल्यामुळें अंगाराम्ल श्वासोच्छ्वासाच्या द्वारें न जातां त्वचेच्या द्वारें बाहेर पडतो.

प्रतीतीअंतीं असें समजून आलें आहे कीं, त्वचेच्याच योगानें मणके असणारे लहान प्राण्यांची श्वासोच्छ्वास क्रिया चालते. बेडकाचें फुप्फुस काढून घेतलें तरी तो कांहीं वेळ वांचतो; या कालांत तो अंगाराम्ल बाहेर टाकतो इतकेंच नाहीं तर प्राणवायुही ग्रहण करितो; म्हणजे बेडकाच्या अंगीं फुप्फुसांशिवाय त्वचेच्याच योगानें श्वासोच्छ्वास करण्याची शक्ति आहे.

यावरून इतकें सिद्ध होतें कीं, शरीरांत उष्णता कायम ठेवणें, रक्तशुद्धि करणें वगैरे ज्या क्रिया आहेत, त्या ज्याप्रमाणें फुप्फुसांच्या योगानें होतात, त्याप्रमाणें त्या त्वचेच्या द्वारेंही होत असतात; इतकेंच कीं फुप्फुसांचे द्वारें जी क्रिया चालते तिचा बराच अंश असून त्वचेच्या द्वारें जी क्रिया चालू असते तिचा कमी अंश असतो. जर त्वचेच्या द्वारें श्वासोच्छ्वास क्रिया चालू असते व ही थंडदेशापेक्षां उष्णदेशांत अधीक चालते, तर नाकतोंड दाबूनही ही क्रिया चालविण्यास मोठी अडचण आहे असें नाहीं; इतकेंच कीं त्वचा स्वच्छ ठेवणें जरूर आहे, व या द्वारें श्वासोच्छ्वास करण्याची कांहीं दिवस संवय असली पाहिजे. हिंदुस्थान देशांत व मिसर देशांत कांहीं लोक योगाभ्यास करीत असत. हा अभ्यास उष्ण देशाशिवाय इतर ठिकाणीं करण्याचा परिपाठ होता असें दिसून येत नाहीं. उष्ण देशांत हवेच्या उष्णतेमुळें स्नान वगैरे करून त्वचा स्वच्छ ठेवितां येते; शिवाय उष्ण हवेमुळें शरीर उघडें ठेविलें असतां त्रास होत नाहीं इतकेंच नाहीं, तर तसें करण्यापासून सुख वाटतें. फुप्फुसांचे

रसायनसख्य नसल्यामुळें, आपण जें ताक्ष्र्ययुक्त अन्न खातों त्यावर दहनव्यापार होत नाहीं; व शरीराची जी नेहमीं झीज होत असते ती अशा प्रकारें राहिलेल्या अन्नानें भरून येते.

ताक्ष्र्यव्यतिरिक्त अन्नापासून उष्मा उत्पन्न होणें व ताक्ष्र्ययुक्त अन्नापासून झीज भरून येणें, हीं जीं दोन अन्नापासून निरनिराळीं कार्यें होतात, त्यांचा व मनुष्याचा जो संबंध

---

द्वारें जास्ती प्राणवायु जातो म्हणून जठराग्नि प्रदीप्त होऊन भूक लवकर लागते. परंतु त्वचेच्या द्वारें प्राणवायूचा अंश कमी ग्रहण होतो म्हणून भूक कमी लागते; यामुळें कांहीं दिवस अन्नाशिवाय राहतां येणें अशक्य नसतें. त्वचेच्या द्वारें श्वासोच्छ्वास करितां येतो ही गोष्ट आर्य लोकांस माहीत होती असें दिसतें. ही गोष्ट अनुभवावरून माहीत झाली असावी. जो मनुष्य स्वस्थ बसला असतो तो २४ तासांत ६८६००० घनइंच हवा ग्रहण करितो व श्रम करणारा मनुष्य इतक्याच कालांत १५६८३९० घनइंच ग्रहण करतो, वगैरे गोष्टी त्यांस माहीत असण्याचा संभव कमी आहे. जे योगाभ्यास करितात ते कांहीं खात नसतात; तेव्हां त्यांस प्राणवायु ग्रहण करण्याची जरूरी नसते. ते योगाभ्यास करूं लागल्याबरोबर त्यांचें रुधिराभिसरण सावकाश चालतें. प्रारंभीं रक्ताशयाची क्रिया साधारण रीतीनें जोरानें चालल्यामुळें अंगाला घाम फुटतो. शरीर उघडें असल्यामुळें त्वचेच्या द्वारें हवेस जाण्यास अडचण नसते. उष्ण हवेमुळें शरीरास लागणारी उष्णता सहज रीतीनें कायम ठेवितां येते. योगाभ्यासाच्या योगानें फुप्फुसांची शक्ति वाढते व कांहीं रोग नाहींसे होतात असा कांहीं लोकांचा समज आहे. हा समज कितपत खरा आहे हें बरोबर सांगतां येत नाहीं.

वर जी हकीगत सांगीतली ती येथें सविस्तर रीतीनें सांगण्याचें कारण कीं, पूर्वीं ज्या गोष्टी अद्भुत अशा वाटत त्या लोकांचे अज्ञानामुळें होत. जों जों सृष्टपदार्थविषयक नियमांविषयीं अधिकाधिक माहिती होईल तों तों ह्या गोष्टींविषयीं खुलासा होऊन ह्या अद्भुत वाटणार नाहींत.

आहे, त्याचें नियमन कोणत्या नियमांवरून होतें, याविषयीं विचार केला असतां या प्रत्येक प्रकारचे अन्नांत हवेचा विशेष जोर असतो असें आपणास दिसून येतें. हवा फुप्फुसांत न गेली तर, शरीरांत उष्मा उत्पन्न न होऊन शरीरांतील दूषित अंश बाहेर पडणार नाहीं. जर शरीरांतील दूषित अंश शरीरांत राहिला, तर, व्याधि वगैरे उत्पन्न होऊन शरीर क्षीण होतें व कांहीं काळानें त्याचा नाश होतो. याकरितां वैद्यलोक स्वच्छ हवा घेण्याविषयीं नेहमीं सांगत असतात. अन्न व हवा यांचा निकट संबंध असल्यामुळें नुसत्या अन्नापासून इष्टकार्य होत नाहीं. इष्टकार्य होण्यास हवा अवश्य आहे. शरीरांत उष्णता उत्पन्न करण्यासाठीं जी हवा लागते, ती सर्व देशांतील लोकांस सारखी लागते असें नाहीं. शरीरास अवश्य लागणारी उष्णता ही थंड हवेंतील लोकांपेक्षां उष्ण हवेंतील लोकांस सहज रीतीनें कायम ठेवितां येते; व शरीरांत उष्णता कायम ठेवण्याचा तार्क्ष्यव्यतिरिक्त अन्नाचा धर्म असल्यामुळें, उष्ण हवेंतील लोकांस अशा प्रकारचें थोडें जरी अन्न मिळालें, तरी तेवढ्यावर त्यांचें काम चालतें. त्याचप्रमाणें त्यांस तार्क्ष्ययुक्त अन्नही कमी लागतें. कारण, उष्ण हवा असल्यामुळें त्यांचे शरीरास फारसे श्रम पडत नाहींत; त्यांच्यानें फारसा व्यायाम करवत नाहीं; यामुळें त्यांचे शरीरयंत्राची झीज, थंड हवेंतील लोकांचे शरीरापेक्षां अधीक होत नाहीं. उष्ण हवेमुळें कमी अन्न लागतें याविषयीं विशेष खुलासा करण्याचें कारण नाहीं.

---

१—श्वासोच्छ्वासक्रियेपासून रक्तावर जें प्रत्यक्ष व तत्काल कार्य होतें तें हें कीं, या क्रियेमुळें रक्तांतील अंगाराम्ल व उदकजनकवायु हे कमी होतात.

उन्हाळ्यांत आपणांस जें अन्न लागतें, त्यापेक्षां हिवाळ्यांत जास्ती अन्न लागतें हें प्रत्येकास अनुभवावरून माहीत असेलच.

ज्याअर्थी उष्ण हवेंतील लोकांस थंड हवेंतील लोकांपेक्षां स्वाभाविक रीतीनें कमी अन्न लागतें, त्याअर्थी त्यांजवळ अवशिष्ट अन्नाचा बराच सांठा असतो व यामुळें आम्हीं मागें जो सिद्धांत सांगितला त्याप्रमाणें या हवेंतील लोकसंख्या, थंड हवेंतील लोकसंख्येपेक्षां त्वरित वाढत जाते; इतकेंच कीं, दुसऱ्या गोष्टींनीं या दोन हवेंतील लोकांची सारखी स्थिति असली पाहिजे.

अन्नाचे द्वारें हवेचा व लोकसंख्येचे नियमाचा, व यामुळें धनाचे वांटणीचा जो संबंध आहे, त्याचा हा पहिला प्रकार झाला. हवेचा व धनाचे वांटणीचा दुसरे प्रकारें एक संबंध आहे. तो येथें सांगणें जरूर आहे. यावरून वरील सिद्धांतास अधीक बळकटी येईल. हा दुसरा सिद्धांत असा आहे कीं, उष्ण हवेंतील लोकांपेक्षां थंड हवेंतील लोकांस जास्ती अन्न लागतें, इतकेंच नाहीं, तर, त्यांस जें अन्न खावें लागतें तें महाग असतें. कारण, त्यांस अन्न मिळविण्यास विशेष अडचण पडून श्रमही विशेष करावे लागतात. याविषयीं खुलासा करणें अवश्य आहे.

आह्मीं वर सांगितलेंच आहे कीं, आपण जें अन्न खातों त्यापासून दोन कार्यें उत्पन्न होतात. एक शरीरांत उष्मा उत्पन्न होणें व दुसरें, नेहमीं शरीराची जी झीज होत असते ती भरून येणें. अन्नाचे द्वारें आपल्या पोटांत जो अंगारवायु गेला असतो त्याचा व वातावरणांतील जो प्राणवायु आपण ग्रहण क-

---

१–नाइन्टीन्थ सेंचरी ( एकुणासावें शतक नांवचें मासिकपुस्तक ) जून. १८७९. पृष्ठ. ९८०.

रितीं, व ज्याचा संचार सर्व शरीरांत असतो, त्याचा संयोग केशाकर्षिणी धमन्यांत होऊन पहिलें कार्य होतें. हा संयोग झाला ह्मणजे पहिलें कार्य झालेंच पाहिजे. हें जें संयोगजन्य फल होतें, तें प्रमाणव्यतिरिक्त शुद्ध पदार्थ असले तरी होतें असें नाहीं. ज्याप्रमाणें इतर शुद्ध पदार्थ हे विविक्षित प्रमाणांनीं मिसळले असतां त्यांपासून संयोगजन्य फल उत्पन्न होतें, त्याप्रमाणें प्राणवायु व अंगारवायु यांचें संमीलन होऊन, उष्णतारूपी संयोगजन्य फल उत्पन्न होणें तें विविक्षित प्रमाण असलें तर होतें. ह्मणून आपणांस जर शरीरप्रकृतीचें मान चांगलें ठेवावयाचें आहे, तर, आपण प्राणवायूचें ग्रहण जसें कमी किंवा जास्ती करूं, त्याप्रमाणें अंगारवायुयुक्त अन्नाचे मानांत फेरफार करणें अवश्य आहे. जर असें न केलें, तर, संयोगजन्य फल न होऊन, शरीरांतील दूषित अंश बाहेर पडणार नाहीं. शिवाय बाहेरची हवा थंड असल्यामुळें, ज्या वेळेस शरीरांतील उष्णतेचें मान कमी होतें, त्या वेळेस या दोन शुद्ध पदार्थांचें जास्ती ग्रहण करणें अवश्य आहे. यावरून असें एक अनुमान निघतें कीं, ज्या देशांतील हवा थंड असते, तेथील लोकांस अंगारवायुयुक्त अन्न खाण्याची आवश्यकता असते. ती दोन कारणांवरून असते. पहिलें कारण असें कीं, उष्ण देशांतील हवेचे परमाणु उष्णतेमुळें पातळ होत असल्यामुळें श्वासोच्छ्वास जोरानें चालत नाहीं; ह्मणून प्राणवायूचें कमी ग्रहण होतें. परंतु थंड हवेंतील लोकांची गोष्ट याचे उलट आहे. थंड हवेंतील परमाणु घट्ट असतात, ह्मणून त्या हवेंतील लोक श्वास घेतांना उष्ण हवेंतील लोकांपेक्षां जास्ती प्राणवायु ग्रहण करितात. दुसरें असें कीं, थंडीमुळें श्वासोच्छ्वास फार जलद चालतो; व त्यामुळें ते एकंदरींत प्राणवायूचें जास्ती ग्रहण करितात. प्रतीतीअंतीं असें समजतें

कीं, एकच प्राणी उन्हाळ्यांत जितक्या प्राणवायूचें ग्रहण करितो, त्यापेक्षां तो थंडींत जास्ती ग्रहण करितो. हे विचार कदाचित् कित्येकांस समजणार नाहींत. याकरितां हें खुलासेवार सांगणें जरूर आहे. ज्यावेळेस मनुष्य स्वस्थ बसला असतो त्यावेळेस त्याचा श्वासोच्छ्वास स्थिर व सावकाश चालतो हें सर्वांस अनुभवावरून माहीत असेल; परंतु ज्या वेळेस तो चालूं लागतो त्या वेळेस त्याचा श्वासोच्छ्वास[1] जलद चालतो; व प्राणवायूचें जास्ती वेळां ग्रहण होतें. वरें, ज्या वेळेस तो विशेष श्रम करितो, त्यावेळेस त्याचा श्वासोच्छ्वास फार जलदीनें सुरू होऊन, प्राणवायूचें जास्ती वेळां ग्रहण होतें; व तो प्राणवायूचा जास्ती अंश ग्रहण करितो. थंड हवेंतील लोकांस जास्ती श्रम करण्याची आ-

---

१—साधारण श्वास घेतला असतां, त्या बरोबर फुप्फुसांत १ पैंट वायु जातो, व साधारण उच्छ्वासाबरोबर फुप्फुसांतून तितकाच अथवा एक पैंटापेक्षां थोडा कमी वायु बाहेर पडतो. फुप्फुसांत साधारण रीतीनें सुमारें १२ पैंट वायु नेहमीं असतो. जो वायु आपण घेतों, त्याचा रक्तावर व्यापार होण्यासाठीं रक्ताशयाचे प्रत्येक क्रियेबरोबर दोन औंस रक्त फुप्फुसांत प्रवेश करितें. या दोन औंस रक्तावर ॡ सेकंदांत वायूचा व्यापार होतो. रुधिराभिसरणाची एक फेरी १६० सेकंदांत होते; म्हणजे २४ तासांत ५४० फेऱ्या होतात. २४ तासांत ५७ हागझेड वायु फुप्फुसांत जातो; व इतक्याच कालांत २४ हागझेड रक्त फुप्फुसांत जातें. रक्त व हवा या परस्परांचे व्यापारामुळें हवेंतील ३२८ औंस प्राणवायु कमी होतो; व रक्तांतील १० औंस, ११६ ग्रेन अंगारवायु कमी होतो.

प्रतीतीअंतीं असें समजून आलें आहे कीं, जो मनुष्य स्वस्थ बसला आहे तो २४तासांत ६,८६,००० घनइंच हवा ग्रहण करतो, व काबाडकष्ट करणारा मनुष्य इतक्याच कालांत, १५,६८,३९८ घनइंच ग्रहण करितो; यावरून जो मनुष्य स्वस्थ बसतो तो दर तासांत ३ ग्यालन प्राणवायु घेतो.

वश्यकता असते; व ते स्वाभाविक रीतीनें जास्ती श्रम करतात. यामुळें ते प्राणवायूचें ग्रहण जास्त करितात. जर थंड हवेंतील लोकांस प्राणवायूचें जास्ती ग्रहण करावें लागतें, तर, ज्या अन्नांत अंगारवायु असतो असें विशेष अन्न त्यांस खाण्याची आवश्यकता असते. कारण, वर सांगितलेंच आहे कीं, या दोन वायूंपासून संयोगजन्य फल होणें तें त्यांचें विविक्षित प्रमाण असेल तर होणार आहे; ह्मणजे एकाचें मान जास्ती वाढविलें तर, दुसऱ्याचेंही मान विविक्षित प्रमाणानें जास्ती वाढविलें पाहिजे; व एकाचें मान कमी केलें असतां दुसऱ्याचेंही मान कमी करणें जरूर आहे.

या विचारांवरून असा एक सिद्धांत निघतो कीं, जसजसा देश थंड असतो, तसतशी, ज्या अन्नांत अंगारवायु असतो तें अन्न खाण्याची तेथील लोकांस आवश्यकता असते. हें अनुभवावरूनही समजतें. शीत कटिबंधांतील लोक व्हेल माशाचें तेल खातात व तें थोडकें खातात असें नाहीं. जरी त्यांनीं तें पुष्कळ खाल्लें, तरी त्यांस कांहीं एक इजा होत नाहीं इतकेंच नाहीं, तर, तें त्यांस चांगलें मानवतें. परंतु उष्ण कटिबंधांतील लोक तें खावयास लागले असतां त्यांस तें मानवत नाहीं. केव्हां केव्हां तें खाल्ल्यापासून त्यांचे प्राणाची हानिही होते. उष्ण देशांत साधारण रीतीनें खाण्याचे पदार्थ ह्मटले ह्मणजे, फळफळावळ, तांदुळ वगैरे धान्यें व भाजीपाला. तेल, चरबी व मांस यांत अंगारवायूचा जास्ती अंश असतो.

ज्या अन्नांत अंगारवायु फार असतो तें अन्न, ज्यांत तो कमी असतो, त्यापेक्षां महाग असतें असें अनुभवावरून समजतें. फळफळावळ यांत प्राणवायूचा बराच अंश असतो; तीं विपुल सांपडतात; तीं मिळविण्यास फारसा त्रासही पडत नाहीं; किंवा

फारसा धोकाही येत नाहीं. परंतु अंगारवायुयुक्त पदार्थ हे स्वल्प श्रमानें प्राप्त होत नाहींत; ते फळफळावळ, अथवा भाजीपाला ह्याप्रमाणें जमिनीपासून मिळण्यासारखे नसतात; ते मोठमोठालीं व क्रूर श्वापदें यांचे चरबीचे अथवा तेलाचे असतात; ते मिळविण्यास मनुष्यास फार श्रम करावे लागतात, इतकेंच नाहीं, तर, ते पदार्थ मिळविणें हें कित्येक वेळां जोखमीचें काम असतें. बरें, इतकें करून हे पदार्थ विपुल प्राप्त होतात असें नाहीं. हे फारसे सांपडत नाहींत यामुळें महाग असतात. यावरून हें उघड आहे कीं, जों जों देश अधिकाधिक थंड, तों तों, तेथील लोकांचें अन्न अधिकाधिक अंगारवायुयुक्त असतें. जसजसा तो उष्ण असतो, तसतसा तेथील लोकांचे अन्नांत प्राणवायूचा विशेष अंश असतो. प्राणवायुयुक्त अन्न हें जमिनीपासून प्राप्त होतें; ह्मणून तें सुलभ असून पुष्कळ मिळतें. परंतु अंगारवायुयुक्त अन्न मिळविण्यास फार यातायात पडते; व हें मिळविणें फार धोक्याचें काम असतें. यामुळें थंड हवेचे कारणावरून, ज्या देशांत अंगारवायुयुक्त अन्न खाण्याची आवश्यकता असते, तेथील लोक ज्या देशांत प्राणवायुयुक्त अन्न लागतें, तेथील लोकांपेक्षां विशेष धीट असतात हें उघड आहे. हें इस्किमो लोकांविषयीं मागील एका भागांत जी हकीकत दिली आहे तिजवरून व्यक्त होणार आहे. प्राणवायुयुक्त अन्न हें स्वल्पायासानें व सहज गत्या प्राप्य असल्यामुळें धोक्याचे प्रसंग थोडे येतात. यावरून आपणांस आणखी कांहीं सिद्धांत ठरवितां येतील; परंतु ते सिद्धांत संपत्तीचे वांटणीचे संबंधाचे नसल्यामुळें, प्रस्तुतचे विषयास त्यांची फारशी मातब्बरी नाहीं.

या विचारांवरून संपत्तीची जी वांटणी होते, तींत अन्नाचे भेदामुळें कसा कमजास्तीपणा होतो हें दिसून येतें. आतां

ज्या प्रमेयांवरून आपणांस एक सिद्धांत ठरवावयाचा आहे, त्या प्रमेयांचें पुनः एकवार कथन करणें अवश्य होय. कारण, असें केल्यानें हा सिद्धांत कसा लागू पडतो हें समजण्यास अडचण पडणार नाहीं.

जसजसा लोकसंख्येंत फेरफार होतो, तसतसा मजूरीचे दरांत फेरफार होतो; ह्मणजे ज्या वेळेस मजूरांची संख्या वाढते त्या वेळेस मजूरीचा दर कमी होतो, व ज्या वेळेस त्यांची संख्या कमी होते, त्यावेळेस मजूरीचा दर वाढतो. इतकेंच कीं, दुसऱ्या गोष्टींत मात्र फरक असतां कामा नये. दुसऱ्या कित्येक गोष्टींनीं जरी मजूरांचे संख्येंत फेरफार होतो, तरी अन्नाचे पुरवठ्याचे मानाप्रमाणेंही मजूरांचे संख्येचें मान असतें; ह्मणजे ज्या वेळेस मजूरांस अन्नाचा बराच पुरवठा उपलब्ध असतो त्या वेळेस त्यांची संख्या वाढत जाते व ज्या वेळेस तो कमी असतो त्या वेळेस त्यांची संख्या कमी असते. थंड देशांत शरीररक्षणास जें अन्न अवश्य आहे तें दुर्मिळ असतें इतकेंच नाहीं, तर, उष्ण देशांतील लोकांस जितकें लागतें त्यापेक्षां जास्ती लागतें. यामुळें थंड देशांतील लोकसंख्या उष्ण देशांतील लोकसंख्येसारखी झपाट्यानें वाढत नाहीं. यावरून असा सिद्धांत निघतो कीं, उष्ण देशांत मजूरीचा दर कमी होण्याविषयीं प्रवृत्ति असते, व थंड देशांत तो जास्ती होण्याविषयीं प्रवृत्ति असते.

आतां हा सिद्धांत निरनिराळे खंडांना लागू करून पाहिला असतां, तो कितपत खरा आहे हें समजणार आहे. आशिया, आफ्रिका व अमेरिका या तीन खंडांत प्राचीन काळीं जी सुधारणा झाली, ती मुख्यत्वेंकरून त्या खंडांतील उष्ण देशांत झाली. त्या प्रदेशांत मजूरीचा दर कमी होता. हा दर प्रा-

वीन काळींच कमी होता असें नाहीं, तर अद्यापिही कमी आहे. मजूरांचे स्थितींत जो बदल होणें इष्ट आहे तो न झाल्यामुळें, हा दर बहुतेक अंशीं सारखाच आहे असें ह्मटलें असतां चालेल. मजूरीचा दर कमी असल्यामुळें मजूरांची स्थिति निकृष्ट होती. युरोपांतील सुधारणा ही थंड देशांत झाली; ह्मणून मजूरांस जास्ती मजूरी मिळे. ज्या उष्ण देशांत प्राचीन काळीं सुधारणा झाली, त्या देशांत अन्नाचा पुरवठा मुबलक असल्यामुळें मजूरदारांची संख्या जास्ती असे; व त्यामुळें मजूरीचा दर कमी असे. ह्मणून पूर्वोक्त तीन खंडांतील भांडवलवाले व मजूर यांमध्यें जें अंतर असे, त्यापेक्षां युरोपांतील भांडवलवाले व मजूर यांमधील अंतर कमी असे. कारण, युरोपांतील मजूरांस मजूरी जास्ती मिळे; ह्यामुळें तेथील भांडवलवाल्यांस नफा थोडा मिळे. या अंतरामुळें सामाजिक व राजकीय स्थितीचे संबंधानें जे परिणाम झाले ते फार महत्त्वाचे होते; ह्मणजे पूर्वोक्त तीन खंडांतील मजूरांस कमी मजूरी मिळे यामुळें त्यांची स्थिति निकृष्ट असे. युरोपांतील मजूरांस जास्ती मजूरी मिळे, ह्मणून साधारण रीतीनें या तीन खंडांतील मजूरांपेक्षां त्यांची स्थिति बरी असे. त्यांची स्थिति जशी असावी तशी होती असें आह्मी ह्मणत नाहीं. दोघांची तुलना करून पाहतां, युरोपांतील मजूरांची स्थिति बरी होती; व तीन खंडांतील खालच्या प्रतीचे लोक व वरच्या प्रतीचे लोक यांमध्यें अंतर फार असल्यामुळें, वरच्या प्रतीचे लोकांस ज्या मानानें जुलूम करावयास सांपडे, त्या मानानें युरोपांतील वरच्या प्रतीचे लोकांस सांपडत नसे. या ठिकाणीं उभयतांमधील अंतर कमी असल्यामुळें वरच्या प्रतीचे लोकांचें वजन तीन खंडांतील वरच्या प्रतीच्या लोकांइतकें नव्हतें. युरोपांतील खालच्या प्रतीचे लोक वर डोकें

काढूं लागले, याचें कारण त्यांच्या डोक्यावर कमी ओझें असे. परंतु पूर्वोक्त तीन खंडांतील मजूर व वरच्या प्रतीचे लोक यांमध्यें अंतर फार असल्यामुळें तेथील मजूर जुलमानें चेपून गेले होते. त्यांस कोणीही कोणत्या गोष्टींत विचारीत नसे.

---

## भाग ९ वा.

आशिया, आफ्रिका व अमेरिका या खंडांविषयीं विचार करीत असतां, दुसरे भागांत सांगितलेंच आहे कीं, या खंडांत प्रथम जी सुधारणा झाली, ती मुख्यत्वेंकरून हिंदुस्थान, मिसर देश, मेक्सिको व पेरू या देशांत झाली. परंतु ही सुधारणा कोणत्या कारणांमुळें झाली, याविषयीं विचार निराळे भागांत करूं असेंही आह्मीं सांगितलें आहे. आशिया, युरोप, आफ्रिका व अमेरिका या खंडांविषयीं जो स्थूल विचार सांगितला, तो फक्त धनसंचयाचे संबंधानें होता. आतां धनसंचयाविषयींचे सिद्धांत, व धनाचे वांटणीचे संबंधानें ज्या सिद्धांतांचें विवेचन मागें केलें, ते सिद्धांत वरील देशांस कसे लागू पडतात याविषयीं विचार करणें राहिलें आहे. हा विचार या भागांत करण्याचें योजिलें आहे. प्रथम हिंदुस्थानाविषयीं

१–हिंदुस्थान हें नांव केव्हांपासून प्रचारांत आलें असावें हें खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं, तथापि, हें प्राचीन नांव नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. याचीं प्राचीन नांवें भरतखंड व आर्यावर्त हीं प्रसिद्धच आहेत. फार्शी भाषेंतील हिंदु म्हणजे काळा व स्तान म्हणजे देश या शब्दावरून इराणी लोकांनीं हिंदुस्थान नांव दिलें असावें असा कित्येकांचा अभिप्राय आहे. हें नांव देण्याचें कारण कीं हिंदु लोक हे इराणी लोकांपेक्षां काळे होते. कांहीं लोकांचा अभिप्राय असा आहे कीं, सिंधु नदीचे प्रदेशावरून हें नांव सर्व हिंदुस्थान देशास पडलें असावें. परंतु हिंदुस्थान हें नांव उत्तर हिंदुस्थानास मात्र लागू होतें; नर्मदेच्या दक्षिणेस जो प्रदेश आहे त्यास

विचार करूं. नंतर मिसरदेश, मेक्सिको व पेरू यांविषयीं अनुक्रमें विचार करूं. याच चार देशांचीं उदाहरणें घेण्याचें कारण कीं, आशिया खंडांतील देशांपैकीं हिंदुस्थानाविषयीं, आफ्रिकेंतील देशांपैकीं मिसर देशाविषयीं व अमेरिका खंडांतील देशांपैकीं मेक्सिको व पेरू यांविषयीं जशी आपणांस माहिती उपलब्ध आहे, तशी या तीन खंडांतील इतर देशांविषयीं नाहीं. शिवाय, प्राचीन काळीं या तीन खंडांत सृष्टपदार्थविषयक नियमांचे अनुकूलतेमुळें, धनाचा संचय करावयास सांपडून जी सुधारणा झाली ती मुख्यत्वेंकरून या चार पूर्वोक्त देशांत झाली. ज्याप्रमाणें आह्मीं धनसंचयाचे संबंधानें आशिया, आफ्रिका व अमेरिका या खंडांतील निरनिराळे भागांविषयीं विचार केला, त्याप्रमाणें धनाचे वांटणीविषयींही विचार करणें अवश्य आहे. परंतु तसें केलें असतां ग्रंथविस्तार फार होईल. ह्याकरितां वर सांगितलेल्या चार देशांविषयीं हा विचार केला असतां, सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें धनाचे वांटणीचे संबंधानें कशीं कार्यें होतात हें समजण्यास अडचण पडणार नाहीं.

**हिंदुस्थान.**—आशिया खंडांतील देशांपैकीं हिंदुस्थान देश हा जसा प्राचीन कालापासून प्रसिद्धीस आला आहे, तसा दुसरा कोणताही देश प्रसिद्धीस आला नाहीं. हिंदुस्थानाकडे परकीय राष्ट्रांचें जितकें लक्ष्य लागलें होतें तितकें दुसरे कोणतेही राष्ट्राकडे लागलें नव्हतें. हिंदुस्थानाची संपत्ति ही जगभर गाजत होती. हिंदुस्थान देश ही केवळ सुवर्णभूमि व

---

दखन अथवा दक्षिण प्रदेश म्हणत असत. आमचे मतें पहिली कल्पना बरोबर दिसते. कारण दुसऱ्या कल्पनेप्रमाणें अर्थाची ओढाताण करावी लागते, व सिंधुप्रदेश हें नांव फारच प्राचीन कालीं असलें तर असेल.

शोभा व सौंदर्य यांहीं अलंकृत असें पौश्चात्य लोकांस वाटे. आतां, ही कल्पना जरी बरोबर नव्हती, तरी हिंदुस्थान देश हा भूगोलावरील इतर देशांपेक्षां जास्त संपन्न होता, व येथें जास्त लोकवस्ती होती ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु पूर्वोक्त कल्पनेमुळें या देशावर जशीं संकटें ओढवलीं, तशीं दुसरे थोडकेच देशांवर ओढवलीं असतील. याच कल्पनेमुळें या भरतखंडांत राज्यक्रांति अनेकवेळां होऊन देशांतील लोकांस जशा हाल अपेष्टा सोसाव्या लागल्या तशा दुसरे थोडेच देशांस सोसाव्या लागल्या असतील. हिंदुस्थान देश हा फक्त संपत्ति व सुपीकता यांविषयींच प्रख्यात होता असें नाहीं; तर या देशांतील लोकांच्या विशेष चाली, विशेष आचार व विचार, येथील नद्यांची शोभा, येथील उंच व विशाल पर्वत, सुपीक व हिरवींचार मैदानें, रुचकर फळफळावळी, कृत्रिम, सुंदर व सुबक पदार्थ व तसेच भूगर्भांतून सांपडणारे अमोलिक धातु यांहींकरून हें भरतखंड जिज्ञासु लोकांस शोध करावयाचें, चैनी लोकांस आरामाचें, तत्त्ववेत्त्यांस विचाराचें व शिपायांस लूट मिळवून श्रम परिहार करण्याचें फार दिवसांपासून साधन झालेलें आहे.

कोणतेही देशाचे सुधारणेविषयीं यथार्थ विचार करण्यास खरा इतिहास असणें अवश्य होय. असा इतिहास उपलब्ध नसला ह्मणजे, जे सिद्धांत ठरवावयाचे ते बरोबर नसतात; केवळ अनुमान करून निर्वाह करावा लागतो. हिंदुस्थान देशाचा खरा इतिहास उपलब्ध नसल्यामुळें, या देशांतील सुधारणेविषयीं, येथील लोकांचे आचारांविषयीं, त्यांची स्थिति व हेतु यांविषयीं

१–मरेकृत हिंदुस्थानचा इतिहास. पृष्ठ. १८.

२–माल्टीब्रनकृत भूगोल. भाग. २ पृष्ठ. १०८.

निरनिराळे ग्रंथकारांचे निरनिराळे तर्क दिसून येतात; ज्यास जशी लेखणी चालवावीशी वाटली तशी त्यानें चालविली आहे. [1] खरी स्थिति काय होती, हें समजण्यास आज जसें साधन असावें तसें नाहीं. हिंदुस्थानाविषयीं विचार करण्यास इतिहासाचा अभाव ही मोठी उणीव दृष्टीस पडते; व ही विशेषेंकरून प्राचीन कालाविषयीं विचार करितांना फार नडते. भारतभागवतादि पुराणांवरून मुख्यत्वें इतिहासाची व भूगोलाची कांहीं माहिती मिळते. परंतु यांत कवीचे उज्ज्वल कल्पनातरंग असल्यामुळें, हीं साधनें जितकीं भरंवशाचीं असावीं तितकीं नाहींत. या देशाचा इतिहास उपलब्ध नसल्यामुळें, येथील लोकांस इतिहास लिहिणें मुळींच माहीत नव्हतें, असा कित्येक ग्रंथकर्त्यांचा ग्रह होऊन गेला आहे. परंतु ज्या लोकांची बरीच सुधारणा झाली होती, जे शास्त्रें, कलाकौशल्यें, कविता, गायनादि विद्या, यांचा अभ्यास करीत इतकेंच नव्हे, तर, त्यांवर पुष्कळ ग्रंथही लिहीत, या विद्या शिकविण्याविषयीं तजवीज करीत,

---

१–याविषयींचें उत्तम उदाहरण खालीं लिहिलेल्या अवतरणावरून समजून येईलः–आशिया खंडांतील लोक काय करतील व काय करणार नाहींत हें सांगतां येणार नाहीं. त्यांचे अंगीं क्षमा नाहीं. हिंदुस्थानांतील रहिवाशांचे अंगीं हे दुर्गुण तर विशेषेंकरून दृष्टीस पडतात. त्यांस आस्था नाहीं, व त्यांस कोणतीही गोष्ट लक्षपूर्वक पाहण्याची संवय नाहीं. कीन्सफॉल आफ् दी मोगल एम्पायर (मोगल राज्याचा नाश ) पृ. २१

दुसऱ्या एका ग्रंथकाराचें असें मत आहे कीं, ब्राह्मणधर्म हा जगांतील अतिनिकृष्ट धर्मांपैकीं एक आहे. हिंदु लोकांच्या ३३ कोटि देवता आहेत; त्यांच्यांत आपले अवयव छिन्न भिन्न करण्याची वहिवाट आहे; अजारी माणसें पुराबरोबर वाहून जावींत म्हणून ते त्यांस गंगा, नर्मदा व कृष्णा या नद्यांचे कांठीं नेऊन ठेवितात. कार्नवेल कृत भूगोल पृ.२३४.

त्यांचा प्रसार करण्याविषयीं उपाय करीत, त्या लोकांस साधारण गोष्टी लिहिण्यास, व आपले राजांचे गुणावगुण व त्यांहीं केलेलीं कृत्यें, हीं लिहिण्यास माहिती[1] नसावी असें ह्मणतां येत नाहीं. साधारण सुधारलेले लोकांस बखरी लिहिण्याची कला माहीत होती असें आपण पाहतों. हिंदु लोक इतर लोकांपेक्षां जास्त सुधारलेले असून त्यांस ही माहिती नव्हती असें ह्मणण्यास शंका वाटते. बखरी लिहून ठेवण्याची कला माहीत असणें, व बखरी न सांपडणें या दोन गोष्टी भिन्न आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. दिल्लीचा शेवटील हिंदु राजा पृथुराज याचे पदरीं चंद ह्मणून एक भाट होता. त्यानें या राजाचा इतिहास लिहून ठेविला आहे त्यावरून, व अकरावे शतकांत लिहिलेला काश्मीर देशाचा इतिहास आढळतो त्यावरून, इतिहास लिहिण्याची कला हिंदु लोकांस माहीत होती असें ह्मणण्यास आधार आहे. हीं जीं प्रमाणें दिलीं तीं थोडीं व कांहींशीं आधुनिक आहेत हें खरें आहे; तथापि, त्यांवरूनही हिंदु लोकांस इतिहास लिहिण्याची कला माहीत होती किंवा नाहीं याविषयीं कल्पना करितां येईल. आपणास ही एक गोष्ट नेहमीं ध्यानांत टेविली पाहिजे कीं, ज्या कालाविषयीं आपण विचार करीत आहों त्या कालाची स्थिति कशी होती. ही गोष्ट मनांत न आणितां, आपण अभिप्राय द्यावयास लागलों असतां कदाचित् चूक होण्याचा संभव आहे. स्वातंत्र्य व शांतता यांचा नेहमीं उपभोग घेणारांस जुलमानें गांजलेले लोकांची कशी स्थिति असते याची कदाचित् कल्पना करतां येत नसेल. ज्या लोकांस देशभाषेचें अज्ञान; ज्यांचे आचार विचार व धर्म भिन्न; दारिद्र्यांत दिवस काढल्यावर व संपत्ति दृष्टीस पडल्या-

---

१—टाइकृत राजस्थानाचा इतिहास उपोद्घात पृ. ८.

वर, ज्यांचा लोभ जागृत झाला; स्वधर्माची दीक्षा परधर्माचे मनुष्यास देणें महत्पुण्य, असें ज्यांस लहानपणापासून शिक्षण मिळालें होतें अशा लोकांचे सत्तेखालीं जे हिंदु लोक सुमारें आठशें वर्षेपर्यंत गांजून गेले होते; ज्यांचीं शहरें उद्वस्त होऊन गेलीं होतीं; ज्यांचें धन लुटलें गेलें होतें; ज्यांचे ग्रंथांचा नाश होऊन गेला होता; ज्यांच्या राजेरजवाड्यांना आपली राजधानी सोडून आपल्या आयुष्याचे दिवस गिरिकंदरीं, नद्यांचे कांठीं अथवा जंगलांत काढावे लागले; शिजविलेलें अन्न तोंडांत पडतें किंवा नाहीं, याची देखील ज्यांना भ्रांत, अशा लोकांस अशा गडबडीच्या वेळेस ग्रंथ जतन करून ठेवणें कसें सुचावें? व त्या वेळचे व त्या पूर्वीचे इतिहासावरील लेख कसे सांपडावेत? कदाचित् कित्येक ह्मणतील कीं, अलीकडे इंग्रज सरकारचे सहायानें व पाश्चात्य पंडितांचे श्रमानें जर इतर विषयांवरील ग्रंथांचा शोध लागत चालला आहे तर, ऐतिहासिक ग्रंथ कां सांपडूं नयेत? या प्रश्नाचें असें उत्तर आहे कीं, इतर विषयांवर जे ग्रंथ असतात, ते ज्याप्रमाणें राजांजवळ असतात त्याप्रमाणें पंडितांजवळही असतात. परंतु बखरींची गोष्ट तशी नाहीं. त्या राजांचे आज्ञेवरून भाटांनीं अथवा अशा प्रकारच्या दुसरे लोकांनीं लिहिलेल्या असून, त्या बहुतकरून राजांचे संबंधाच्या असतात; व त्या राजांजवळ अथवा त्यांचे सरदार यांजपाशीं असण्याचा विशेष संभव असतो. राजधान्यांचा नाश झाला, त्यांबरोबर या बखरींचाही नाश झाला

१–टाडकृत राजस्थान.

२–बखरींचा नाश झाला असावा, हें हल्लींच्या स्थितीवरूनही मानण्यास कारण आहे. शिवाजी महाराजापासून तों रावबाजीपर्यंत बरेच राज्यकर्ते होऊन गेले. त्यांच्या संबंधाच्या बखरी होत्या हें सर्वांस महशूर

असेल असा संभव आहे; किंवा त्या वाण्याच्या दुकानीं जाऊन नाश पावल्या असतील. पूर्वींच्या कालाविषयीं इतिहास लिहून ठेविलेला होता असें आह्मी खात्रीपूर्वक ह्मणत नाहीं. परंतु हिंदु लोक सुधारलेले होते यावरून, त्यांनीं निरनिराळे विषयांवर ग्रंथ करून ठेविले आहेत यावरून, व पृथुराजाचा व काश्मीरचा इतिहास उपलब्ध आहे ही गोष्ट, व हिंदु लोकांपेक्षां कमी

---

आहे. अज्ञानामुळें अनेक लेख वाण्याच्या घरीं गेले; कांहीं हयगयीमुळें कसरींनीं खाल्ल्याच्या योगानें नाश पावले; कित्येक फाटलेले लेख दृष्टीस पडतात याबद्दलही वाद नाहीं. जर ग्यांड डफ साहेबासारख्या इतिहासप्रिय लोकांनीं, किंवा आमच्यांपैकीं कांहीं शोधक गृहस्थांनीं वेळेवर परिश्रम केले नसते, तर, आजमित्तीस मराठ्यांचा इतिहास किती उपलब्ध असता? पेशवाईनंतर पेशव्यांचें सर्व दफ्तर इंग्रज सरकाराकडे गेलें. इतिहासाची योग्यता किती आहे, हें इंग्रज सरकार सुधारलेलें असल्यामुळें त्यास माहीत आहे; म्हणून हे लेख कायम राहिले; व ग्यांड डफ साहेबासारख्या गृहस्थांच्या द्वारें थोडी तरी माहिती मिळते. ज़र इंग्रज सरकार सुधारलेले नसतें, तर हे लेख कांहीं दिवस कदाचित् कायम असते; परंतु कांहीं कालाने हे जुने पुराणे निरुपयोगी लेख म्हणून अथवा रद्दी समजून फाडून टाकण्यांत आले असते. हल्लीं तरी यांपैकीं किती लेख कायम आहेत हें कोणास माहीत आहे? सध्यां शांतता असल्यामुळें, जुनीं सरदार घराणीं जागेवर कायम आहेत; म्हणून त्यांपाशीं आपणांस बखरी मागतां तरी येतात. परंतु जर हीं घराणीं देशोधडीस लागलीं असतीं, तर, त्यांबरोबर लेखांचीही वाताहात झाली असती हें उघड आहे. सध्यां ज्ञानाचा प्रसार होऊं लागला आहे म्हणून थोडें तरी यश येत आहे. सध्यां ज्या कांहीं अनुकूल गोष्टी आहेत त्या नसत्या तर, मराठ्यांचे इतिहासाचें साधन मिळण्याचा संभव किती असता? या गोष्टी पूर्वीं अनुकूल नसल्यामुळें, पूर्वींचा इतिहास सांपडत नसावा, व बखरी वगैरे लेख राजघराण्यांबरोबर किंवा सरदारांचे घराण्यांबरोबर नाश पावले असावेत हें विशेष संभवतें.

सुधारलेले लोकांस बखरी लिहून ठेवण्याचें माहीत होतें ही गोष्ट मनांत आणितां, हिंदु लोकांस बखरी लिहिण्याची अत्यंत महत्त्वाची गोष्ट माहीत नव्हती, हें ह्मणणें अंमळ चमत्कारिक दिसतें.

एका[1] ग्रंथकाराची इतकी कल्पना धांवली आहे कीं, पूर्वीचा इतिहास लिहून ठेविलेला नसेल, किंवा ज्या वेळेस ब्राह्मणांची सत्ता चालेना, त्या वेळेस पूर्वीचे युगांची आठवण राहूं नये ह्मणून, ब्राह्मणांनींच बखरींचा नाश केला असेल!!! या कल्पनेस काय आधार असेल तो ग्रंथकर्त्यासच माहीत. या ग्रंथकाराप्रमाणेंच कदाचित् दुसऱ्यांचे तर्क असतील, असें आह्मांस प्रथम वाटलें होतें; परंतु असा दुसऱ्या कोणाचाही तर्क धांवला नाहीं ही आनंदाची गोष्ट होय. ब्राह्मण व बौद्ध धर्मानुयायी यांचें फार हाडवैर होतें; बौद्धपंथीयांस ब्राह्मण नास्तिक असें मानीत; कारण, वेद हा ईश्वरप्रणीत नाहीं असें बौद्धपंथीयांचें मत होतें; ते जातिभेद मुळींच मानीत नसत. नास्तिकांचे ग्रंथ ह्मणून जर ब्राह्मणांनीं बौद्ध राजांचे बखरींचा नाश केला असेल तर सांगवत नाहीं. परंतु यासही कोठें आधार मिळत नाहीं; व ही गोष्ट संभवत नाहीं. ब्राह्मण हे विद्याप्रिय होते; ते ग्रंथांचा नाश करतील हें प्रत्यक्ष प्रमाण नसतां खरें मानणें अविचाराचें आहे. दुसरें असें कीं, बौद्धपंथीय हे कोणी सायबेरियांतून अथवा हबसाणचे प्रदेशांतून आलेले होते असें नाहीं. ब्राह्मण व बौद्धपंथीय यांचा देश एक, भाषा एक व पूर्वज एक, अशी स्थिति होती; उभयतांचीं धर्मसंबंधीं मतें व त्यामुळें आचारविचार मात्र भिन्न होते. जर उभयतांचे पूर्वज एकच होते, तर, ब्राह्मण आपले पूर्वजांचे ग्रंथांचा नाश करण्यास प्रवृत्त होतील हें संभवत नाहीं. अली-

१–पिंकरटनकृत भूगोल. पृ. ४२०.

कडे प्राचीन गोष्टींचा जो शोध चालू आहे, त्यावरून पुष्कळ गोष्टींविषयीं माहिती मिळाली आहे. या माहितीवरून असें समजतें कीं, सातवे शतकाचे प्रारंभीं हिंदुस्थानांत लहान मोठीं ८३ संस्थानें होतीं. कांहींत ब्राह्मणांचें प्राबल्य व कांहींत बौद्धांचें. या संस्थानांमध्यें नेहमीं लढाया चालत. कांहींचे मतें या लढाया धर्माचे कारणावरून न चालतां, राज्यविस्तार करण्याचे हेतूनें चालत. या लढाया राज्यविस्तार करण्याचे हेतूनें चालू असत असें जरी मानिलें, तरी ब्राह्मण व बौद्धपंथीय हे उभयतां सुधारलेले असल्यामुळें, रानटी लोकांप्रमाणें परस्परांचे ग्रंथांचा नाश करण्यास उद्युक्त होतील असें मानितां येत नाहीं. असो. पुराणादि ग्रंथांत जरी अतिशयोक्ति आहे, तरी, त्यांवरून प्राचीन कालाचे स्थितीविषयीं कांहीं माहिती मिळते. शिवाय या देशाशीं पर राष्ट्रांचा कांहीं दिवस संबंध होता. सेल्युकसचा[१] वकील मिग्यासथनीज हा चंद्रगुप्ताचे दरबारीं बरेच दिवस होता. त्यानें जी माहिती मिळविली ती, व यानंतर दुसरे ग्रीक व रोमन ग्रंथकार, विशेषेंकरून, स्ट्रेबो, आरियन व प्लिनी यांनीं हिंदुस्थानाचे स्थितीविषयीं जी माहिती प्रसिद्ध केली तिजवरून, हिंदुस्थानचे प्राचीन स्थितीविषयीं बराच खुलासा होतो. शिवाय प्राचीनस्थितिशोधकांचे परिश्रमानें जीं नाणीं, शिलालेख व ताम्रपट हीं सांपडलीं आहेत, त्यांवरून हिंदुस्थानचे प्राचीन स्थितीचें दिग्दर्शन होतें.

---

१–शिकंदर बादशहाचे मरणानंतर त्याचा सैनिक सेल्यूकस याचे वांट्यास ब्याक्ट्रियाचें राज्य आल्यावर, त्यानें चंद्रगुप्त राजावर चाल केली; व त्याजबरोबर ख्रि. पू. ३१२ त तह केला. त्यानें चंद्रगुप्ताला आपली मुलगी दिली; व मिग्यासथनीज याला राजाचे दरबारीं वकील ठेविलें.

हिंदुस्थानचे प्राचीन इतिहासाचीं हीं जीं निरनिराळीं साधनें, त्यांवरून आपणांस असें समजतें कीं आर्य हे चांगले सुधारलेले होते. हिंदुस्थान देश हा सुधारलेला होता याविषयीं आतां वाद नाहीं. परंतु सुधारणेचें मान व प्रथमत्व यांविषयीं बराच मतभेद आहे. हिंदु लोकांची सुधारणा साधारण होती असें ज्यांचें ह्मणणें आहे, ते युरोपांत १९ वे शतकाचे आरंभीं जें सुधारणेचें मान होतें, तें मनांत आणून कदाचित् ह्मणत असतील असें दिसतें. परंतु युरोप खंडांतील सुधारणा ज्या स्थितीस येऊन पोंचली आहे, ती, व हिंदुस्थानाची पूर्वींची सुधारणा, यांमध्यें तुलना करणें हें केवळ अविचाराचें आहे असें आह्मांस वाटतें. कारण, हिंदुस्थानाची पूर्वींची सुधारणा, व युरोपांतील हल्लींची सुधारणा यांमध्यें फारच काल लोटला आहे; हिंदुस्थानांतील सुधारणा ही स्वतःसिद्ध बनलेली आहे; तीस अन्य देशाची बिलकूल मदत नव्हती. जर अन्य देशाची मदत असती, तर, सुधारणेचा जो प्रकार दृष्टीस पडला, त्याहून भिन्न प्रकार दृष्टीस पडला असता यांत संशय नाहीं. अन्य देशाची मदत नसल्यामुळें, सुधारणेस उत्तम वळण मिळालें नाहीं. एखाद्या वृक्षाच्या फांद्या वगैरे न छाटतां, त्यास तसें वाढूं दिलें तर, ज्याप्रमाणें तो अस्ताव्यस्त वाढत जातो, त्याप्रमाणें हिंदु सुधारणेची गोष्ट होय. ही सुधारणा स्वतःसिद्ध असल्यामुळें, तींत कृत्रिम वैचित्र्याची शोभा जितकी असावी तितकी दिसून येत नाहीं. युरोपांतील कोणतेही देशाची सुधारणा ही स्वतःसिद्ध बनलेली नाहीं. ती ग्रीस, इटली, इंग्लंड, फ्रान्स, व जर्मनी या देशांतील सुधारणेचे व अरब व हिंदु लोकांच्या सुधारणेचे जे निरनिराळे प्रकार ते मिळून एक

---

१—विलसनकृत हिंदुजातीभेद. भा. १. पृ. २०२

२—एलफिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास. पृ. ५३.

संयुक्त फल झालेलें आहे. या सुधारणेस अनेक राष्ट्रांनीं मदत केल्यामुळें, ती प्रस्तुतचे स्थितीस येऊन पोंहोंचली आहे. आह्मीं हे जे विचार सुचविले, त्यांवरून युरोपांतील हल्लींची सुधारणा, व हिंदुस्थानांतील पूर्वींची सुधारणा यांमध्यें साम्य नाहीं हें उघड आहे. जर दोन सुधारणांत कोणतेही प्रकारचें साम्य दिसून येत नाहीं, तर त्यांमध्यें तुलना करून मत देणें हें बरोबर नाहीं. दुसरें असें कीं, हिंदु लोकांचे सुधारणेंत फारसा अर्थ नाहीं, असें ह्मणणारे ग्रंथकार इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वीं, निकृष्टावस्था पावलेले जे अर्वाचीन हिंदु लोक, त्यांवरून प्राचीन हिंदु सुधारणेविषयीं व हिंदु लोकांविषयीं मत देतात, हें आमच्या मतें न्याय्य नाहीं. कारण, आठशें वर्षें ज्यांनीं दास्य भोगिलें, जे जुलमानें गांजले होते, ज्यांचे धर्माचा नेहमीं छल होत असे, त्यांचे स्थितींत, धर्मांत व आचारांत बदल होणार नाहीं काय? जर बदल होणार आहे, तर, अर्वाचीन हिंदु लोकांवरून त्यांचे पूर्वजांविषयीं मत देणें हें अविचाराचें होणार नाहीं काय?

प्राचीन काळचे हिंदुस्थानचे सुधारणेविषयीं विचार करणें तें, समकालीन जे दुसरे सुधारलेले देश होते, त्यांसच उद्देशून करणें, हें विशेष न्याय्य आहे. असें केलें असतां हिंदु सुधारणेचें मान कितपत होतें, हें आपणांस चांगलें समजणार आहे. समकालीन सुधारणांविषयीं विचार करीत असतां, आपणांस दिसून येतें कीं, हिंदु लोकांची चांगली सुधारणा झाली होती. प्रसिद्ध प्रोफेसर उइल्सन् यांचा असा अभिप्राय आहे कीं, "हिंदु लोकांच्या रीतीभातींमुळें, व परकीय राष्ट्रांचे सत्तेखालीं ते असल्यामुळें, ख्रिस्ती शकापूर्वीं ३०० वर्षें त्यांची जी स्थिति होती, तीच साधारण पुढेंही होती. दोन हजार वर्षें लोटलीं तथापि, त्यांना कांहीं फायदा

झाला नाहीं. जो फायदा झाला तो आमचाच झाला. याकरितां प्राचीन कालचे समकालीन जे दुसरे लोक त्यांची, व हिंदु लोकांची तुलना करणें हें योग्य आहे; व असें केलें असतां त्यावेळचे राष्ट्रांत यांचें पाऊल सुधारणेंत पुढें होतें असें मानण्यास कारण आहे. प्राचीन कालीं इतर ठिकाणच्या लोकांमध्यें जे धर्मप्रकार चालू होते, त्यांपेक्षां हिंदु लोकांचे धर्मांत मूर्तिपूजा ही कमी होती. त्यांचा राज्यव्यवस्थेचा प्रकार हा जरी जुलमाचा होता, तरी, कायद्यावरून, चालीवरून व धर्मावरून त्याचें नियमन झालें होतें. त्यांचे कायदे हे बहुतांशीं शहाणपणाचे व विचाराचे असून जगांतील नानाप्रकारचे व्यवहारसंबंधांस लागू पडण्यासारखे होते. सामाजिक स्थितीची बरीच सुधारणा झाल्याशिवाय हे संबंध कधींही दृष्टीस पडणार नाहींत. त्यांची भाषा प्रौढ होती. तींत ग्रंथ बरेच असून ते निरनिराळे विषयांवर होते. गणितशास्त्रांत त्यांचें पुष्कळ अध्ययन झालें होतें. मनुष्य व सृष्टि यांचे संबंधाच्या ज्या गूढ गोष्टी, त्यांविषयीं ते गहन विचार करीत. शोभेच्या व उपयुक्त कलांत त्यांचें वाखाणण्याजोगें नैपुण्य होतें. अर्वाचीन युरोपांत सुधारणेचे जे प्रकार दृष्टीस पडतात, त्यांशीं तुलना करून पाहतां, त्यांचे धर्मांत, त्यांचे राज्यव्यवस्थेंत, त्यांचे कायद्यांत, त्यांचे ग्रंथांत, त्यांचे शास्त्रांत, त्यांचे कलाकौशल्याचे कामांत, जरी कांहीं व्यंगें दृष्टीस पडलीं, तरी तुलना करावयाचीं जीं साधनें आहेत, त्यांवरून पाहतां, प्राचीन कालचे सुधारलेले राष्ट्रांपैकीं ज्या राष्ट्रांची जास्त सुधारणा झाली होती, त्या राष्ट्रांप्रमाणें हिंदु लोकांची सुधारणा या पूर्वोक्त गोष्टींत झाली होती, व ही सुधारणा, ज्या प्राचीन कालाविषयीं कांहीं लेख व दंतकथा हीं उपलब्ध आहेत, त्या कालीं होती, याविषयीं कोणताही निःपक्षपाती मनुष्य वाद

करणार नाहीं." या अभिप्रायावरून हिंदु लोकांची सुधारणा कशी होती हिचें सहज अनुमान होईल.

ज्याप्रमाणें इतर कांहीं लोक ह्मणतात कीं, आह्मी फार जुने व आमची सुधारणा प्रथमची, त्याप्रमाणें आमचे लोकही ह्मणतात. ज्याच्या त्याच्या कांहीं दंतकथा आहेतच. [१]अथीनियन लोक ह्मणतात कीं, आह्मी चंद्राचेही अगोदरचे आहों. आर्के-डियन लोकही आपणांस चंद्रापेक्षां जुने समजत. लासिडि-मन लोक आपणांस पृथ्वीपुत्र मानीत. फ्रिजिअन लोक अ-गोदरचे आहेत अशी मिसर देशाचा राजा सामेटिकस हा मि-सरदेशीयांची खात्री करीपर्यंत, मिसरदेशीय लोक आपण जगांतील सर्व लोकांपेक्षां जुने आहों असें समजत. क्याल्डि-यन लोक १५ हजार वर्षेपर्यंत आपला इतिहास सांगतात. ब्रह्म देशाचे लोक ह्मणतात कीं, तीन वर्षांत जितके पावसाचे थेंब पृ-थ्वीवर पडतात, तितक्या वर्षांपूर्वीचे आह्मीं आहों. हिंदु लोकांचा काल तर अनादि आहे. तात्पर्य प्राचीन काळचे प्रत्येक राष्ट्रास वाटतें कीं, ईश्वरानें आपणास प्रथम निमार्ण केलें व आपण सर्वांहून जुने आहों. जगांतील प्राचीन राष्ट्रांपैकीं हिंदु राष्ट्र हें एक होय, ही गोष्ट निर्विवाद आहे; असें आमचेंच मत आहे असें नाहीं; तर परदेशीय[२] लोकही ही गोष्ट कबूल क-रितात. प्राचीन काळीं हिंदु लोक सुधारले होते किंवा नाहीं, व त्यांची सुधारणा सामान्य होती किंवा चांगल्या प्रकारची होती, या प्रश्नाविषयीं विचार करितां, हिंदु लोक प्राचीन काळीं सुधारलेले होते इतकेंच नाहीं, तर, त्यांची सुधारणा चां[३]गल्या

१—मार्शमनकृत हिंदुस्थानचा इतिहास. पृ. २ व ३

२—थार्नटनकृत हिंदुस्थानचा इतिहास. पृ. २

—थामस मारिसकृत हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास पृ. २

३—पोपकृत हिंदुस्थानचा इतिहास. पृ. ३९.

प्रकारची होती असें आपणास कळून येतें. ज्या वेळेस युरोप खंड निबिड आज्ञानांधःकारांत होतें, त्यावेळेस[१] हिंदुस्थान हें सुधारणेचें पीठ होतें. तेथील रहिवाशी उत्तम व सुबक पदार्थ कृतीनें तयार करूं लागले होते. त्यांच्यांत शरीर व वित्त यांचे संरक्षणाविषयीं नियम[२] होते, व ते अमलांत आणण्याविषयीं तजवीजही करीत. हिंदुस्थानांत निरनिराळे प्रकारचीं धान्यें, मसाले व सुगंधी पदार्थ तयार होऊं लागले होते. शत्रूबरोबर[३]

---

१–मेडोज टेलरकृत हिंदुस्थानचा इतिहास. उपोद्घात. पृ. ९

२–जीवित व वित्त यांचे रक्षणाविषयीं आर्य लोक पूर्वी काळजी घेत असत किंवा नसत, हें पुढील अवतरणावरून दिसून येईल:—

यथोद्धरति निर्दाता कक्षं धान्यं च रक्षति ॥
तथा रक्षेन्नृपो राष्ट्रं हन्याच्च परिपंथिनः ॥ ११० ॥
राज्ञो हि रक्षाधिकृताः परस्वादायिनः शठाः ॥
भृत्या भवंति प्रायेण तेभ्यो रक्षेदिमाः प्रजाः ॥ १२३ ॥

मनुस्मृति. अ. ७.

या संबंधानें अ. ७ श्लोक ११४, ११५, ११६, ११७, व १२२ पहा.

३–युद्धांत जे नियम योद्ध्यांनीं पाळिले पाहिजेत, म्हणून मनूनें सांगितलें आहे, ते नियम किती न्याय्य आहेत, हें खालीं दिलेल्या अवतरणावरून कळून येईल.

न कूटैरायुधैर्हन्याद्युध्यमानो रणे रिपून् ॥
न कर्णिभिर्नापि दिग्धैर्नाग्निज्वलिततेजनैः ॥ ९० ॥
न च हन्यात्स्थलारूढं न क्लीबं न कृतांजलिम् ॥
न मुक्तकेशं नासीनं न तवास्मीति वादिनम् ॥ ९१ ॥
न सुप्तं न विसन्नाहं न नग्नं न निरायुधम् ॥
नायुद्ध्यमानं पश्यंतं न परेण समागतम् ॥ ९२ ॥
नायुधव्यसनप्राप्तं नार्तं नातिपरिक्षतम् ॥
न भीतं न परावृत्तं सतां धर्ममनुस्मरन् ॥ ९३ ॥

मनु. अध्याय ७.

त्यांचें वर्तन विशेष दयाळूपणाचें असे. त्यांनीं निरनिराळ्या शास्त्रांचें बरेंच अध्ययन केलें होतें, व ईश्वराचें अस्तित्व व त्याचें स्वरूप यांविषयीं त्यांस जशी माहिती होती, तशी माहिती अथेन्स येथील उत्तम तत्त्ववेत्त्यांस देखील[1] नव्हती. नील नदीच्या पाण्यानें भिजलेल्या प्रदेशावर मिसर देशीय राजांनीं मनोरे बांधण्यापूर्वी, अथवा युरोपांतील सुधारणेचीं आद्यपीठें, जे ग्रीस व इटाली देश, ते रानटी लोकांचीं वसतिस्थानें असतां, हिंदुस्थान देश हा संपत्ति व शोभा यांचें भांडार[2] होतें. ज्या ठिकाणीं खिस्ती शकापूर्वीं बरींच वर्षें, लोक उपयुक्त व चैनीच्या कला यांचा उपयोग करूं लागले होते, ज्या ठिकाणीं शारीर श्रमाचा परिहार होण्यासाठीं विश्रांति व्यावयास सांपडे, व विषयोपभोगाचे तडाक्यांतून निसटून विद्येकडे लक्ष पुरविण्यास सवड सांपडे, ज्या ठिकाणीं मनुष्याचे कृतीनें जमिनीवर बराच बदल झालेला होता, शेतकऱ्यांस श्रमाबद्दल चांगलें पीक मिळत असे, कारागीर लोक ओबड धोबड व कच्च्या मालाचे सुंदर व नाजुक पदार्थ तयार करूं लागले होते, ते पदार्थ हल्लीं यंत्रादिक साधनें असतांही, इतर लोकांस तयार करण्यास[3] मारामार पडते, ज्या ठिकाणीं शिल्पकार व खोदींव काम करणारे, शेंकडों वर्षें पाऊस व वारा यांस न जुमानणाऱ्या अशा इमारती बांधूं लागले होते, व कोणत्याही गोष्टीची उणीव पडूं नये ह्मणून, ज्या ठिकाणीं व्यासवाल्मिकांसारखे महाकवि आपले रसाळ वाणीनें पूर्वजांचे गुणानुवाद गाऊं लागले होते, व जैमिनीसारखे तत्त्ववेत्ते गहन विषयांवर असे ग्रंथ लिहीत कीं, ज्या ग्रंथांतील

१—एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास पृ. ५२

२—थार्नटनकृत हिंदुस्थानचा इतिहास पृ. ३

३—आईसकृत हिंदुस्थानचा इतिहास. पृ. ६६

कित्येक विचार अद्याप ग्राह्य आहेत; जी गोष्ट डिकार्टिज व लिबनिटज यांना ख्रिस्ती शकानंतर १६ वे शतकांत खात्रीपूर्वक सांगतां आली, जी गोष्ट अतिशय सूक्ष्म अनुमानाअंतीं न्यूटन ह्याला नाकबूल करितां आली नाहीं, ती गोष्ट कपिलानें ख्रिस्ती शकापूर्वीं सुमारें आठशें वर्षें स्पष्टपणें सिद्ध केली, असे ज्या ठिकाणीं कल्पक विद्वन्मणी निपजत, त्या ठिकाणची सुधारणा नादान होती, असें समजून नाक मुरडणें अविचाराचें आहे. हस्तिनापूर व इंद्रप्रस्थ, अनलवाडा व सोमनाथ, राजगृह व पाटलिपुत्र हीं शहरें व दिल्ली व चितूर येथील विजयप्रदर्शक कमानी, यांवरून व निरनिरळ्या रंगांचीं व निरनिरळ्या प्रकारच्चीं रेशमी वस्त्रें, शालजोड्या, सत्रंज्या, रुमाल, झगे व जरतारीकामें यांवरून कारागीर लोक कसबी होते असें होत नाहीं काय? जे [3]परदेशस्थ व्यापारी जीवावरच्या सफरी

१–थामसनकृत भगवद्गीतेचें भाषांतर. उपोद्घात. पृ. ८०

२–आकाश आहे तरी काय या संबंधाचा शोध.

३–हिंदुस्थानचा व्यापार आपल्या हातीं असावा असें परकीय लोकांस वाटत असे. या देशाशीं प्रथम दळणवळण मिसर देशीयांचें असल्यामुळें, व्यापाराचा फायदा प्रथम त्यांस होऊं लागला. मिसर देश हा पूर्व व पश्चिम यांमध्यें २५० वर्षेपर्यंत व्यापाराचें स्थान होतें. सिरियन लोक आक्सस व कास्पियनचे मार्गानें व्यापाराच्या जिनसा नेत.

मिसर देश रोमन लोकांचे हातीं आल्यावर, म्हणजे आगस्टस् बादशहाचे कारकीर्दींत, रोमन लोकांस मिसर देशाची खरी योग्यता समजून येऊं लागली व त्यांस व्यापाराचा फायदा होऊं लागला. ते मसाले, मोतीं, रेशिम वगैरे जिनसा हिंदुस्थानांतून आणीत. कांहीं काल लोटल्यावर, सारासिन लोकांनीं मिसर देश काबीज केल्यावर अर्थात् व्यापाराचें काम त्यांकडे आलें. मुसलमान लोक हिंदुस्थानांत राज्य स्थापन करीत असतां, व्हेनिस व जिनोआ येथील लोक युरोपांतील राष्ट्रां-

करून या जिनसा पैदा करण्याविषयीं झटत व परदेशस्थ लोक उत्सवाचे दिवशीं मोठ्या आवडीनें त्यांचा उपयोग करीत, ते वेडेगोळे ह्मणून करीत ? मगध राजांचे कारकीर्दीत या देशांत व परदेशांत व्यापार झपाट्यानें चालू होता. हिंदी महासागराचे आजूबाजूचे जे प्रदेश त्यांबरोबर व्यापार चाले. पाटलीपुत्र ( पाटना ) शहरापासून तों सिंधु नदापर्यंत, व पाटलीपुत्रापासून भडोचपर्यंत राजमार्ग होता. विद्येची अभिवृद्धि करण्याविषयीं व साधारण लोकांत ज्ञानाचा प्रसार करण्याविषयीं एतद्देशीय भाषेंत ग्रंथ तयार करण्याकरितां मगध राजे विद्वान लोकांस उत्तेजन देत; यावरून ज्या प्रकारची सुधारणा असावी त्या प्रकारची होत होती असें सिद्ध होत नाहीं काय ?

आज हिंदु लोकांविषयीं परद्वीपस्थ लोकांचा जो वाईट ग्रह झाला आहे, त्याचें श्रेय मुख्यत्वें मिल साहेबांस दिलें असतां फारशी चूक होणार नाहीं असें आह्मांस वाटतें. हे मिल साहेब अर्थशास्त्र व तर्कशास्त्र यांचे कर्ते व स्त्रीस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते जगमान्य मिल साहेब नव्हत; तर त्यांचे वडील जेम्स मिल हे होत. यांनीं हिंदुस्थानचा इतिहास या नांवाचा ग्रंथ केला आहे; तो सनदी नोकरीचे उमेदवार वाचतात, व त्यांतच त्यांची परीक्षा

---

स हिंदुस्थानांतील जिनसा पुरवीत. परंतु त्यांस फार वांकड्या मार्गानें जिनसा मिळत, म्हणून ते त्या फार महाग विकीत. ज्या वेळेस केप ऑफ् गुड होप ह्यावरून पोर्तुगीस लोकांस मार्ग सांपडला, त्या वेळेस लिसबन हें व्यापाराचें मोठें स्थान बनलें. हल्लीं या हिंदुस्थान देशाची सर्व सत्ता इंग्रज लोकांकडे आल्यामुळें व्यापाराचें सर्व सूत्र इंग्लिश व्यापाऱ्यांच्या हातीं आहे. दरसाल जी कोट्यवधि रुपयांची घडामोड होते ती मुख्यत्वेंकरून या व्यापाऱ्यां मार्फत होते. आज काल लंदन शहर लंका आहे असें म्हटलें असतां चालेल.

१–मार्शमनकृत हिंदुस्थानचा इतिहास पृ. ५१.

घेतात. हे उमेदवार या देशावर राज्यकारभार करण्यास येतात; तेव्हां त्यांचा प्रथम ग्रह ग्रंथकाराप्रमाणें असणार हें उघड आहे. मिल साहेबांचे ग्रंथास ड्युबाई, आर्म, बुशेनन, वार्ड प्रभृति गृहस्थांचे लेख आधार होत. वस्तुतः हे गृहस्थ अगदींच सामान्य प्रतीचे असून निःपक्षपाती नसावे असें दिसतें. बरें मिल साहेबांनीं वरील गृहस्थांचे लेखांपैकीं जेवढें वाईट तेवढें घेतलें आहे. त्यांस हिंदुसुधारणेमध्यें कांहींच चांगलें दिसलें नाहीं ही चमत्कारिक गोष्ट आहे. मिल साहेबांच्या अभिप्रायाचा एक मासला आह्मी या ठिकाणीं देतों, त्यावरून या साहेबांची कल्पनाशक्ति कशा प्रकारची आहे हें समजेल. हे साहेब ह्मणतात कीं:—'ब्राह्मण हे लबाडी व ठकबाजी यांनीं पूर्ण भरलेले आहेत.' आपण ब्राह्मणांना प्रस्तुत एकीकडे ठेऊं, व एकंदर हिंदूंविषयीं साहेब काय ह्मणतात हें पाहूं. मिल साहेब ह्मणतात कीं, जेव्हां हिंदु लोकांस धैर्यानें सूड उगवितां येत नाहीं, तेव्हां ते लागलींच कोर्टाचा रस्ता धरतात; याच कारणावरून ते भांडखोर व कज्जेदलाल आहेत.

कित्येक लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, ज्या मानानें लोक न्याय मिळण्यासाठीं कोर्टाचा रस्ता पाहतात त्या मानानें त्यांची कमी किंवा जास्ती सुधारणा आहे असें समजावें; कारण पुष्कळ फिर्यादी होणें हें भांडखोरपणाचें लक्षण नसून, लोकांस आपले हक्क कळूं लागले आहेत याविषयींचें दर्शक आहे. या समजुतीप्रमाणें पाहतां, हिंदु लोकांस दोष न देतां उलट त्यांची स्तुति करणें योग्य आहे; परंतु हिंदु लोकांस चांगलें ह्मणणें ह्मणजे प्रमाद करणें होय असें साहेबांस वाटत असावेंसें दिसतें. असो. वरील समजूत चुकीची समजून ती एकीकडे ठेवूं; व खरी

---

१—मिलकृत हिंदुस्थानचा इतिहास. व्हा. १ पृ. ३२९

स्थिति काय होती याविषयीं विचार करूं. मद्रासचे प्रसिद्ध गव्हरनर सर थामस मनरो यांचा असा अभिप्राय आहे कीं, हिंदु लोकांची खरी स्थिति पाहण्याचे मला अनेक वेळां प्रसंग आले व ते भांडखोर नाहींत याविषयीं माझी खात्री आहे.

मनूनें असें सांगितलें आहे कीं, राजानें[1] आपण होऊन ऋणादिक वाद, फिर्याद वगैरे उपस्थित करवूं नये इतकेंच नाहीं, तर त्याच्या हाताखालच्या लोकांनींही करवूं नये; आणि दुसऱ्यानें केलेली फिर्याद कधींही बुडवूं नये.

हिंदु लोक कलहप्रिय असतील, परंतु ते इतर राष्ट्रांतील लोकांपेक्षां जास्त आहेत काय ? जर असे आहेत तर ते दोषास पात्र आहेत.

इतर देशांतील फिर्यादीचें मान अथवा गुन्ह्यांची संख्या हीं या देशापेक्षां कांहींशीं जास्ती आहेत, परंतु कमी नाहींत; मग हिंदु लोकांसच दोष कां द्यावा हें आह्मास समजत नाहीं. जर फिर्यादी विशेष होऊन लोक भांडखोर बनले असतील तर ते पूर्वी विशेष नसून अलीकडे बनले आहेत. पूर्वी आपसांत पंचमार्फत निकाल करवून घेण्याविषयीं विशेष वहिवाट असे. हल्लीं देखील ब्राह्मणांशिवाय इतर बहुतेक जातींचे लोकांमध्यें जातीच्या प्रकरणाचा निकाल पंच करितात. अशी स्थिति असतां मिल साहेबांनीं जो सर्व राष्ट्रास दोष लाविला आहे तो अविचाराचा आहे. यावरून सर्व हिंदु लोक साधु आहेत असें प्रतिपादन करण्याचा आमचा हेतु आहे असें कोणीं समजूं नये. कांहीं भांडखोर होते, कांहीं आहेत व कांहीं असावयाचेच; परंतु या गोष्टी-

१ नोत्पादयेत्स्वयं कार्यं राजा नाप्यस्य पूरुषः ॥
न च प्रापितमन्येन ग्रसेदर्थं कथंचन ॥
मनुः अ. ८ श्लोक ४३

वरून सर्व राष्ट्रास दोष देणें अविचाराचें आहे. मिल साहेबांच्या लक्षांत एक गोष्ट आली असती तर, त्यांचे हातून वरील प्रमाद घडला नसता. ती गोष्ट ही कीं, इंग्रजी अमलांत न्याय चांगला होऊं लागला ह्मणून लोक कोर्टांचा रस्ता धरूं लागले. मुसलमानी अंमल जाऊन इंग्रज लोकांचा अंमल सुरू झाला; मुसलमानी राज्यास उतरती कळा लागली तेव्हां, बेबंदशाही माजून न्यायान्यायाचा विचार पैशाशिवाय होत नसे; इंग्रज लोकांनीं सर्व घोटाळा मोडून शाळा, कोडतें वगैरे स्थापन केलीं. शाळांपासून उपयोग आहे असें लोकांस समजून आल्यावरून ते आपल्या मुलांस शिक्षण देऊं लागले; कोडतांत योग्य न्याय लवकर मिळून तादृश खर्च पडत नाहीं हें अनुभवास येऊं[1] लागल्यामुळें ते फिर्यादी करूं लागले. यांत लोकांचा दोष नसतां उलट इंग्रज लोकांस अभिमान वाळगण्यास कारण आहे; कारण इंग्रजी न्यायावर लोकांचा विशेष भरंवसा आहे असें होतें; परंतु इतका खोल विचार करावयाचाच नाहीं असा मिल साहेबांनीं निश्चय केला होता.

हिंदुसुधारणेविषयीं विचार करतांना मिल साहेबांनीं प्राचीन हिंदु ह्मणजे महमुद गिझनी यानें स्वारी करण्यापूर्वीचे, व मुसलमानी अंमल सुरू झाल्यावरचे हिंदु, असा भेद न मानतां सरसकट सर्वांस लबाड असा दोष दिला आहे; व हिंदु लोकांस न्यायान्यायाचें कांहींच वाटत नाहीं असें ह्मटलें आहे. परंतु ग्रीक, चिनी, इराणी व अरबी ग्रंथकारांचे जे लेख या देशाविषयीं प्रसिद्ध झाले आहेत, त्यांत हिंदु लोकांचे खरेपणाबद्दल व न्यायाबद्दल प्रथम फार तारीफ केलेली आहे.

---

१—मोक्षमुलर साहेबांनीं हिंदुस्थानापासून आपणांस काय शिक्षण मिळेल या विषयावर दिलेलीं व्याख्यानें. पृ. ५४.

आर्ट्याक्झर्सीज नेमन याचा ग्रीक वैद्य टिसियस यानें हिंदु लोकांचे न्यायाविषयीं स्वतंत्र भागांत वर्णन केलें आहे.

पाटलीपुत्र ज्यास हल्लीं पाटना असें ह्मणतात, तेथें चंद्रगुप्ताचे दरबारीं मिग्यासथनीस ह्मणून वकील होता; त्याचें असें ह्मणणें आहे कीं, हिंदु लोकांत चोऱ्या क्वचित् दृष्टीस पडतात; ते सत्य बोलणें महत्पुण्य समजतात.

आरिअन हा दुसरे शतकांत लिहितांना असें ह्मणतो कीं, ज्यांकडे देखरेख करण्याचें काम आहे त्यांनीं राजास खोटा मजकुर कळविणें हें देशवहिवाटीविरुद्ध आहे; हिंदु लबाडीच्या गुन्ह्यांत सांपडलेला दृष्टीस पडत नाहीं असें ह्मटलें तरी चालेल.

चिनी लोकांपैकीं फार प्रसिद्ध प्रवाशी ह्यूएन संग हा सातवे शतकांत हिंदुस्थानांत आला होता; त्याचें असें मत आहे कीं, जरी हिंदु लोकांचा स्वभाव गमती आहे, तरी त्यांचें वर्तन सरळ व प्रामाणिकपणाचें आहे; ते अन्यायानें पैसा हरण करीत नाहींत; त्यांच्या राज्यव्यवस्थेंत सरळपणा हा विशेष गुण दृष्टीस पडतो.

मुसलमान लोकांपैकीं इद्रिस या नांवाचे गृहस्थानें अकरावे शतकांत भूगोल ग्रंथ केला आहे; त्यांत तो ह्मणतो कीं, विश्वासुकपणा, प्रामाणिकपणा व जें वचन दिलें असेल तें पाळण्याविषयीं दक्षता या गुणांबद्दल हिंदु लोकांची इतकी प्रसिद्धी आहे कीं, परकी लोक चोहोंकडून त्यांचे देशांत येतात.

प्रसिद्ध प्रवाशी मार्कोपोलो यानें तेरावे शतकांत ठिक ठिकाणीं प्रवास केला; त्याचें मत असें आहे कीं, आब्रामण ( ब्राह्मण ) हे उत्तम व सचोटीनें व्यापार करणारे आहेत; ते कांहीं झालें तरी खोटें भाषण करीत नाहींत.

अकबर बादशहाचा प्रधान आबुल फाझल हा सोळावे शत-

कांत होऊन गेला; ह्यानें ऐन अकबारी ह्या नांवाचे ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं:—'हिंदु लोक धार्मिक, आनंदी व न्यायावर प्रीति करणारे आहेत; ते कामांत हुशार असून सत्यावर प्रीतिक-रणारे आहेत; ते कृतज्ञ असून विश्वासुक आहेत; त्यांच्या शिपा-यांस लढाईतून पळून जाणें हें माहीत नाहीं.'

अशा प्रकारें एकामागून एक अशा पुष्कळ परकीय गृहस्थां-चे अभिप्राय देतां येतील; परंतु ते सर्व देण्याचें कारण नाहीं. वर जे अभिप्राय दिले आहेत त्यांवरून, व प्राचीन ग्रंथांवरून हें उघड दिसेल कीं मिल साहेबांनीं सर्व राष्ट्रावर जो आरोप आणिला आहे तो चुकीचा आहे. वेदकालांत लोकांची सत्या-विषयीं किती अभिरुचि होती हें या ग्रंथाचीं जीं भाषांतरें झालीं आहेत त्यांवरून व मोक्षमुलर प्रभृति पंडितांचे लेखांव-रून समजणार आहे. मन्वादिक स्मृतिकारांचे ग्रथांतही स-त्याची व सदसद्विचारशक्तीची फार मातबरी मानिली आहे.

सत्येंकरून साक्षी पवित्र होतो; सत्याच्या योगानें धर्माची वृद्धि होते; ह्मणून सर्व वर्णांच्या साक्षीदारांनीं सत्य भाषण करावें.[1] आत्म्याचा साक्षी आत्मा आहे; आत्मा हाच आत्म्याची गति आहे; ह्मणून असत्य भाषण करून उत्तम साक्षी जो आत्मा त्याचा अपमान करूं नये.[2]

---

१ सत्येन पूयते साक्षी धर्मः सत्येन वर्धते ॥
तस्मात् सत्यं हि वक्तव्यं सर्ववर्णेषु साक्षिभिः ॥
मनु. अ. ८ श्लोक ८३

२ आत्मैव ह्यात्मनः साक्षी गतिरात्मा तथात्मनः ॥
मावमंस्थाः स्वमात्मानं नृणां साक्षिणमुत्तमम् ॥
मनु. अ. ८ श्लोक. ८४

पापकर्म करणारे लोक असें समजतात कीं, आपण पापकर्म करण्याला प्रवृत्त असतां आपणांला कोणी पाहत नाहीं, परंतु ही त्यांची चूक आहे, कारण देवता व तदंतर्गत पुरुष ( सदसद्विवेक ) त्यांचें पापकर्म पाहतात.[1]

हे भद्रे[2], जर तूं जसें आहे त्याहून अन्यथा बोलशील, तर जन्मपर्यंत जें त्वां पुण्य केलें असेल, तें सर्व कुत्र्याला प्राप्त होईल.

हे भद्रे[3], तूं आपणाला एकटाच असें समजतोस, परंतु ही तुझी चूक आहे; कारण तुझें पापपुण्य पाहणारा असा तुझ्या हृदयांत नित्य राहणारा मुनि ( मननशील परमात्मा ज्यास सदसद्विवेकशक्ति अथवा इंग्रजींत मानिटर असें ह्मणतात. ) आहे.

एखादा मनुष्य[4] बोलत असतां तो खरें बोलतो किंवा खोटें बोलतो ह्याविषयीं त्याचा अंतरात्मा शंका घेत नाहीं, त्याहून अन्य श्रेष्ठ पुरुप आहे असें देवता समजत नाहींत.

पौराणिक कालाविपयीं विचार केला असतां आपणांस हीच गोष्ट कळून येते. दशरथ राजानें आपली बायको कैकेयी हिला

---

१ मन्यंते वै पापकृतो न कश्चित्पश्यतीति नः ॥
तांस्तु देवाः प्रपश्यंति स्वस्यैवांतरपूरुषः ॥
मनु. अ. ८ श्लो. ८५

२ जन्मप्रभृति यत्किंचित्पुण्यं भद्र त्वया कृतं ॥
तत्ते सर्वं शुनो गच्छेद्यदि ब्रूयास्त्वमन्यथा ॥
मनु. अ. ८ श्लो. ९०

३ एकोऽहमस्मीत्यात्मानं यत्त्वं कल्याण मन्यसे ॥
नित्यं स्थितस्ते हृद्येष पुण्यपापेक्षिता मुनिः ॥
मनु. अ. ८ श्लो. ९१.

४ यस्य विद्वान् हि वदतः क्षेत्रज्ञो नाभिशंकते ॥
तस्मान्न देवाः श्रेयांसं लोकेऽन्यं पुरुषं विदुः ॥
मनु. अ. ८. श्लो. ९६

जें वचन दिलें, तें पूर्ण करण्याकरितां त्यानें आपला प्रिय पुत्र राम यास वनवसांत पाठविलें, व तो पुत्रशोकानें मरणही पावला. कैकेयीचा मुलगा भरत हा रामास राज्य देऊं लागला; परंतु रामानें तें घेतलें नाहीं. कारण बापानें जें वचन दिलें तें आपणच दिलें आहे असें समजून, त्यानें भरताची समजूत घातली व त्यास राज्याचा उपभोग घेण्यास सांगितलें. रामांनीं जाबालीस जें उत्तर दिलें तेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे. राम ह्मणाले, तुह्मी मला जें सांगतां, तें दिसण्याला खरें दिसतें, परंतु वस्तुतः खरें नाहीं; मनुष्य थोर अथवा नीच, शूर अथवा

---

१ कुलीनमकुलीनं वा वीरं पुरुषमानिनम् ॥
चारित्रमेव व्याख्याति शुचिं वा यदि वाशुचिम् ॥ ४ ॥
कस्य यास्याम्यहं वृत्तं केन वा स्वर्गमाप्नुयाम् ॥
अनया वर्तमानोहं वृत्त्या हीनप्रतिज्ञया ॥ ८ ॥
कामवृत्तोऽन्वयं लोकः कृत्स्नः समुपवर्तते ॥
यद्वृत्ताः संति राजानस्तद्वृत्ताः संति हि प्रजाः ॥ ९ ॥
सत्यमेवानृशंसं च राजवृत्तं सनातनम् ॥
तस्मात्सत्यात्मकं राज्यं सत्ये लोकः प्रतिष्ठितः ॥ १० ॥
ऋषयश्चैव देवाश्च सत्यमेव हि मेनिरे ॥
सत्यवादी हि लोकेस्मिन् परं गच्छति चाक्षयम् ॥ ११ ॥
उद्विजंते यथा सर्पान्नरादनृतवादिनः ॥
धर्मः सत्यपरो लोके मूलं सर्वस्य चोच्यते ॥ १२ ॥
सत्यमेवेश्वरो लोके सत्ये धर्मः सदाश्रितः ॥
सत्यमूलानि सर्वाणि सत्यान्नास्ति परं पदम् ॥ १३ ॥
दत्तमिष्टं हुतं चैव तप्तानि च तपांसि च ॥
वेदाः सत्यप्रतिष्ठानास्तस्मात्सत्यपरो भवेत् ॥ १४ ॥
एकः पालयते लोकमेकः पालयते कुलम् ॥
मज्जत्येको हि निरय एकः स्वर्गे महीयते ॥ १५ ॥
सोहं पितुर्निदेशं तु किमर्थं नानुपालये ॥
सत्यप्रतिश्रवः सत्यं सत्येन समयीकृतम् ॥ १६ ॥

अधीर शुद्ध अथवा पापी, हें त्याचे वर्तनावरून समजावें; सत्य व दया हीं राजाचे मुख्य गुण होत; सत्य हा राज्याचा पाया आहे; सर्व जग सत्यावर अवलंबून आहे; देवता व ऋषि सत्यास मान देतात; जो मनुष्य सत्य बोलतो त्यास उत्तम व अविनाशि लोक प्राप्त होतो; या जगांत सद्गुणांतील मुख्य तत्त्व सत्य होय व सद्गुण हा सत्यावर अवलंबून आहे; सत्यापेक्षां दुसरें कांहीं एक श्रेष्ठ नाहीं. जर असें आहे तर मी आपलें वचन कां मोडूं? लोभामुळें, भ्रमामुळें अथवा अज्ञानामुळें मी सत्याचें अतिक्रमण करणार नाहीं.

हरिश्चंद्र राजानें आपली प्रिय पत्नी तारामती व पुत्र रोहिदास यांसह अनेक विपत्ति भोगिल्या, परंतु सत्त्वभंग होऊं दिला नाहीं. पुण्यश्लोक नल राजानें आपली पत्नी दमयंती हिजसह हाल अपेष्टा भोगिली. स्त्रियांवर शस्त्र उचलावयाचें नाहीं हें व्रत पाळण्यासाठीं भीष्मांनीं आपला नाश होऊं दिला. धर्मराजास सत्यव्रत हें नांव आहे. हें व्रत पाळण्यासाठीं त्यानें बारा वर्षें आपल्या बंधूंसहवर्तमान वनवासांत काढिलीं. अशा प्र-

---

नैव लोभान्न मोहाद्वा न चाज्ञानात्तमोन्वितः ॥
सेतुं सत्यस्य भेत्स्यामि गुरोः सत्यप्रतिश्रवः ॥ १७ ॥
कायेन कुरुते पापं मनसा संप्रधार्य तत् ॥
अनृतं जिह्वया चाह त्रिविधं कर्मपातकम् ॥ २१ ॥
भूमिः कीर्तिर्यशो लक्ष्मीः पुरुषं प्रार्थयंति च ॥
सत्यं समनुवर्तंते सत्यमेव भजेत्ततः ॥ २२ ॥
सत्यं च धर्मं च पराक्रमं च
भूतानुकंपां प्रियवादितां च ॥
द्विजातिदेवातिथिपूजनं च
पंथानमाहुस्त्रिदिवस्य संतः ॥ ३१ ॥

वाल्मीकिरामायण. अयोध्याकांड. सर्ग. १०९. पृ. १७७,१७८.

कारें रामायणभारतादि ग्रंथांत अनेक कथा आहेत; त्यांत कांहीं अतिशयोक्ति असेल; त्यांत कांहीं कविकल्पनातरंग असतील; परंतु त्या कथांचें सार पाहूं गेलें असतां हें आहे कीं, थोर पुरुष आपणांवर कसलाही प्रसंग आला असतां सत्यास सोडीत नाहींत. जें वचन आपण दिलें असतें, तें पाळण्यासाठीं आपणांस दारा, सुत व बंधु यांचा वियोग होत असला तरी होऊं देतात; परंतु आपल्या व्रताचा भंग होऊं देत नाहींत. आमचे कथेकरी वगैरे अनेक लोक या महातत्त्वाचा उपदेश हिंदु लोकांस नेहमीं करीत असतात. रामायण व भारतीय कथांचें श्रवण हें हिंदु लोकांचें बाळकडूच आहे असें ह्मटलें असतां चालेल. अशी ज्या ठिकाणीं स्थिति आहे तेथील सर्व लोक लबाड हें ह्मणणें लहान धाडस नाहीं.

वरील एकंदर हकीकतीवरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, मिल साहेबांनीं हिंदु लोक लबाड असा जो दोष ठेविला, तो निदान प्राचीन कालचे हिंदूंचे संबंधानें निराधार आहे. मुसलमानी अंमल सुरू झाल्यावर धर्म वगैरे बाबतींत छल होऊं लागल्यामुळें, आचार विचार वगैरे गोष्टींत थोडा बदल होणें स्वाभाविक आहे. आश्चर्य हें कीं, मुसलमानी अंमलामुळें हिंदु लोकांची स्थिति सर्वांशीं बदलली नाहीं; व याच गोष्टीवरून मूळचा पाया भक्कम होता असें होतें. सत्य ही विशेष खर्चाची व चैनीचीचीज आहे व ही थोडे लोकांस प्राप्त होते, असें जें मोक्षमुलर साहेबांनीं ह्मटलें आहे तें यथार्थ आहे. ज्यांस स्वातंत्र्यसुखाचा

---

१ ॥ न च प्रसादः पुरुषेषु मोघः ॥
॥ न चाप्यर्थो नश्यति नापि मानः ॥
॥ यस्मादेतन्नियतं सत्सु नित्यं ॥
॥ तस्मात् संतो रक्षितारो भवंति ॥

सावित्र्युपाख्यान.

नेहमीं उपभोग मिळतो, त्यांस या चिजेची फारशी मातबरी वाटत नसते; त्यांस परकीय अंमलाखालीं असणारे लोकांची खरी स्थिति काय असते हें माहीत नसतें. निर्भीडपणानें खरें बोलावें, खरें लिहावें व खऱ्या रीतीनें चालावें तर ज्यांचे हातीं अधिकार असल्यामुळें नफा नुकसान करण्याचें असतें त्यांस तें रुचत नाहीं; त्यांची इतराजी होते; व ते कधीं कधीं नुकसान करण्यास प्रवृत्त होतात. अशीं पुष्कळ उदाहरणें दृष्टीस पडतात. बरें खरें न बोलावें तर मनाची शांति होत नाहीं. एकीकडे सत्ताधीशांची इतराजी व यामुळें सुखाची हानि, व दुसरीकडे सत्याचा भंग व यामुळें मनास असमाधान अशी स्थिति होते. यामुळें सत्यासत्याचें संमिश्रण होण्याचा संभव असतो. ही स्थिति सदोदित असते असें नाहीं. थोर मनाचे अधिकारी असले ह्मणजे परस्परांचा परस्परांवर विश्वास असतो; व निराळी स्थिति दृष्टीस पडते. राष्ट्रांतील लोकांचे खासगी वर्तनाविषयीं विचार करितांना राज्यप्रकरणाचा संबंध एकीकडे ठेवणें योग्य आहे असें आह्मांस वाटतें. असो. आह्मांस या विषयाचा इतका पाल्हाळ करण्याचें कारण नव्हतें; परंतु मिल साहेबांनीं सर्व राष्ट्रावर जो आरोप आणिला आहे, तो खरा मानणारे परकीय लोकांमध्यें पुष्कळ आहेत. खरें खोटें समजून घेण्याची थोड्यांस संधी सांपडते. जें ऐकिलें असेल अथवा वाचिलें असेल, तें खरें समजून चालणारे फार, खोल विचार करून सत्य कोणतें हें शोधून काढणारे थोडे असतात. हिंदु लोकांस सत्यासत्याचा विधिनिषेध नाहीं व ते विश्वासास पात्र नाहींत अशा समजूतीनें जर राज्यकर्ते त्यांवर राज्य करूं लागले, तर उभयतांचीं मनें शुद्ध न राहून अहित होण्याचा संभव नाहीं काय? या संबंधानें मोक्षमुलर साहेबांनीं ह्मटलें आहे तें लक्षांत ठेवण्या सारखें आहे. ते

ह्मणतातः—हिंदुस्थानांतील लोकांची निकृष्ट स्थिति आहे व ते लबाड्यांनीं भरलेले आहेत, अशा समजुतीनें जर सनदी नोकर हिंदुस्थानांत येऊन राज्यकारभार करूं लागतील तर, या गोष्टीपासून इंग्रजी राज्यास जितका धोका, जितका अपाय व जितकें नुकसान होईल, तितकें दुसऱ्या गोष्टीपासून होणार नाहीं. कारण, जो मनुष्य सर्व लोक लबाड आहेत असें घेऊन चालतो, त्याचे हातून खाजगी अथवा सार्वजनिक व्यवहारांत जितकी निश्चयेंकरून चूक होण्याचा संभव आहे, तितकी दुसऱ्या मनुष्याचे हातून होण्याचा संभव नाहीं.

हिंदु लोक कसे होते याविषयीं आह्मींच अभिप्राय देणें हें बरोबर नाहीं, ह्मणून त्याविषयीं दुसरे लोक काय ह्मणतात हें आपण पाहूं. एलफिन्स्टन साहेब कोण होते हें पुष्कळांस माहीत आहेच. यांचा अभिप्राय वाचल्यानें हिंदु लोकांविषयीं परकीय लोकांचा गैर समज होण्यास काय कारण आहे व लोकांची स्थिति काय होती हें समजेल. हे साहेब ह्मणतात कीं:—"एतद्देशीय लोकांचें वर्तन कसें आहे हें समजण्यास हिंदुस्थानांतील इंग्लिश लोकांस जितकी संधी आहे असें वाटतें तितकी मिळत नाहीं. इंग्लंडांत सुद्धां थोड्या लोकांसच आपल्या बरोबरीच्या लोकांच्या पलीकडची माहिती असते, व जी काय असते ती वर्तमानपत्रद्वारें प्राप्त होते; परंतु हिंदुस्थानांत अशा प्रकारची सोय नाहीं. या देशांत धर्म व आचार यांमुळें लोकांशीं स्नेह करण्यास अडचण येते; त्यांबरोबर व्यवहारही बेताबाताचे होतात; व परस्परांचे हेतु, अभिप्राय वगैरे गोष्टी कळविण्याचा कमी प्रसंग येतो.

१ मोक्षमुलरकृत हिंदुस्थानापासून आपणांस कोणतें शिक्षण मिळेल ( व्हाट क्यान् इंडिया टीच अस् ) पृ. ७५.

२ एलफिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास. पृ. २१३.

लोकांची कुटुंबस्थिति काय आहे याविषयीं आपणांस फक्त ऐ-कीव माहिती आहे; व आयुष्यांतील ज्या शतशः व्यवहारांत मनुष्याचे चांगले गुण दृष्टीस पडतात त्यांत आपला कांहींच संबंध नसतो. परधर्माचे मिशनरी ( खिस्ती धर्मोपदेशक ), न्यायाधीश, पोलिस व मुलकी अमलदार, व राज्यकारस्थानी पुरुष यांचा कांहीं खासगी संबंध असल्याशिवाय त्यांस राष्ट्रांतील लोकांचे सद्गुण माहीत नसतात. ज्या गोष्टी आमच्या दृष्टीस पडतात, त्यांविषयीं आह्मी आपल्या रीतीभातींवरून अभिप्राय देतों. आमचे ग्रंथकार हे स्थल व काल या संबंधानें कांहीं विचार करीत नाहींत; ते मराठे व बंगाली यांस सारखे समजतात; व महाभारतांतील योद्ध्यांचे आंगीं जे दोष होते ते प्रस्तुतच्या लोकांच्या आंगीं आहेत असें समजतात. हिंदुस्थान सोडून परत आल्यानंतर, जे गृहस्थ हिंदु लोक व इतर लोक (मग ज्यांस आपण उत्तम असें समजतों तेही) यांची तुलना करून पाहतात, त्यांचा हिंदु लोकांविषयीं ग्रह चांगला होतो.

आपल्या मोठमोठाल्या शहरांत राहणाऱ्या हलकट लोकांइतके हिंदु लोकांपैकीं कोणतेही लोक हलकट नाहींत. खेड्यांतील लोक हे सर्वत्र आनंदी, कुटुंबावर ममता करणारे, शेजाऱ्यांवर प्रेम करणारे, व सरकाराशिवाय इतर लोकांबरोबर प्रामाणिकपणानें व खऱ्यारीतीनें वागणारे आहेत. ठगी व डाका घालणारे लोकांविषयीं विचार केला तरी, इंग्लंड देशापेक्षां हिंदुस्थानांत गुन्ह्यांची संख्या कमी असते. हिंदु लोक सभ्य व गरीब आहेत. त्यांच्यांत व्यभिचार कमी आहे व रीतीभातींच्या संबंधानें त्यांचें शुद्ध वर्तन पाहून आपणांसही खालीं पहावें लागेल."

सर टामस मनरो यांचा असा अभिप्राय आहे कीं, "शेतीची

---

१ एलफिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास. पृ. ३७५–३८१

चांगली पद्धत, जिनसा तयार करण्याचे कामांत हस्तकौशल्य, उपयुक्त व चैनीचे पदार्थ तयार करण्याचें सामर्थ्य, लेखन, वाचन व गणित शिकविण्यासाठीं खेड्यांतून स्थापन झालेल्या शाळा, पाहुणचार व धर्मादाय, व स्त्रियांस मान देणें, या गोष्टींवरून जर सुधारणा आहे असें समजावयाचें, तर हिंदु लोक युरोपांतील कोणत्याही राष्ट्रापेक्षां कमी सुधारलेले नाहींत; व सुधारणेच्या संबंधानें आपण देवघेव करावयाचें मनांत आणिलें असतां, माझी खात्री आहे कीं, इंग्लंडास फायदा झाल्याशिवाय रहाणार नाहीं."

बिशप हीबर ह्मणतात कीं, हिंदु लोक शूर, सज्जन, बुद्धिवान व ज्ञान संपादन करण्याविषयीं व आपली सुधारणा करण्याविषयीं उत्सुक आहेत; ते मातापितरांचे आज्ञेंत राहणारे, मुलांवर प्रेम करणारे, शांत व सभ्य असे आहेत; व कोणी त्यांच्या उपयोगी पडला असतां त्याविषयीं कृतज्ञता दाखविणारे त्यांच्यासारखे दुसरे लोक माझे पाहण्यांत नाहींत.

आतां हिंदुस्थानाविषयीं व तेथील सुधारणेविषयीं मोक्ष मुलर साहेबांचा काय अभिप्राय आहे हें आपण पाहूं. या साहेबांनीं आर्य सुधारणेविषयीं जितका विचार केला आहे तितका दुसऱ्या थोड्या लोकांनीं केला आहे; यांचे विचार जितके निःपक्षपाताचे व विचाराचे असतात तितके दुसरे थोड्यांचे असतात. आह्मी जो अभिप्राय देणार आहों तो कांहींसा विस्तृत आहे; परंतु विषयाचें महत्त्व लक्षांत आणिलें असतां तादृश विस्तृत वाटणार नाहीं. मोक्ष मुलर साहेबांनीं थोडे वर्षांपूर्वी हिंदुस्थानांतील सनदी नोकरीकरितां उमेदवार यांसाठीं केंब्रिज विद्यालयांत व्याख्यानें दिलीं; त्या वेळीं हिंदुस्थानापासून कोणत्या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत याविषयीं अनेक ग्रंथांचा आधार घेऊन, व अनेक गृहस्थांचे आक्षेपांविषयीं विचार करून आपला अभिप्राय प्रदर्शित केला. तो असाः—

[ या भूतलावर सृष्टपदार्थांचें वैपुल्य, त्यांची शक्ति व त्यांचें सौंदर्य, हीं कोठें दृष्टीस पडतात हें आपण पहावयास लागलों असतां, तीं हिंदुस्थानांत आहेत असें आपणांस दिसून येईल; मनुष्याचें मन प्रगल्भ दशेस येऊन त्याचा विकास विशेष कोठें झाला, आयुष्यांतील गहन विषयावर फार विचार कोणीं केला, व प्लेटो व क्यांट यांचे ग्रंथांचा ज्यांनीं अभ्यास केला आहे त्यांना सुद्धां ज्या कांहीं गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत, त्यांचा निर्णय कोठें झाला, असें मला कोणीं विचारिलें तर, हा आर्यावर्तांत झाला असें मी सांगेन. ग्रीक, रोमन व ज्यू लोक यांचे जे विचार होते, त्यांमुळें आह्मां युरोपस्थ लोकांचे मनाचें पोषण झालें; परंतु पूर्ण ऐहिक व पारमार्थिक सुख मिळण्यासाठीं हे विचार बरोबर आहेत किंवा नाहींत हें समजण्यास कोणत्या ठिकाणीं साधन आहे, असें मला कोणीं विचारिलें तर मी हिंदुस्थानाकडे बोट दाखवीन.

हे विचार ऐकून तुह्मांस आश्चर्य वाटेल, विशेषेंकरून ज्यांनीं कलकत्ता, मद्रास व मुंबई येथें कांहीं दिवस घालविले असतील, त्यांस तेथील लोकांपासून आपणांस कांहीं शिकण्यासारखें आहे असें समजून फारच आश्चर्य वाटेल; परंतु मी हल्लींचे हिंदुस्थानाविषयीं सांगत नाहीं. एक हजार, दोन हजार, अथवा तीन हजार वर्षांपूर्वींचे आर्यांविषयीं मी बोलत आहें.

जर तुह्मांस भूगर्भशास्त्राची गोडी असेल, तर या शास्त्राची माहिती मिळण्याचें साधन हिमालयापासून लंकेपर्यंत वाटेल तितकें आहे; वनस्पतिशास्त्राविषयीं तुमची जिज्ञासा असेल तर, पुष्कळ शोधक हरएक शोध करूं लागले तरी त्यांस पुरेशा वनस्पति आहेत; जर तुह्मांस मानवजातिशासनाविषयीं नाद असेल तर, हिंदुस्थान देश हा अनेक प्रकारच्या मनुष्य जातींचें

संग्रहालय आहे; जर तुह्मांस नाणीं शोधून ता जमा करण्याची आवड, असेल तर इराणी, क्यारियन, थ्रेशियन, पार्थियन, ग्रीक, मासिडोनियन, सिथियन, रोमन, व मुसलमानी नाणीं हिंदुस्थानांत पुष्कळ आहेत, असें तुह्मास दिसून येईल. तुह्मांपैकीं पुष्कळांनीं शास्त्राचा अभ्यास केला असेल; परंतु भाषांचा प्रसार, त्यांचा नाश व त्यांचें संमिश्रण हीं कशीं होतात हें हिंदुस्थानांत राहून जितकें उत्तम रीतीनें समजेल, तितकें दुसरे देशांत राहून समजेल काय?

या महीतलावर ज्या गोष्टीविषयीं आपण विशेष काळजी घेतों, जिच्यावर आपले आचार, विचार, आशा वगैरे अवलंबून आहेत, जिच्याशिवाय ग्रामसमाज, राज्य, चाली, कायदे, सत्य व असत्य हीं कांहींच असूं शकणार नाहींत, जिच्या योगानें मनुष्य व पशु यांमध्यें भेद आहे असें आपण समजतों, जी मनुष्याचें व राष्ट्राचें जीवन होय, जी अतिगूढ, अशी जी धर्मजिज्ञासा ती हिंदुस्थानांत विशेष दृष्टीस पडत होती. धर्माची खरी उत्पत्ति, त्याची नैसर्गिक वृद्धि, व त्याचा नाश याविषयीं तुह्मांस चांगला अभ्यास करावयाचा असेल, तर ब्राह्मण धर्माचें गृह, बौद्ध धर्माचें उत्पत्तिस्थान, व झोरोआस्ट्रियन धर्माचें आश्रयस्थान जें भरत खंड, त्याशिवाय इतर ठिकाणीं साधन आहे काय?

तुह्मांस संस्कृत भाषेचा अभ्यास करण्याविषयीं प्रथम कंटाळा वाटेल, परंतु कंटाळा न करितां हा अभ्यास चालू ठेविला तर, ज्या ग्रंथांचा शोध लागला नाहीं किंवा जे माहीत नाहींत ते तुह्मांस सांपडतील, व मनुष्याची पूर्वस्थिति कशी होती हें तुह्मांस कळून येईल.

हिंदुस्थान देश हा तुह्मांस दूरचा व चमत्कारिक वाटेल, प-

रंतु असें तुह्मी वाटूं देऊं नका. कारण, हिंदुस्थानचा इतिहास ह्मणजे मनुष्याचे मनाचा इतिहास होय; ह्मणून हा देश आपल्या जवळच आहे असें तुह्मी समजा. तुह्मांस भाषा, धर्म, दंतकथा, तत्त्वज्ञान, कायदे, चाली, मूळच्या कला व मूळचें शास्त्र यांपैकीं कोणत्याही गोष्टीचा अभ्यास करावयाचा असो, तरी तुह्मांस हिंदुस्थानाकडे वळलें पाहिजे, मग तुमची इच्छा असो किंवा नसो. कारण, मनुष्याचे इतिहासाचीं जीं साधनें आहेत, त्यांपैकीं कांहीं विशेष उपयुक्त व महत्त्वाचीं हिंदुस्थानांत आहेत.

जर तुह्मी ग्रीक, रोमन, साक्सन, सेल्ट वगैरे लोकांचा इतिहास वाचून स्वस्थ बसाल, व ज्या भाषेविषयीं सर्वांस आश्चर्य वाटत आहे अशी जी संस्कृत भाषा तिचे उत्पादक, नैसर्गिक धर्मांपैकीं अतिशय सरळ धर्माचे जनक, ज्यांनीं तत्त्वज्ञानसंबंधानें सूक्ष्म विचार केला आहे असे जे आर्यलोक, त्यांचे इतिहासाचा अभ्यास करणार नाहीं, तर तुमचें ज्ञान पूर्ण दशेस कधीं येणार नाहीं. आपण आपल्या विद्यालयांतून बराच इतिहास शिकवितों, परंतु हिंदुस्थानचा इतिहास बरोबर समजून घेतला तर त्याची बरोबरी दुसऱ्याच्यानें करवणार नाहीं.

आपण आपल्या सुधारणेविषयीं विचार करूं लागलों तर, आपणांस असें कळून येईल कीं, आपण दुसऱ्या लोकांपासून पुष्कळ गोष्टी घेतल्या आहेत. यहुदी लोकांचा जुना करार हा आपल्या धर्माचा पाया आहे. आपले खिशांत जीं घड्याळें आहेत त्यांचें मूळ पाहूं गेलें असतां बाबिलोनियन लोक होत; तासाचीं साठ पळें असा विभाग त्यांनीं केला. आपण आपलीं मूळाक्षरें ग्रीक व रोमन लोकांपासून शिकलों; ग्रीक लोक फिनिशन लोकांपासून शिकले, व फिनिशन लोक मिसरवासी लोकांपासून शिकले. ज्याप्रमाणें आपणांस आपला धर्म यहुदी लोकांपासून प्राप्त झाला,

तत्त्वज्ञान ग्रीक लोकांपासून, राज्यव्यवहारज्ञान रोमन लोकांपासून, व नीतिज्ञान साक्सन लोकांपासून प्राप्त झालें, त्याप्रमाणें तुह्मी संस्कृत भाषेचा अभ्यास केला असतां तुह्मांस आणखी दुसऱ्या पुष्कळ गोष्टी कळून येतील.

आपलें व आर्य लोकांचें मूळ एक आहे ही गोष्ट पुष्कळ लोकांस समजत नव्हती; हें ऐक्य कबूल करणें लोकांचे जीवावर येत असे. ड्युगल स्टुअर्ट याचें असें मत होतें कीं, संस्कृत ग्रंथ हे लबाड ब्राह्मणांनीं नुकतेच केले असावेत. हा समज आतां चुकीचा ठरला आहे. संस्कृत भाषेंतील प्राचीन ग्रंथसमूह हा ग्रीक लोकांचे ग्रंथसमूहापेक्षां जास्ती आहे हें आतां ठरलें आहे, व संस्कृत ग्रंथांचे अभ्यासानें आपले बालपणांतील गोष्टींची आठवण होऊन आपण कसे होतों हें आपणांस आतां कळून येत आहे.

तुह्मांस वाटतें कीं, हिंदुस्थानांत राहणें ह्मणजे काळेपाण्याची शिक्षा, हिंदु लोक ह्मणजे हलक्या प्रतीचे लोक, त्यांस सत्यासत्याचें कांहींच वाटत नाहीं; परंतु तुमचा हा समज चुकीचा आहे. हिंदु लोक लबाड आहेत ही गोष्ट तुह्मी श्रुतिवचनाप्रमाणें मानतां; परंतु एखादा मनुष्य ग्रीस देशांत गेला, व त्यास गाडीवाल्यानें फसविलें, तर सर्व प्राचीन व अर्वाचीन ग्रीक लुच्चे आहेत व त्यांस लबाडी आवडते असें होतें काय? नाहीं. त्याचप्रमाणें कलकत्ता, मद्रास व मुंबई येथील कोडतांत जे लोक येतात किंवा बाजारांत जे दुकानदार बसतात ते लोकांस फसवितात, एवढ्यावरून सर्व हिंदु लोक लबाड आहेत असें होतें का? हिंदुस्थानांतील लाख, दोन लाख, दहा लाख लोक लबाड असतील, परंतु यावरून २५ कोट लोक लबाड आहेत असें कसें ह्मणतां येईल? एखादा इंग्लिश खलाशी गुन्ह्यांत सांपडला असतां तो आपला गुन्हा लागलींच कबूल करील

असें तुह्मांस वाटतें का ? शितावरून भाताची परीक्षा होते हें खरें आहे, परंतु हें वचन मनुष्याचे संबंधानें लागू पडत नाहीं.

सर जान मालकम साहेब ह्मणतात कीं "कांहीं ठिकाणें शिवाय करून बाकीच्या ठिकाणचे हिंदु लोक हे सुदृढ असून शूर, उदार व दयाळू आहेत; व धैर्याबद्दल जितकी त्यांची प्रसिद्धि आहे तितकी सत्य बोलण्याबद्दलही आहे."

"प्रोफेसर विलसन यांचें असें मत आहे कीं, हिंदु लोकांमध्यें मी फार दिवस राहिलों, व त्यांचें वर्तन कसें आहे हें पाहण्याची मला जितकी संधी आली, तितकी दुसऱ्या थोड्याच युरोपियन लोकांस आली असेल. कलकत्ता येथील टांकसाळींत पुष्कळ कारागीर मजूर वगैरे लोकांशीं माझा रोज सहवास असे; त्यांच्यांमध्यें अप्रामाणिकपणा बिलकुल नव्हता असें नाहीं; परंतु इतर देशांतील टांकसाळींत जितका आढळून येतो तितका नव्हता; येथें त्याचें स्वरूप फारसें भयंकर दृष्टीस पडत नसे, व तो क्वचित् घडे. कारागीर, मजूर व कामगार लोक मेहनती असत व आनंदानें काम करीत; दारू पिऊन उन्मत्त होण्याचा अथवा दांडगेपणाचा प्रकार दृष्टीस पडत नसे; वरिष्ठ सुस्वभावाचा आहे असें लोकांस कळून आलें ह्मणजे, यत्किंचित् अपमान न करितां ते मोकळे मनानें वागण्यास तयार असतात.

कलकत्त्यांतील श्रेष्ठ प्रतीचे लोक मला समजूतदार, उदार व स्वतंत्र असे दिसून आले; त्यांची चाल चलणुक सभ्यपणाची असे; त्यांपैकीं कांहीं गृहस्थांची व माझी चांगली मैत्री आहे; ते जगांत कोणत्याहि ठिकाणीं सभ्य गृहस्थ या नांवास पात्र होतील."

कर्नल स्लीमन यास ठगी लोकांचें बंड मोडण्यासाठीं नेमिलें

होतें; हें बंड मोडण्यासाठीं या साहेबास लोकांत रहावें लागत असे; यामुळें त्याचे नजरेस लोकांचे बरे वाईट गुण दृष्टीस पडत. त्याचें असें ह्मणणें आहे कीं:—ज्यांस हिंदु लोकांचे खेड्यांतील व्यवस्था माहीत नाहीं, त्यांस हिंदु लोकांची माहिती नाहीं असें समजावें. ज्याप्रकारच्या स्थानिक स्वराज्याबद्दल आह्मांस अभिमान वाटतो, त्या प्रकारची व्यवस्था येथें दृष्टीस पडते. खेडें ह्मटलें ह्मणजे एक लहानसें प्रजासत्ताक राज्य होय. हिंदु लोकांमध्यें जे चांगले गुण आहेत ते येथें विशेषेंकरून दृष्टीस पडतात. एकाच खेड्यांतील लोक परस्परांशीं लबाडीचा व्यवहार क्वचित् करतात. त्यांस देवाच्या शपथेचें भय वाटतें.

वारन हेस्टिंग्स एकंदर हिंदु लोकांविषयीं ह्मणतात कीं "ते सभ्य व परोपकारी आहेत; पृथ्वीच्या पाठीवर जे लोक आहेत, त्यांपेक्षां हे विशेष कृतज्ञ असून त्यांस कोणी इजा केली असतां तिजबद्दल सूड उगविण्याविषयीं त्यांची कमी प्रवृत्ति असते; ते विश्वासुक असून कायदेशीर हुकूम मानण्यास तयार असतात."

हिंदु लोकांविषयीं मला स्वताला थोडा अनुभव आहे. गेल्या वीस वर्षांत अनेक मतांचे संबंधानें वादविवाद झाले; या बाबतींत त्यांचें वर्तन कसें होतें हें मीं लक्षपूर्वक पाहिलें; व माझा असा अभिप्राय आहे कीं, सत्याविषयीं त्यांचें प्रेम व उदार वर्तन हें युरोपांत व अमेरिकेंत आपण पाहतों त्यापेक्षां जास्ती आहे; त्यांचे वादविवादांत दांडगेपणा नसून त्यांचे मनाची दृढता दिसून येते; व इकडील संस्कृतभाषाभिज्ञ हे मर्यादा सोडून परस्परांस टोंचून लिहितात, हें पाहून त्यांस आश्चर्य वाटतें हें मला माहीत आहे; त्यांजकडून चूक झाली असतां ते ती लागलींच कबूल करितात; जेव्हां त्यांचें ह्मणणें बरोबर असतें, तेव्हां ते आपल्या युरोपीय प्रतिपक्ष्यांस खोंचून लिहीत

नाहींत; जी गोष्ट खोटी आहे ती प्रसिद्ध करून लोकांस फसविणें ही जी कित्येक विद्वानांची लुच्चेगिरी आपण पाहतों ती त्यांजमध्यें क्वचित् दृष्टीस पडते. याही बाबतींत त्यांचा आपणांस कांहीं अंशीं कित्ता घेण्यास हरकत नाहीं.

हिंदु लोकांचे ग्रंथांविषयीं विचार केला असतां त्यांची सत्याविषयीं प्रीति व पूज्यता दिसून येते. त्यांचे भाषेंत खरें यास सत्य हें नांव आहे; त्याचा धात्वर्थ जसें आहे तसें, असा आहे. पुष्कळ लोक एखादी गोष्ट खरी मानतात, एवढ्याच कारणावरून ती खरी असा सत्य या शब्दाचा अर्थ नाहीं. जें आहे तें हें आहे, मग लोक निंदा करोत अथवा स्तुति करोत, असा त्यांच्यांतील सत्य या शब्दाचा अर्थ आहे. वेदांतील देवतांची मोठी स्तुति ह्मटली ह्मणजे त्या सत्य आहेत ही होय. ज्या ठिकाणीं सत्याविषयीं इतकी पूज्यता आहे, त्या ठिकाणीं असत्य हा गुन्हा लोक मानीत असतील हें उघड आहे.

शतपथ ब्राह्मणांत असें सांगितलें आहे कीं, जो सत्य भाषण करितो, तो आपले स्थंडिलांतील अग्नि प्रज्वलित करितो, जणुकाय त्यानें अग्नींत तूप टाकिलें आहे; अशा मनुष्याचें तेज वृद्धिंगत होतें; व तो दिवसेंदिवस उत्कर्ष पावतो. परंतु जो असत्य भाषण करितो, तो पाणी टाकून ज्याप्रमाणें पेटलेला अग्नि विझवावा त्याप्रमाणें आपल्या स्थंडिलांतील अग्नि विझवितो; या मनुष्याचें तेज कमी कमी होत जातें, व तो दिवसेंदिवस अधिक दुष्ट होतो; ह्मणून मनुष्यानें सत्यच भाषण करावें हें चांगलें.

तैत्तिरीय, आरण्यक, कथोपनिषद, रामायण, महाभारत वगैरे प्राचीन ग्रंथांत सत्याविषयीं पूज्यता दिसून येते. सत्य ही अद्वितीय अमोल चीज आहे. ज्यास हिचा लहानपणापासून उपभोग मिळतो तो सुखी असतो. हिंदु लोकांशिवाय इतर लोकांच्या प्रा-

चीन ग्रंथांत सत्य व सदसद्विवेकशक्ति यांविषयीं पूज्यभाव दिसून येतो किंवा नाहीं याविषयीं मला संशय नाहीं.

आतां हिंदुस्थानच्या असंख्य लोकांवर जे तुह्मी राज्य करूं लागणार, त्यांस मी जी गोष्ट सांगणार ती ही कीं, एकंदर सर्व हिंदु राष्ट्राविषयीं जो तुमचा चुकीचा समज झाला आहे तो काढून टाका. हिंदु लोक लबाड, त्यांवर विश्वास ठेवूं नये व त्यांस शास्त्र वगैरे शिकविण्यापूर्वी सत्य भाषण करण्यास शिकवावें अशा समजुतीनें तुह्मी त्यांशीं वर्तन कराल, तर कांहीं एक उपयोग होणार नाहीं इतकेंच नाहीं, तर ते आपल्या शास्त्राचा आधार घेऊन तुह्मांस नम्रता व सत्य हीं शिकवितील. हिंदुस्थानांत लबाड लोक असतील; परंतु या जगांत लबाड लोक कोठें नाहींत? हिंदुस्थानांत ज्या कांहीं गोष्टी नीतीच्या समजतात त्या आपण अनीतीच्या समजतों. ज्या कांहीं आपण नीतीच्या समजतों त्या ते अनीतीच्या समजतात. असा प्रकार असावयाचाच. आपण आपल्या समजाप्रमाणें चालूं, परंतु दुसऱ्याविषयीं मत देतांना विचार केला पाहिजे. ]

हिंदु सुधारणेविषयीं एथपर्यंत जो आह्मीं विचार केला तो हिंदु लोकांचे आचार, विचार वगैरे गोष्टींचे संबंधानें परद्वीपस्थ लोकांनीं काय दोष ठेविले आहेत व त्यांच्याच पैकीं विलसन, एलफिन्स्टन, मोक्ष मुलर प्रभृति पंडितांचे काय अभिप्राय आहेत याविषयीं होता. परंतु एवढ्यावरून आह्मीं हातीं धरलेल्या विषयाचें यथार्थ निरूपण होणार नाहीं. भाषेची, स्त्रियांची, व धर्म व नीति या बाबतींत लोकांची स्थिति कशी होती हें समजलें असतां सुधारणेचें मान कसें होतें हें समजून येईल; ह्मणून याविषयीं विचार करून हा वादग्रस्त विषय संपवूं. देशांत सुधारणा आहे किंवा नाहीं, हें कांहीं अंशीं भाषेच्या स्थितीवरून समजतें.

देशांत सुधारणा असल्याशिवाय भाषेची सुधारणा कधींही व्हावयाची नाहीं. जसजसे लोक सुधारत जातात, तसतशी भाषा सुधारत जाते, हें प्रत्येक सुधारलेले देशाचे इतिहासावरून समजतें. मनाची सुधारणा झाल्याशिवाय भाषेची सुधारणा झाली आहे, असें एकही उदाहरण नाहीं. भाषा ही मनाचा विकास दाखविते. मनांत ज्ञानाचा विकास झाल्याशिवाय भाषा प्रौढ दशेप्रत येत नाहीं. आतां संस्कृत भाषेविषयीं विचार करितां, ती प्रौढ दशेप्रत आली होती किंवा नाहीं, याविषयीं जरी पूर्वी वाद होता, तरी, त्याबद्दल हल्लीं वाद नाहीं. संस्कृत भाषेचे अज्ञानामुळें परकी लोकांचा चुकीचा ग्रह झाला होता. ल्याटीन व ग्रीक भाषांचा लहानपणापासून अभ्यास करण्याची संवय असल्यामुळें स्वभावतः या दोन भाषांविषयीं युरोपियन लोकांचें प्रेम असे. या भाषेंतील बराच शब्दसमूह स्वभाषेंत असल्यामुळें, त्या शिकण्यास त्यांस फारशी अडचण पडत नसे. परंतु संस्कृत भाषा ही अगदींच परकी असल्यामुळें, व ही शिकण्यासही चांगलीं साधनें नसल्यामुळें, हिची खरी योग्यता काय आहे हें समजण्यास साधन नव्हतें. परंतु इंग्लिश लोकांपैकीं सर उइलियम जोन्स, विल्किन्स, कोल ब्रुक व विल्सन, जर्मनींत स्लेजेल व लासन, फ्रान्स देशांत चेझी, बर्नौफ, लांगलोइस प्रभृति पंडित अभ्यास करूं लागले, त्या वेळेस संस्कृत भाषेची योग्यता हळूहळू कळूं लागली; व लोकांचा चुकीचा ग्रह जाऊन ते ल्याटिन व ग्रीक भाषांबरोबर संस्कृत भाषेची योग्यता मानूं लागले.

संस्कृत भाषेच्या संबंधानें पुष्कळ परद्वीपस्थ लोक नाक मुरडतात; परंतु याचें कारण उघड आहे. तें हें कीं, या भाषेंतील मूळाक्षरें नवीन, नांवें नवीन, विचार नवीन, तात्पर्य, बहुतेक अपरिचित गोष्टींशीं गांठ पडते. ही भाषा शिकावयाची ती

केवळ परीक्षा उतरण्यासाठीं; परीक्षा पास झाली ह्मणजे संस्कृत पुस्तकें वाचण्याची आवड कमी. ही स्थिति केवळ परद्वीपस्थ लोकांचीच आहे असें नाहीं; त्यांची अशी स्थिति असणें हें विशेष आश्चर्यकारक नाहीं. आमच्यांतीलही पुष्कळ शिकलेल्या लोकांची अशी स्थिति आहे.

वर सांगितल्याप्रमाणें परद्वीपस्थ लोकांची स्थिति असल्यामुळें, पुष्कळ लोकांस संस्कृत भाषेचा अभ्यास करण्याचा कंटाळा येतो. अशा प्रकारच्या अभ्यासापासून तादृश उपयोग नाहीं असें पुष्कळांस वाटतें. विशेष चमत्कार हा कीं, इंग्लंड व हिंदुस्थान देश यांचा निकट संबंध असतां, हे विचार व ही अनास्था फ्रान्स, इटली, स्वीडन व जर्मनी या देशांपेक्षां, इंग्लंडांत फार करून दृष्टीस पडते. जर्मनींत कोणी संस्कृत शिकून तयार झाला असतां त्यास बराच मान मिळतो; जर कोणी हिंदुस्थान पाहून स्वदेशीं परत आला तर, त्याचें भाषण लोक मोठ्या उत्सुकतेनें ऐकतात. परंतु इंग्लंडांत संस्कृत भाषेचा अभ्यास करणारास बोअर ह्मणजे त्रासदायक मनुष्य समजतात.[१]

सर विलियम जोन्स व कोलब्रुक हे विलक्षण बुद्धिमान होते; यांचे ग्रंथांस इंग्लिश लोक मान देतात खरें; परंतु या दोघां विद्वान गृहस्थांनीं आपलें सर्व आयुष्य संस्कृत भाषेचे अभ्यासांत घालविलें हें त्यांचें दुर्दैवच समजलें पाहिजे; कारण, यांनीं असें न करितां दुसरा व्यवसाय केला असता तर, त्यांस फार मान मिळाला असता. जर अशा थोर पुरुषांची ही स्थिति, तर बालंटाईन, डेविस, इलियट, इलिस, माकेंझी, म्यूर व विलसन यांविषयीं तर विचारावयास नको. मोठमोठाल्या पुस्तकालयां-

---

१–मोक्षमुलरकृत "हिंदुस्थानापासून आपणास कोणतें शिक्षण प्राप्त होईल." पृ० ४.

तून सुद्धां यांचे ग्रंथ दृष्टीस पडत नाहींत. पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं, मानवधर्मशास्त्र, हितोपदेश, शाकुंतल वगैरे थोड्या ग्रंथांशिवाय संस्कृतांत आहे तरी काय? एकच पुस्तकाचे संबंधानें अनेक हस्तलेख जमा करून ते छापण्यांत मतलब काय? यापासून आह्मांस काय फायदा होणार? संस्कृत भाषा शिकण्यांत अर्थ काय? ही भाषा आतां कोणी फारसे बोलत नाहींत, ही मृतवत् आहे व हिचा व्यवहारांत तादृश उपयोग नाहीं असा पुष्कळ लोकांचा समज असल्यामुळें, या भाषेकडे दुर्लक्ष दिसून येतें. बौद्ध राजांचे कारकीर्दीपासून या भाषेचें महत्त्व कमी कमी होत गेलें; तथापि, याच भाषेत ग्रंथ लिहिण्याचा प्रघात होता. संस्कृत भाषेकडे जें कांहीं अंशीं दुर्लक्ष झालें, तें या भाषेचें महत्त्व व देशभाषांची स्थिति यांविषयीं अज्ञान हें मुख्य कारण होय.

भाषेची थोरवी व प्राचीन माहिती मिळण्यास साधन या संबंधानें तर संस्कृत भाषेचें महत्त्व आहे, परंतु इतिहासदृष्ट्या या भाषेचें महत्त्व फार आहे. जगाच्या इतिहासाविषयीं विचार करणें ह्मणजे विशेषतः आर्य, ग्रीक, रोमन व युरोपीय अथवा पाश्चात्य सुधारणेविषयीं विचार करणें आहे. आर्य सुधारणा ही सर्वांत प्राचीन; या सुधारणेनें ज्यांचें हिताहित झालें व होत आहे असे २० कोट लोक ह्मणजे जगांतील लोकांच्या एक षष्ठांश आहेत. आतां, या सुधारणेविषयीं विचार करणें ह्मणजे संस्कृत भाषेत ग्रंथरूपानें आर्यांचे जे विचार प्रसिद्ध झाले आहेत त्यांविषयीं करणें आहे.

संस्कृत भाषा ही बंगाली, मराठी, टामिल वगैरे देशभाषांची जननी होय. या भाषांचा उत्कर्ष हळूहळू होत आहे, परंतु यांस अद्याप पोषणाची जरुरी आहे. हें पोषण संस्कृत भाषेपासून चांगलें होणार आहे. या भाषेचा संबंध तोडून टा-

कून स्वतंत्र रीतीनें काम चालविण्यास देशभाषांचे अंगीं सामर्थ्य नाहीं. ही स्थिति येण्यास कांहीं काळ लोटला पाहिजे.

संस्कृत भाषेंतील ग्रंथ कोठकोठें आहेत, याविषयीं माहिती मिळण्यासाठीं हिंदुस्थान सरकारानें विद्वान लोकांस ठिकठिकाणीं पाठवून माहिती आणविली. हिजवरून १०००० हस्तलेखांचा शोध लागला आहे; यांशिवाय कांहींचा नाश झाला असेल; व कांहीं अद्याप असून त्यांचा तपास लागला नसेल. यावरून संस्कृत भाषेंत ग्रंथसमूह फार असला पाहिजे. एवढा ग्रंथसमूह ग्रीक व ल्याटिन या दोन भाषामिळून सुद्धां नाहीं. आतां हे सर्व ग्रंथ चांगले आहेत असें जरी नाहीं, तरी सर्व निरुपयोगी आहेत असें ह्मणतां येत नाहीं. हे एक दोन शतकांत तयार झालेले नाहींत. हे तयार होण्यास दोन तीन हजार वर्षें लागलीं असावींत; तेव्हां संस्कृत ग्रंथांविषयीं व यामुळें आर्य सुधारणेविषयीं विचार करणें ह्मणजे, दोन तीन हजार वर्षेंपर्यंतचा जो आर्यांचा इतिहास, त्याविषयीं विचार करणें होय. हा काल हिंदुस्थानच्या इतिहासापैकीं तीन चतुर्थांश असून महत्त्वाचा आहे. या कालाविषयीं विचार न करणें हें इतिहासदृष्ट्या योग्य होणार नाहीं. दुसरें असें कीं, हिंदु लोकांची प्राचीन सुधारणा ही चांगली होती किंवा अगदींच सामान्य प्रतीची होती हा प्रश्न एकीकडे ठेविला तरी, ही गोष्ट खरी आहे कीं, पूर्वींची सुधारणा चांगली व पूर्वींचे आचार विचार चांगले, असें समजून त्यांचें अवलंबन करणारे हिंदु लोकांत फार व न करणारे अतिशय थोडे, ह्मणजे हजारांत एक देखील सांपडणें कठीण. एवढ्या जनसमूहाची व त्याचे आचार, विचार ह्यांची नुसती निर्भर्त्सना करून कार्यभाग होणार नाहीं. जुनें भांडार खुलें करून त्यांतील रत्नें कोणतीं, मोहरा कोणत्या

व खुर्दा कोणता यांची निवड करून जनसमूहाची, अथवा निदान त्यापैकीं समंजस लोकांची खात्री केल्याशिवाय कार्य होणार नाहीं. परंतु हें काम एक दोघांचें नाहीं. पुष्कळ लोक ज्या वेळेस या कामाकडे लक्ष देतील त्या वेळेस वरील हेतु सिद्धीस जाणार आहे.

संस्कृत भाषेच्या संबंधानें कित्येकांचा असा आक्षेप आहे कीं, या भाषेचा इतिहास ह्मणजे थोड्या लोकांचा इतिहास आहे; तेव्हां याविषयीं विशेष विचार करण्याचें कारण काय? यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं, ही गोष्ट फक्त आर्यसुधारणेस लागू नाहीं. वस्तुतः पाहतां जगाचा खरा इतिहास हा थोड्या व्यक्तींचा इतिहास होय. ही गोष्ट निदान एकुणिसावे शतकापर्यंत कायम होती. हजारों लोक जन्मास आले व हजारों मरण पावले; या सर्वांचा इतिहास आज कोठें उपलब्ध आहे काय? यांपैकीं सुधारणेस ज्यांनीं मदत केली आहे असे या देशांत, ग्रीस देशांत व इटली देशांत थोडेच होऊन गेले. जर ग्रीक व ल्याटिन भाषा शिकल्या पाहिजेत, तर संस्कृतही शिकली पाहिजे. ज्याप्रमाणें संस्कृत भाषेंतील ग्रंथ थोड्यांस समजतात, त्याप्रमाणें ग्रीक व ल्याटिन भाषेंतील ग्रंथही थोड्यांस समजतात.

हिंदुस्थानांतील प्राचीन ग्रंथांविषयीं व विशेषेंकरून वेद व बौद्ध कालांतील ग्रंथांविषयीं मोक्षमुलर साहेब ह्मणतात कीं "या ग्रंथांचे अभ्यासापासून एका प्रकारचें शिक्षण मिळतें; असें शिक्षण दुसरे ग्रंथापासून मिळत नाहीं. ज्यांस आपल्या भाषेचा ह्मणजे विचारांचा विकास कसकसा होत गेला, हें समजून घेण्याची इच्छा आहे; ज्यास धर्म व दंतकथा यांचा प्रादुर्भाव व यांची वृद्धि हीं कसकशीं होतात, हें समजण्याची इच्छा आहे; ज्यास ज्योतिषशास्त्र, व्याकरण, तत्त्वज्ञान, कुटुंबस्थिति वगैरे

गोष्टींचा प्रथम आरंभ कसा झाला असावा हें समजून घेण्याची इच्छा आहे, ते ग्रीक, रोमन व जर्मन ह्या भाषांतील ग्रंथांकडे जितकें लक्ष देतात, तितकेंच त्यांनीं वेदकालाचे ग्रंथांकडे द्यावें."

संस्कृत भाषेचें महत्त्व आतां कित्येक कारणांवरून कळून येऊं लागलें आहे; व जों जों या भाषेचा अभ्यास विशेष वृद्धिंगत होईल, तों तों आर्यसुधारणेचें खरें स्वरूप समजूं लागेल, व त्या सुधारणेपासून काय फायदा आहे हें कळूं लागेल.

ज्या मानानें देशांतील स्त्रियांस कमी किंवा जास्ती मान मिळत आहे, त्या मानानें त्या देशाची कमी किंवा जास्ती सुधारणा झाली आहे असें समजावें, असें प्रसिद्ध ग्ल्याडस्टन साहेबांचें ह्मणणें आहे. आतां, या अभिप्रायाप्रमाणें या देशांत स्त्रियांस मान मिळत असे किंवा नाहीं हें आपण पाहूं.

मनु ह्मणतोः—"ज्या ठिकाणीं स्त्रियांस मान मिळतो, त्या ठिकाणीं देवता संतुष्ट असतात; जेथें त्यांस मान मिळत नाहीं, तेथें सर्व क्रिया निर्फळ होतात. जो मनुष्य स्त्रियेचें रक्षण करितो, तो आपली संतति, चरित्र, कूल, आत्मा आणि स्वधर्म यांचें रक्षण करितो. अर्थसंग्रह, व्यय, स्वच्छता ठेवणें, पाकनिष्पत्ति व घरांतील सामुग्रीची देखरेख ह्या सर्व गोष्टींविषयीं स्त्रियेची योजना करावी."

---

१—यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः ॥
यत्रैतास्तु न पूज्यंते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥
मनुस्मृति. अ. ३. श्लो. ५६.

स्वां प्रसूतिं चरित्रं च कुलमात्मानमेव च ॥
स्वं च धर्मं प्रयत्नेन जायां रक्षन् स रक्षति ॥
अर्थस्य संग्रहे चैनां व्यये चैव नियोजयेत् ॥
शौचे धर्मेऽन्नपक्त्यां च पारिणाह्यस्य चेक्षणे ॥
मनु. अ. ९. श्लो. ७,११.

भारतांत[1] असें लिहिलें आहे कीं "भार्येसारखा दुसरा बंधु नाहीं, भार्येसारखी गति नाहीं, भार्येच्या सहाय्यानें जसा धर्मसंग्रह होतो तसा दुसऱ्याच्यानें होत नाहीं."

स्मृतिकाल व भारतकाल हे फार प्राचीन असें कदाचित् कित्येक ह्मणतील; ह्मणून या नंतर काय स्थिति होती याचा आपण विचार करूं. वराहमिहिर ह्यांनीं बृहत्संहिता या नांवाचा ग्रंथ केला आहे. हा पुष्कळ लोकांचे पाहण्यांत आला असेल; हा वरील कालानंतर झाला आहे याबद्दल वाद नाहीं. ह्यांत असें लिहिलें आहे कीं:—

"पुरुषांस[2] आनंदकारक असें स्त्रियांहून दुसरें रत्न ब्रह्मदेवानें निर्माण केलें नाहीं; स्त्रियांच्या सहाय्यानें धर्म व अर्थ प्राप्त होतात; त्यांपासून पुत्र प्राप्त होतो; त्या गृहामध्यें लक्ष्मीस्वरूप होत; यास्तव त्या सत्कार व ऐश्वर्य यांस पात्र आहेत.

जे[3] विरक्त होत्साते स्त्रियांचे गुण सोडून त्यांतील दोष मात्र

---

१–नास्ति भार्यासमो बंधुर्नास्ति भार्यासमा गतिः ॥
नास्ति भार्यासमो लोके सहायो धर्मसंग्रहे ॥

भारत.

२–श्रुतं दृष्टं स्पृष्टं स्मृतमपि नृणां ल्हादजननम् ॥
न रत्नं स्त्रीभ्योन्यत्क्वचिदपि कृतं लोकपतिना ॥
तदर्थं धर्मार्थौ सुतविषयसौख्यानि च ततो ॥
गृहे लक्ष्म्यो मान्याः सततमबला मानविभवैः ॥

बृहत्संहिता अ. ७४. श्लो. ४.

३– येप्यंगनानां प्रवदंति दोषान् ॥
वैराग्यमार्गेण गुणान् विहाय ॥
ते दुर्जना मे मनसो वितर्कः ॥
सद्भाववाक्यानि न तानि तेषाम् ॥

बृह. अ. ७४ श्लो. ५.

काढतात ते दुर्जन होत, असा माझ्या मनाचा निश्चय आहे; हीं त्यांचीं भाषणें सत्य नव्हत.

[1]ज्या गृहांत स्त्रियांस मान मिळत नाहीं, तीं घरें महामारीनें व्यापल्यासारखीं सर्वत्र नाश पावतात.

[2]स्त्रीपुरुषांस व्यभिचाराचा दोष शास्त्रांत सारखाच सांगितला आहे; पुरुष हा दोष विशेष मानीत नाहींत; स्त्रिया मानतात; ह्मणून खरोखर विचार केला असतां स्त्रियाच श्रेष्ठ आहेत.

[3]निष्पाप स्त्रियांची निंदा करण्याऱ्या पुरूषांचें केवढें धारिष्ट आहे! चोर एखाद्या मनुष्याचे घरीं चोरी करावयास जाऊन उलट त्यासच "चोरा उभा रहा" असें ह्मणत असतां, त्याचें जितकें धारिष्ट तितकेंच ह्या पुरुषांचें होय."

वरील वचनांवरून स्त्रियांविषयीं प्राचीन आर्यांचे विचार कसे होते हें साधारण रीत्या लक्षांत येईल; परंतु या देशावर मुसलमान लोकांची सत्ता झाल्यापासून ज्याप्रमाणें इतर कांहीं गोष्टींत बदल झाला, त्याप्रमाणें स्त्रियांचे स्थितींतही बदल झाला. मुसलमानांचे अनुकरणानें कांहीं ठिकाणीं गोषा सुरू होऊन स्त्रियांस विशेष प्रतिबंध होऊं लागला. अविवाहित मुलींस मुसलमान लोक जबरीनें नेतात असा समज असल्यामुळें

---

१–जामयो यानि गेहानि शपंत्यप्रतिपूजिताः ॥
तानि कृत्याहतानीव विनश्यंति समंततः ॥
अ. ७४ श्लो. १०.

२–दंपत्योर्व्युत्क्रमे दोषः समः शास्त्रे प्रतिष्ठितः ॥
नरा न तमवेक्षंते तेनात्र वरमंगनाः ॥
अ. ७४. श्लो. १२.

३–अहो धार्ष्ट्यमसाधूनां निंदतामनघाः स्त्रियः ॥
मुष्णतामिव चौराणां तिष्ठ चौरेति जल्पतां ॥
बृहत्संहिता अ. ७४.

लोक आपल्या मुलींचीं लवकर लग्नें करीत; व यामुळें अल्पवयांत लग्नें करण्याचा प्रघात पडला असावा. मुसलमानी अंमल हा विशेषेंकरून उत्तर हिंदुस्थानांत फार दिवस असल्यामुळें, स्त्रियांचे हीन स्थितीचा प्रकार जितका तेथें दृष्टीस पडतो, तितका महाराष्ट्र वगैरे ठिकाणीं दृष्टीस पडत नाहीं. स्त्रियांचें स्वातंत्र्य कमी झालें, तें त्यांच्या पातिव्रत्याचा भंग होईल या भीतीनें झालें. त्यांच्या पातिव्रत्याचा भंग होणें कोणत्या शाहाण्या पुरुषांस आवडेल ? हा भंग न व्हावा ह्मणून आपल्या समजुतीप्रमाणें जे जे योग्य उपाय आहेत ते ते करण्यास लोक प्रवृत्त होणार नाहींत काय ? परंतु याबद्दल त्यांस व त्यांबरोबर त्यांचे वाडवडिलांसही दोष देणें प्रमाद होणार नाहीं काय ? सुदैवानें सांप्रत वर सांगितलेली भीति बाळगण्याचें कारण राहिलें नाहीं. आतां पूर्वींप्रमाणें, किंबहुना अधिक स्वातंत्र्य स्त्रियांस मिळण्याचीं चिन्हें दिसत आहेत. या विषयाकडे लोकांचें बरेंच लक्ष लागत चाललें आहे. राष्ट्राचे विचार अथवा राष्ट्रीय चाली हीं एक दोन दिवसांत बनत नाहींत. त्याच प्रमाणें त्यांत बदल एक दोन दिवसांत होत नाहीं. अशा बाबतींत विशेष उतावीळपणा व घाई केली असतां इष्ट कार्य होत नाहीं. सुधारणेची दिशा बरोबर आहे किंवा नाहीं हें पाहून, सावकाश परंतु स्थिरपणें चालणें परिणामीं श्रेयस्कर असतें. दुसरे लोकांनीं जरी पुष्कळ ओरड केली, तरी तिजकडे जितकें लक्ष देणें योग्य आहे तितकेंच दिलें पाहिजे.

धर्म व नीति यांविषयीं लोकांचे विचार कसे आहेत, हें समजलें असतां, सुधारणेचें मान कसें होतें हें समजतें. हे विचार खालीं दिलेल्या अवतरणांवरून कळून येतील.

धर्म नष्ट झाला असतां आपला नाश होतो; धर्माचें संरक्षण केलें असतां आपलें नित्य संरक्षण होतें; ह्मणून धर्महानि करूं नये.

[1]धर्म हाच एकटा खरा मित्र आहे; हा मरणानंतरही आपले-बरोबर येणारा आहे; बाकी सर्व शरीराबरोबर नाश पावणारें आहे; ह्मणून मोहास गुंतून धर्महानि होऊं देऊं नये.

[2]आईबाप हे परलोकीं सहाय्य करणारे नाहींत; मुलगा, बायको, व ज्ञाति, यांतून कोणीही सहाय्य करणारा नाहीं; धर्म मात्र सहाय्य करणारा आहे.

[3]प्राणी एकटाच उत्पन्न होतो, तो एकटाच लय पावतो व पापपुण्याचें फल तो एकटाच भोगतो, ह्मणून आईबाप अथवा बांधव यांचेकरितांही धर्मत्याग करूं नये.

जी स्त्री[4] काया वाचा मनेंकरून व्यभिचार करीत नाहीं, ती [5]ईहलोकीं कीर्ति पावते, व आपल्या पतीसह उत्तम लोकाप्रत जाते.

हे [6]पार्था तूं आपलें कर्तव्यकर्म लोभ मनांत न धरितां नेहमीं करीत जा. जो पुरुष कांहीं आशा न धरून आपलें कर्तव्य कर्म करितो, त्यास उत्तम लोक प्राप्त होतो.

---

१–धर्म एव हतो हंति धर्मो रक्षति रक्षितः ॥
तस्माद्धर्मो न हंतव्यो मा नो धर्मोऽहतोऽवधीत् ॥ १५ ॥
एक एव सुहृद्धर्मो निधनेऽप्यनुयाति यः ॥
शरीरेण समं नाशं सर्वमन्यद्धि गच्छति ॥ १७ ॥
मनुस्मृति. अ. ८.

२–नामुत्र हि सहायार्थे पिता माता च तिष्ठतः ॥
न पुत्रदारा न ज्ञातिर्धर्मस्तिष्ठति केवलः ॥ २३९ ॥
मनु. अध्याय ४.

३–मनु. अ. ४ श्लो. २४०.
४–मनु. अ. ५ श्लो. १६५.
५–मनु. अ. ५ श्लो. १६६.
६–तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ॥
असक्तो ह्याचरन् कर्म परमाप्नोति पूरुषः ॥ १९ ॥
भग. गीता. अ. ३.

हे अर्जुना[1], ज्याप्रमाणें प्रदीप्त झालेला अग्नि हा इंधनाची रक्षा करून सोडतो, त्याप्रमाणें ज्ञानाग्नि हा सर्व वाईट कर्मांचा नाश करितो. या जगांत[2] ज्ञानासारखें शुद्ध करणारें कोणीही नाहीं.

मित्र[3], परिचित, शत्रु, उदासीन, तिऱ्हाईत, द्वेष करण्यास पात्र, बंधु, साधु किंवा पापी या सर्वांविषयीं ज्याची समबुद्धि असते तो श्रेष्ठ होय.

जो कोणत्याही प्राण्याचा द्वेष करीत नाहीं; जो सर्वांशीं मित्रभावानें व दयाळुपणानें वागतो; जो माझें माझें असें ह्मणणारा किंवा लोभी नाहीं; ज्यास अहंकार नाहीं; सुखदुःखांत ज्याचें वर्तन सारखें असतें; ज्याचे अंगीं क्षमा असते; जो संतुष्ट असतो; जो सतत भक्ति करितो; ज्यानें इंद्रियनिग्रह केला आहे; जो दृढनिश्चयाचा आहे; ज्याचें मन व बुद्धि हीं माझे ठायीं रत झालीं आहेत; जो माझी भक्ति करितो; जो हर्ष, द्वेष, भय यांपासून मुक्त आहे; ज्यास कांहीं अपेक्षा नाहीं; जो शुचिर्भूत आहे; जो दक्ष आहे; शुभाशुभाचें ज्याला कांहीं वाटत नाहीं;

---

१–भगवद्गीता अध्याय ४ श्लोक. ३७

२– न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

भगवद्गीता. अ. ४ श्लो. ३८.

ज्ञानमाहात्म्याविषयीं रामदास म्हणतातः—

ज्ञानाविण जे जे कळा ॥ ते ते जाणावी अवकळा ॥
ऐसें भगवंत बोलिला ॥ चित्त द्यावें त्याच्या बोला ॥

३–भग. गीता. अ. ६ श्लोक ९.

४–भग. गीता. अ. १२ श्लोक १३—२०.

दया क्षमा शांति ॥ तेथें देवाची वसती ॥ तुका०

दीनाचा दयाळू मनाचा मवाळू ॥ स्नेहाळू कृपाळू जगीं दासपाळू ॥
जया अंतरीं भाव संताप कैचा ॥ जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

रामदासश्लोक.

जो मानापमानाविषयीं सम असतो; ज्यास निंदा व स्तुति हीं सारखीं असतात; ज्याची मति स्थिर असते, तो मला प्रिय आहे. वर हें जें परमामृत सांगितलें, त्याचें सेवन करून जो माझे ठायीं विश्वास ठेवितो, माझ्याविषयीं तत्पर असतो व माझी भक्ति करितो, तो तर मला फार प्रिय आहे.

अ[1]भय, स्वतःची संशुद्धि, दान, दम, स्वाध्याय, आर्जव, अहिंसा, सत्य, अक्रोध, शांति पैशून्याभाव, सर्व भूतांचे ठायीं दया, क्षमा, अद्रोह व धैर्य हे दैवी स्थितींत ज्यांचा जन्म झाला आहे, त्यांचे गुण आहेत.

अ[2]र्जुना, ज्याणें हें सर्व जग निर्माण केलें, तें अविनाशि आहे, असें तूं समज; अव्यय जें हें, त्याचा नाश कोणासही करितां येत नाहीं. यास ज[3]न्म नाहीं; हा नित्य, शाश्वत, पुराण असा आहे; शरीर मृत झालें असतां हा नाश पावत नाहीं. अव्यय व अनुत्तम असा जो माझा उत्तम भाव, तो न समजून, मी

---

१–भगवद्गीता अध्याय १६ श्लोक १–३

२–अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ॥
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥
भग. गीता अ. २

३–न जायते म्रियते वा कदाचित् ॥
नायं भूत्वा भविता वा न भूयः ॥
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो ॥
न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ २० ॥ भगवद्गीता अ. २
अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते मामबुद्धयः ॥
परं भावमजानंतो ममाव्ययमनुत्तमम् ॥ २४ ॥ अध्याय ७
नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ॥
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ २५ अ. ७
वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ॥
भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥ २६ ॥ अ. ७

अव्यक्त असतां अज्ञान लोक मी व्यक्त आहें असें मला मानितात. योगमायेनें आवृत्त जो मी, तो सर्वांस दृष्टिगोचर नाहीं. मी अज व अव्यय आहें; मला मूर्ख जन जाणत नाहींत. भूत, वर्तमान व भविष्य या काळचे प्राण्यांविषयीं मला माहिती आहे; मला मात्र कोणीही जाणत नाहीं.

मी [1]सर्व भूतांस सारखा आहें, मला द्वेष्य (ज्याचा मी द्वेष करावा) किंवा प्रिय असा कोणी नाहीं. जे भक्तिपुरःसर माझी आराधना करितात, ते माझे ठायीं वास करितात व मी त्यांचे ठायीं वास करितों. अति[2]शय जरी दुराचारी मनुष्य असला, तरी तो जर माझी अनन्यभावें भक्ति करीत आहे, तर तो साधु आहे असें समजावें, कारण त्यानें मला बरोबर रीतीनें ओळखिलें.

---

१–समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ॥
ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ २९ ॥
भग. गीता अ. ९

भक्तीनें मुक्ति साध्य होते, असा ज्ञानदेव, तुकाराम, रामदास वगैरे साधूंनीं उपदेश केलेला आहे:—

भावेंविण भक्ति, भक्तीविण मुक्ती ॥
बळेंवीण शक्ती बोलों नये ॥ ज्ञानदेव

भावचि कारण भावचि तारण ॥ मोक्षाचें साधन बोलियेलें ॥
तुकाराम.

रामदास सांगे खूण ॥ भक्तीवीण सर्व शीण ॥
रामदास.

२–अपिचेत् सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ॥
साधुरेव स मंतव्यः सम्यक् व्यवसितो हि सः ॥ ३० ॥
गीता अ. ९

या जगांत सत्य हा धर्माचा पाया आहे; सत्य हें धर्माचें मूळ होय; सत्य हें मुख्य तत्त्व आहे; सत्यावर श्री अवलंबून आहे; सत्य श्रेष्ठ आहे.

जे लोक पापाचेठायीं रत, ज्यांचेठायीं दया व धर्म हीं वास करीत नाहींत, जे दुष्टांची संगत धरितात, जे सच्छास्त्र व सत्संगति यांपासून पराङ्मुख असतात, ते नरकाप्रत जातात; जे ज्ञानशील आहेत, त्यांस चांगली गति प्राप्त होते; जे पापी आहेत, त्यांस यमयातना प्राप्त होते.

जे कर्ज फेडीत नाहींत, जे ठेव ठेविली असतां तिचा अपहार करितात, जे विश्वासघातकी आहेत, जे दोष ग्रहण करितात, जे गुणी लोकांचा मत्सर करितात, जे नीचावर प्रीति करितात, जे सज्जन, सत्कर्म, गुरु व देव यांची निंदा करणारे

---

१–धर्मः सत्यपरो लोके मूलं धर्मस्य तत्वता ॥
सत्यमेवेश्वरो लोके सत्ये श्रीर्नियतं स्थिता ॥
सर्वे सत्यप्रतिष्ठानं तस्मात् सत्यपरो भवेत् ॥
रामायण. अ. २. श्लोक. १३–१४.

सत्याचे संबंधानें तुकारामबावा म्हणतातः—
तुका म्हणे सत्य सांगे ॥ येोत रागें येती ते ॥

मुक्तेश्वर म्हणतातः—
सत्यापरता नाहीं धर्म ॥ सत्य तेंचि परब्रह्म ॥
सत्यापाशीं पुरुषोत्तम ॥ सर्व काळीं तिष्ठत ॥
असत्य तेंचि पैं पातक ॥ असत्य तोचि महानरक ॥
असत्याचेनि संगें दुःख ॥ अनंत जन्म भोगिती ॥ दुष्यंतश० आख्यान.
सत्य सन्मार्गे वर्तितां नर ॥ त्याचा कैवारी जगदीश्वर ॥
त्याचें कार्य सारङ्गधर ॥ आपण आंगें संपादी ॥ मुक्ते० द्रौ० वस्त्रहरण.

२–गरुडपुराण अध्याय १ श्लोक १४.

३–गरुडपुराण अध्याय १ श्लोक १७.

४–गरुडपुराण अध्याय ४ श्लोक ७–१०.

आहेत, जे दुःखितांस पाहून हर्ष पावतात, अथवा हर्षितांस दुःख देतात, जे दुष्ट भाषण करितात, अथवा ज्यांचें मन दुष्ट आहे ते वैतरणीप्रत जातात.[1]

जे मातापितरांचा अथवा गुरूंचा अपमान करितात, जे पतिव्रता, सुशील, कुलीन, विनययुक्त अशा स्त्रीचा द्वेषानें त्याग करितात, ते वैतरणींत पडतात.

जे अनाथांवर दया करीत नाहींत, जे साधु लोकांचा द्वेष करितात, अथवा जे अपराधावांचून दंड करितात, ते नरकाप्रत जातात.[2]

हिंदुसुधारणेचा विषय फारच लांबला; परंतु हिंदुसुधारणेविषयींचा प्रश्न हा वादग्रस्त असल्यामुळें, याविषयीं यथार्थ विचार करणें जरूर होय. हिंदु लोक नादान व त्यांची सुधारणा नादान, असें ह्मणणारे फक्त परदेशस्थांत सांपडतात असें नाहीं, तर अलीकडील आमच्यांतील कांहीं विद्वानांचाही असाच ग्रह झाला आहे. त्यांनीं शोधक व निःपक्षपाती पाश्चात्य पंडितांचें काय मत आहे, याविषयीं विचार करून व स्वतः कांहीं ग्रंथावलोकन करून अभिप्राय देणें योग्य आहे. हिंदुस्थानाची सुधारणा कळसास जाऊन पोंहोंचली होती, कोणतीही गोष्ट करावयाची राहिली नव्हती, नवीन सुधारणा व नवीन कल्पना या सर्व आमच्या शास्त्रांत आहेत, असें आमचें बिलकूल मत नाहीं. हें मत अगदीं पोरकट आहे असें आह्मी समजतों. आर्यांस पुष्कळ गोष्टींत सुधारणा करावयाची राहिली होती. धर्म व नीति यांत त्यांस प्राचीन राष्ट्रांपैकीं कोणत्याही राष्ट्रानें मागें सारिलें नाहीं. परंतु राज्यव्यवहार, वक्तृत्व, शिल्पकला वगैरे गोष्टींत ग्रीक व रोमन लोकांचें पाऊल पुढें होतें. आर्यांची जी सुधारणा झाली होती, ती युरोपांतील हल्लींचे सुधारणेशीं ताडून

१–गरुडपुराण अध्याय ४ श्लोक १४–१५.
२–गरुडपुराण अध्याय ४ श्लोक ४५.

पाहतां बरीच कमी होती, हें जरी खरें आहे, तरी, प्राचीनकालीं समकालीन ज्या दुसऱ्या सुधारणा होत्या, त्यांमध्यें स्थूलदृष्ट्या हिंदुसुधारणेचें पाऊल पुढें होतें; व शें दोनशें वर्षीपूर्वी इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांत जी सुधारणा होती, तिशीं ती बरोबरी करणारी होती, असें ह्मणण्याचा आमचा हेतु आहे.

हिंदुस्थान देश सुधारलेला होता ही गोष्ट निर्विवाद आहे; व जी सुधारणा झाली होती, ती लयास जाऊन लोक निकृष्ट अवस्थेप्रत पावले होते, हीही गोष्ट निर्विवाद आहे. या देशांत सुधारणेस सहाय्यकारी जशा गोष्टी आहेत, तशा दुसऱ्या थोड्याच देशांत आहेत. या देशांत व्यापाराचीं जशीं साधनें आहेत, तशीं दुसऱ्या थोड्याच देशांत आहेत. असें असतां, या साधनांचा ज्यांनीं कमी फायदा करून घेतला आहे, असें जगाचे इतिहासांत हिंदु लोकांशिवाय दुसरे सुधारलेले लोकांचें उदाहरण मिळणें कठीण. असो. ज्या प्रश्नाविषयीं प्रस्तुत आपणास विचार करावयाचा आहे, तो प्रश्न असा आहे कीं, सृष्टपदार्थविषयक नियमांचे अनुकूलतेमुळें हिंदुस्थानांत सुधारणा कशी झाली व ही सुधारणा लयास जाण्यास हे नियम कितपत कारणीभूत होते. या विषयाचा विचार महत्त्वाचा असून, त्याकडे जितकें लक्ष देणें इष्ट आहे, तितकें दिलेलें नाहीं; व या विषयाविषयीं कोठें सविस्तर विचार केलेला आढळून येत नाहीं. वरील दोन गोष्टींपैकीं पहिले गोष्टीविषयीं वाद नाहीं; परंतु ज्या कारणांमुळें सुधारणा लयास गेली, त्या कारणांविषयीं बराच मतभेद दिसून येतो. कोणी[1] ह्मणतात कीं, हिंदु लोक हे जुलमानें फार दिवस गांजल्यामुळें, त्यांच्यांतील स्वतंत्रतादि गुण नाहींसे होऊन, त्यांचें राज्य व त्यांची सु-

---

१–ब्राईसकृत हिंदुस्थानचा इतिहास. पृ० २६.

धारणा हीं लयास गेलीं. कित्येक ह्मणतात कीं, जातिभेदामुळें हिंदुस्थानास निकृष्ट स्थिति प्राप्त झाली. कित्येकांचें ह्मणणें कीं, मूर्तिपूजेमुळें ही दुर्दशा प्राप्त झाली. तात्पर्य, निरनिराळे ग्रंथकारांचे निरनिराळे तर्क दिसून येतात. वर जीं निरनिराळीं कारणें सांगितलीं, त्यांपासून या देशाचें अहित झालें नाहीं असें नाहीं; परंतु आमचे मतें हीं कारणें नव्हेत. हीं कार्यें होत. कारण, जुलूम, जातिभेद व मूर्तिपूजा हीं कांहीं विशेष कारणें अथवा विशेष स्थिति असेल तर सुरू असतात. हीं तरी कां उत्पन्न व्हावीं ? ज्याप्रमाणें आह्मी राजांचे जुलमानें गांजलों होतों, त्याप्रमाणें इतर कांहीं लोकही जुलमानें गांजले होते. इतर कांहीं लोकही पूर्वीं मूर्तिपूजक होते. हिंदुस्थानांतील लोक सुधारलेले होते या गोष्टीबद्दल वाद नाहीं. जर अशी स्थिति होती, तर, इतर कांहीं लोकांचे अगोदर येथील जुलूम कमी व्हावा; जातिभेद मोडून जावा; व मूर्तिपूजा नाहींशी व्हावी. असें न होतां, या तिन्ही गोष्टी कायम राहिल्या; याचें कारण काय ? लोकांस मूर्तिपूजा, जुलूम व जातिभेद हीं मोडण्यास इच्छा कां होऊं नये ? व त्यांनीं तीं मोडण्याविषयीं जेवढा प्रयत्न करणें इष्ट आहे, तेवढा प्रयत्न कां करूं नये ? इतर कांहीं राष्ट्रांची सुधारणा मागाहून होऊं लागली असतां, त्यांच्यांतील जुलूम, जातिभेद व मूर्तिपूजा हीं उत्तरोत्तर कमी होत गेलीं; हिंदु लोक सुधारलेले असून त्यांच्यांतील या तीन गोष्टी कमी झाल्या नाहींत; यावरून हें उघड आहे कीं, या देशांत ज्या कारणामुळें जुलूम, जातिभेद व मूर्तिपूजा हीं उत्पन्न होऊन कायम राहिलीं तीं कारणें, व इतर देशांत ज्या कारणांमुळें या तीन गोष्टी उत्पन्न झाल्या, तीं कारणें निराळीं असलीं पाहिजेत; किंवा इतर देशांपेक्षां या देशांत या कारणांचा विशेष

जोर असला पाहिजे. जुलूम, जातिभेद व मूर्तिपूजा यांस कशाचें तरी पाठबळ असलें पाहिजे. या देशांत जुलूम, मूर्तिपूजा व जातिभेद यांस कशाचें पाठबळ होतें व हीं कां जोरावलीं असा प्रश्न उत्पन्न होतो; व या प्रश्नाविषयीं विचार करणें अवश्य आहे. जेथून प्रवाह उत्पन्न होतो, तेथें शोध करून तजवीज न करितां, प्रवाहाचे मध्यंतरींच तो बंद करण्याविषयीं तजवीज केली तर इष्ट कार्य होणार नाहीं; कदाचित् झालेंच तर कांहीं दिवस मात्र फलप्राप्ति होईल. परंतु प्रवाह जोरावला ह्मणजे, जो यत्न केला असेल, तो निष्फल होईल. याविषयीं खुलासा पुढें होणार आहे; ह्मणून याविषयीं येथें विचार करण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानची सुधारणा ही सृष्टपदार्थविषयक कारणांमुळें कशी झाली, व ही लयास जाण्यास हीं कारणें बरेच अंशीं कशीं सहाय्यभूत झालीं, याविषयीं आपण विचार करूं.

धनसंचयाविषयीं स्थूल विचार करीत असतां, आह्मीं पहिले भागांत सांगितलेंच आहे कीं, धनसंचय असल्याशिवाय कोणत्याही देशाची सुधारणा होत नाहीं; कारण, सुधारणेस ज्ञानाची आवश्यकता असते; ज्ञान संपादन करण्यास सवड असावी लागते; निर्वाहाची तजवीज असल्याखेरीज सवड सांपडणें कठीण असतें; निर्वाहाची योजना धनाशिवाय होत नाहीं; ह्मणून सुधारणेस प्रधान कारण धनसंचय हें होय. शिवाय, पहिले भागांत आह्मीं असें सांगितलें आहे कीं, धनसंचय हा उत्साहपूर्वक व नियमित रीतीनें श्रम करण्यामुळें, किंवा सृष्टपदार्थांचे विपुलतेमुळें श्रमाबद्दल जें फल मिळतें, त्यावर अवलंबून असतो. हवेचें मान चांगलें असेल तर उत्साहपूर्वक श्रम होतात. हिंदुस्थानांत जो धनसंचय झाला, तो सृष्टपदार्थांचे विपुलतेमुळें झाला. हें सर्वांस माहीत आहे कीं, हिंदुस्थान देश हा प्राचीन काला-

पासून सुपीकतेबद्दल प्रसिद्ध आहे. ब्रेझील देशाशिवाय अथवा कदाचित् चीन देशाशिवाय पृथ्वीचे पाठीवर जे देश आहेत, त्यांपेक्षां हिंदुस्थानची जमीन सुपीक आहे. कित्येक जमिनींत वर्षांतून तीन तीन पिकें काढावयास सांडतात. गंगा नदीनें जो प्रदेश भिजलेला आहे तो सर्वांत सुपीक आहे. या प्रदेशाची अशी ख्याती सांगतात कीं, या प्रदेशांत कांहीं ठिकाणीं तांदुळाचे एका दाण्यापासून शेरभर तांदूळ उत्पन्न होतात. ही कदाचित् अतिशयोक्ति असेल; परंतु हा प्रदेश अतिशय सुपीक आहे याविषयीं वाद नाहीं. तापीकांठही फार सुपीक आहे. या कांठचे प्रदेशांत कित्येक कुळें अशीं दृष्टीस पडतात कीं, त्यांस दरसाल २०० माप ह्मणजे ४०० पल्ले धान्य मिळून शिवाय कपाशी होते. गंगथडी व भिमथडी या प्रदेशांत कांहीं जमिनी अशा आहेत कीं, शेतकऱ्यानें तीन चार महिने श्रम केले असतां, तीन चार वर्षें त्याचे व त्याचे मुला लेंकरांचें पोषण चांगले प्रकारें होईल इतकें पीक उत्पन्न होतें. या प्रदेशांत तीन किंवा चार वर्षांनीं एकदां चांगला पाऊस पडतो; व पाऊस एकदां चांगला पडला ह्मणजे, तीन चार वर्षेंपर्यंत बघावयाला नको, अशी स्थिति असते. हिंदुस्थानची जमीन सुपीक आहे असें आह्मीं ह्मटलें, यावरून हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रदेश सुपीक आहे असें नाहीं. मुलतानपासून ठठ्ठापर्यंत खडकाळ डोंगर आहेत. बिकनेर, जोधपूर, जसलमीर व रण[3] हे वालुकामय प्रदेश आहेत. रुद्रपूर व अलमोरा यांचे दरम्यान कांहीं वैराण मुलूख आहे.

१–एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास.

२–थामस मारिसकृत हिंदु०इति०भाग. १. पुस्तक. १. पृ०२७२.

३–रणचें क्षेत्रफळ ६५०० चौरस मैल आहे. याची रुंदी ५ पासून ८० मैल आहे.

उत्तरेकडील प्रदेशांत कोठें कोठें मैदानें आहेत. नद्यांच्या मुखांजवळील भाग हा पाणथळ आहे. सातपुड्याच्या पायथ्याशीं ज्या जमिनी आहेत त्या भिकार आहेत. आह्मीं जें सुपीकतेचें मान सांगितलें, तें स्थूल मान होय. वर जे प्रदेश सांगितले त्यांशिवाय बाकीच्या बहुतेक ठिकाणीं हिरवीचार कुरणें, मैदानें व शेतें दृष्टीस पडतात. हिंदुस्थानचे ज्या प्रदेशांत सुधारणेचें बीज प्रथम रुतून त्याचा वृक्ष बनला, तो प्रदेश अतिशय सुपीक आहे.

हिंदुस्थानची जमीन सुपीक असल्यामुळें अर्थातच धनाचा संचय उत्तरोत्तर होत गेला; व जसजसा धनसंचय होऊं लागला, तसतसें अवशिष्ट संचयावर निर्वाह करावयास सांपडून, मानसिक श्रम करण्यास सवड सांपडूं लागली. तेव्हां हिंदुस्थानांत जी सुधारणा झाली, तीस मूळ साधन मुख्यत्वेंकरून जमिनीची सुपीकता होय. जर हिंदुस्थानची जमीन सुपीक नसती, तर, धनसंचय करण्यास फार आयास पडले असते; शारीर श्रमांचा परिहार करण्यासाठीं विश्रांति घ्यावयास सांपडून मानसिक श्रम करण्यास सवड सांपडणें कठीण असतें; व जी सुधारणा दृष्टीस पडली ती दिसण्याचा संभव कमी होता.

हिंदुस्थान देशाचा बहुतेक भाग हा उष्ण कटिबंधांत असल्यामुळें येथील हवा उष्ण आहे. युरोप खंडांतील हवेशीं येथील हवेची तुलना करून पाहतां, या देशांतील उष्णतेचें मान फारच आहे. दक्षिण हिंदुस्थानांतील कांहीं प्रदेशांत जें थंडीचें मान, तें युरोपांतील उष्णतेचें साधारण मान; व थंडीचे दिवसांत जें दुपारीं उष्णतेचें मान, तें इंग्लंड वगैरे देशांत उन्हाळ्यांतील उष्णतेचें मान. हिंदुस्थानची हवा उष्ण आहे असें आह्मीं ह्मटलें, यावरून सर्व ठिकाणीं हवेचें मान उष्ण आहे

---

१–एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास. पृ० ४.

असें नाहीं. कित्येक ठिकाणीं हवेमध्यें पुष्कळ फरक दृष्टीस पडतो. उत्तर हिंदुस्थानचे पश्चिमेस जें मोठें[१] रान आहे त्यांत, अथवा उत्तर सरकार्स, कर्नाटक, व दक्षिणेकडील[२] दुसरे कांहीं प्रदेश, जे समुद्राचे पृष्ठभागापासून थोड्या उंचीवर आहेत,[४] त्यांत उष्णता फारच तीव्र[३] असते. अशी उष्णता इतर ठिकाणीं नसते. परंतु तासिसूदन एथें उन्हाळ्यांत जें उष्णतेचें मान तें बंगाल्यांत हिंवाळ्याचें मान. टेंकड्यावरील प्रदेशांत व महाराष्ट्र व ह्मैसूर यांसारखे उंचवट्याचे मैदानावरील प्रदेशांत हवा गरम असते. सिमला, महाबळेश्वर, उत्तेकमंड, श्रीनगर, काश्मीर अथवा पेशावर ह्या सारखीं जीं स्थलें समुद्राचे पृष्ठभागापासून सुमारें ७००० फूट उंचीवर आहेत, त्या ठिकाणीं हवा थंड असते. दिल्ली[५] वगैरे ठिकाणीं थंडी इतकी असते कीं, केव्हां

---

१–एक्स्ट्राक्ट टू इलस्ट्रेट जिआग्रफी, हिस्टरी, आग्रिकल्चर आफ् ब्रिटिश इंडिया. पृ० ७८.

एल्फिन्स्टन साहेब या रानांतून सरकारी वकील मंडळी बरोबर जात असतां, त्यांस पारा ११२° वर होता असें दिसून आलें; अकबर बादशाहाचा बाप हुमायून हा या रानांतून जात असतां, त्याचे बहुतेक लोक उन्हानें व तान्हेनें मेले.

२–समुद्राचे पृष्ठभागापासून त्रिचिनापल्ली २५० फूट उंच आहे. गंतूरचा प्रदेश ५० फूट उंच आहे.

३–सरकार्सविषयीं हेन साहेब असें सांगतो कीं, ज्या वेळेस मी सन १७९९ त येथें होतों, त्या वेळेस मध्यरात्रीं पारा १०८° वर होता; व सकाळचे आठ वाजतां ११२° वर होता.

४–हे प्रदेश समुद्राचे पृष्ठभागापासून २००० फुटांपेक्षां अधिक उंच आहेत. म्हैसूर प्रांतांपैकीं बंगलूर व नंदिदुर्ग हे ३००० फूट उंच आहेत. श्रीरंगपट्टण हें २४०० फूट उंच आहे.

५–हवेचें मान ज्या अंशावर असतां पाणी गोठावयास लागतें, त्यापेक्षां कमी अंशावर सुद्धां थंडीचे दिवसांत केव्हां केव्हां हवेचें मान दिल्लीस असतें. या ठिकाणीं एकदां तीन दिवस थंडी इतकी होती कीं, तिजमुळें पाण्यानें भरलेलीं पितळेचीं भांडीं फुटून गेलीं.

केव्हां तळीं गोठून जातात. आह्मीं उष्णतेचें मान सांगितलें तें स्थूल मान होय. हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत उष्णता तीन महिने तर फारच प्रखर असते. जमिनींतून वाफा चालतात; उष्ण वारा वाहत असतो; धुळीचा लोळ उंच जातो; झरे व ओढे कोरडे पडतात; कित्येक नद्यांचें पाणी आटून जातें; प्रवाशी तान्हेनें बेजार होतात; व दुपारीं बाहेर पडणें ह्मणजे मानेवर गोणी दिल्यासारखें वाटतें. कित्येक ठिकाणीं रात्रीं गच्चीवर अथवा माळवदावर बसून घटका दोन घटका पाठ गार केल्याशिवाय, अथवा वाळवंटांत लोळत पडल्याशिवाय झोंप येणें मुष्कील पडतें. अंगांतून घामाच्या धारा चालणें, घसा कोरडा होऊन पाण्याचा शोष लागणें, अंगाला घामगलंडीं येणें, या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी पुष्कळ लोकांस व विशेषेंकरून बंगाल, काशीकडील मुलूख, माळवा, खानदेश, बडोद्याकडील प्रदेश, व कर्नाटक येथील लोकांस थोड्याबहुत अनुभवास येत असतील; ह्मणून याविषयीं विशेष खुलासा करण्याचें कारण नाहीं.

या देशाची हवा उष्ण असल्यामुळें, ज्या अन्नांत अंगारवायूचा विशेष अंश असतो, तें अन्न खाण्याचा प्रघात नसून, ज्या अन्नांत प्राणवायूचा विशेष अंश असतो, तें अन्न खाण्याचा या देशांतील लोकांचा प्रघात आहे; ह्मणजे येथील बहुतेक लोक पशुपक्ष्यांचे मांसावर निर्वाह करीत नसून, धान्यावर व वनस्पतींवर निर्वाह करितात. प्राणवायुयुक्त अन्न मिळविण्यास व पचविण्यास जे श्रम लागतात, त्यांपेक्षां अंगारवायुयुक्त अन्न मिळविण्यास व पचविण्यास जास्ती श्रम लागतात, हें मागील भागांत सांगितलेंच आहे. हा देश सुपीक असल्यामुळें, थोड्या श्रमानें विपुल अन्नसामुग्री मिळे. या देशांतील लोकांचें खाण्याचें धान्य मुख्यत्वें तांदूळ होतें. ज्वारी अथवा बाजरी खाण्याचा

प्रघात अलीकडे पडला असावा. हा प्रघात विशेषेंकरून देशावर आढळतो. महाराष्ट्र व कर्नाटक प्रांतांत फार करून चांगल्या स्थितींत असणारे लोक तांदूळ खातात. बंगाल्यांत गरीब लोक देखील तांदूळ खातात. ज्वारी व बाजरी ह्यांविषयीं प्राचीन ग्रंथांत कोठें उल्लेख केलेला दिसून येत नाहीं. तांदुळांविषयींच लेख आढळतात.

कांहीं लोकांचें असें मत आहे कीं, आर्य हे मांसभक्षक होते. कांहीं आर्य मांस भक्षण करीत असतील; परंतु मांसावर बहुतेक निर्वाह करीत होते असें ह्मणतां येत नाहीं. बहुतेकांचा निर्वाह धान्यावर होत असे व विशषेंकरून तांदुळांवर. हिंदुस्थानाची प्राचीन सुधारणा मुख्यत्वेंकरून उत्तर हिंस्थानांत झाली. या ठिकाणीं बहुतेक लोक कशावर निर्वाह करीत असत, या गोष्टीचा विचार करणें जरूर आहे. प्रस्तुत हिंदुस्थानांतील बहुतेक ठिकाणचे लोक काय खातात हें पहावयाचें नाहीं. ज्या ठिकाणीं व ज्या कालांतील सुधारणेविषयीं आपण विचार करीत आहों, त्या ठिकाणीं व त्या कालीं साधारपणें खाण्याचें धान्य कोणतें होतें हें पहावयाचें आहे. असें न केलें तर आपला सिद्धांत चुकीचा ठरणार आहे, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ही गोष्ट लक्षांत न ठेवितां, व ग्रंथांवरून पूर्वीचे स्थितीविषयीं जें अनुमान निघतें त्याकडे लक्ष न देतां, हिंदुस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणचे हल्लींचे स्थितीवरून मत देणें हा कांहीं अंशीं अविचार होणार आहे. बहुतेक आर्य लोकांचा निर्वाह तांदुळावर होत नसून दुसरें धान्य अथवा मांस यांवर होत असे, अशाविषयीं प्रमाण मिळेपर्यंत वरील समजूत चुकीची आहे, असें ह्मणणें प्रमाद आहे असें आह्मांस वाटतें. नुसते वायफळ तर्क करण्यांत तादृश अर्थ नाहीं. यापासून इष्ट कार्य साधण्याचा कमी संभव असतो. असो.

तांदुळांत प्राणवायूचा अंश बराच असल्यामुळें हें अन्न पचविण्यास फारसे श्रम लागत नाहींत; शिवाय, येथील हवा उष्ण असल्यामुळें, उत्साहानें एकसारखे श्रम करवत नाहींत; व विशेष श्रम करवत नसल्यामुळें थंड हवेंतील लोकांस साधारणपणें जें अन्न दररोज लागतें, त्यापेक्षां आमचे लोकांस कमी लागतें. रावबाजीसारखे विचित्र पुरुष, व चढाओढीनें शाल्योदन झोडणारे त्या काळचे भिक्षुकांसारखे भोक्ते, कदाचित् अपवादादाखल सांपडतील; परंतु एकंदरीनें पाहतां वरील नियमाची बरीच व्यापकता आहे असें दिसून येतें.

हवा व अन्न यांचें मान या देशांत सदरीं सांगितल्याप्रमाणें असल्यामुळें, सुधारणेस अवश्य जी सामाजिक स्थिति, ती बनण्यास फार अवधी लागली नाहीं. हवा व अन्न यांचे पूर्वोक्त मानामुळें, ह्या देशांत लोकसंख्या वाढत जाऊन संपत्तीचे वांटणींत न्यूनाधिक्य उत्पन्न झालें. हें ह्मणणें कदाचित् कित्येकांस प्रथम दर्शनीं चमत्कारिक वाटेल; परंतु

१–क्यापटन हाल यानें अमेरिकेचे उत्तर प्रदेशांत बरींच वर्षें घालविलीं. त्याचें असें ह्मणणें आहे कीं, मी येथें असतां, ९ पाउंड मांस खुशाल खात होतों.

या प्रदेशांतील मूल किती अन्न खातें, याविषयीं प्यारी साहेबांनीं प्रतीति पाहिली, व त्यांस कळून आलें कीं, तें एका दिवसांत जें अन्न खाई तें असें:—

| | पौंड | औंस |
|---|---|---|
| पाणघोड्याचें गोठलेलें मांस | ४ | ४ |
| शिजविलेलें | ४ | ४ |
| भाकर | १ | १२ |
| | १० — | ४ |

केन साहेब म्हणतो कीं, सुबत्तेचे वेळीं येथील लोकांस ८ पासून १० पौंड मांस व अर्धा ग्यालन पाणी लागतें.

विचाराअंतीं याची यथार्थता कळून आल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुस्थान देश सुपीक असल्यामुळें धान्याची समृद्धि असून तें स्वस्त असे. रुपयाला १५ पायली बाजरी, दीड रुपयाला पल्लाभर ज्वारी, रुपयाला नऊ पायली गहूं, ३२ शेर दूध, चार शेर तूप, व ६ रुपये पल्ला गूळ, ही स्थिति सुमारें सन १८५५ पावेतों कांहीं ठिकाणीं होती. या देशांत जें धान्य पिकतें, तें फक्त या देशांतील लोकांचे निर्वाहापुरतें पिकतें, इतकेंच नाहीं, तर, लोकांची जोगवण होऊन, अवशिष्टही बरेंच उरतें, व तें परदेशास पाठवावयास सांपडतें; अथवा अतिथी द्वारीं आला असतां त्यास द्यावयास सांपडतें. भिकाऱ्यास भिक्षा घालण्याचा जो प्रघात या देशांत फार पडला आहे, तो याच साधनामुळें कांहीं अंशीं पडला असावा. जमीन सुपीक असल्यामुळें लोकांस थोडक्या श्रमानें व पैशानें निर्वाह करावयास सांपडे; व हवा उष्ण असल्यामुळें वस्त्रप्रावरणाबद्दल थोडा खर्च लागे. थंड देशांत नेहमीं गरम कपडे घातल्याशिवाय शरीराचें चांगलें रक्षण होत नाहीं; तेथें वस्त्र प्रावरणाबद्दल जास्ती खर्च लागतो. या ठिकाणीं तर आठ महिने एक दोन वस्त्रांवर काम चालतें; व थंडीचे दिवसांत एक घोंगडी व एक वस्त्र, एवढ्यांवर देखील कित्येक लोकांचा निभाव लागतो; ह्मणून वस्त्रांबद्दल एकंदरीनें थंड देशापेक्षां या देशांत खर्च कमी लागतो. इतर सर्व गोष्टी सारख्या असतील तर, थंडीचे दिवसांत जें सर्पण लागतें, त्यापेक्षां इतर दिवसांत कमी लागतें, हें प्रत्येकास अनुभवावरून कळून आलें असेल. यावरून उष्ण देशांतील लोकांस थंड देशांतील लोकांपेक्षां सर्पणाच्या संबंधानें एकंदरींत बराच खर्च कमी लागतो. अन्न, वस्त्र वगैरे अवश्य गोष्टींची सोय या देशांत

थोडक्यांत होत असल्यामुळें, येथें अर्थातच लोकसंख्या वाढत गेली. ज्या मनुष्यास स्वतःचें पोट भरण्याची पंचाईत पडते, त्यास लग्न करण्याची इच्छा कमी असणार; झालीच तर त्यास आपली इच्छा जागचे जागीं ठेविली पाहिजे. अशा मनुष्यास आपली मुलगी देण्यास बापाची तरी इच्छा कशी व्हावी? निरुपायास्तव कदाचित् त्याचा इलाज चालणार नाहीं; परंतु अशीं उदाहरणें थोडीं. निर्वाहाची व वस्त्रप्रावरणाची या देशांत फारशी अडचण नसे, ह्मणून लोक लग्नें करीत. पुन्नाम नरकापासून पुत्र पितरांचा उद्धार करितो व पुत्र उत्पन्न केल्यावांचून जो द्विज राहतो तो नरकाप्रत[1] जातो, या भ्रांतिमूलक समजुतीमुळें लोक लग्नें करीत असत, ही गोष्ट जरी एकीकडे ठेविली, तरी, वरील कारणामुळेंच बहुत करून लोक लग्नें करीत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या कारणामुळें स्वाभाविक रीतीनें लोकसंख्या वाढत गेली. जें संचित धन मजूरीच्या रूपानें वांटून द्यावयाचें, तें जर लोकसंख्येचे मानानें वाढलें असतें, तर श्रम करणारे लोकांची फारशी निकृष्ट स्थिति नसती. जें संचित धन वांटून द्यावयाचें, तें कांहीं कालपर्यंत लोकसंख्येबरोबर टिकाव धरील. जर इंग्लंडसारख्या धनाढ्य देशांत लोकसंख्येचे मानानें हें धन वाढत नाहीं, तर पूर्वीं या देशांत हें धन लोकसंख्येचे मानानें वाढणें अशक्य होतें. ज्या मानानें लोकसंख्या वाढत गेली, त्या मानानें धन वाढलें नाहीं, ह्मणून मजूरीचा दर कमी होत गेला. मजूरीचा दर कमी होत गेला यामुळें, अर्थात् भांडवलवाले यांस

१–अनधीत्य द्विजो वेदाननुत्पाद्य तथा सुतान् ॥
अनिष्ट्वा चैव यज्ञैश्च मोक्षमिच्छन् व्रजत्यधः ॥

मनुस्मृ० अ० ६ श्लोक० ३७.

जास्ती नफा होऊं लागला. ज्यांचे श्रमानें संपत्ति निर्माण होत असे, त्यांस धनाचा थोडाच अंश मिळून, बाकीचा मोठा अंश साऱ्याचे रूपानें अथवा नफ्याचे रूपानें वरच्या प्रतीचे लोकांस मिळूं लागला. यामुळें संपत्तीचे वांटणींत न्यूनाधिक्य उत्पन्न झालें; व संपत्ति ही एका प्रकारची शक्ति असल्यामुळें, सामाजिक व राजकीय सत्तेचे वांटणींत जितकें न्यूनाधिक्य असणें इष्ट आहे, त्याहून अधिक झालें. हिंदुस्थानांतील बरेच लोक नेहमीं दारिद्र्यानें पीडले असतात, त्यांची सामाजिक स्थिति अतिशय शोचनीय असते, त्यांस निर्वाहाचें मात्र साधन असतें, एक वर्षीं पर्जन्य न पडला, तर, दुष्काळ पडून शेंकडों लोक अन्नावांचून प्राणास मुकतात, त्यांचें पाऊल पुढें पडत नाहीं, त्यांस जसा नेणारा भेटेल, तसे ते निमूटपणें पाऊल टाकितात व त्यांस नेहमीं सरकारचे अथवा सावकाराचे तोंडाकडे पहावें लागतें, ह्या दुःखदायक स्थितीस मुख्यत्वेंकरून स्वस्ताई[1] कारण होय. स्वस्त अन्नापासून थोडक्या खर्चांत निर्वाहाची सोय होते हें खरें; परंतु त्याच कारणानें लोकसंख्या[2] वाढून म-

१—अन्न स्वस्त असल्यामुळें जर श्रम करणारे लोकांची स्थिति निकृष्ट होते, तर एक दोन वर्षें मुळींच श्रम न करितां स्वस्थ बसावें, म्हणजे आपोआप महागाई होईल व शेतकरी वगैरे लोकांची स्थिति सुधारेल; व रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र वगैरे शास्त्रांचा अभ्यास करून खटाटोप करण्याचें कारण उरणार नाहीं, असें कदाचित् कित्येक म्हणतील. स्वस्ताईमुळें अनिष्ट कार्य होतें, असें जें आम्हीं म्हटलें आहे, तें अन्नाचा सांटा विपुल होऊन स्वस्त विकल्यानें शेतकरी वगैरे लोकांस कमी किंमत येते, व यामुळें त्यांचें नुकसान होऊन, त्यांची स्थिति वाईट होते, एवढ्या संबंधानें आहे. पीक चांगलें होऊन त्यास भाव आला पाहिजे; व असें झालें तर शेतकऱ्यांस नफा होईल. मुळींच पीक झालें नाहीं तर नफ्याविषयीं बोलावयास नको.

२—हिंदुस्थानांतील लोकसंख्येचे संबंधानें गैरसमज झाल्यामुळें कित्ये-

जूरी थोडी मिळते; व थोडी मजूरी मिळाल्यामुळें वरील परि-

कांचें असें मत झालें आहे कीं, लोकसंख्या जास्त झाली आहे व मजूरांची निकृष्ट स्थिति होत आहे, अशी जी ओरड ऐकूं येते, ती निराधार आहे. कारण, त्यांचें असें म्हणणें आहे कीं, लागवडीस न आलेली अशी हिंदुस्थानांत अद्यापि पुष्कळ जमीन आहे; व जर लोकसंख्या वाढून निर्वाहाची पंचाईत पडती, तर स्वाभाविक रीतीनें लोक जास्त जमीन लागवडीस आणण्याचे उद्योगास लागले असते. परंतु ज्या अर्थी हा प्रकार दृष्टीस पडत नाहीं, त्या अर्थी लोकसंख्या फार वाढून मजूरांची स्थिति वाईट होत आहे, हें म्हणणें पोकळ आहे.

आतां वरील समजूत जरी एक अंशीं बरोबर असली, तरी, ती सर्वांशीं बरोबर आहे, असें म्हणतां येत नाहीं. देशांत लागवडीस न आलेली जमीन पुष्कळ असली म्हणजे, लोकसंख्या वाढून निकृष्ट स्थिति प्राप्त होण्याची भीति नाहीं असें नाहीं. कारण, जी जमीन लागवडीस आणावयाची, ती शहरापासून अथवा खेड्यापासून फारच लांब असून तींत फक्त निर्वाहापुरतेंच पीक उत्पन्न होण्याचा संभव असेल, तर लोकांस वसाहत करण्याची इच्छा होणार नाहीं. अशी स्थिति नसेल तर, लोकांचे अंगीं साहस नसल्यामुळे ही जमीन लागवडीस येत नसेल. अनिश्चित फल मिळविण्याचे आशेस गुंतण्यापेक्षां निश्चित फल थोडें जरी मिळालें, तरी, तेवढ्यावर निर्वाह करून डोकें खुपसून राहूं, मोलमजूरी करूं, किंवा निदान पक्षीं भिक्षा मागून पोट भरूं, असें म्हणणारे लोक असतील. वरील कामास अगोदर कांहीं पैसे लागतात. ते न मिळाल्यामुळें किंवा जूट न जमल्यामुळें जमीन लागवडीस येत नसेल. हे केवळ तर्क आहेत असें नाहीं. अशी हिंदु समाजाची वास्तविक स्थिति आहे. या एकंदर गोष्टींविषयीं विचार करितां, देशांत लागवडीस न आलेली अशी जमीन असतां, लोकसंख्येची वृद्धि होण्याचा संभव आहे किंवा नाहीं हें समजेल. शिवाय दुसरी ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, लोकसंख्या जास्ती झाली असें म्हटलें म्हणजे, खरोखर संख्येचा आंकडा जास्त झाला पाहिजे असें नाहीं. मजूरीच्या रूपानें जें धन वांटून द्यावयाचें, तें कमी होऊन पूर्वीचीच

णाम घडून येतो, यांत नवल नाहीं. जोंपावेतों श्रमाची किंमत कमी येईल, तोंपावेतों कितीही अन्य उपाय योजिले, तरी ते निर्फल होत.

हिंदुस्थानांत श्रम करणारांची संख्या वाढत गेल्यामुळें, मजूरीचा दर कमी होता, हें आह्मीं वर सांगितलेंच आहे. मजूरीचा दर कमी होता, हें दुसरे प्रकारेंही दाखवितां येईल. तें असें कीं, कोणतेही देशांत संपत्तीची वांटणी ही तीन[1] प्रकारें होते. मजूरी, सारा व नफा. कांहीं[2] लोक व्याज हा चवथा वर्ग मानितात; परंतु वास्तविक पाहतां, ज्या तीन[3] गोष्टींमिळून नफा होतो, त्यांपैकीं व्याज हा एक अंश आहे. असें जरी

---

संख्या जरी कायम राहिली, तरी ही संख्या जास्ती झाली असें म्हटलें पाहिजे. कदाचित् कित्येक म्हणतील कीं, पूर्वीं देशांत कित्येक कारणांमुळें भांडवल फार खेळत नसे म्हणून, किंवा देशांत धान्याचा मुबलक पुरवठा असे म्हणून, मजूरास कमी मजूरी मिळे, हें बरोबर आहे; परंतु हल्लीं व्यापाराचे संबंधानें व आगगाडीचे संबंधानें देशांत बरेंच भांडवल आहे. भांडवल जरी जास्ती आलें, तरी, ज्या प्रकारचे मजूरांविषयीं आपण विचार करीत आहों, त्याप्रकारचे मजूरांमध्यें वास्तविक किती वांटून देण्यांत येत आहे, याविषयीं विचार केला पाहिजे. नुसतें भांडवल देशांत जास्ती आल्याची मातबरी नाहीं. या भांडवलाचा मजूरांस बराच फायदा होतो असें जरी मानिलें, तरी, मजूरांची स्थिति वाईट आहे, हें जर कोणी नाकबूल करीत नाहीं, तर ज्या मानानें लोकसंख्या वाढत आहे, त्या मानानें धन वाढत नाहीं हें उघड आहे. म्हणून लोकसंख्या जास्ती झाली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१–फासेटकृत अर्थशास्त्र. पृ. १४५.

२–बकलकृत सुधारणेचा इति. भा. १. पृष्ठ ७४.

३–नफ्यांत ज्या तीन गोष्टींचा अंतर्भाव होतो त्याः–१ ली–भांडवलावरील व्याज; २ री–नुकसानीच्या जोखमीबद्दल भरपाई; ३ री–देखरेख करणाराने श्रमाबद्दल मजूरी.

आहे, तरी, हें खरें आहे कीं, नफ्याचें मान किती असलें पाहिजे हें आपणास व्याजाचे दरावरून साधारण रीतीनें काढितां येतें; व ज्या अर्थीं व्याजाचे दरावरून नफ्याविषयीं साधारण अंदाज करण्यास मार्ग आहे, त्या अर्थीं एका देशांत व्याजाचें व साऱ्याचें मान काय आहे, हें आपणास समजलें असतां, मजूरीचें मान कसें असेल, याविषयीं आपणास अनुमान करितां येईल. जर एखादे देशांत व्याजाचें व साऱ्याचें मान जास्ती आहे, तर, मजूरीचा दर कमी असला पाहिजे हें उघड आहे. व्याज व सारा यांचें मान हिंदुस्थानांत कसें होतें, याविषयीं आपण विचार करूं.

आर्य लोकांचे व्यवहार वगैरे बाबतींत प्रमाणभूत ग्रंथ मनुस्मृति अथवा मानवधर्मशास्त्र हा होय. यावरून आपणास कळून येतें कीं, सावकारास दरमहा दरशेंकडा सव्वा रुपया व्याज घेण्यास मोकळीक होती. हा दर शास्त्रोक्त असून गहाण असतां मिळावयाचा. हा दर वसिष्ठास मान्य आहे असेंही सांगितलें आहे; गहाण नसेल तर, सज्जनधर्मानुसारी धनिकानें दरमहा दरशेंकडा दोन रुपये व्याज घ्यावें. शेंकडा दोन रुपये व्याज घेतलें असतां सावकार पापी होत नाहीं. गहाण न ठेवितां, कर्ज दिलें असेल तर, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या

---

१–वसिष्ठविहितां वृद्धिं सृजेद्वित्तविवर्धिनीम् ॥
अशीतिभागं गृह्णीयान्मासाद्वार्धुषिकः शते ॥ १४० ॥
मनु. अ. ८.

२–द्विकं शतं वा गृह्णीयात्सतां धर्ममनुस्मरन् ॥
द्विकं शतं हि गृह्णानो न भवत्यर्थकिल्बिषी ॥ १४१ ॥
मनु. अ. ८.

३–द्विकं त्रिकं चतुष्कं च पंचकं च शतं समम् ॥
मासस्य वृद्धिं गृह्णीयाद्वर्णानामनुपूर्वशः ॥ १४२ ॥
मनु. अ. ८.

चार वर्णांपासून अनुक्रमें दरमहा दरशेंकडा दोन, तीन, चार व पांच रुपये असें व्याज घ्यावें. धान्य, फळफळावळ, लोंकरीचीं वस्त्रें, अश्वादि वाहनें यांबद्दल पराकाष्ठा पांच पट वाढ घेतां येते; अधिक घेतां येत नाहीं. जें कर्ज दिलें असेल, तें सावकारानें मागितलें असतां, ज्या दिवशीं तें देण्याचें ऋणको नाकबूल करील, त्या दिवसापासून दरमहा दरशेंकडा पांच रुपये व्याज घ्यावें. याज्ञवल्क्यस्मृतींतही व्याजाचे दराविषयीं असेंच सांगितलें आहे.

या प्रमाणांवरून व्याजाचा दर किती जरब होता, हें समजणार आहे; व विशेषेंकरून ज्यांच्या श्रमानें धन तयार होत असे, त्यांस तर फारच जरब व्याज द्यावें लागत असे, हें वरील प्रमाणांवरून व्यक्त होत आहे. जरब व्याज घेण्याचा प्रघात हा फक्त मनूचे वेळींच होता असें नाहीं. हा प्रघात अद्यापिही कित्येक ठिकाणीं कायम आहे. अहमदनगर जिल्ह्यांत व दुसरे कांहीं ठिकाणीं शेंकडा तीन अथवा चार रुपये व्याज घेतल्याशिवाय सावकार लोक कर्जाऊ पैसा देत नाहींत. कांहीं लो-

---

१—धान्ये शदे लवे वाह्ये नातिक्रामति पंचतां ॥ १५० ॥
मनु. अ. ८.

२—मनुस्मृति अध्याय ८ श्लोक १५१.

३—अशीति भागो वृद्धिः स्यान्मासि मासि सबन्धके ॥
वर्णक्रमाच्छतं द्वित्रिचतुःपञ्चकमन्यथा ॥ ३८ ॥
कान्तारगास्तु दशकं सामुद्रा विंशकं शतम् ॥
दद्युर्वा स्वकृतां वृद्धिं सर्वे सर्वासु जातिषु ॥ ३९ ॥
सन्ततिस्तु पशुस्त्रीणां रसस्याष्टगुणा परा ॥
वस्त्रधान्यहिरण्यानां चतुस्त्रिगुणा परा ॥ ४० ॥
मिताक्षरा व्यवहाराध्याय.

४—भांडारकर डेक्कन ( महाराष्ट्राचा ) प्राचीन इतिहास पृ. ८३.

कांचें असें मत आहे कीं, नाशीक येथील लेण्यांत जे शिलालेख आहेत त्यांवरून पाहतां, पूर्वी व्याजाचा दर दरसाल दर शें-कडा पांचपासून साडेसात रुपये असावा असें दिसतें. असा दर कधींच नसेल असें आह्मी ह्मणत नाहीं. परंतु असा दर होता असें जरी घेऊन चाललें, तरी तो सदोदित होता किंवा कांहीं दिवस होता, सर्वत्र होता किंवा कांहीं विशेष ठिकाणीं होता, तो दर सर्व लोकांस लागू होता, किंवा कांहीं विशेष जातींच्या लोकांस लागू होता, या प्रश्नांविषयीं चांगला खुलासा होणें जरूर आहे. मनु व याज्ञवल्क्य यांचे कालाविषयीं विचार करितां, आणि यांचे नंतर देशांत शांतता कमी होती ही गोष्ट मनांत आणितां, व प्रस्तुतचे कालावरून विचार करितां, व्या-जाचा दर एकंदरीनें जरब असला पाहिजे. सन् १८१० त हौस आफ् कामन्स सभेची कमेटी भरली होती. या कमेटीनें जो रपोट केला, त्यावरूनही असेंच कळून येतें. व्याजाचा दर थोडे दिवस कमी असेल; परंतु यावरून तो एकंदरीनें नेहमीं तसा होता असें ह्मणतां येत नाहीं. व्याजाचा दर एकंदरीनें नेहमीं कमी होता असें घेऊन चाललें असतां, देशांत अक्षयीं स्वस्थता होती, धनोत्पादक कामाकडे बरेंच भांडवल खर्ची पडत असे, श्रम करणारे लोकांची स्थिति सुधारून त्यांची पत वाढली होती, या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी होत्या असें ह्मणावें लागतें. असो.

हिंदुस्थानांत जसा व्याजाचा दर होता, तसा दुसरे थोडेच ठिकाणीं असेल. इंग्लंडांत व्याजाचा दर दरसाल दरशेंकडा तीनपासून साडेतीन रुपये आहे; हालंदांत दरसाल दरशेंकडा दोन रुपये आहे. रशियामध्यें इंग्लंदपेक्षां जास्ती दर आहे. इंग्लिश सरकारास जर कर्जाऊ रक्कम घेण्याचें कारण पडलें,

तर त्यास तीन रुपये व्याजानें रक्कम मिळते. रशियन सरकारास शेंकडा पांच रुपये देऊनही कर्जाऊ रक्कम मिळण्याची मारामार पडते. हिंदुस्थान सरकारासही थोडें जास्त व्याज द्यावें लागतें. याचें कारण असें आहे कीं, रशियन सरकारापेक्षां इंग्लिश सरकारची अधिक पत आहे; व हिंदुस्थान सरकारची जी पत आहे, तिजपेक्षां इंग्लिश सरकारची अधिक पत आहे. कर्जाऊ पैसा देणारांस असें वाटतें कीं, रशियन सरकारास पैसा देण्यानें आपण एका प्रकारची जोखीम घेत आहों; या व्यापारांत आपणांस कदाचित् नुकसान होण्याचा संभव आहे; ह्मणून ते या जोखिमीबद्दल व्याज जास्ती घेतात. कर्जाऊ पैसा घेणाराची कमी पत असल्यामुळें सावकारानें जास्ती व्याज मागितलें, तर सावकाराकडे दोष आहे काय? व्याजाचे दरांत जो कमजास्तपणा असतो, तो केवळ सावकाराचे मर्जीप्रमाणें फार दिवस असत नाहीं.

आपणांस कांहीं नफा होईल असें जेव्हां सावकार लोक व त्याचप्रमाणें दुसरे लोक यांस वाटतें, तेव्हां ते नेहमींपेक्षां अधीक पैसा उसनवार देतात. अशा वेळीं व्याजाचा दर कमी[१] असतो. परंतु ही वेळ निघून जाऊन व्यापारांत बुडणुक झाली ह्मणजे, व्याजाचा दर अतिशय चढतो. कारण, पुष्कळ लोकांस जरी पैशाची जरूरी असली, तरी, सावकार लोक बुडणुकीच्या भीतीमुळें पैसा उसनवार देण्यास कांकूं करितात; खात्रीचीं कुळें देखील त्यांस कित्येक वेळां तोंडघशीं पाडतात; ह्मणून त्यांस लोकांचा विश्वास येत नाहीं. लढाईच्या वेळीं लढाईच्या खर्चासाठीं सरकारास सावकार पहावा लागतो. जोंपर्यंत लढाई चालू असते, तोंपर्यंत सरकारास लक्षावधि रुपयांच्या

१–मिल्कृत अर्थशास्त्र पुस्तक २. पृष्ठ १९४.

रकमा कर्जाऊ घ्याव्या लागतात; व धनानुत्पादक कामांत लक्षावधि रुपयांचा चुराडा होतो. सरकार भक्कम कूळ असल्यामुळें, व सरकारची मर्जी संपादन करण्यास सवड सांपडत असल्यामुळें, पुष्कळ सावकार कित्येक वेळां चढाओढीनें व मोठ्या हौसेनें कर्जाऊ पैसा देतात; यामुळें धनोत्पादक कामांत भांडवल थोडें खर्ची पडतें. भांडवल पूर्वीपेक्षां कमी खर्ची पडूं लागल्यामुळें त्यास अर्थात् दर जास्ती येतो. लोकांस पैशाची जरूरी असते, ह्मणून त्यांस व्याजाचा अधिक दर द्यावा लागतो. यावरून हें उघड आहे कीं, लढाया या व्याजाचा दर वाढविण्यास अंशतः कारणीभूत असतात.

लढाईच्या कारणावरून ज्याप्रमाणें व्याजाचा दर वाढतो, त्याचप्रमाणें आगगाड्यांसारखीं नवीन परंतु चिरकाल राहणारीं जीं कृत्यें, त्यांत पैसा घालण्याची सोय निघाली असतां, व्याजाचा दर वाढतो. कारण, जें भांडवल धंद्याच्या कामांत खर्ची पडलें असतें, किंवा खर्ची घालतां येण्यासारखें असतें, त्याचा बराच अंश वर सांगितलेल्या कृत्याकडे खर्च होतो. अशा प्रकारें व्यवस्था करण्यास साधन मिळावें ह्मणून, जर निराळा संचय केला असेल, तर गोष्ट निराळी.

व्याजाचा जो दर चालू असतो, तो भांडवलाचा संचय जसा असतो, व भांडवलाविषयीं मागणी जशी असते, तसा असतो. व्याजाचा दर हा अंशतः देशांतील लोकांच्या संवयींवरही अवलंबून असतो. कित्येक देशांतील लोक चैनी असतात; व कित्येक बेतावातानें राहणारे असतात. ज्या देशांतील लोक काटकसरीनें खर्च करणारे असतात, त्या देशांत थोडासा जरी नफा मिळूं लागला, तरी संचय करण्याविषयीं

१–मिलकृत अर्थशास्त्र पुस्तक २. पृ. १९५.

लोकांची इच्छा होते. हें दच लोकांचे उदाहरणावरून स्पष्ट होतें. जे खर्चिक असतात त्यांस बराच फायदा मिळाल्याखेरीज संचय करावासा वाटत नाहीं. संचय कमी असेल, तर, धनोत्पादक कामाकरितां जें धन पाहिजे, तें कमी असतें. ज्या देशांत दंगे धोपे नेहमीं सुरू असतात, व लोकांच्या वित्ताचें बरोबर संरक्षण होत नाहीं, त्या देशांत जोखीम जास्ती असते; संचय करण्याविषयीं कमी इच्छा असते; व जरी असली, तरी, धनोत्पादक कामांत थोडें भांडवल खर्ची पडतें. भांडवल कमी खर्ची पडूं लागलें ह्मणजे त्याची किंमत वाढते; ह्मणजे भांडवलाबद्दल व्याजाचा दर ज्यास्ती द्यावा लागतो. हिंदुस्थानांत व्याजाचा दर जास्ती होता, याचें कारण कांहीं अंशीं असें कीं, या देशांत शरीर व वित्त यांचें जितकें योग्य रीतीनें संरक्षण व्हावें तितकें होत नसे. प्रजापालनाविषयीं जरी मनूनें सक्त नियम[1] केले होते, तरी, राजेलोक प्रजेवर जुलूम करण्यास मागें पाहत नसत; कित्येक वर्षेंपर्यंत या देशांत बेबंदशाही[2] चालू होती; या गोष्टीमुळें कारखाने न वाढून धनाची जितकी वृद्धि व्हावी तितकी झाली नाहीं. बेबंदशाहीमुळें धन पुरून ठेवण्याची चाल या देशांत विशेष अमलांत होती.

---

१—विक्रोशंत्यो यस्य राष्ट्राद्ध्रियंते दस्युभिः प्रजाः ॥
संपश्यतः सभृत्यस्य मृतः स न तु जीवति ॥ १४३ ॥
मनुस्मृ. अ. ७.

मोहाद्राजा स्वराष्ट्रं यः कर्षयत्यनवेक्षया ॥
सोऽचिराद्भ्रश्यते राज्याज्जीविताच्च सबांधवः ॥ १११ ॥
शरीरकर्षणात्प्राणाः क्षीयंते प्राणिनां यथा ॥
तथा राज्ञामपि प्राणाः क्षीयंते राष्ट्रकर्षणात् ॥ ११२ ॥
मनुस्मृ. अ. ७.

२—फासेटकृत अर्थशास्त्र पृ. १६४.

अन्न स्वस्त असल्यामुळें नफा जास्ती मिळतो हें आह्मीं मागें सांगितलें आहे. या देशांत अन्न स्वस्त असे ह्मणून व्याजाचा दर जास्ती असे. आस्ट्रेलियांत व्याजाचा दर जास्ती आहे; कारण येथील जमीन सुपीक असल्यामुळें नफा जास्ती मिळतो. इंग्लंदांत निर्वाहाचे पदार्थ महाग असल्यामुळें कमी नफा मिळतो; ह्मणून व्याजाचा दर कमी आहे.

वर जे विचार सांगितले, त्यांवरून देशांत शांतता, निर्वाहाचे पदार्थांचा भाव, लोकांच्या संवयी, व त्यांची पत हीं जशीं असतात, तसा व्याजाचे दरांत फेरफार होतो हें उघड आहे. ही गोष्ट मनांत न आणितां, अथवा समजून उमजून कित्येक लोक सावकारांस दोष देतात, ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे! कित्येकांचा तर असा ग्रह होऊन गेला आहे कीं, महाराष्ट्र देशांतील शेतकरी लोकांस जी प्रस्तुत स्थिति प्राप्त झाली आहे तीस सावकारांचा, व विशेषेंकरून मारवाड्यांचा जुलूम कारण होय. ही समजूत किती भ्रांतिमूलक आहे! मारवाडी लोक कर्जाऊ पैसे न देऊं लागले, तर पार्शी लोक देऊं लागतील; पार्शी लोकांनीं हात आंखडला तर भाटेलोक पुढें सरसावतील; तात्पर्य जोंपर्यंत वर सांगितलेल्या कारणांपैकीं कोणत्याही कारणाचा जोर कायम आहे, तोंपर्यंत व्याजाचा दर कधींही

---

१–जेव्हां श्रमाबद्दल खर्च कमी किंवा जास्ती असतो, तेव्हां नफ्याचा दर कमी किंवा जास्ती असतो. श्रमाबद्दल खर्च कमी किंवा जास्ती असतो, तो अन्न स्वस्त किंवा महाग असतें म्हणून असतो; म्हणून स्वस्त अन्न असलें म्हणजे नफ्याचा दर वाढतो हें उघड आहे.

२–देशांत ज्या गोष्टीच्या योगानें नफा जास्त मिळतो, त्या गोष्टीच्या योगानें व्याजाचा दर जास्त होत जातो; उलटपक्षीं ज्या गोष्टीच्या योगानें नफा कमी मिळतो, तिच्या योगानें व्याजाचा दर कमी होतो.

फासेटकृत अर्थशास्त्र पृ. ४०३.

कमी व्हावयाचा नाहीं. व्याजाचे दरांत जो फेरफार होतो, तो वरील कारणांमुळें होतो; सावकारामुळें किंवा विशेषेंकरून मारवाडी सावकारामुळें होत नाहीं. व्याजाचे दरांत फेरफार होऊन, शेतकरी लोकांची स्थिति सुधारावी अशी ज्यांची इच्छा आहे, त्यांनीं या कारणांविषयीं विचार करून त्यांचा जोर कमी करण्याविषयीं यत्न करणें इष्ट होय. मारवाडी लोक हे फक्त जी स्थिति आहे, तिचा फायदा करून घेतात. परंतु जोंपर्यंत वरील करणांपैकीं एकही कारण कायम राहील, तोंपर्यंत प्रस्तुतचे मारवाड्यांचे ऐवजीं दुसरे सावकार मारवाडी बनतील; मिळून सावकारावांचून रयतेस गत्यंतर नाहीं. सावकार लोकांचा वर्ग नवीन उत्पन्न झाला आहे असें नाहीं; हा पूर्वीं होता, व हल्लींही आहे. जोंपर्यंत धान्याचे संबंधाची वहिवाट कायम आहे तोंपर्यंत सावकार अवश्य असला पाहिजे. जर सावकार लबाडीनें फायदा करून घेत असेल, तर तसें त्यास करूं देऊं नये; परंतु सावकारी बसणें हें हितावह नाहीं, हीही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. असो. याविषयीं येथें विशेष सविस्तर विचार करण्याचें कारण नाहीं. वर जीं प्रमाणें दिलीं, व जे विचार सुचविले, त्यांवरून पूर्वीं या देशांत व्याजाचा दर जरब होता किंवा नाहीं व असें असण्याचें कारण काय, हें वाचकांचे लक्षांत आलें असेल.

व्याज व सारा या दोन गोष्टींपैकीं व्याजाविषयीं येथपर्यंत झालें. आतां दुसरी गोष्ट ह्मणजे सारा, इजविषयीं विचार करूं. साऱ्याचे बाबतींत या घटकेपर्यंत बराच मतभेद आहे. पूर्वींचे कालाविषयीं जशी माहिती असावी, तशी उपलब्ध नसल्यामुळें, या विषयाचा निर्णय होणें कठीण आहे;

१–डेक्कनरायट कमिशनचे रिपोर्टावर सर आर्स्किन पेरी यांचे ता. १ दिजंबर १८७७ चे मिनिट.

तथापि जी माहिती मिळते, तिजवरून अनुमान करण्यास अड-चण पडणार नाहीं. इंग्लंड व स्कॉटलंड या दोन देशांतील शेतकरी लोकांस जमिनीचे साऱ्याबद्दल एकंदर उत्पन्नाचा सुमारें चतुर्थांश द्यावा लागतो. फ्रान्स देशांतील शेतकऱ्यांस एक तृतीयांश द्यावा लागतो. युनायटेड स्टेट्स्‌मध्यें साऱ्याचें मान फारच कमी आहे. कित्येक ठिकाणीं सारा नांवाला मात्र आहे. हिंदुस्थान देशांतील आधुनिक व्यवस्थेवरून परद्वीपस्थ ग्रन्थकारांचें असें मत होऊन गेलें आहे कीं, हिंदुस्थानांत शास्त्रोक्त सारा हा उत्पन्नाचा एक द्वितीयांश असे. कोणत्या शास्त्राला उद्देशून हा अभिप्राय बनला आहे, हें आह्मांला समजत नाहीं. मनुस्मृतीस उद्देशून हा अभिप्राय दिला असावा, असें ह्मणावें तर या स्मृतींत असें कांहीं एक सांगितलें नाहीं. उलट असें सांगितलें आहे कीं, "राजानें धान्याचा सहावा, आठवा, अथवा बारावा भाग घ्यावा." हा अंश जमिनीचे मगदुराप्रमाणें द्यावयाचा असें दिसतें. ह्मणजे जमीन ज्याप्रमाणें उत्तम, मध्यम अथवा कनिष्ठ असेल, त्याप्रमाणें सहावा, आठवा अथवा बारावा अंश द्यावयाचा. श्रोत्रिय ब्राह्मणापासून राजानें कर घेऊं नये, असें जें पूर्वोक्त स्मृतींत सांगितलें आहे, त्याशिवाय साऱ्याचे बाबतींत जी व्यवस्था सांगितली आहे, तींत स्थूल दृष्ट्या फारसा दोष दिसून येत नाहीं. कारण, वरील स्मृतींत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, शेतकरी व व्यापारी यांस फल मिळून आपणासही फल मिळेल,

१–बकलकृत सुधारणेचा इतिहास. भा. १ पृ. ७५.

२–बकलकृत सुधा. इति. भा. १ पृ. ७६.

३–पंचाशद्भाग आदेयो राज्ञा पशुहिरण्ययोः ॥
धान्यानामष्टमो भागः षष्ठो द्वादश एव वा ॥ १३० ॥
मनुस्मृति अ. ७.

४–मनु. अध्याय ७ श्लोक १३३.

असा राजानें विचार करून प्रजेवर कर बसविण्याची योजना करावी. ज्याप्रमाणें भ्रमर वगैरे थोडथोडा मकरंद भक्षण करितात, त्याप्रमाणें राजानें प्रजेपासून थोडथोडा वार्षिक कर घ्यावा. राजानें आपल्या प्रजेच्या मुळाचा अतिशयित लोभानें उच्छेद करूं नये. मुळाचा उच्छेद केला असतां, राजा आपणाला व प्रजांना पीडीत करील. जो राजा प्रजेचें रक्षण न करितां सहावा भाग मात्र घेतो, तो सर्व लोकांचे दोषाचा अधिकारी होतो.

साऱ्याचे बाबतींत ही जी व्यवस्था सांगितली, तिजवरून स्मृतींत १/२ घेण्याविषयीं कोठेंही सांगितलें नाहीं हें उघड आहे. एक द्वितीयांश घेण्याचा जो प्रघात पडला तो मागाहून होय; व हा तरी जुलमी अथवा चैनींत चूर असणारे राजांचे कारकीर्दीत असावा. मनुस्मृतींत षष्ठांश घेण्याविषयीं सांगितलें आहे, तथापि, आपत्कालीं राजानें प्रजेपासून चौथा भाग घेतला असतां, तो पातकापासून मुक्त असतो असेंही सांगितलें आहे. मनुस्मृतींत साऱ्याचे अथवा कराचे संबंधानें जे नियम व जी व्यवस्था सांगितली आहे, त्याप्रमाणें किती दिवस व्यवस्था अमलांत होती, हें स्पष्ट सांगतां येत नाहीं. जी व्यवस्था सांगितली आहे, तिजप्रमाणें जरी राजे चालत असले, तरी ही व्य-

---

१–यथा फलेन युज्येत राजा कर्ता च कर्मणाम् ॥
तथा वेक्ष्य नृपो राष्ट्रे कल्पयेत्सततं करान् ॥ १२८ ॥
मनु. अ. ७.

२–मनुस्मृति अ. ७ श्लोक. १२९.

३–नोच्छिंद्यादात्मनो मूलं परेषां चातितृष्णया ॥
उच्छिंदन् ह्यात्मनो मूलमात्मानं तांश्च पीडयेत् ॥ १३९ ॥
मनु. अ. ७.

४–मनुस्मृति अ. ८ श्लोक ३०८.

५–मनुस्मृति अ. १० श्लोक ११८.

वस्था फार दिवस चालू होती असें ह्मणतां येत नाहीं. परशत्रूपासून राज्याचा बचाव करणें, राज्याची सरहद्द वाढविणें, चैन उडविणें, या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टींमुळें बहुतेक राजे आपत्तींत होते. ही विपत्ति ज्यांस नाहीं असे थोडे राजे दृष्टीस पडतील. कवीच्या रामराज्यांत आपत्तीचा संसर्ग लागला नसेल तर सांगवत नाहीं. परंतु ऐतिहासिक कालाविषयीं विचार करितां असें दिसून येतें कीं, ब्राह्मण व बौद्ध, यवन व हिंदु, मोंगल व मराठे, व मराठे व फिरंगी यांजमध्यें नेहमीं लढाया चालून तिजोरी लवकर खलास होत असे; व अर्थात् रयतेवर कराचा जास्ती बोजा पडत असे; व या धांदलींत शांततेचे वेळीं षष्ठांश, अष्टमांश, व द्वादशांश घेण्याविषयींचा व आपत्कालीं चतुर्थांश घेण्याविषयींचा नियम एकीकडे राहून, राज्यकर्ते एक तृतीयांश व एक द्वितीयांशदेखील घेण्यास चुकले नसतील असें वाटतें. राजानें एक द्वितीयांशाचे ऐवजीं एक तृतीयांश घेतला असतां माफक कर घेतला असें लोकांस वाटत असे. उत्तर सरकार्सचे संस्थानिकांचे प्रांतांत व दुसरे कांहीं संस्थानांत सारा दोनपासून[१] तीन पंचमांश घेण्यांत येत असे.

व्याज व सारा हीं हिंदुस्थानांत फार जरब असल्यामुळें मजूरीचा दर कमी असे; ह्मणून भांडवलवाले यांस जास्ती नफा मिळे. भांडवलवाले यांस नफ्याबद्दल जो अंश मिळे, त्या मानानें पाहतां मजूरदारांस फारच थोडा अंश मिळे. जेमतेम निर्वाह झाला ह्मणजे मिळविली अशी बहुतेकांची स्थिति होती. ही स्थिति अद्यापि कायम आहे. कारण पूर्वीं ज्याप्रमाणें मजूरदारांस श्रमाची किंमत कमी मिळत असे, त्याप्रमाणें हल्लींही कमी मिळत आहे. ज्या वेळेस युनायटेड् स्टेट्समध्यें थोडे व-

१–एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इति. पृ. ७६ टीप.

र्षांपूर्वी लढाई सुरू होती, त्या वेळीं श्रम करणारे लोकांस बरीच मजूरी मिळे; त्या वेळीं बरेच शेतकरी सांवरले; व त्यांकडे साऱ्याची बाकी फारशी थकत नसे. परंतु आतां पुनः पूर्ववत्. स्थिति होऊं लागली आहे.

आतां कदाचित् असा आक्षेप निघेल कीं, इंग्रज सरकार शेतकऱ्यांविषयीं जशी काळजी वाहत आहे, तशी पूर्वींचें सरकार वाहत नसे; पूर्वीं शेतकऱ्यांवर फार जुलूम होत असे; त्यांस विनपगारी श्रम करावे लागत असत; हल्लीं असा प्रकार नसतां, आतांपेक्षां पूर्वींची स्थिति वाईट असली पाहिजे; व पूर्वीं हल्लींपेक्षां वास्तविक जास्त असमाधान असलें पाहिजे. काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत खुशाल प्रवास करावा अशी जरी प्रस्तुत स्थिति आहे, तरी, पूर्वींच्या व हल्लींच्या व्यवस्थेविषयीं विचार केला असतां, पूर्वीं ज्या गोष्टीमुळें असमाधान कमी वाटत असे, ती गोष्ट हल्लीं जितकी प्रचारांत असावी तितकी नाहीं. पूर्वींच्या राज्यव्यवस्थेंत कितीही न्यूनता असली, व तिजमुळें शेतकऱ्यांस कितीही जुलूम सोसावा लागत असला, तरी, ज्या गोष्टीमुळें शेतकऱ्यांस समाधान वाटे ती गोष्ट ही कीं, आपत्तीचे वेळीं साऱ्याची अंशतः अथवा सर्वांशीं माफी मिळत असे. या गोष्टीमुळें जी स्थिति होती तीच फार दिवस चालू होती. पूर्वीं कित्येक ठिकाणीं हल्लींपेक्षां जास्ती सारा असे; परंतु पर्जन्याचे आपत्तीमुळें अथवा टोळधाडीमुळें अथवा अशा दुसऱ्या अनिवार्य कारणांमुळें पीक बुडालें असतां, पूर्वींचें सरकार अंशतः अथवा योग्य कारण दिसल्यास सर्वांशीं सारा माफ करीत असे. ही चाल एतद्देशीय संस्थानांतून अद्यापि कायम आहे. ज्या वेळेस सक्ती

१—कुरुंदवाड येथें राहणाऱ्या आमच्या एका मित्रानें आम्हांस असें सांगितलें कीं, मैंदर्गी तालुक्यांत गेल्या दुष्काळांत कहर उसळल्यामुळें

केली असतां गडबड होण्याचा विशेष संभव, त्या वेळेस पूर्वीचें सरकार साधु वृत्ति धारण करून न्यायान्यायाचा विचार करी. परंतु ही वेळ निघून गेली ह्मणजे नित्यक्रम पुनः चाले. आपत्तीचे वेळीं सक्ती वगैरे केली असतां मनुष्य फार खवळतो; व पोट भरण्याचा उपाय खुंटूं लागला, ह्मणजे मनुष्य दंगे धोपे करावयास प्रवृत्त होतो, असा साधारण नियम आहे. ही वेळ निघून गेली ह्मणजे शेतकरी लोक सारा पूर्ववत देतात, ही गोष्ट पूर्वीचे सरकारास चांगली माहीत असे. चढलेली बाकी वसूल करण्याचे कामीं तें फारशी सक्ती करीत नसे. कुळास ऐपत अथवा शेत वाहण्याची उमेद आली असतां, सरकारची बाकी लवकर वसूल होत असे; व हें शेतकऱ्यांस सोयस्कर असे. कारण, त्यांस वाटे कीं, जोंपावेतों आपणांला देण्याला ऐपत आहे, तोंपावेतों सरकार घेईल; परंतु ज्या वेळेस आपणांवर प्रसंग गुदरेल, त्या वेळेस सरकार आपला कसा तरी बचाव करील. सरकार जी सूट देई, ती भलत्या वेळीं देई असें नाहीं. खरोखर आपत्तीचे प्रसंगीं देई. हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांविषयीं मजकूर लिहित असतां, इंग्लंडांतील प्रसिद्ध स्टांडर्ड वर्तमानपत्रकर्ते ह्मणतात कीं, 'निर्वाहाच्या साधनाचा अभाव, पीडा व अन्याय यांमुळें दंगे धोपे कधीं कधीं उत्पन्न होतात; हे सक्तीनें मोडून टाकावेत; परंतु हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत ज्या सुधारणा करणें जरूर आहे त्या करण्यास जे चुकतील त्यांवर मोठी जबाबदारी आहे.' हल्लींच्या स्थितीविषयीं टाईम्स आफ् इंडिया, मुंबई ग्याझीट व मुंबई रिव्ह्यू पत्रकर्त्यांनीं जें ह्मटलें आहे तें विचार करण्या-

---

संस्थानचे अधिकाऱ्यांनीं पूर्वोक्त तालुक्याचा ३० हजार वसूल असतां, ३० हजार रुपयांची सूट दिली, व लोकांस सांगितलें कीं, जर हा सारा देण्यास तुम्हांस पुढील वर्षी ऐपत आली तर द्या.

१-स्टांडर्ड. ता. २१ मे सन १८७९.

सारखें आहे. टाईम्स आफ् इंडिया पत्रकर्ते ह्मणतात कीं,

१–टाईम्स आफ् इंडिया तारीख ३ जून १८७९.

पीक थोडें झालें असतां सूट द्यावी लागते किंवा नाहीं हें खालीं दिलेल्या माहितीवरून समजेल:—

मुंबई इलाख्यांत सन १८७२–७३ सालीं ७,५६,५०६ रुपये; सन १८७३–७४ सालीं ८,०४,६०८ रुपये; सन १८७४–७५ सालीं ८,८३,७७२ रुपये; सन १८७५–७६ सालीं ४,७७,३२६ रुपये; सन १८७६–७७ सालीं ९,००,९४३ रुपये; व सन १८७७–७८ सालीं १,८२,३९५ रुपये सूट देण्यांत आली.

सूट द्यावी अशी जी सूचना आहे, तिजवर कदाचित् असा आक्षेप निघेल कीं, 'एका खेड्यांतील लोकांस सूट दिली म्हणजे दुसरे, तिसरे अथवा चवथे खेड्यांतील लोक सूट मागावयास लागतील; आपत्तीचे काळीं जें नुकसान होतें, तें सर्व ठिकाणीं सारखें होतें असें नाहीं; व सर्वांस नुकसानीपासून सारखा त्रास होतो असें नाहीं.' सूट द्यावी असें कित्येकांचें म्हणणें आहे; परंतु सरसकट कांहीं एक सारासार विचार न पाहतां सूट द्यावी असें कोणाचेंही म्हणणें नाहीं. सारासार विचार न करितां सूट देण्याची वहिवाट ठेवणें शेतकऱ्यांस हितावह नाहीं. कारण आत्मावलंबन हा जो गुण त्यांचे आंगीं असला पाहिजे, तो असणार नाहीं हें खरें आहे; परंतु ज्यांस सूट द्यावयाची त्यांची स्थिति खरोखर वाईट आहे किंवा नाहीं व त्यांचे खेड्यांत दुष्काळ खरोखर आहे किंवा नाहीं याविषयीं पूर्ण चौकशी करून नंतर वेळेवर सूट दिली असतां, उभय पक्षांस हितावह होणार आहे. खरोखर स्थिति काय आहे हें समजण्यास अडचण येणार आहे असें नाहीं.

कांहीं लोकांचा दुसरा असा आक्षेप आहे कीं, 'जो सारा सध्यां जमिनीवर बसविण्यांत आला आहे, तो माफक असून तो आपत्तीचीं व सुवत्तेचीं सालें मनांत आणून बसविलेला आहे; मग सूट देण्याचें कारण काय?' प्रस्तुत जो साऱ्याचा दर आहे, तो कमी आहे किंवा कसें याविषयीं वाद न करितां, हा दर कमी आहे असें आपण घेऊन चालूं. आतां ज्यांनीं पैमाष सुरू केली त्यांस सुद्धां आपणांस सूट देण्याचा प्रसंग

येणार नाहीं असें वाटलें नाहीं. सूट देण्याचें कारण पडूं नये असा कमी दर घेण्याचा हेतु असतो हें खरें आहे; परंतु सन १८४१ त मुंबई सरकारचा असा अभिप्राय होता कीं, "बरेच दिवस एक सारखा थोडथोडा सारा घेऊन व चांगली व्यवस्था ठेवून रयतेची स्थिति सुधारेपर्यंत सूट देण्याची आवश्यकता अजी कमी होण्याचा संभव नाहीं." रयतेची स्थिति सुधारेपर्यंत सूट देण्याची आवश्यकता पडणार असें सरकारास ५० वर्षांपूर्वी जें वाटलें तें योग्य होय. रयतेची स्थिति सुधारेपर्यंत मात्र सूट द्यावी, नंतर देण्याचें कारण नाहीं असाच पुष्कळ लोकांचा अभिप्राय आहे. आपत्तीचे वेळीं सूट द्यावी ही समजूत नवीन नसून ज्या वेळेस गोल्डस्मिड, विंगेट व फियर यांनीं पैमाष सुरू केली तेव्हांपासून आहे.

यावरून कमी दर असतां सूट देण्याची आवश्यकता नाहीं असें नाहीं हें उघड आहे. एक विघा जमिनीबद्दल पूर्वीचे कारकीर्दीत जो सारा द्यावा लागत असे, त्या मानानें हल्लीं एक विघा जमिनीबद्दल जो सारा द्यावा लागतो तो कमी आहे; परंतु साऱ्याचे संबंधानें विचार करितां, पूर्वीपेक्षां हल्लीं दर कमी आहे किंवा नाहीं एवढ्याच गोष्टीविषयीं विचार करणें बरोबर नाहीं. जो दर बसविला आहे, तो जड वाटण्यासारखा आहे किंवा कसें याविषयीं मुख्यत्वेंकरून विचार केला पाहिजे. कारण धनसंचय करावयास न सांपडल्यामुळें, अथवा पीक वगैरे न झाल्यामुळें, अथवा पूर्वींचीं कांहीं साधनें कमी झाल्यामुळें, साऱ्याचा दर कमी असून जड वाटण्याचा संभव आहे. पूर्वीपेक्षां साऱ्याचा कमी दर, देशांत एकसारखी शांतता, धान्यास अधिक भाव, व जमिनीचें स्वामित्व, इतक्या गोष्टी प्रस्तुत शेतकऱ्यांस अनुकूल आहेत; परंतु इतक्या गोष्टी अनुकूल असतांही जर दर जड वाटत आहे तर कांहीं तरी प्रतिकूल गोष्टी असल्या पाहिजेत हें उघड आहे. जर प्रतिकूल गोष्टी नसत्या तर शेतकऱ्यांस ओरड करण्याचें कारण नसतें. ज्या प्रतिकूल गोष्टींमुळें शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिति कायम आहे त्या अशा कीं, पूर्वीं सर्व जमीन लागवडीस आणणें भाग पडत नसे; एक वर्षीं एक

आहे असें दिसतें; व जों जों रयत असमर्थ होत आहे, तों तों आमची सक्ती वाढत आहे. रयतेपासून आतां कांहीं एक मिळावयाचें नाहीं असें जेव्हां आह्मांस दिसून येतें, तेव्हां शेवटीं आह्मांस सूट द्यावी लागतेच. परंतु आह्मी असें विचारतों कीं, ज्या वेळेस सूट दिल्यापासून रयतेस कांहीं एक उपयोग व्हावयाचा नाहीं, त्या वेळपर्यंत सूट देण्याचें काम कां लां-

---

जमीन व दुसरे वर्षी दुसरी जमीन नांगरण्यास सवड असे. यामुळें पीक चांगलें होई; हल्लीं तसें करण्यास सवड नाहीं. पूर्वी जेवढ्या जमिनीची लागवड केली असेल, तेवढ्यावर मात्र सारा घेण्याची वहिवाट असे. पूर्वी गायरानांवर सारा घेत नसत; हल्लीं तसा प्रकार नाहीं. पूर्वी आपत्तीचे वेळीं अंशत: अथवा कारण पडल्यास सर्वांशीं सूट मिळे; म्हणजे वांड झाली तर, किंवा मुराण झालें तर किंवा करप झाली, किंवा नाबूद असेल तर सूट मिळे. हल्लीं आपत्तीचे काळींही सूट देण्याची कमी वहिवाट असल्यामुळें साऱ्याची फेड करण्याकरितां शेतकऱ्यांस सावकार पहावा लागतो; व सावकारास व्याज द्यावें लागतें. सावकार एकदां घरांत शिरला म्हणजे तो फिटून शेतकरी ऋणमुक्त होणें फार कठीण पडतें. पूर्वी सारा थकला असतां चिठ्ठी लिहून दिली म्हणजे चालत असे. पूर्वी साऱ्याबद्दल कित्येक ठिकाणीं धान्य घेण्याची वहिवाट असे; ही वहिवाट कोंकणांत अद्याप चालू आहे. हा प्रकार चालू होता म्हणून सावकाराकडे जाण्याचें फारसें कारण नसे. पूर्वी कौलानें जमिनी लावीत असत; म्हणून शेतकऱ्यांस बराच फायदा होई. केव्हां केव्हां त्यास वेळेवर तगाई मिळत असे. पूर्वी सारा वसूल करण्याचे कामांत ढिलाई असे; हल्लीं वक्तशीर दोन हप्त्यांनीं तो दिलाच पाहिजे. वक्तशीर सारा देण्याची थोड्यांस ऐपत असल्यामुळें पुष्कळांस सावकाराची मनधरणी करावी लागते. पूर्वी ६ किंवा ८ महिने गाड्या वाहून ५० पासून ७५ रुपये प्रत्येकास कमवावयास सांपडत. हल्लीं आगगाडीच्या योगानें हा रोजगार बसला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टींमुळें सारा देणें जड जातें.

वणीवर टाकावें ? एतद्देशीय संस्थानांत ज्याप्रमाणें वेळेवर सूट देतात, त्याप्रमाणें वेळेवर सूट कां देऊं नये."

• मुंबई ग्याझीटकर्ते ह्मणतातः—"ज्या लोकांस मागचा पुढचा विचार नाहीं, त्या लोकांपासून नियमित वेळीं सक्तीनें सारा वसूल करण्यांत येत आहे; यामुळें शेतकरी लोकांस सावकारावर अवलंबून राहवें लागत आहे. सावकारापासून शेतकऱ्यांस फार उपयोग होत आहे. कारण बहुतेक शेतकऱ्यांकडे जो सारा थकला असता, तो सावकरांनीं बक्षीर दिलेला आहे. सावकारांनीं हा सारा दिला नसता तर, शेतकऱ्यांच्या जमिनीचा लिलांव होऊन त्यांस हुसकून लाविलें असतें. कोठें गेलें तरी कांहीं लबाड व कांहीं चांगले असे लोक असावयाचेच; परंतु थोड्या लबाड लोकांसाठीं सर्वांस त्रास देणें बरोबर नाहीं."

मुंबई रिव्ह्यूपत्राचे कर्ते प्रसिद्ध मार्टिन वुड यांनीं तारीख ७ जून १८७९ चे अंकांत जो अभिप्राय दिला आहे तो आह्मी तात्पर्य रूपानें देतों. रिव्ह्यूकर्ते ह्मणतात कीं, "आमची तीस वर्षांची पैमाषपद्धत ही हितावह झाली नाहीं असें प्रतीतीअंतीं समजून आलें आहे. देशांतील शेतकरी लोकांस जीं दुःखें सोसावीं लागतात, त्यांचें कारण आमची पैमाष आहे. सारा माफक असावा असा जरी सरकारचा हेतु आहे, तरी, तो माफक नाहीं; व सारा जरी माफक असला, तरी, आपत्तीचे काळीं वेळेवर अंशतः अथवा सर्वांशीं सूट द्यावी असा सरकाचा ठराव आहे. परंतु आह्मी तर सक्तीनें सारा वसूल करीत आहों. ज्याप्रमाणें एतद्देशीय संस्थानांत वेळेवर सूट देतात, त्याप्रमाणें आमचें सरकार चाललें असतां, फायदेशीर होणार नाहीं काय ? रयतेस कांहीं एक द्यावयास मिळत नाहीं असें जेव्हां आह्मांस

दिसून येतें, तेव्हां शेवटीं आह्मांस सूट द्यावी लागतेच. मोटमोठ्या खर्चाचीं कामें उभारून मग आह्मी त्यांस मदत करितोंच. आह्मी एका हातानें घेतों व दुसऱ्या हातानें देतों. यापेक्षां ज्या तालुक्यांत आपत्ति आहे, तेथील शेतकऱ्यांस सूट देऊन त्यांचें ओझें कमी करणें बरें आहे. जमिनीवर कमी सारा बसवावा व आपत्तीचे वेळीं सूट द्यावी. असें केलें असतां रयतेस कुरकुर करण्यास जागा राहणार नाहीं. इतकेंही करून रयतेची स्थिति वाईट होत गेली तर मग सरकाराकडे तरी दोष नाहीं." पूर्वीपेक्षां साऱ्याचें संबंधानें हल्लीं विशेष सक्ति आहे, असें केवळ एतद्देशीय लोकांचें ह्मणणें आहे असें नाहीं. इंग्लंडांतील कांहीं लोकांचा असाच अभिप्राय आहे. दुसरें असें कीं, माजी व्हाइसरॉय नामदार लॉर्ड लिटन साहेब यांनींही साऱ्याचे बाबतींत सक्ती आहे, असें कबूल केलें आहे. ते ह्मणतात:—"साऱ्याचे बाबतींत आमची सक्ती आहे असें मला वाटतें; व सरकारचें नुकसान न होतां, शेतकऱ्याचाही फायदा होईल अशा प्रकारें ही सक्ती कमी करितां येण्यासारखी आहे."

हल्लीं गायरानांवरही सारा बसल्यामुळें गायरानें लागवडीस आणावीं लागत आहेत; व चारा न मिळाल्यामुळें गुरांचे हाल

---

१–दक्षिणेंतील शेतकरी लोकांविषयीं कायद्याचे बिलाचे संबंधानें होप साहेबांनीं भाषण केल्यावर वर सांगितल्याप्रमाणें व्हाइसरॉय साहेबांनीं बोलून दाखविलें.

२–जमीन भिकार होत चालली आहे असें जें म्हणणें आहे तें कितपत खरें आहे हें सांगतां येत नाहीं. परंतु देशांतील चोहोंकडचीं गायरानें लागवडीस येत आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. रिकामी अशी थोडी जागा दृष्टीस पडते. यामुळें गुरांस चरण्याचें साधन बरेंच नाहींसें झालें आहे. गायरानें कमी झाल्यामुळें गुरें रोडकीं व निशक्त

होत आहेत. गुरांचे हाल ह्मणजे शेतीचे हाल हें उघड आहे.

होत आहेत. यापासून शेतीस अपाय पोहोंचण्याचा संभव दिसत आहे. (-हिंदु पेट्रियट. मे. २६. १८७९).

गायरानें जाऊन त्यांऐवजीं जमिनी लागवडीस येत आहेत किंवा कसें, हें इलियट साहेब यांनीं ईस्ट इंडिया आसोशियेशन पुढें जो कांहीं वर्षांमागें निबंध वाचिला त्यावरून कळून येणार आहे. मद्रास येथील शेतकीचे पाठशालेवरील मुख्य मि० रॉबर्टसन् यांनीं मद्रास सरकारास सन १८७६ त कोइंबतूर प्रांतांतील शेतीचे स्थितीविषयीं जो रिपोर्ट पाठविला होता त्याचा, व दुसरे कामगारांनीं जे रिपोर्ट पाठविले होते, त्यांचा आधार इलियट साहेबांनीं घेतला आहे. रॉबर्टसन् यांचे रिपोर्टांत असें लिहिलें आहे कीं, कोइंबतूर प्रांताचें क्षेत्रफल ७४३२ औरस चौरस मैल असून, लोकसंख्या १७६३२७४ आहे. सन १८५७पर्यंत गायरानें वगैरे मोडून जाऊन ७०६७५० एकर जास्त जमीन लागवडीस आलेली आहे; व गायरानें लागवडीस आणण्याचें काम चालू आहे. "सर्व गायरानांची जमीनही नांगराचे तडाक्यांत येऊं लागेल तर ज्या साधनांवर शेतकरी इतके दिवस अवलंबून होते, त्या साधनांचा नाश होईल," असा रॉबर्टसन साहेबांचा अभिप्राय आहे. शिवाय रॉबर्टसन साहेबांचें असें म्हणणें आहे कीं, "या इलाख्यांतील (मद्रास) लागवड करण्याजोग्या जमिनींपैकीं बहुतेक जमिनी इतक्या निकृष्ट झाल्या आहेत कीं, त्या लागवडीच्या उपयोगीं नाहींत." इलियट साहेब ह्मणतात कीं, पंजाबांत इ० स० १८७१–७२ पासून १८७४–७५ पर्यंत २०,००,००० एकर जमिनीची जास्ती लागवड झालेली आहे.

मध्य प्रांतांत सन १८७५–७६ सालांत ५,३१,००० एकर जमिनीची जास्ती लागवड झाली.

मुंबई इलाख्यांतील गायरानें कमी झाल्यापासून वाईट परिणाम होत आहेत, याविषयीं डेक्कन रायट कमिशनर्स यांनीं आपले रिपोर्टांत वारंवार उल्लेख केलेला आहे. आग्रिकलचरल ग्याझेट ऑफ् इंडिया यांत असें लिहिलें आहे कीं, वायव्यप्रांतांतील बेरार या प्रदेशांत गुरें राखणारे लोक चारा नसल्यामुळें गुरांना घोड्यांची लीद खावयास घालूं लागले आहेत.

पूर्वी ही स्थिति नसे. पूर्वी लांकूड फांट्याचे संबंधानें जी सोय होती ती हल्लीं नाहीं. या एकंदर गोष्टींविषयीं विचार केला असतां, प्रस्तुतचा दर जरी कमी असला, तरी तो देणें शेतकऱ्यांस जड जात असेल किंवा नाहीं याविषयीं सहज अनुमान करितां येईल.

वर जे विचार सांगितले, त्यांवरून मजूरांची स्थिति कशी होती, व हल्लींही कशी आहे, हें वाचकांचे लक्षांत आलें असेल. हिंदुस्थान देशांत संपत्तीस ऊत येत होता, असें आमचे पैकीं व परकीय राष्ट्रांतील लोकांपैकीं कित्येकांचें मत होतें; व हल्लींही कांहींचें आहे. परंतु खरोखर पाहतां अशी स्थिति नव्हती. मजूरीचा दर कमी असल्यामुळें राष्ट्रांतील बहुतेक लोकांची निकृष्ट स्थिति होती व आहे. संपत्तीचा संचय होऊन ती राजे रजवाडे, सरदार, व इतर कांहीं शेट सावकार यांचेपाशीं असे. संपत्तीची वांटणी ज्याप्रमाणें इतर सुधारलेल्या देशांत होती, त्याप्रमाणें या देशांत नव्हती; व थोड्या लोकांजवळ संपत्तीचा संचय होऊन ती तेव्हांच दिसे. इतर देशांत संपत्तीचे वांटणींत या देशापेक्षां कमी न्यूनाधिक्य असे. ज्याप्रमाणें चोहोंकडून पदार्थ जमा करून प्रदर्शन करावें, त्याप्रमाणें निरनिराळ्या व्यक्तींपासून संपत्तीचा अंश गोळा होऊन तिचें राजे व सरदार यांचे घरीं प्रदर्शनच होत असे. हें प्रदर्शन पाहून लोक मोहून जात; व देश धनाढ्य आहे असें त्यांस वाटे. आमचे राजे रजवाड्यांचें ऐश्वर्य पाहून परकीय लोकांचा लोभ जागृत झाला; व त्यांस वाटे कीं, हिंदुस्थान देश ही केवळ संपत्तीची खाण आहे. या भ्रांतिमूलक कल्पनेमुळें या देशावर हल्ले सुरू होऊन हा देश उद्ध्वस्त झाला. हिंदुस्थानची संपत्ति फार दिवसांपासून प्रसिद्ध होती. ही संपत्ति मिळविण्यासाठीं फार प्राचीन कालापासून प-

रकीय राष्ट्रांचा यत्न चालू होता. सेसॉस्ट्रिस, डेरायस, शिकंदर

---

१–मिसर देशाचा राजा सेसॉस्ट्रिस यानें प्रथम हिंदुस्थानावर स्वारी केली, असें डायोडोरस सायक्यूलस म्हणतो. सेसॉस्ट्रिस हा ख्रिस्ती शकापूर्वी १३०८ त राजा होता. त्याबरोबर ४०० गलबतें होतीं. त्यानें तांबड्या समुद्रापर्यंत सर्व मुलूख जिंकिला व जमीनीचे मार्गानें हिंदुस्थानावर स्वारी केली; परंतु त्यानें कायमचें ठाणें बसविलें नाहीं.

२–डेरायस यानें आपला प्रधान सायलाक्स याला आरमार तयार करावयास व सिंधु नदींतून समुद्रापर्यंत जाण्यास सांगितलें. सायलाक्स यास ३० महिने लागले. त्यानें हिंदुस्थानचे संपत्तीविषयीं जी माहिती सांगितली, तिजवरून हिंदुस्थानावर स्वारी करण्याचें डेरायस याचे मनांत आलें. डेरायस यानें काबूल, पंजाब व सिंध हे प्रांत जिंकिले. हिंदुस्थान देश हा त्याचे राज्याचा एक भाग होता. हिंदुस्थानांतून त्यास १,२९,००,००० रुपये वसूल मिळत असे.

३–शिकंदर बादशाहानें ख्रि. श. पूर्वी ३२७ चे एप्रिल महिन्यांत १,२०,००० फौजेनिशीं हिंदुस्थानावर स्वारी केली; आणि पंजाबांत गुजराथ येथें जीलम नदीचे कांठीं पोरस राजाचा पराभव केला. तरुण बादशाहाचे मनांतून गंगा नदी वलांडून पुढें जावयाचें होतें; परंतु शिपाईलोक कुरकुर करूं लागल्यामुळें त्यास स्वदेशाची वाट धरणें भाग पडलें. शिकंदर परतला, हें तरी हिंदुस्थानचें दैवच समजावयाचें. ग्रीक लोकांची सत्ता कमी झाल्यावर, ब्याक्ट्रियाचे राजांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून, बराच भाग काबीज केला असावा, असें हिंदुस्थानचे पश्चिम प्रदेशांत जीं नाणीं सांपडलीं, त्यांजवरून मानण्यास हरकत नाहीं. या राजांनीं किती दिवस राज्य केलें हें समजण्यास साधन नाहीं. या राजांपैकीं मिनांडर हा प्राचीन काळीं फार प्रसिद्ध होता. हा ख्रि. श. पूर्वी दुसरे शतकांत गादीवर बसला. याचे मागून युक्रेटायडीस गादीवर बसला. याचे ताब्यांत हिंदुस्थानांतील ५,००० शहरें होतीं असें म्हणतात. ही अतिशयोक्ति आहे; परंतु याची सत्ता बऱ्याच भागावर असावी असें दिसतें.

बादशाहा व मिथ्रिडेटीज यांनीं या देशावर हल्ला करून संपत्ति हरण केली. नंतर महंमूद, तैमूरलंग व नादिरशाहा

---

१–पार्थियाचा राजा मिथ्रिडेटीज यानें युक्रेटायडीस याला जिंकून हिंदुस्थानांतील त्याचें राज्य काबीज केलें. यानें सिंधु नदीपासून गंगा नदीपर्यंत जो प्रदेश आहे तो जिंकिला. उज्जनी, अजमीर व आग्रा येथें अनेक वेळां जीं नाणीं सांपडलीं, तीं मिथ्रिडेटीज व त्याचे मागून आलेले राजांचीं होत, असें प्राचीनस्थितिशोधकांचें मत आहे.

२–महमुदापूर्वी मुसलमानांनीं अनेक वेळां स्वाऱ्या केल्या. धर्मसंस्थापक महंमद याचे मरणानंतर थोडेच वर्षांनीं खलीफ उमार यानें अबुल अलास यास हिंदुस्थानावर स्वारी करण्याकरितां पाठविलें. त्याची व हिंदूंची पहिली लढाई आरोर येथें झाली. तींत अबूल हा मारला गेला. नंतर खलीफ अल्ली यानें सिंधमधला कांहीं प्रदेश जिंकला. वलीदपर्यंत म्हणण्यासारखें कांहीं झालें नाहीं. इ० स० ७०५ व ७१५ या वर्षांचे दरम्यान वलीद यानें सिंध प्रांतावर चाल करून गंगा नदीपर्यंत प्रांत जिंकिला. तीन वर्षांनीं वलीदचा सेनापति महमेद-बेन कासीम यानें चितुरावर स्वारी केली. परंतु बाप्यानें त्याचा पराभव केला. बाप्याचा पणतु खुमान यानें मुसलमान लोकांबरोवर २४ लढाया करून त्यांचा मोड केला. तेव्हांपासून १५० शें वर्षेंपर्यंत मुसलमानांनीं गडबड केली नाहीं. नंतर हरुन अलरश्चिद याचे कारकीर्दींत मुसलमानांनीं पुन्हा उठावणी केली होती. परंतु हिंदु राजांनीं जोर धरल्यामुळें सुमारें १५० शें वर्षेंपर्यंत हल्ला आला नाहीं. परंतु शेवटीं जयपाळ राजा राज्य करीत असतां, सबक्तजीन यानें स्वारी केली. त्याचे मागून महमुदानें २४ वेळां स्वाऱ्या केल्या. मुसलमान लोक द्रव्य हरण करीत असत व लोकांस गुलाम करून नेत. मुसलमान लोक वारंवार स्वाऱ्या करीत असल्यामुळें, शेवटीं हिंदु गुलाम इतके स्वस्त झाले होते कीं, त्यांस २ रुपयांस देखील कोणी घेईना !!!

३–नादिरशाहा परत गेला त्या वेळेस त्यानें १,२५,००,००,००० रुपयांची संपत्ति नेली असें म्हणतात (ब्राईसकृत हिंदुस्थानचा इति.

यांनीं हा देश उद्ध्वस्त करून अमर्याद संपत्ति लुटून स्वदेशीं नेली. परकीय राष्ट्रांतील लोकांस संपत्ति नेण्यास फार त्रास पडला नाहीं. कारण थोडे लोकांपाशीं संपत्तीचा संचय होऊन प्रदर्शन झालें होतें. जर संपत्तीचा फैलावा झाला असता, जी संपत्ति होती, ती निरंतरचे लोकोपयोगी कामांत मुरली असती, तर परकीय लोकांस ती नेण्यास अडचण येती. संपत्तीचा अशा प्रकारें व्यय झाल्यापासून राजेरजवाड्यांस कमी फायदा झाला असता असें नाहीं. लोकांस फायदा होऊन राजांसही फायदा झाला असता. परंतु हें व्हावें कसें? कारण सृष्टपदार्थविषयक कारणांचा जोर अनिवार्य पडला. सुपीकतेमुळें लोकसंख्येची वृद्धि, या वृद्धीमुळें मजूरीचा कमी दर, कमी मजूरीमुळ संपत्तीचे वांटणींत फार न्यूनाधिक्य, व न्यूनाधिक्यामुळें संपत्तीचा संचय व प्रदर्शन, अशीं एकामागून एक कार्यें होऊन परकीय लोकांस हा देश सुवर्णभूमि असा वाटूं लागला. परंतु खरोखर पाहतां या संपत्तीचा उपभोग घेणारे थोडे भाग्यशाली होते. पुष्कळांची स्थिति अगदीं साधारण होती. युरोपांतील भिकार देशांपेक्षांही हिंदुस्थान देश भिकार आहे, असें बर्क साहेबांनीं बोलून दाखविलें तें किती यथार्थ होतें, याची प्रतीति आह्मी चांगली घेत आहों. युरोपियन लोकांस हिंदुस्थानचे स्थितीविषयीं खरी माहिती नसल्यामुळें त्यांचे ग्रह भलभलते झाले. जरी पुष्कळ लोक खरोखर कंगाल होते, तरी त्यांस हें खरें वाटत नसे; व अद्यापि कित्येकांस खरें वाटत नाहीं. हिंदुस्थानचे संपत्तीविषयीं पाश्चात्य लोकांची समजूत चुकीची होती. राजेरजवाडे व शेटसावकार यांजवळ संपत्ति असे. इतर लोकांची

---

पृ. २३ ). कीनसाहेब लिहितात कीं, ८० कोटींपेक्षां ज्यास्त रुपये त्यानें नेले, शिवाय जवाहीर घोडे वगैरे.

वास्तविक स्थिति फारच निकृष्ट असे. इतर लोकांची स्थिति चांगली कशी असावी ? जोंपावेतों मजूरीचा दर कमी आहे, तोंपावेतों त्यांची स्थिति चांगली होणें अशक्य होय. हिंदुस्थानांत सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें लोकसंख्या वाढून मजूरीचा दर कमी असे. जर लोकसंख्या वाढल्यामुळें मजूरीचा दर कमी होता, तर, मजूरांची स्थिति चांगली कशी असावी ? हल्लींचे कालाविषयीं विचार केला असतांही आपणांस कळून येईल कीं, श्रम करणारे लोकांस थोडी मजूरी मिळते ह्मणून त्यांची स्थिति निकृष्ट आहे. कित्येकांस तर निर्वाहाची पंचाईत पडते.

हिंदुस्थान देश गरीब आहे किंवा नाहीं हें खालीं लिहिलेल्या माहितीवरून कळून येईल. क्रिमियन लढाईचे वेळीं इंग्लंडांत ज्यांचें एक हजार रुपयांवर उत्पन्न होतें, त्यांवर कर बसविण्यांत आला; व एका वर्षांत १६ कोटि रुपये वसूल झाले. हिंदुस्थानांत इ० स० १८६०–१८७१ पर्यंतचे १२ वर्षांत उत्पन्नाची इयत्ता २०० असून, १३ कोटि रुपये वसूल झाले. ज्या वेळेस १,००० रुपयांची इयत्ता होती, त्या वेळेस सदर्हु प्रकारचा कर देणारे हिंदुस्थानांत १,८०,००० लोक निघाले. परंतु इंग्लंडची लोकसंख्या पुष्कळ कमी असतां हा कर देणारे ४,२१,३७६ लोक निघाले.

इंग्लंडांत ५०० पासून १,००० रुपये पर्यंत उत्पन्नाचे लोक २८,८०,००० होते. हिंदुस्थानांत २००–५०० रुपये उत्पन्नाचे लोक ५ लाख होते. इंग्लंडांत २७० व वरील उत्पन्नाचे लोक एक कोट होते.

" हिंदुस्थानची वसुलाचे संबंधानें स्थिति " या विषयावर प्रसिद्ध फासेट साहेबांचा " १९ वें शतक " या मासिक पुस्तकांत जो लेख छापून प्रसिद्ध झाला आहे, त्यांत ते ह्मणतात

कीं, " हिंदुस्थान देश हा अतिशय श्रीमान् देश आहे, व ज्या कामाबद्दल हिंदुस्थानास खर्च देण्याची ताकद नाहीं, असें एकही काम नाहीं, (मग तें काम कितीही खर्चाचें असो) असा थोडे वर्षांमागें लोकांचा समज होता. आतां हिंदुस्थान देशाचे संपत्तीविषयीं व लोकांचे स्थितीविषयीं बरोबर समज होऊं लागला आहे. वारंवार जे दुष्काळ पडतात त्यांमुळें व दुसऱ्या कित्येक गोष्टींमुळें हिंदुस्थानची स्थिति अशी वाईट कां होते ह्याकडे लोकांचें लक्ष लागलें आहे. ह्या गोष्टीवरून इंग्लिश लोकांस शेवटीं ही गोष्ट चांगली कळून आली आहे कीं, हिंदुस्थान देश हा अतिशय भिकार देश आहे, व तेथील बहुतेक लोकांची इतकी गरीब स्थिति आहे कीं, ज्यास्ती कर बसवून ज्यास्ती उत्पन्न वाढविण्याचें जर कारण पडेल, तर, सरकारास मोठ्या अडचणी आल्याशिवाय राहणार नाहींत."[१]

हिंदुस्थानांत उपजीविकेचे पदार्थ स्वस्त असल्यामुळें संपत्तीचे वांटणींत अतिशयित न्यूनाधिक्य उत्पन्न झालें. या न्यूनाधिक्यामुळें दुसरीं कार्यें घडून आलीं. ज्याजवळ संपत्ति नसते त्यास हीनत्व येतें व त्याची वजनदारी नसते. ज्याजवळ संपत्ति असते त्यास मान मिळतो; त्यास एका प्रकारचा अधिकार असतो व लोकांवर त्याचें स्वामित्व चालतें. या गोष्टी ज्याप्रमाणें हल्लीं हिंदुस्थानांत व इतर देशांत अनुभवास येतात, त्याप्रमाणें त्या पूर्वीं हिंदुस्थानांतही प्रत्ययास येत असल्या पाहिजेत. दुसऱ्या गोष्टींत जर फरक नसेल तर, ज्याजवळ जशी संपत्ति असते, त्याचें तसें वजन असावयाचें, ही गोष्ट ज्याप्रमाणें व्यक्तिसंबंधानें दृष्टोत्पत्तीस येते, त्याप्रमाणें ती व्यक्तिसमूहा-

---

१–नाइन्टीन्थ सेंचरी ( एकुणिसावें शतक नांवाचें मासिक पुस्तक ) फेब्रुआरी १८७८.

सही लागू आहे. संपत्ति ही एका प्रकारची शक्ति आहे, हें सर्वांस अनुभवावरून माहीत आहे. संपत्तीचे वांटणींत न्यूनाधिक्य होत गेल्यामुळें अर्थातच अधिकाराचे वांटणींत न्यूनाधिक्य उत्पन्न झालें. अन्न स्वस्त असल्यामुळें श्रीमान् थोडे व मजूरदार फार अशी स्थिति असते; त्याप्रमाणें याच कारणामुळें चाकरी करून निर्वाह करणारे फार असतात. जे धनिक असतात, त्यांस थोडक्या पैशांत पुष्कळ लोकांस चाकरीस ठेवितां येई. अशी स्थिति इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांत दृष्टीस पडत नाहीं. या ठिकाणीं थोडक्या पैशांत चाकर ठेवितां येत नसल्यामुळें, धनिकापाशीं थोडे चाकर असणार व त्यांचें स्वामित्व थोडक्यांवर चालणार हें उघड आहे. हिंदुस्थानांत थोडक्या धनिकांचें बरेच लोकांवर स्वामित्व चाले. थोडे लोकांस अधिकार मिळून पुष्कळ लोक आश्रितादाखल किंवा चाकरादाखल असत. जे लोक आश्रित असत अथवा ज्यांस सेवा करून निर्वाह करावा लागे, त्यांस नेहमीं हां जी हां जी करावयाची संवय लागून त्यांचे मनाची निकृष्ट स्थिति होण्याचा संभव आहे किंवा कसें, हें समजण्यास अडचण पडणार नाहीं. सेवा करून मनाची स्वतंत्रता कायम ठेवणें सुधारलेल्या देशांत देखील कठीण आहे. सेवा करून निस्पृहपणें वर्तन करणारे शेंकडा किती निघतात, हें लक्षांत आणिलें असतां पूर्वीं स्थिति कशी असेल, याची कल्पना करितां येईल. थोडके लोकांचे हातीं अधिकार असणें देशास हितावह नसतें. एकाच व्यक्तीचे मर्जीप्रमाणें चालण्याचा प्रकार कमी होऊन विशेष व्यक्तींचे हातीं ज्या वेळेस सत्ता येते, त्या वेळेस लोकांची स्थिति सुधारते व जुलूम कमी होतो.

उपजीविकेच्या पदार्थांच्या स्वस्ताईमुळें संपत्तीचे वांटणींत

न्यूनाधिक्य उत्पन्न झालें हें आह्मीं वर सांगितलें आहे. स्वस्त अन्नापासून दुसरें असें कार्य झालें कीं, थोडक्यांत निर्वाह होऊं लागल्यामुळें स्वाभाविक रीतीनें आळस वाढला. निर्वाहाचें साधन स्वल्पायासानें प्राप्त होण्यासारखें असलें ह्मणजे ज्यास्ती श्रम करण्याची इच्छा लोकांस होत नाहीं. बरें, निर्वाहाचें साधन स्वल्पायासानें उपलब्ध नसेल तर विशेष श्रम करावे लागतात, व विशेष श्रम करण्याची संवय असल्यापासून सुस्ति वाढत नाहीं. अशी स्थिति असते किंवा नाहीं, हें देश व कोंकण येथील लोकांविषयीं विचार केला असतां समजेल. ज्या वेळेस देशाची बाल्यावस्था असते त्या वेळेस ही गोष्ट ढळढळीत दिसून येते. अशा कालांत श्रम करण्याचा मुख्य हेतु उदरभरण हा होय. जसजशी सुधारणा होत जाते, तसतसे मनुष्यें अन्य हेतूंमुळें श्रम करितात. या देशांत जमीन सुपीक असल्यामुळें लोकांस थोडक्या श्रमानें निर्वाहाचें साधन मिळे. फळफळावळ व तांदूळ वगैरे धान्यें यांवर चांगला निर्वाह करितां येत असे, ह्मणून शरीररक्षणाकरितां पक्षी अथवा श्वापदें यांचे मांसाचें कारण पडत नसे. थोडक्या श्रमानें पुष्कळ अन्न मिळूं लागलें, ह्मणून अधिक श्रम करण्याची इच्छा अर्थातच कमी होती. थोडे श्रम करण्याची संवय ही फक्त पूर्वींचे लोकांसच होती असें नाहीं. हल्लींही ही संवय दृष्टीस पडते. जोंपावेतों धान्याचा भाव माफक असतो, तोंपावेतों लोकांस ही संवय नडत नाहीं; परंतु आपत्तीचे कालीं ही संवय फार नडते. हिंदुस्थानांतील लोकांच्या गरजा थोड्या आहेत व त्याही थोडक्या श्रमानें भागवितां येत असल्यामुळें तृप्ति वाढली. ही तृप्ति सुधारणेस बाधक होय; परंतु ही तर आमचे आंगीं पूर्णपणें खिळली आहे. निर्वाहाची एकदां सोय झाली ह्मणजे दुसरा

व्यवसाय आरंभणारे फार थोडे निघतात. ही स्थिति अद्यापि दृष्टीस पडते. या सुस्तीमुळें व तृप्तीमुळें अर्थातच घरांत स्वस्थ बसून थोडक्या श्रमानें जें सुख प्राप्त होत असेल, तें मिळालें ह्मणजे कृतकृत्यता झाली असें लोकांस वाटतें. थोडक्यांत गरज भागूं लागली ह्मणजे सुस्ति उत्पन्न होऊन शरीर सुखावतें व एकदां तें सुखावलें ह्मणजे विपत्तीचे कालींही अधिक श्रम होत नाहींत. जर मनुष्याचे मागें कांहीं उद्योग नसेल किंवा त्यास कांहीं सद्धेतु सिद्धीस न्यावयाचा नसेल, तर, त्याचे मनाचा कल कुमार्गाकडे लागून त्याची स्थिति वाईट होते, हें आपणास अनुभवावरून कळून येतें.

सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें हिंदुस्थानांत आणखी एक महत्त्वाचें कार्य उत्पन्न झालें. तें कार्य जातिभेद होय. जातिभेदाचे उत्पत्तीचे संबंधानें बराच मतभेद अद्यापि दिसून येतो. जुन्या लोकांचे समजुतीप्रमाणें जातिभेद ईश्वरकृत आहे. आमच्यांपैकीं व पाश्चात्य लोकांपैकीं कांहींचे मतें ब्राह्मणच जातिभेदास कारण आहेत. कांहींचें असें मत आहे कीं, हिंदुस्थानांतील मूळचे लोक व आर्य हे भिन्न होते; आर्यांची जात व धर्म हीं भिन्न होतीं; ह्मणून हा भेद उत्पन्न झाला असावा. आतां इतक्या सर्व गोष्टींविषयीं या ठिकाणीं यथार्थ विचार करितां येत नाहीं. याविषयीं स्वतंत्र ग्रंथांत विचार करणें योग्य आहे. कारण हा विषय वादग्रस्त असून फारच महत्त्वाचा आहे; दुसरें असें कीं, आह्मीं जो विषय हातीं घेतला आहे, त्याचा प्रकृत ग्रंथ हा पहिला भाग आहे. जीं सृष्टपदार्थविषयक कारणें आहेत त्या सर्वांविषयीं या भागांत विचार केलेला नाहीं. ज्या कारणांविषयीं आह्मीं येथवर विचार केला आहे, त्यांपासून प्रत्यक्ष कार्यें होत नाहींत. सृष्टपदार्थविषयक कार-

णांपैकीं विशेष महत्त्वाचें कारण सृष्टचमत्कार हें होय; या कारणामुळें धर्मभोळेपणाची प्रवृत्ति होते असें आह्मीं मागें सांगितलें आहे; परंतु ही कशी होते याविषयीं कांहीं एक सांगितलें नाहीं. याविषयीं सविस्तर विचार स्वतंत्र भागांत करण्याचा आमचा उद्देश आहे; ह्मणून आह्मी जातिभेदाविषयीं विशेष विचार करीत नाहीं. सृष्टचमत्कार या विषयाविषयीं विचार केल्याशिवाय जातिभेदाचे विषयाविषयीं विचार करणें प्रशस्य नाहीं; कारण, या दोन विषयांचा निकट संबंध आहे. आमचे मतें जातिभेदास ईश्वर कारण नाहीं; किंवा ब्राह्मण कारण नाहींत; यास सृष्टपदार्थविषयक नियम मात्र कारण आहेत असेंही आह्मी ह्मणत नाहीं. जातिभेदासारखीं कार्यें मुख्यत्वेंकरून कोत्या समजुतींमुळें उत्पन्न होतात. ज्या कारणांमुळें मनुष्याचे विचार कोते झाले आहेत असें आपणास इतिहासावरून दिसून येतें, त्यांपैकीं धर्मभोळेपणा हें प्रधान कारण होय. धर्मभोळेपणा हा मुख्यत्वेंकरून सृष्टचमत्कारांपासून उत्पन्न होतो. ज्याप्रमाणें अतिशयित सुपीकतेमुळें स्वस्त अन्न होतें व स्वस्त अन्नामुळें धनाचे वांटणींत व यामुळें सामाजिक स्थितींत न्यूनाधिक्य उत्पन्न होतें, ह्मणजे एक पक्षीं हीन स्थिति व दुसरे पक्षीं थोडे लोकांजवळ संपत्ति व अधिकार हीं असतात, त्याप्रमाणें सृष्टचमत्कारांपासून धर्मभोळेपणा, धर्मभोळेपणापासून ज्ञानाचे वांटणींत न्यूनाधिक्य व त्यामुळें एक पक्षीं बहुतेक लोकांचें अज्ञान व दुसरे पक्षीं थोड्या लोकांजवळ ज्ञानभांडार अशीं कार्यें होतात. शेतकऱ्यांची हीन स्थिति झाली आहे ह्मणून ज्याप्रमाणें सावकारासच दोष देणें योग्य नाहीं, त्याप्रमाणें शूद्रांचे हीन स्थितीबद्दल इतर जातीचे लोकांस दोष देणें योग्य नाहीं. जी हीन स्थिति झाली होती तिचा फायदा इतर जातींचे लो-

कांनीं व विशेषेंकरून ब्राह्मणांनीं घेतला; परंतु यावरून ते जातिभेदाचें कारण आहेत असें ह्मणतां येत नाहीं. असो.

वरील एकंदर हकीकतीवरून या देशांत सृष्टपदार्थविषयक कारणांचा जोर किती बलवत्तर आहे हें वाचकांचे लक्षांत आलें असेल. या कारणांचा जोर सहज कमी करितां येण्यासारखा नाहीं. ज्या ठिकाणीं येथल्यासारखीं कारणें आहेत, त्या ठिकाणीं लोकांची निकृष्ट स्थिति दृष्टीस पडते. यावरून कदाचित् कित्येकांचा असा समज होईल कीं, या कारणांचा जोर कमी करून लोकांची स्थिति सुधारतां येणार नाहीं, असें आह्मी ह्मणत आहों. लोकांची स्थिति सुधारणार नाहीं असें आमचें बिलकूल मत नाहीं. हल्लीं जो क्रम चालू आहे तो तसाच चालेल तर सुधारणा झालीच पाहिजे. इतकेंच कीं, सुधारणा करण्यास ज्या अडचणी आहेत त्या सामान्य नाहींत, व जो काल लागणार आहे तो थोडा आहे असें नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

युरोपांतील स्थितीविषयीं विचार केला असतां, आपणास असें दिसून येईल कीं, संपत्ति व अधिकार यांचे वांटणींत ज्या न्यूनाधिक्यामुळें राज्यांचा पाया कमजोर असतो, तें न्यूनाधिक्य कमी करण्याविषयीं प्रवृत्ति आहे; व युरोपांत आपण सुधारणेचें जें रूप हल्लीं पाहत आहों, तेंही विशेषेंकरून याच कारणामुळें होय. युरोप खंडाची सुधारणा ह्मणजे आतां शिखरास जाऊन पोहोंचली आहे व तींत आतां कांहीं एक करावयाचें राहिलें नाहीं असें ह्मणण्याचा आमचा हेतु नाहीं. परंतु सर्व लोकांचा सामावेश होऊन निरनिराळे प्रकारचे लोकांस सुधारणा करण्यास सवड सांपडेल, व यामुळें सर्वांची सुधारणा हळू हळू होत जाईल अशा प्रकारें सामाजिक व राजकीय व्यवस्था चालू आहे.

हिंदुस्थानांत जी सुधारणा झाली ती अंशतः होती; ह्मणजे निरनिराळे प्रकारचे लोक वास करीत असून त्यांपैकीं कांहीं विशेष प्रकारचे लोकांमध्यें मात्र सुधारणा होती. साधारणतः पाहतां बाकीचे एकंदर लोक अज्ञानांधकारांत व दारिद्र्यांत बुडाले होते.

सृष्टपदार्थविषयक नियमांचे प्राबल्यामुळें हिंदुस्थानांत काय कार्यें झालीं, याविषयीं आपण येथवर विचार केला. यावरून आपणांस दोन मुख्य गोष्टी कळून येतात. त्यांपैकीं पहिली ही कीं, स्वस्त अन्नामुळें मजूरीचा दर कमी होऊन श्रम करणारे लोकांची स्थिति दिवसेंदिवस वाईट होत चालली. ती इतकी कीं, एक वर्षीं पीक झालें नाहीं तर लागलींच त्यांचे डोळे पांढरे होतात. स्वस्त अन्नामुळें थोडक्यांत गरजा भागूं लागल्या ह्मणून सुस्ति उत्पन्न होऊन शिथिलअवस्था उत्पन्न झाली. ही स्थिति किती हितावह आहे याविषयीं विचार करणें फार अगत्याचें होय. स्वस्त अन्नामुळें एक पक्षीं मजूरीचा दर कमी होऊन बरेच लोकांची हीन स्थिति होणें, व दुसरे पक्षीं संपत्तीचा संचय थोडेच लोकांजवळ होऊन त्यांकडे सामाजिक व राजकीय अधिकार राहणें, हें देशास हितावह नसतें. मोठा जनसमूह फक्त अन्नार्थी होऊन थोडेच लोक धनाढ्य झाल्यापासून अधिकार थोड्यांचे हातीं येतो, व सहजगत्या एक पक्षीं निमूटपणें ऐकण्याची संवय व दुसरे पक्षीं जुलमाचा प्रकार अशीं कार्यें घडून येतात. हीं कार्यें हिंदुस्थानाचे इतिहासावरून चांगलीं नजरेस येतात. थोडेच लोकांजवळ ज्ञानाचा संचय असून बाकीचे लोक अज्ञान व मूर्ख असणें जसें देशास हितावह नाहीं, तसेंच धनाचे संबंधानें होय. ज्याप्रमाणें देशांतील सर्व लोक विद्वान् होणार नाहींत, त्याप्रमाणें सर्व लोक धनिक बनणार नाहींत हें खरें आहे. फ्रेंच कम्यूनिस्ट ह्मणतात त्या-

प्रमाणें, सर्वांजवळ सारखें धन असावें असें आह्मी ह्मणत नाहीं. परंतु श्रम कणारे लोकांस श्रमाचें अधिक फल मिळूं लागलें पाहिजे; व असें होऊं लागलें ह्मणजे अर्थात् त्यांची स्थिति सुधारण्याचा संभव आहे; व त्यांस वर डोकें काढण्यास सवड सांपडणार आहे. यावरून देशांतील भांडवलवाल्यांस दरिद्री करून श्रम करणारे लोकांची स्थिति सुधारावी असें ह्मणण्याचा आमचा हेतु असेल असेंही कोणी समजूं नये. भांडवलवाले तर कायम राहिलेच पाहिजेत, व श्रम करणारे लोकांसही श्रमाबद्दल अधिक फल मिळून त्यांची स्थिति सुधारली पाहिजे. आतां ही स्थिति प्राप्त होण्यास कोणते उपाय केले पाहिजेत, हा प्रश्न जरी फार महत्त्वाचा आहे, तरी त्याविषयीं प्रकृत ग्रंथांत विचार करितां येत नाहीं.

दुसरी जी गोष्ट कळून येते ती ही कीं, हिंदुस्थानची हवा दुर्बलता आणणारी आहे. अशा प्रकारची हवा असली ह्मणजे शरीर व मन यांस उत्साह कमी असतो. हें आपणास अनुभवावरूनही माहीत आहे. इतर सुधारलेले देशांतील लोकांची व आपली तुलना करून पाहतां, आपणांत जितके अशक्त सांपडतील तितके सुधारलेल्या दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रांत सांपडण्याचा संभव कमी आहे.

हिंदुस्थानचा इतिहास वाचिला असतां आपणास कळून येतें कीं, एकामागून एक अशा परकीय लोकांच्या टोळ्यांच्या टोळ्या देशांत आल्या. अरब, पठाण व तार्तर यांनीं वेळोवेळीं या देशावर स्वाऱ्या करून हा देश उद्ध्वस्त केला; परंतु त्यांबरोबर आह्मांस फार दिवस टिकाव धरवला नाहीं. प्रत्येकानें कांहीं दिवसपर्यंत सत्ता गाजविली; परंतु प्रत्येकास हवेमुळें दुर्बलता येऊं लागली व त्या वेळेस प्रत्येकास धीट व सदृढ लोकां-

पुढें हात टेंकावे लागले. अशा रीतीनें एकाचे हातून दुसऱ्याचे हातीं देशाचें आधिपत्य गेलें. या देशाचें जें आधिपत्य गेलें तें फक्त हवेचे दुर्बलतेमुळें गेलें असें नाहीं. हें जाण्यास दुसरीं कारणें होतीं; परंतु हवेपासून जी दुर्बलता उत्पन्न झाली ती पुष्कळ अंशीं सहाय्यकारी झाली. जोंपावेतों ही स्थिति कायम राहील, तोंपावतों उत्साह व हिंमत हीं देशांत कमीच असावयाचीं. अद्यापि आपणांस सुधारणेच्या व यामुळें देशोन्नतीच्या संबंधानें किती गोष्टी करावयाच्या आहेत? या सर्व गोष्टी शरीरांत व मनांत हिंमत व उत्साह हीं असतील तर होतील, हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. हवेच्या संबंधानें जी अडचण असते ती ज्याप्रमाणें नैसर्गिक कारणांमुळें असते, त्याप्रमाणें ती कृत्रिम दोषांमुळेंही उत्पन्न होते. कांहीं कारणें आपणांस दूर करितां येणार नाहींत ही गोष्ट जरी खरी आहे, तरी, शास्त्रसंबंधानें जे शोध झाले आहेत, त्यांचे योगानें बरीच स्थिति सुधारतां येईल ही गोष्ट निर्विवाद आहे. आमचें ह्मणणें काल्पनिक आहे असें नाहीं. पंचवीस वर्षांपूर्वींचें मुंबईचें हवेचें मान व हल्लींचें मान यांत किती अंतर पडलें आहे हें लक्षांत आणिलें असतां, हळू हळू प्रयत्न चालू ठेविल्यापासून मानवी कृतीनें स्वाभाविक कारणांचा जोर कमी करितां येतो किंवा नाहीं हें समजेल. आमच्या कृतीचें फल कित्येक वेळां कदाचित् आह्मांस मिळणार नाहीं; परंतु एवढ्याच कारणावरून उद्योगास न लागणें हें श्रेयस्कर नाहीं. हवेच्या योगानें राष्ट्राला जी दुर्बलता आली, ती एक दोन युगांत आलेली नाहीं; ती येण्यास युगांचीं युगें लोटलीं असावींत. तेव्हां ही दुर्बलता कालांतरानें जाईल; परंतु यत्न केला असतां बरीच जाईल यांत संशय नाहीं.

**मिसर¹ देश**—आफ्रिका खंडाविषयीं स्थूल विचार करितांना आह्मीं मागें सांगितलेंच आहे कीं, या खंडांत प्राचीन कालीं जी सुधारणा झाली ती मिसर देशांत झाली; व मिसर देशाविषयीं सविस्तर विचार निराळे भागांत करूं. सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें हिंदुस्थानांत जशीं कार्यें घडून आलीं, तशीं कार्यें मिसर देशांत घडून आलीं किंवा नाहीं, याविषयीं आतां विचार करूं. जगाचे प्राचीन इतिहासांत ज्या देशांची फार प्रसिद्धि आहे, त्यांपैकीं मिसर देश हा एक होय. ज्याप्रमाणें प्राचीन कालीं हिंदुस्थानचें अथवा ग्रीस व इताली या देशांचें पाऊल सुधारणेंत पुढें होतें, त्याप्रमाणें मिसर देशाची सुधारणा प्रसिद्ध होती. हिंदुस्थान देशाचा प्राचीन इतिहास हा ज्याप्रमाणें अतिशयोक्तीनें भरलेला आढळतो, त्याप्रमाणें मिसर देशाची गोष्ट आहे. हिंदुस्थान देशाविषयीं विचार करण्यास जितकीं साधनें उपलब्ध आहेत, तितकीं मिसर देशाविषयीं नसल्यामुळें, हिंदुस्थानाविषयीं जसा विचार करावयास सांपडला, तसा जरी मिसर देशाविषयीं करितां येणार नाहीं, तरी, हिराडोटसप्रभृति प्रवाशांनीं या देशांत स्वतः प्राचीन कालीं प्रवास करून जी माहिती मिळविली, व ब्रूस, डेविसन, बेलझोनी वगैरे आधुनिक प्रवाशांनीं नील नदी, मनोरे वगैरे विषयीं मिळविलेली जी माहिती प्रसिद्ध झाली आहे, तिजवरून आपणांस मिसर देशाविषयीं विचार करण्यास फारशी अडचण पडणार नाहीं.

मिनिस हा मिसर देशाचा पहिला राजा होता असें तेथील

१–धर्मशास्त्रांत मिझ्रामचा देश असें मिसर देशाचें नांव आढळतें. या देशांत ह्यामचा मुलगा मिझ्राइम याचे वंशजांनीं वसाहत केली व यावरून हें नांव पडलें असावें असें म्हणतात. अरब लोक या देशास मस्र व तुर्क लोक मिस्र असें म्हणतात; यावरून मराठींत मिसर हें नांव पडलें.

लोक ह्मणतात. महापुरानंतर ३३० वर्षांनीं हा राजा राज्य करूं लागला. ज्या वेळेस ज्यू लोक नुकताच कोठें धनाचा संचय करूं लागले होते अथवा ज्या वेळेस इराणाच्या मैदानांत धनगर लोक गुरें चारीत असत, त्या वेळेस मिसर देशांत लोक शेती करून भरभराटीस येत चालले होते. त्यांस शेतीवर निर्वाह करावयास सांपडून सभोंवतील देशांस धान्याचा पुरवठा करितां येई. युरोपीय सुधारणेचे उगम ग्रीस व इटाली देश, हे ज्या वेळेस रानटी स्थितींत होते, त्या वेळेस मिसर देशांत सुधारणा होऊन कलाकौशल्याचीं कामें दृष्टीस पडत असत. जो ग्रीस देश विशेषेंकरून युरोपांत गुरुस्थानीं होता, त्या ग्रीस देशास मिसर देशापासून कांहीं उपयुक्त कला व शास्त्रें ह्यांचें ज्ञान प्राप्त झालें. ग्रीक व रोमन लोकांनीं मिसर देशांतील लोकांस कलाकौशल्य वगैरे गोष्टींत मागें सारिलें, ही गोष्ट जरी खरी आहे, व मिसर देशांतील प्राचीन सुधारणा व युरोपांतील हल्लींची सुधारणा ह्यांची तुलना केली असतां, मिसरदेशीय सुधारणा फार कमी होती असें जरी ह्मणावें लागतें, तरी, मिसर देश सुधारलेला होता व तेथील सुधारणा आर्य सुधारणेशिवाय प्राचीन होती, या गोष्टी निर्विवाद आहेत. अंधाऱ्या रात्रीं ज्याप्रमाणें ताऱ्यांचा प्रकाश पडतो, त्याप्रमाणें आफ्रिका खंडांत चोहोंकडे अज्ञानांधःकार पसरलेला असून, मिसर देशांत संपत्तीचें वैभव व ज्ञानाचा प्रकाश हीं झळकूं लागलीं होतीं. हा प्रकाश पाहून सभोंवतालचे राजांस हा देश काबीज करण्याविषयीं इच्छा उत्पन्न होऊं लागली. या देशावर सायरस ह्याचा मुलगा कंबायसेस यानें स्वारी करून तो इराणास सामील केला. तेव्हांपासून हा जो देश परकीयांचे सत्तेखालीं गेला, तो अद्यापपर्यंत तसाच आहे.

१–टेलरकृत प्राचीन इतिहास पृष्ठ. ७.

त्याचें स्वातंत्र्य प्रस्तुतचे स्थितीवरून नष्टच झालें, असें ह्मटलें तरी चालेल. इराणी लोकांस हा देश हस्तगत करण्यास फारसे आयास पडले नाहींत. परंतु या देशाचें स्वामित्व त्यांकडे फक्त १९३ वर्षे राहिलें. तरुण शिकंदर बादशाहानें इराणी लोकांस पादाक्रांत करून मिसर देश हस्तगत केला; परंतु शिकंदर बादशाहानें राज्याची जी भव्य इमारत स्वपराक्रमानें रचिली होती, ती तो मरण पावल्याबरोबर ढांसळली; व मिसर देश हा त्याचे सैनिकांपैकीं टालमीचे वांट्यास आला. टालमी, व हेंच नांव धारण करणारे जे राज्यकर्ते त्याचे मागाहून होऊन गेले, त्यांचे कारकीर्दींत, ह्मणजे सुमारें ३०० वर्षें, मिसर देशांत शास्त्र व व्यापार यांचा उत्कर्ष होऊन लोकांस पूर्वीचे दिवसांची आठवण होऊं लागली होती. टालमी फिलाडेल्फस् याचे कारकीर्दींत अलेक्झांड्रिया शहर हें जगांत व्यापाराचें मोठें बंदर होतें. टालमीच्या कारकीर्दींत सायरिनीचे मार्गानें आफ्रिकेच्या मध्य भागांत उंटाच्या सहाय्यानें व्यापार चालू झाला. खंबायतचे आखातापासून, तहत कन्याकुमारीपर्यंत जो हिंदुस्थानचा पश्चिमेकडील प्रदेश, त्याजबरोबर मिसर देशाचा व्यापार चाले. अशा स्थितींत हा देश असतां, ह्याविषयीं बलिष्ठ रोमन लोकांचा लोभ जागृत होऊन त्यांनीं हा देश जिंकिला व आपल्या अवाढव्य राज्यास सामील केला. हा देश रोमन राज्यास सामील झाल्यावरही संपत्तीचें स्थान होता; व सीझर ह्याचे कारकीर्दींत रोमन लोकांची जी चैन वाढली तिचा पूर्ण उपभोग घेण्यास आलेक्झांड्रिया हें स्थान होतें. जरी अशा

१—हंबोल्टस कासमास. भा. २ पृ. ५३७ व ५३८.

२—रोम व बायझानशियम् यांस ६६६ वर्षेपर्यंत मिसर देशाहून धान्याचा पुरवठा होत असे.

रीतीनें एकामागून एक घडामोडी चालल्या होत्या, तरी, मिसर देशाची भवितव्यता निश्चित झाली नव्हती. आफ्रिका खंडांतील या नंदनवनाचा उपभोग मिळावा ह्मणून अरबस्तानचे रखरखीत मैदानांत तयारी चालली होती. ज्या वेळेस मुसलमान लोक महमदी धर्माचा प्रसार करण्याकरितां चोहोंकडे फांकले, त्या वेळेस सरासीन लोकांची प्रथम धाड मिसर देशावर पडली. जरी या लोकांनीं हा देश प्रथम उद्वस्त केला, तरी मागाहून तो भरभराटीस येऊं लागला होता. कांहीं काल लोटल्यावर या देशाचें आधिपत्य मामलूक यांकडे गेलें. परंतु ब-

---

१–इ. स. ८८७ त खलिफांचें स्वामित्व गेलें व त्यांचेच जानिसरी टर्कोमन ज्यांस त्यांनीं मदतीकरितां बोलाविलें होतें, ते राज्य करूं लागले. टालोनायडी, फतेमाइट व ऐऊबाई या घराण्यांतील पुरुषांनीं अनुक्रमें इ. स. १२५० पर्यंत राज्य केलें.

२–मामलूक हे मिसर देशांतील टर्कोमन सुलतानांचे गुलाम होत. यां पैकीं बासराईक मामलूक यांनीं इ. स. १३८२ पर्यंत राज्य केलें. सर्केशियन अथवा बोर्जाइट् मामलूक हे नंतर पुष्कळ वर्षे अधिपति होते. तुर्कस्थानचा बादशाहा दुसरा सेलिम यानें मिसर देश काबीज करून एकसत्ताक प्रकार मोडून टाकून २४ सरदारांस राज्य करण्याची परवानगी दिली. मामलूक हे जिआर्जी व सर्केशिया येथील गुलाम असून, फतेमाइट खलिफांचे कारकीर्दींत त्यांस शस्त्रें देऊन शिपाई बनविलें होतें. त्यांस लष्करी अधिकार प्राप्त झाल्यावर ते आपल्या धन्यांवर उठले. त्यांनीं त्यांची कत्तल उडवून कांहींस हाकून दिलें व तेच सत्ताधारी बनले. आपलें वैभव आपल्या मुलांस प्राप्त व्हावें अशी साधारण मनुष्याची इच्छा असते; परंतु मामलूक ह्यांनीं राजकीय अधिकार आपले पुत्रांस दिला नाहीं. दुसरे पूर्वोक्त प्रांतांतून आपल्या सारखे जे लोक गुलाम करून आणिले होते त्यांस तो दिला. गुलाम होऊन येणें हें भूषणास्पद आहे असा या रानटी लोकांचा समज होता. हुद्द्याच्या व मानाच्या जागा मिळण्यास गुलामगिरी हा गुण अंगीं असावा लागत

रींच वर्षें लोटल्यावर तुर्कस्थान सरकारानें मामलूक यांची सत्ता मोडून टाकिली. ज्या वेळेस युरोपांत राज्यक्रांतीच्या ज्वाळा चोहोंकडे पसरूं लागल्या, त्या वेळेस फ्रेंचांनीं मिसर देश का१. बीज करून मामलूक सरदारांची सत्ता अजी कमी केली. परंतु हा देश पुनः इंग्लिशांचे मदतीनें तुर्कस्थान सरकारचे सत्तेखालीं आला. हल्लीं या देशावर तुर्कस्थान सरकारचा प्रतिनिधि अंमल चालवितो. यास खेदिव ह्मणतात. हा पुष्कळ अंशीं स्वतंत्र आहे. मिसर देशावर युरोपांतील सुधारलेल्या राष्ट्रांचा डोळा आहेच; व त्यांची मधून मधून ढवळाढवळ चालली आहेच. प्रस्तुत या देशांत इंग्लिशांचें विशेष वजन आहे. फ्रेंच लोकांस ही गोष्ट खपत नाहीं. परंतु ते आपल्याच फिकिरींत असल्यामुळें त्यांचें चालत नाहीं. खेदीव हा कर्जबाजारी आहे. मिसर देशांत अज्ञान फार आहे व त्याची स्थिति ठीक दिसत नाहीं.

वर जी आह्मीं मिसर देशाची राजकीय स्थिति सांगितली तिजवरून या देशांत कांहीं तरी अर्थ असला पाहिजे असें वाचकांचे लक्षांत येईल. जर मिसर देशावर प्राचीन कालापासून परकीय लोकांच्या एकामागून एक उड्या पडत आ-

---

असे. तुर्कस्थानचे बादशाहानें मामलूक यांचा नाश करण्याविषयीं मनांत विचार आणिला; व त्यांचे मुख्य सरदारांस मेजवानीस बोलावून बहुतेकांची कत्तल उडविली. कांहीं सरदार पळून गेले. मामलूक यांस मिसर देश सोडून जेंगोला येथें जाऊन राहणें भाग पडलें.

१—फ्रेंच लोकांनीं मिसर देश इ. स. १७९८ त काबीज केला. यामुळें युरोपांतील लोकांस वाटूं लागलें कीं, मिसर देशांत वसाहत होऊन सुधारणा होईल; परंतु फ्रेंचांनीं मिसर देश सुधारणा करण्याचे हेतूनें जिंकिला नसून वैभव वाढविण्यासाठीं काबीज केला होता. त्या वेळेस इंग्लिश व फ्रेंच यांमध्यें चुरस असल्यामुळें इंग्लिशांनीं तुर्कस्थान सरकारास मदत करून इ. स. १८०१ त फ्रेंचांस हाकून दिलें.

हेत व ते स्वामी बनत आहेत, तर तेथें कांहींतरी उपभोग्य गोष्ट असावी व तेथील मूळच्या लोकांची हीन स्थिति असावी, अशी सहज कल्पना करितां येईल. आतां मिसर देशांत धन-संचय होऊन सुधारणा होण्यास व साधारण लोकांची हीन स्थिति होण्यास सृष्टपदार्थविषयक नियम कितपत सहाय्यकारी होते, याविषयीं प्रस्तुत विचार करावयाचा आहे.

हिंदुस्थानांत जी सुधारणा झाली तीस मुख्यत्वेंकरून जमिनीची सुपीकता कारण होय, असें आह्मीं मागें सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणें मिसर देशांत जी सुधारणा झाली तीस देखील या देशांतील सुपीक जमीन कारण होय. या सुपीकतेस कारण नील[१] नदी होय. हिंदुस्थान देशांत पर्जन्याचे पाण्यावर पीक उत्पन्न करितां येतें; परंतु ज्याप्रमाणें या देशांत पर्जन्य दर वर्षा पडतो, त्याप्रमाणें मिसर देशांत पडत नाहीं. एखादे सालीं पडला तर पडतो. ज्याप्रमाणें आमचे शेतकऱ्यांस पर्जन्यावर अवलंबून राहवें लागतें, त्याप्रमाणें मिसर देशांतील शेतकरी लोक नील नदीचे पाण्यावर अवलंबून राहतात. ज्याप्रमाणें आमची भागीरथी, त्याप्रमाणें मिसरदेशीयांची नील नदी. नील नदीच्या पाण्यानें जो प्रदेश भिजलेला आहे तो सर्व सुपीक आहे; व विशेषेंकरून मुखाजवळील प्रदेश ज्यास त्रिमत्यांतील

१–टेलरकृत प्राचीन इतिहास पृ. ७. नील, गंगा, व्होल्गा, नायजर, आरिनोको व ऱ्हाईन ह्या समुद्राला पुष्कळ मुखांनीं मिळतात. नील, गंगा, सिंधु व मिसिसिप्पि या नद्यांस दरसाल पूर येतो. पावसाळ्यांत जो पाऊस पडतो त्यामुळें व ज्या पर्वतांपासून ह्या नद्या निघतात त्या पर्वतांवरील बर्फ वितळून हा पूर सुरू होतो. हे पूर केव्हां केव्हां भयंकर असतात. गंगा नदीला १८२२ त पूर आला होता; त्यामुळें ६ लाख लोक मरण पावले व कित्येक खेडीं वाहून गेलीं. या पुरांपासून उपयोगही आहे. कारण त्यांबरोबर जो गाळ येतो त्यामुळें जमीन सुपीक बनते.

प्रदेश ह्मणतात तो तर फारच सुपीक[1] आहे. सर्व मैदानभर उत्तम पीक असून खारकांचीं व नारिंगांचीं झाडें फार दृष्टीस पडतात. चोहोंकडे हिरवें चार मैदान पाहून मनाला आनंद होतो व आश्चर्य वाटतें. हा प्रदेश या नदीची देणगीच आहे असें समजलें पाहिजे. कारण, हा प्रदेश उत्तरोत्तर गाळ व वाळू मिळून बनत चालला आहे. मिसर देशाचे सुपीकतेविषयीं हिराडोटस ह्मणतो कीं येथील[2] जमीन काळी आहे. आतांही[3] याचप्रमाणें स्थिति दिसून येते. पीक मिळण्यासाठीं लोकांस किती श्रम करावे लागत असत हें पुढें दिलेल्या अवतरणावरून समजेल. "मिसरदेशीय लोकांस खरोखर मानवी जातीचे बाकीचे लोकांपेक्षां कमी श्रम करून जमिनीपासून फल

---

१–वंडर्स आफ् दि वर्ल्ड ( जगांतील चमत्कार ) पृ. १०१.

नील नदीच्या पाण्याबरोबर जो गाळ येतो, त्याचें पृथक्करण करून पाहतां त्यांत $\frac{1}{2}$ मातीचा अंश, $\frac{1}{4}$ कारबोनेट आफ् लाईमचा अंश व बाकी उदक + आक्साईड आफ् आयरन व क्यारबोनेट आफ् लाईम हीं द्रव्यें आहेत.

ज्याप्रमाणें नील नदीचे मुखाजवळील चिमट्यांतील प्रदेश हा प्रसिद्ध आहे, त्याप्रमाणें हिंदुस्थानांत भागीरथीचे मुखाजवळील चिमट्यांतील प्रदेश प्रसिद्ध आहे.

२–हिराडोटसकृत मिसर देशाचे इतिहासाचें आर्नोल्ड साहेबांनीं केलेलें भाषांतर. पृ. ६.

हिराडोटस हा ग्रीक लोकांमध्यें मोठा इतिहासकार होऊन गेला. त्यानें "पर्शन वार" (इराणी लोकांबरोबर लढाई) या नांवाचा इतिहास लिहिला आहे. ग्रीक लोकांमधील दुसरा प्रसिद्ध इतिहासकार थुसिडायडिस हा होय. यानें 'पेलोपोनिशन वार' ( ग्रीस देशाचे दक्षिण भागांतील लोकांबरोबर अथिनियन लोकांचें युद्ध ) या नांवाचा इतिहास लिहिला आहे.

३–प्रोग्रेसिव जिआग्रफी ( भूगोल ) भाग. २ पृ. ४८८.

मिळत आहे; कारण ढेंकळें फोडण्यासाठीं नांगर धरून ते श्रम करीत नाहींत, किंवा दुसरे लोक ज्याप्रमाणें शेतांत काम करितात त्याप्रमाणें ते शेतांत काम करीत नाहींत. परंतु ज्या वेळेस नदीला आपोआप पाणी येऊन मैदानें भिजतात, व तीं भिजून जाऊन पाणी उतरतें, त्या वेळेस प्रत्येक मनुष्य आपले शेतांत बीं टाकितो व तें डुकरांकडून तुडवितो; बीं तुडविलें ह्मणजे मग पिकाची वाट पाहत बसतो; हें पीक डुकरांकडून तुडवून धान्य सांठवून ठेवितो."[1]

ही स्थिति ह्मणजे फक्त प्राचीन काळीं होती असें नाहीं; हल्लींही थोड्या श्रमानें पीक प्राप्त होतें; दोन महिन्यांत प्रत्येक प्रकारचा हंगाम तयार होतो.[2]

हल्लींच्या स्थितीविषयीं विचार करितां असें आढळून येतें कीं, नदीचे पाण्याचा ओलावा विपुल मिळाला ह्मणजे उष्ण हवेमुळें पीक लवकर चांगलें तयार होतें. नील नदीच्या पाण्यानें जी जमीन भिजली आहे, तीस नांगरणी वगैरे श्रमाची जरुरी नाहीं. ओलाव्यामुळें जमीन मऊ होते ह्मणून, व नदीचे पाण्याचे गाळांतून जमिनीस उत्तम द्रव्यें सांपडतात ह्मणून, बीं पेरण्याचे अगोदर माती इकडली तिकडे केली ह्मणजे काम होतें.[3] समशीतोष्ण व उष्ण कटिबंधांत जे पदार्थ उत्पन्न होतात, ते बहुतेक येथें उत्पन्न होतात. तांदूळ व दुसरें धान्य हें विपुल उत्पन्न होतें. गहूं व जवस हीं मिसर देशांत वरचे प्रदेशांमध्यें उत्पन्न होतात. फेरोनें आपल्या स्वप्नांत गव्हांची जी एक जात पाहिली होती, त्या जातीचा गहूं[4] अद्यापि येथें उ-

१–हिराडोटसकृत मिसर देशाचा इतिहास. पृ. ७.
२–वंडर्स आफ् दि वर्ल्ड पृ. १०२.
३–प्रोग्रेसीव जिआग्रफी भा. २ पृ. ४८९.
४–उत्तम गहूं हा मिसर देशाचे वरील प्रदेशांत मागारा येथें पिकतो.

ष्टीस पडत आहे. त्याचे एका रोपाला सात सात कणसें येतात. यावरून येथील सुपीकतेचे मानाविषयीं सहज अनुमान करितां येईल. परंतु ज्या अर्थी पीक हातीं लागून सुबत्ता होणें हें नदीचे पाण्यावर अवलंबून असतें, व नदीला दरवर्षी सारखें पाणी येतें असें नाहीं, त्या अर्थी हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें दुष्काळ वारंवार पडतात, त्याप्रमाणें मिसर देशांतही वारंवार दुकाळ पडण्याचें भय असतें. केरो शहराच्या आसपास नील नदीला २२ फुटांपेक्षां ज्या मानानें कमी पाणी असतें त्या मानानें पीक कमी येतें; २२ फूट पाणी असलें ह्मणजे, चांगलें पीक होईल अशी आशा असते; परंतु २८ फुटांपेक्षां जास्ती पाणी चढूं लागलें ह्मणजे, दुष्काळाची भीति असते. कारण, पाणी कमी होण्याला कांहीं दिवस लागतात; व तें लवकर कमी न झालें तर वीं पेरण्याला अडचण असते.

आह्मीं हे जे विचार सांगितले ते सर्व धान्याचे संबंधानें झाले. परंतु येथील लोकांस निर्वाहाचें साधन फक्त धान्य आहे असें नाहीं. पुष्कळ लोकांचें भोज्य खारका होत. खारकांचीं झाडें मिसर देशांत आपोआप देखील उगवतात असें ह्मणतात. येथें खारका इतक्या होतात कीं, त्यांवर मनुष्यांस निर्वाह करा-

१–उत्तर आफ्रिकेच्या व अरबस्तानच्या ओसाड मैदानांतील लोकांस ज्याप्रमाणें उंटांची जरूरी असते, त्याप्रमाणें खारकांची आवश्यकता असते. खारकांचीं झाडें उत्तर अक्षांशाच्या १२–३७ अंशांत चांगलीं होतात. जिनोआ, स्पेन व फ्रान्स या देशांत या झाडांची लागवड झाली आहे. ख्रिस्ती धर्मशास्त्रांत व कुराणांत शत्रूनें देखील खारकांचे झाडांवर कुऱ्हाड मारूं नये अशी मनाई आहे. महमदाचें भोज्य खारका असत. हीं झाडें कोरड्या व ओसाड ठिकाणीं उगवतात. परंतु नद्यांचे कांठीं हीं चांगलीं असतात. खारकांच्या झाडांच्या १३९ जाति दृष्टीस पडतात; व त्यांपैकीं ६० पासून ७० पर्यंत अरबस्तानांत आढळतात.

वयास सांपडून त्या उंटांसही खावयास सांपडतात. तांदूळ जितका पुष्टाईला आहे, तितक्याच किंबहुना थोड्या जास्तीही खारका पुष्टिकारक आहेत. खारकांचीं झाडें २०० वर्षेंपर्यंत जगतात. हीं झाडें उष्ण देशांत चांगलीं वाढतात; व चांगलीं वाढलीं ह्मणजे प्रत्येक झाडास ५६ पौंड खारका येतात. ज्याप्रमाणें आयरिश लोकांना बटाटे, त्याप्रमाणें मिसरदेशीयांना खारका. ज्याप्रमाणें तांदूळ गंगेच्या कांठचे प्रदेशांत थोड्या श्रमानें उपलब्ध आहेत, त्याप्रमाणें मिसर देशांतील लोकांस खारका मिळविण्यास फारसे श्रम करावे लागत नाहींत. मिसर देशांत जी सुधारणा झाली ती सयद या प्रदेशांत प्रथम झाली. हा प्रदेश फार सुपीक आहे. या प्रदेशांत उपजीविकेचें एका प्रकारचें साधन आहे. तें तांदूळ किंवा खारका यांहीपेक्षां विपुल आहे. हें धौरा[1] या नांवानें प्रसिद्ध आहे. या शिवाय हिराडोटस यानें येथील पाणथळ जमिनींत राहणाऱ्या लोकांचे निर्वाहाचें एक साधन पाहिलें. तें असें कीं, ज्या वेळेस नदीला पाणी येतें व सर्व मैदान समुद्रवत् दिसतें, त्या वेळेस पाण्यांत पुष्कळ कमळें उगवतात; लोक या कमळांचीं पुष्पें तोडन तीं उन्हांत वाळवितात; यांत जो एक पदार्थ असतो, तो काढून बारीक कुटतात; व त्याचे पाव बनवून ते भाजतात. या कमळांचे कंद हे खाण्यासारखे असून ते अतिशय गोड असतात. ते वाटोळे असून शिताफळा एवढे मोठाले असतात.

भाजीपाला[2], फळफळावळ अथवा नदींतील मासे हीं निर्वाहाचीं

---

१–लोक धौऱ्याचे हिरवे दाणे मक्याप्रमाणें भाजून खातात; यांचीं ताटें उंसाप्रमाणें खातात; पानें गुरांच्या उपयोगीं पडतात; व दाणे दळून लोक त्यांचे पिठाच्या भाकरी करतात.

२–ज्या वेळेस मुसलमान लोकांनीं मिसर देशावर स्वारी केली, त्या वेळेस आलेक्झांड्रिया शहरांत ४००० लोक भाजीपाला व फळफळावळ विकणारे होते.

साधनें एकीकडे ठेविलीं, तरी वर जी हकीकत सांगितली तिजवरून मिसर देशांतील लोकांस निर्वाहाचे पदार्थ किती स्वल्पायासानें व विपुल प्राप्य आहेत याविषयीं सहज कल्पना करितां येईल. पूर्वोक्त प्रकारें उपजीविकेचें साधन विपुल असल्यामुळें, काय कार्य झालें हें सांगण्यापूर्वी येथील हवेचें मान कसें आहे, याविषयीं आपण विचार करूं.

मिसर देश हा विंध्याद्रीचे उत्तरेकडील जो हिंदुस्थानचा भाग त्याशीं सरासरीनें समांतर येईल. तेव्हां उत्तर हिंदुस्थानांत जें हवेचें साधारण मान, तेंच मान मिसर देशांत असावयाचें. परंतु हिंदुस्थानचे या प्रदेशांत सिंधु, भागीरथी, यमुना, गोग्रा, गोमती, ब्रह्मपुत्रा वगैरे नद्यांचे पाण्यानें, व दर वर्षी पाऊस पडतो त्यामुळें व अशाच प्रकारच्या नैसर्गिक कारणांनीं, हवेची प्रखरता कांहींशी कमी झालेली आहे. परंतु मिसर देशाची गोष्ट अशी नाहीं. येथील हवा उष्ण आहे व या ठिकाणीं पर्जन्याचा[१] ओलावा फारसा नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. केरो येथें वर्षांतून चार पांच पाऊस पडतात. मिसर देशांतील वरच्या प्रदेशांत एक दोन पडतात. समुद्रकिनाऱ्यावर मात्र पाऊस वारंवार पडतो. जो ओलावा मुख्यत्वें उपलब्ध आहे, तो नील नदीचे जे कालवे[२] आहेत, त्यांपासून व कांहीं सरोवरांपासून[३] आहे.

---

१–मिसर देशांतील शेतकरी पाऊस पडला असतां फारसें समाधान मानीत नाहींत; कारण, पाऊस पडला म्हणजे असंख्य तण उत्पन्न होऊन त्यांपासून पिकास अपाय होतो असें ते म्हणतात.

२–मिसर देशांत जे कालवे आहेत, त्यांत जोजेफचा कालवा अथवा ज्यास कलिदेमेनही म्हणतात, तो मोठा आहे. त्याची लांबी ११० मैल असून रुंदी ५० पासून ३०० फूट आहे.

३–मीरीस अथवा ज्यास हल्लीं बर्केटएलकरून म्हणतात हें सरोवर, मारिओटिस, आबूकर, एटको व मेंझले हीं मिसर देशांतील मुख्य स-

उष्णमापक यंत्रांत पारा फार करून १०० अंशांवर असतो; व कधीं कधीं १२० अंशांवर असतो. मिसर देशाचे जवळच अरबस्तान देश असल्यामुळें तेथील रखरखीत रानावरून वसंत ऋतूंत जो वारा येतो, त्यापासूनही बराच त्रास होतो. यास मिसर देशांत खमसीन ह्मणतात. हा वारा फार दिवस वाहूं लागला तर, कित्येक वेळां प्राणांस अपाय होतो. नील नदीच्या दोन्ही बाजूंस डोंगरांच्या ज्या रांगा समुद्रापर्यंत पसरल्या आहेत, त्यांमुळें सभोंवतालचे उष्ण देशावरून वाहणारे वाऱ्यास जरी कांहींसा अडथळा होतो, तरी, हे डोंगर उंच नसल्यामुळें हे ढगांस आकर्पून घेत नाहींत; यामुळें तुषार जमा होऊन, व वातावरणांत ओलावा उत्पन्न होऊन, या डोंगरांपासून सूर्यकिरणांचे प्रखरतेचें तादृश निवारण होत नाहीं. मिसर देशांतील डोंगर उंच नसल्यामुळें उन्हाळ्यांत भूमध्य समुद्राचे पाण्याची जी वाफ होत असते, ती या डोंगरांसभोंवतीं जमा न होतां, मध्य आफ्रिकेंतील पर्वतांसभोंवतीं जमा होऊन तेथें पाऊस पडतो व नील नदीस प्रवाह सुरू होतात. जोंपावेतों नील

---

रोवरें होत. यांपैकीं मारिओटिस हें कित्येक वर्षेपर्यंत कोरडें होतें. परंतु इ. स. १८०१ पासून समुद्राचें पाणी यांत येऊं लागून, तें पूर्ववत सरोवर बनलें. आबूकर सरोवर हेंही २०० वर्षें कोरडें होतें. परंतु इ. स. १७७८ त समुद्राचे पाण्यानें सरोवराचे सभोंवतील तट मोडून जाऊन पाणी आंत आलें.

१—सायमूम अथवा खमसीन ज्या वेळेस सुरू होतो, त्या वेळेस वातावरणाचा रंग कांहींसा जांभळा होतो; दाहक उष्णता सर्वत्र सुरू होते; वाळू व लहान धोंडे वर उडूं लागतात; धोंडे खालीं पडून त्यांचे ढीग बनतात; व वाळू घरांत शिरते. मिसर देशांत पटकी सुरू होण्याची हीच वेळ होय.

नदीच्या पाण्याचा ओलावा जमिनीस पुष्कळ मिळतो, तोंपावेतों स्थिति बरी असते; परंतु ओलावा कमी झाला ह्मणजे सूर्यकिरणांनीं जमीन भाजून जाऊन रखरखीत वाऱ्यानें होरपळून जाते.

ज्याप्रमाणें जमीन सुपीक असल्यामुळें, हिंदुस्थानांत धनाचा संचय लवकर करावयास सांपडून सुधारणा होऊं लागली, त्याप्रमाणें मिसर देशांत धनाचा त्वरित संचय होऊं लागून सुधारणा होऊं लागली. उष्ण हवेमुळें हिंदुस्थान देशास जे नियम लागू होते तेच मिसर देशासही लागू होते; व या कारणांमुळें दोन्ही देशांत कित्येक गोष्टींत सारखीं कार्यें घडून आलीं. ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत विपुल व स्वस्त अन्नामुळें लोकसंख्या वाढत गेली, त्याप्रमाणें मिसर देशांत लोकसंख्या वाढत गेली. आफ्रिका खंडांतील इतर प्रदेशांत उष्णता बरीच होती, परंतु जमीन सुपीक नसल्यामुळें लोकसंख्या फारशी वाढली नाहीं. जमिनीच्या सुपीकतेमुळें मिसरदेशीयांस उपजीविकेचें साधन थोडक्यांत उपलब्ध असे. शिवाय उष्ण हवेचे संबंधानें जे नियम मागें आह्मीं सांगितले, त्या नियमांप्रमाणें त्यांस अन्न कमी लागे; व वस्त्रप्रावरणाचे[1] संबंधानें थंड हवेंतील लोकांपेक्षां कमी खर्च लागे. अन्नाचा पुरवठा विपुल असल्यामुळें व उष्ण हवेचे कारणानें कमी अन्न लागे व वस्त्रप्रावरणाबद्दल कमी खर्च लागे ह्मणून, लोकसंख्या वाढत गेली. अशी लोकसंख्या आफ्रिका खंडाचे इतर देशांत तर नव्हतीच; परंतु जीं राष्ट्रें सुधारलेल्या राष्ट्रांत प्राचीन काळीं मोडत होतीं, त्यांत देखील अशी लोकसंख्या[2] नव्हती, असें डायोडोरस सायक्यूलस ह्याचें मत आहे. प्रसिद्ध इतिहासकार हिराडोटस हा मिसर देशाविषयीं

१—ड्रेपर्स इंटेलेक्चुअल डेवलपमेंट आफ् युरोप. भा. १ पृ. ८६.
२—बकलकृत सुधारणेचा इतिहास. भा. १. पृ. ८८.

असें ह्मणतों कीं, "अमासिस राजा राज्य करीत असतां (ख्रि० श. पूर्वी १८२५ ) मिसर देश फार भरभराटीस आला होता. नदीस पाणी येण्याचें कधीं चुकलें नाहीं. शेतकऱ्यांस जमिनीपासून चांगलें फळ मिळे; व देशांत वसलेलीं शहरें पुष्कळ होतीं." मिसर देशांत प्राचीन कालीं लोकसंख्या किती होती, हें बरोबर समजण्यास जरी विश्वसनीय साधन नाहीं, तरी तेथें लोकसंख्या फार होती याबद्दल वाद नाहीं. त्या-वेळेस सुधारलेल्या राष्ट्रांपैकीं देखील कोणतेही राष्ट्रांत अशी लोकसंख्या नव्हती, असा जो कांहीं ग्रंथकारांचा समज होता, तो हिंदुस्थानचे संबंधानेंही यथार्थ होता किंवा कसें, हें समज-ण्यास साधन नाहीं. लोकसंख्या जास्ती असल्यामुळें, मजूरांची संख्या जास्त होती; व यामुळें मजूरीचा दर कमी होऊन सं-पत्ति व अधिकार यांचे वांटणींत ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत अति-शयित न्यूनाधिक्य उत्पन्न झालें, त्याप्रमाणें मिसर देशांतही अ-तिशयित न्यूनाधिक्य उत्पन्न झालें. या कारणामुळें एक पक्षीं हीन स्थिति, व दुसरे पक्षीं थोड्यांचे हातीं संपत्ति असा प्रकार घडून आला. ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत साधारण लोकांची स्थिति निकृष्ट होऊन, त्यांस निमुटपणें सर्व सोसण्याची संवय लागली, त्याचप्रमाणें मिसर देशांतही साधारण लोकांची

---

१-कंबायसेस यानें मिसर देश जिंकिला त्यापूर्वी अमासिस हा राज्य करीत होता. अमासिस राजानें असा एक नियम केला होता कीं, प्रत्येक मिसरदेशीयानें वर्षांतून एकदां आपले प्रांताचे मुख्यास आपण कशावर चरितार्थ करितों, हें स्वतः येऊन सांगावें; असें कर-ण्यास एखादा मनुष्य चुकला, किंवा त्यानें इमानें इतबारें चरितार्थाचें साधन सांगितलें नाहीं, तर त्यास मरणाची शिक्षा होत असे. हाच नि-यम सोलन ह्यानें अथेन्स येथें सुरू केला.

योग्यता कांहींच नव्हती. वरच्या प्रतीचे लोकांस पाहिजे तशी दडपादडपी व जुलूम करावयास सांपडे. आतां अशी स्थिति होती किंवा नाहीं, याविषयीं मिसर देशांतील प्रचंड मनोरे व दुसरीं अवाढव्य परंतु निरुपयोगीं कामें साक्ष देत आहेत. मिसर देशांत मनोरे बांधण्याचें वेड इतकें माजलें कीं, ऱ्हाम-सिनिटस ह्याचे नंतर बहुतेक राजांनीं लहान मोठे मनोरे बांधून ठेविले. प्राचीन नामांकित शहरांत ज्या इमारती बांधिल्या होत्या, त्या सर्व नाश पावलेल्या दिसत आहेत; ग्रीस व रोम येथील कलाकौशल्याचीं कामें छिन्न भिन्न झालीं आहेत; परंतु मिसर देशांतील बहुतेक मनोरे जसेचे तसेच आहेत. आतां या सर्व मनोऱ्यांविषयीं आह्मी सांगत नाहीं. परंतु सर्वांत जो मोठा मनोरा आहे, त्याचें स्वरूप व तो तयार होण्याच्या कामीं लाग-लेलीं माणसें यांविषयीं खुलासा झाल्यानें, त्या वेळची स्थिति कशी असावी याविषयीं आतां देखील अनुमान करितां ये-णार आहे.

मिसर देशांत मनोरे पुष्कळ आहेत; परंतु त्यांपैकीं जिझे, सकरा व दशूर ह्यां जवळील मुख्य होत. जिझे येथील मनोरे हे सर्वांत प्रसिद्ध व प्रचंड आहेत. हे खडकावर असून तो खडक नी-ल नदीच्या सपाटीपासून १६० फूट उंच आहे; यामुळें हे फार लांबून देखील दिसतात. त्यांपैकीं सर्वांत मोठा जो मनोरा आहे, तो चिआप्स राजाचे कारकीर्दीत बांधलेला आहे असें ह्म-णतात. त्याचा पाया चौकोनी असून प्रत्येक बाजू ७४६ फूट आहे. त्या मनोऱ्याची लंब उंची ४६१ फूट आहे. त्या-

---

१–ऱ्हामसिनिटस ह्याचे मागून चिआप्स, सिफ्रेनिस, मायसेरिनस व आसिचिस यांनीं मनोरे बांधले. ते अद्यापि कायम आहेत.

२–वंडर्स आफ् दी वर्ल्ड (जगांतील चमत्कार) पृ. १६४ व १६५.

लून वरपर्यंत जाण्यास पायऱ्या आहेत; धोंड्यांचा पहिला थर छातीइतका उंच आहे; त्यावर चोंहोंकडे दोन अथवा तीन फुटांची जागा टाकून आणखी धोंड्यांचा थर आहे. अशा रीतीनें मनोरा चिंचोळा होत जाऊन त्याचे शिखरावरील क्षेत्रफळ सुमारें औरस चौरस ३० फूट आहे. प्रत्येक पायरी एक पासून दीड फूट रुंद व सव्वादोन फूट उंच असल्यामुळें चढण्यास फारसा त्रास पडत नाहीं. या मनोऱ्याचा बाह्य देखावाही चमत्कारिक आहे. १६ वे पायरीवर गेलें ह्मणजे उत्तरेच्या समोरील जी बाजू आहे, तिचे मध्यावर, मनोऱ्याचे आंत जाण्याला एक मार्ग आहे. हा मार्ग अरुंद असून तो ९२ फूटपर्यंत खोल गेलेला आहे. वांकड्या तिकड्या रीतीनें गेल्यावर एक खोली लागते; हीस राणीची खोली ह्मणतात; ही १७ फूट लांब, १४ फूट उंच, व १२ फूट रुंद अशी आहे. या खोलीचे वर दुसरी एक खोली आहे; हीस राजाची खोली असें ह्मणतात; ही खोली राणीचे खोलीचे दुप्पट आहे. अशा रीतीनें यांत आणखी कांहीं खोल्या काढिल्या आहेत. परंतु क्याव्हिग्लिया[1] साहेबांनीं ज्या खोलीचा शोध लाविला, ती खोली ६० फूट लांब व २७ फूट रुंद अशी आहे. या प्रचंड कामास एकंदर ६० लक्ष टन दगड लागले असा अजमास आहे. हा मनोरा बांधण्याचे कामावर १००००० माणसें लागलीं असून तीं वीस वर्षें काम करीत होतीं असें हिराडोटस ह्मणतो. ज्या

---

१–क्याप्टन क्याव्हिग्लियाचे अगोदर आलजिअर्स येथील ब्रिटिश सरकारचे वकील डेव्हिसन साहेब यांनीं व मांटेग्यू साहेब यांनीं १५५ फूट खोल जाऊन आंतील भागाचा शोध लाविला होता. पूर्वी जितक्या खोलीपर्यंत शोध लागला होता, त्यापेक्षां अधिक २०० फूट खोल क्याव्हिग्लिया हे गेले. हा मार्ग आंतील विहिरीचे तळाशीं मिळत असल्यामुळें ते आणखी २८ फूट खोल गेले.

ठिकाणीं एक लाख माणसें वीस वर्षे फक्त राजाचें प्रेत ठेवण्यास जागा असावी ह्मणून काम करीत होतीं, त्या ठिकाणीं योग्य मजूरी मिळाली असेल काय ? एका मजूरास रोज दोन आणे दिले तरी, लाख मजूरांची २० वर्षांची मजूरी ९ कोट रुपये होते. या शिवाय मजूरांवर देखरेख करणारे लोक व धोंडा, चुना वगैरे सामानाबद्दल लागणारा खर्च हा मनांत आणितां एकंदर रक्कम वरीच होते. राज्यप्रकरणीं जरुरीच्या कामांकडे पैसा खर्च करावयास सांपडून, अशा प्रकारच्या निरुपयोगीं व प्रचंड कामाकडे प्रस्तुत कालच्या संपत्तिमान देशांसही जुलमाशिवाय खर्च करितां येत नाहीं ही गोष्ट मनांत आणितां, ज्या राजाचे कारकीर्दींत हा मनोरा बांधिला तो राजा फार जुलमी असला पाहिजे व लोकांचीही फार निकृष्ट स्थिति असली पाहिजे, हें सांगावयास नको. चिआप्स राजानें हा मनोरा बांधिला असें वर सांगितलें आहे. या राजाविषयीं हिराडोटस[१] ह्मणतो कीं, प्रथम यानें देवळें बंद केलीं; यज्ञ करण्याचें मना केलें; नंतर ह्यानें मिसरदेशीय लोकांस आपलें काम करावयास लाविलें. कांहीं लोकांस अरबी टेंकडींतील धोंड्यांचे खाणीपासून नील नदीपर्यंत धोंडे ओढीत आणून ते नावेंतून नदीपलीकडे नेण्यास लाविलें होतें ! कांहींस हे धोंडे पलीकडच्या तीरापासून लिबियाचे टेंकडीपर्यंत नेण्यास लाविलें होतें. हे धोंडे ओढून नेण्याकरितां फरशीचा रस्ता केला होता व हा तयार होण्यास दहा वर्षे लागलीं. मनोऱ्यावर जो एक लेख आहे त्यावरून असें समजतें कीं, मजूरदारांस निर्वाहाकरितां जे कांदे, व गाजरें देत, त्यांबद्दल सुमारें ३९००००० रुपये लागले. या वरून एकंदर हत्यारें, खाणें पिणें, दगड फोडणें व

---

१–हिराडोटसकृत मिसरदेशाचा इतिहास. पृ. ६०.

वाहणें, देखरेख करणें वगैरे कामें करण्यास किती पैसा लागला असावा ? ज्याप्रमाणें चिआप्स यानें मनोरा बांधिला त्याचप्रमाणें त्याचा भाऊ सिफ्रेनिस यानेंही याच मनोऱ्याचे खालोखाल दुसरा मनोरा बांधिला. उभयतां बंधूंनीं १०६ वर्षें राज्य केलें. इतक्या कालांत जुलमाशिवाय बोलणें नव्हतें. ज्याप्रमाणें हिंदुस्थान देशांत अल्लाउदीन व अलमगीर बादशाहांचा सुळसुळाट होता, त्याप्रमाणें वरील बंधुराजांचा मिसर देशांत होता. ज्याप्रमाणें रावबाजीची आठवण झाल्याबरोबर त्याविषयीं आपल्या मनांत तिटकारा उत्पन्न होतो, त्याप्रमाणें मिसरदेशीयांस या राजांचें नांव घेण्याससुद्धां तिटकारा वाटत असे.

ज्या मनोऱ्याचे संबंधानें येथवर आह्मीं निरूपण केलें, त्यापेक्षां लहान मनोरे मिसर देशांत पुष्कळ आहेत. हे कोणते कामाकरितां बांधिले असावेत, याविषयीं प्राचीन कालापासून आजपर्यंत मतभेद आहे. कांहीं ह्मणतात, हे सूर्याचे नांवानें केले आहेत; कांहीं ह्मणतात, ज्योतिषशास्त्रसंबंधीं वेध घेण्याकरितां हे बांधिले होते. परंतु चांगले समजदार लोकांचें असें मत आहे कीं, राजांचीं प्रेतें ठेवण्याकरितां हे बांधिलेले असावेत. केवढा हा उपयोग !! लाखों रुपयांचा चुराडा, व हज़ारों लोकांचे श्रमाचा अपव्यय राजे लोकांचीं थडगीं बांधण्याकरितां व्हावा, यापेक्षां देशाची निकृष्ट स्थिति कोणती ? यावरून त्या वेळेस राज्यप्रवर्तकांचा जुलूम किती असेल, व श्रम करणारे लोकांची किती निकृष्ट स्थिति असेल याची वाचकांस सहज कल्पना करितां येईल. अशीं निरर्थक कामें उभारण्याकरितां मजूरांनीं खुषीनें काम केलें असेल असें मानण्यास शंका वाटते. जी वास्तविक मजूरी होईल ती देऊं लागलें असतां, राजाची संपत्ति जरी मोठी असली, तरी ती एकसारखी फार दिवसपर्यंत पुरवण्यास येणार नाहीं, हें आपण हल्लीं पाहत आहों.

एखादा थोर मनुष्य मरण पावला असतां, मागें त्याची आठवण रहावी ह्मणून स्मारक करण्याची चाल बहुतेक राष्ट्रांत दिसून येते. परंतु या कामांत प्राचीन मिसर देशाची कोणीही बरोबरी केली नाहीं, व पुढें कोणी करील असें दिसत नाहीं.

मिसर देशांत प्राचीन कालीं एक पक्षीं जुलूम व दुसरे पक्षीं हीन स्थिति होती याविषयीं अनुमान करण्यास आणखीही प्रमाणें आहेत. खि० श० पूर्वी सुमारें २५२ ह्या वर्षी आसिचिस राजा राज्य करीत असतां पैसा फारसा वहिवाटींत नव्हता. त्यानें असा कायदा केला कीं, ज्या मनुष्यास पैशाची जरूरी असेल, त्यानें आपले बापाचें प्रेत तारण ठेवून पैसा कर्जाऊ काढावा. या कायद्यांत असेंही सांगितलें होतें कीं, पैसा कर्जाऊ घेणारे इसमाचे कुटुंबाचीं प्रेतें पुरण्याकरितां जी जागा असेल, तिजवर सावकाराची सत्ता चालेल. ज्या मनुष्यानें अशा प्रकारचे तारणावर पैसा काढिला असेल, त्यानें कर्ज न फेडिलें तर, मरणानंतर त्यास पुरावयाचें नाहीं; व त्याचे नातलगांस त्यास पुरूं द्यावयाचें नाहीं.

ज्या वेळेस बारा राजे मिसर देशांत राज्य करीत होते, त्या वेळेस आपल्या कारकीर्दीचें कांहीं तरी स्मारक असावें, असें

---

१—ज्याप्रमाणें मिसर देशांत राजांचीं थडगीं उंच आहेत, त्याप्रमाणें इतर ठिकाणीं तितकीं नाहींत. परंतु लिडिआचा राजा आलिआटिस ( क्रीसस याचा बाप ) याचें जें थडगें गिगा सरोवराचे कांठीं आहे, तें या मनोऱ्याचे खालोखाल येईल. याचे पायाचा परीघ $\frac{3}{4}$ मैल असून उंची सुमारें २०० फूट येईल. मेक्सिकोंत चोलुला येथील मनोरा १७७ फूट उंच आहे. आयर्लंडांत मीथ प्रांतांत न्यूग्रेंज येथें जें थडगें आहे तें ७० फूट उंच आहे. याचा पाया दोन एकरांहून अधीक येईल. न्यूग्रेंज सारखीं थडगीं डेनमार्क, स्वीडन, रशिया व तार्तरी येथें दृष्टीस पडतात.

त्यांस वाटल्यावरून त्यांनीं मीरिस सरोवराजवळ व्यूह बांधिला. हा हिराडोटस यानें स्वतः पाहिला; व त्याचें असें मत आहे कीं, "ग्रीस देशांतील सर्व किल्ले व सर्व इमारती बांधण्यास जो खर्च व जे श्रम लागले असतील, त्यांपेक्षां या व्यूहाकरितां जास्त श्रम व जास्त पैसे लागले असावेत. एफीसस येथील अथवा सेमास येथील देवालय मोठें आहे; मिसर देशांतील मनोरेही प्रचंड आहेत; परंतु हा व्यूह सर्वांस मागें सारील. यांत १२ दिवाणखाने आहेत; ६ दक्षिण बाजूस व सहा उत्तर बाजूस. यांत ३००० दालनें आहेत; पैकीं १५०० जमिनीवर व १५०० जमिनीखालीं. खालच्या दालनांत कोणास जाऊं देत नसत. कारण, ज्या राजांनीं व्यूह बांधिला त्यांचीं व पवित्र सुसरींचीं थडगीं त्यांत आहेत. सर्व भिंतींवर जनावरांचीं चित्रें खोदलीं आहेत. व्यूहाचे प्रत्येक कोनास एक एक मनोरा आहे. हा २४० फूट उंच आहे व यावर जनावरांचीं चित्रें खोदलीं आहेत."

सामिटिकस ह्याचा मुलगा नेकॉस यानें तांबड्या समुद्रापर्यंत कालवा बांधण्याचे कामास सुरवात केली. यांत तारवें जातील इतका हा रुंद आहे. हा कालवा उकरण्याकरितां जे मजूर लाविले होते, त्यांपैकीं अतिश्रमानें १२००० लोक मरण पावले; ह्मणून नेकॉस यानें हें काम तहकूब ठेविलें. पुढें तें डेरायास यानें संपविलें.

साईस येथील अथिनीचे देवळाचे संबंधानें अमासिस राजानें मेंफिस व एलिफंटिना येथून मोठमोठे धोंडे आणिले. त्यांपैकीं एलिफंटिना येथून जो एक धोंडा आणिला होता, त्याची त्यानें खोली करविली. हा धोंडा आणण्याकरितां २००० लोक ३ वर्षें काम करीत होते.

हीं जीं उदाहरणें दिलीं त्यांवरून मिसर देशांत श्रमाचा व्यर्थ व्यय कसा होत असे, श्रम करणारे लोकांची किती निकृष्ट स्थिति असावी, व दुसरे पक्षीं जुलमाचा प्रकार किती जारीनें सुरू असावा, याविषयीं सहज कल्पना करितां येईल. अशा प्रकारचीं उदाहरणें मिसर देशाचे इतिहासांत पुष्कळ आहेत; परंतु त्यांविषयीं येथें विचार करण्याचें कारण नाहीं. स्वस्त अन्नामुळें मजूरीचा कमी दर, कमी मजूरीमुळें मजूरदारांची हीन स्थिति व या हीन स्थितीमुळें जुलूम करण्यास सवड, हीं जीं कार्यें झालीं त्यांमुळें सुधारणेचा पाया कच्चा राहून सुधारणेची इमारत ढांसळली, यांत फारसें नवल नाहीं.

सृष्टपदार्थविषयक नियमांमुळें मिसर देशांत आणखी एक कार्य घडून आलें. तें जातिभेद हें होय. मिसर देशांत ७ जाति असत. उपाध्ये, योद्धे, गुराखी, डुक्कर राखणारे, व्यापारी, दुभाषी व नावाडी. योद्धे लोकांस हर्मोटिबिअन[1] अथवा कलसिरिअन असें ह्मणत. हर्मोटिबिअन व कलसिरिअन हे धंदा वगैरे करीत नसत. या जातीचे लोक फक्त लष्करी काम करीत. बाप मेल्यावर मुलगा तेंच काम करी. मिसर देशांतील या क्षत्रियांस कांहीं विशेष प्रकारचे हक्क असत. या हक्कांचा फायदा धर्मप्रवर्तकांचे जातीशिवाय इतर जातींचे लोकांस मिळत नसे. या क्षत्रियांपैकीं प्रत्येकास कांहीं जमीन दिलेली असे. मिसर देशांतील क्षत्रियांस सारा माफ असे.

---

१–बुसिरिस, साईस, केमीस, पप्रेमिस, प्रासोपिटसबेट व नाथोचा अर्धा भाग येथील योद्ध्यांस हर्मोटिबिअन ही संज्ञा असे. हिराडोटस ह्याचे वेळीं यांची संख्या १६०००० होती. थीब्स, बुवास्टिस, आपथिस, टानिस, मेंडिस, सेबिनिटस, आथ्रिबिस व आनिसिस येथील योद्ध्यांस कलसिरिअन ही संज्ञा असे. यांची संख्या २५०००० होती.

एक हजार हर्मोटिबिअन व एक हजार कलसिरिअन हे दर वर्षास पाळी पाळीनें राजाचे रक्षक असावयाचे. मिसरदेशीय लोक डुकराला अपवित्र मानीत. एखाद्याला डुकराचा विटाळ झाला ह्मणजे तो स्नान करण्याकरितां नदीवर जात असे. डुक्कर राखणारे लोक मिसरदेशीय असले तरी, त्यांस देवळांत जाण्यास मनाई असे. त्यांस इतर जातींचे लोक आपली मुलगी देत नसत; किंवा त्यांची मुलगी कोणी करीत नसे. वर्णव्यवस्थेचे ठशांत ओतलेले आमचे लोकांस ज्याप्रमाणें पूर्वापार चालत आलेला संप्रदाय सोडावासा वाटत नाहीं, त्याप्रमाणें प्राचीन मिसरदेशीय लोक आपल्या वाडवडिलांच्या रीतिभाती कधींही सोडीत नसत. जो धंदा पूर्वापार चालत आला असे तोच मुलगा करीत असे. राज्यप्रकरणांत एखाद्या कारागिराचें अंग दिसून आलें असतां, अथवा मुळारंभीं जो धंदा तो शिकला असेल तो सोडून देऊन दुसरा धंदा करावयास लागला तर, त्यास जबर शिक्षा होई. राज्यप्रवर्तक, धर्मप्रवर्तक व क्षत्रिय ह्या जातींचे लोकांशिवाय इतरांजवळ सत्तेची जमीन असूं नये असा नियम असे. बाकीचे लोकांनीं वरच्या प्रतीच्या लोकांकरितां श्रम मात्र करावेत. यावरून खालचे प्रतींचे लोकांची कशी स्थिति असेल, याविषयीं अनुमान करितां येईल. राज्यांतील थोडेच लोकांचे कल्याणाविषयीं लक्ष दिल्यानें व बाकीच्या लोकांविषयीं हेळसांड करीत गेल्यानें, इतर लोक राज्यांतील घडामोडींविषयीं उदासीन असतात. त्यांची स्थिति सुधारण्याविषयीं यत्न करून, त्यांस वर डोकें काढण्यास सवड न दिली तर, कोणीही स्वामी बनला तरी त्यांस विधिनिषेध वाटत नाहीं. वर ज्या स्थितीचें दिग्दर्शन केलें, ती स्थिति जुलमाची असली पाहिजे हें समजण्यास तादृश अडचण

पडणार नाहीं. जे नियम जुलमाचे आहेत ते जुलमाशिवाय अमलांत येणार नाहींत हेंही उघड आहे. मनोऱ्यांसारख्या निरर्थक इमारती जुलमाशिवाय उभारतां येणें फार कठीण आहे. या इमारती सुधारणेचें दर्शक नसून त्या वेळचे निकृष्ट स्थितीचें सूचक आहेत, असें जें प्रसिद्ध बकल यानें ह्मटलें आहे तें यथार्थ आहे. ही निकृष्ट स्थिति विशेषेंकरून मिसर देशांतील सृष्टपदार्थ-विषयक नियमांचे कार्यापासून उत्पन्न झाली. या नियमांपासून प्रथम जरी सुधारणेस उत्तेजन मिळालें, तरी, त्याच नियमांमुळें हीनता व दुर्बलता प्राप्त झाली, व राज्याची इमारत कुजून जाऊन ती परचक्र आल्याबरोबर ढांसळली.

**मेक्सिको व पेरू**– या दोन देशांचे इतिहासाविषयीं विचार करितां कार्टेज व पिझारो यांच्या दुष्ट कृति लक्षांत आल्यावांचून राहत नाहींत. लोभामुळें मनुष्य कोणतीं अनन्वित कर्में करण्यास प्रवृत्त होतो, हें या दोन देशांचे इतिहासावरून चांगलें कळून येतें. सुवर्ण व रौप्य हीं या दोन देशांत पुष्कळ आढळतात, असें स्पानिश लोकांस समजल्यापासून, या देशांतील लोकांचे विपत्तीस सुरुवात झाली. येथील शहरें उद्ध्वस्त होऊन, लोकांस खाणींतून सोनें व रुपें काढण्याकरितां

---

१–बकलकृत सुधारणेचा इतिहास. भा. १. पृ. ९२.

२–मेक्सिको याचा अर्थ मेक्सितली अथवा लढाईचे देवतेचें स्थान असा आहे. या शहराचें पूर्वीचें नांव टि नॉकटिटलन असें होतें. हें १३९५ त वसविलें होतें. बिल्बोआ येथें राहणारा ननेझ या स्पेन देशीयानें मेक्सिकोचा शोध प्रथम लाविला. कार्टेझ यानें या शहरास ७५ दिवस वेढा दिल्यावर, हें शहर त्याचे हस्तगत झालें. हें शहर हस्तगत होण्यास कांहीं दिवस लागले, म्हणून त्यास संताप येऊन त्यानें जुनें शहर उद्ध्वस्त केलें व नवीन वसविलें.

३–पेरूचा शोध पिझारो व दिगो अल्माग्रो यांनीं लाविला.

एकसारखें काम करावें लागलें. या कामीं हजारों लोक मरण पावले; तथापि, राज्यप्रवर्तकांचें समाधान झालें नाहीं. येथील मूळचे सरदार, मानकरी व सुखवस्तु लोक हे बहुतेक नष्ट झाले आहेत. मेक्सिकोंत अशुद्ध रुपें फारच आहे; तीन हजारांवर खाणी असून त्यांतून रुपें काढण्याचें काम चालू आहे, ही गोष्ट लक्षांत आणिली असतां साधारण अनुमान करितां येईल.

मेक्सिको व पेरू या दोन देशांचे इतिहासांतील अर्वाचीन कथाभाग हा, स्प्यानिश लोकांना कलंक आणणारा आहे. निरपराधी लोकांचा विनाकारण छळ करणें हें नीच कर्म होय.

मेक्सिकन लोकांचा राजा मांटिझूमा हा जुलमी होता; मेक्सिकोंतील लोक मूर्तिपूजक होते; व धर्मसंबंधी त्यांची व्यवस्था जुलमाची होती या गोष्टी जरी खऱ्या असल्या, तरी, ज्या लोकांनीं खरोखर कांहीं एक अपराध केला नाहीं, त्या लोकांची कत्तल उडवून रक्तस्राव करण्यास जे प्रवृत्त झाले, त्यांचें कृत्य किती नीच समजलें पाहिजे? असो. ज्याप्रमाणें हिंदुस्थान व मिसर या देशांतील सुधारणा प्राचीन होती, त्याप्रमाणें मेक्सिकोची सुधारणा प्राचीन नव्हती. टोटिकन लोकांचा पहिला राजा हा इ० स० ६६७ त राज्य करूं लागला.

१–मेक्सिकोंतील जुने लोक टोटिकन हे होते असें म्हणतात. त्यांचा मूळचा देश मेक्सिकोच्या उत्तरेस टोलन हा होता. त्यांस येथून इ. स. ४७२ त हांकून दिल्यावर ते कांहीं दिवस भटकत होते. ज्या ठिकाणीं ते फार दिवस राहत, त्या ठिकाणीं ते घरें दारें बांधीत व जमीन नांगरीत. ते सुमारें १०४ वर्षांनीं मेक्सिको शहराचे पूर्वेस ५० मैल येऊन २० वर्षें राहिले. या नवीन जागेस त्यांनीं टोलाटझिंको हें नांव दिलें. या ठिकाणाहून ते पश्चिमेस ४० मैल गेले. या ठिकाणीं त्यांनीं एक शहर बांधिलें. त्यास त्यांनीं टोलन अथवा टुला हें नांव दिलें. अशा प्रकारें प्रवास करीत असतां त्यांबरोबर मुख्य असत.

टोटिकन[1] लोकांनीं ३८४ वर्षे राज्य केलें. टोटिकन राजांनीं स्वदेशांत कांहीं सुधारणा केली, परंतु मोठा दुष्काळ पडल्यामुळें, लोकांस सभोंवतालचे देशांत जाणें भाग पडलें. त्यांचे मागून चिचिमेका हे राज्य करूं लागले. हे लोक कोठून आले हें समजत नाहीं. स्पानिश लोक ज्या वेळेस आले, त्यावेळेस दुसरा मांटिझूमा[2] हा राज्य करीत होता. ज्या वेळेस स्पानिश लोक मेक्सिको व पेरू या दोन देशांत आले, त्यावेळेस या देशांची[3] सुधारणा झाली होती; येथें लोकवस्तीही पुष्कळ होती; लोक शेती करीत असत; त्यांनीं शहरें वसविलीं होतीं; व त्यांच्यांत राज्यव्यवस्था होती असें त्यांना दिसून आलें.

मेक्सिको व पेरू हे देश सुधारलेले होते असें आह्मीं ह्मटलें, यावरून जुन्या महाद्वीपांतील सुधारलेल्या राष्ट्रांइतके हे देश सुधारलेले होते, असें ह्मणण्याचा आमचा हेतु नाहीं. जुन्या महाद्वीपांतील राष्ट्रांची व या देशांची तुलना केली असतां, यांची सुधारणा फारच कमी होती, हें जरी खरें आहे, तरी, अमेरिकेंतील इतर देशांपेक्षां या दोन देशांतील सुधारणेचें पाऊल पुढें होतें, याविषयीं वाद नाहीं. येथील लोक उदरनिर्वाहाकरितां इतर लोकांप्रमाणें रानांत भटकत न फिरतां, किंवा

---

१–३८४ वर्षांत टोटिकन लोकांचे ८ राजे होऊन गेले. यांच्यांत अशी एक चाल असे कीं, राजा गादीवर बसल्यापासून त्याचें नांव ५२ वर्षेपर्यंत चालावें. ५२ वर्षें संपण्यापूर्वीं तो मरण पावला, तर त्याचे नांवानें प्रतिनिधींनीं राज्य चालवावें. तो जास्त कालपर्यंत वांचला, तर त्यानें राजीनामा द्यावा.

२–दुसरा मांटिझूमा राज्य करण्याचे अगोदर मेक्सिकोंत क्झोलोथ, नोपाल्टझिन, किनाटझिन व पहिला मांटिझूमा हे राज्य करीत होते.

३–क्लार्कस जिआग्रफिकल रीडर. पृ. १९३.

ड्रेपर्स इंटेलेक्चुअल डेव्हलपमेंट आफ् युरोप. भा. १ पृ. ८६.

स्वतंत्र रीतीनें स्वेच्छाचार न करितां, एकाच राजाचे सत्ते खालीं होते; ते शहरांत एकत्र राहूं लागले होते; राज्यप्रवर्तक हे लोकांचे जीवित्वरक्षणाची व उपजीविकेची तजवीज करूं लागले होते; राज्यांत[१] नियम स्थापित होऊं लागले होते; लोक धर्मांचें बंधन मानूं लागले होते; व व्यवहारांत ज्या कलांची आवश्यकता असते, त्या कला दृष्टीस पडूं लागल्या होत्या इतकेंच नाहीं, तर, ज्या कला फक्त शोभेच्या आहेत त्याही दृष्टीस पडूं लागल्या होत्या.

ज्या वेळेस मेक्सिको देश स्प्यानिश लोकांच्या हातीं आला, त्या वेळेस तेथील लोकांस खाजगी मिळकतीचा हक्क पूर्णपणें कळूं लागला होता, असें स्प्यानिश लोकांस आढळून आलें. मेक्सिकोंत शहरें बरींच असून तीं मोठमोठालीं होतीं. झेंपोला हें शहर प्रथम पाहून स्प्यानिश लोकांना आश्चर्य वाटलें; परंतु ज्या वेळेस त्यांनीं मागाहून लस्काला, चोलुला, तकुबा, टेझक्यूको व मेक्सिको हीं शहरें पाहिलीं, त्या वेळेस त्यांस येथें अतिशयित लोकसंख्या असावी असें वाटूं लागलें. धंद्यांचें पृथक्करण व श्रमविभाग हीं दृष्टीस पडत होतीं. सोनार, गवंडी, कोष्टी, चितारी वगैरे धंदे करणारे निरनिराळे लोक देशांत होते. राजे, सरदार व लोक या परस्परांचें नातें कोणतें, हें येथील लोकांस पूर्णपणें माहीत होतें. ते वर्षाचे[२] निर-

१–राबर्टसनकृत अमेरिकेचा इतिहास. पुस्तक ७ पृ. ९३१,९३२.

२–मेक्सिकन लोकांत वर्षाचे १८ महिने असत; व प्रत्येक महिन्यांत २० दिवस, मिळून वर्षाचे ३६० दिवस असत. परंतु या कालांत सूर्याची गति संपत नसे, असें त्यांस दिसून आल्यावर ते वर्षास ५ दिवस जास्त धरीत. हे दिवस ते फाजील दिवस असें समजत, व ज्याअर्थीं या दिवसांची कोणत्याही महिन्यांत गणना होत नसे, त्या-

निराळे भाग मानूं लागले होते. या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टींवरून मेक्सिकन लोक सुधारलेले होते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

आह्मीं ही जी वर हकीकत सांगितली, तिजवरून मेक्सिकोंत सुधारणेचें मान कसें होतें हें समजेल. जोंपावेतों लोक रानटी स्थितींत असतात, तोंपावेतों त्यांच्या गरजाही थोड्या असतात; ह्मणून त्यांस परराष्ट्रांवर अवलंबून राहण्याची फारशी आवश्यकता नसते, व एकत्र जमण्याविषयीं इच्छा नसते. यासाठींच ते स्वसंतोषानें अथवा चरितार्थ चालविण्याकरितां लांबलांब राहतात; व ते बहुतकरून नदीच्या कांठीं झोंपड्या बांधून राहतात. शहरें वसवून रहावयास लागणें हें सुधारणेचें सूचक आहे.

रानटी स्थितींत जे लोक असतात, ते अवश्य लागणारीं सर्व कामें करितात. पारध करण्याकरितां धनुष्य व बाण हीं ते स्वतः करितात; व राहण्याकरितां त्यांस स्वतः झोंपडी बांधतां येते. कलाकौशल्याचीं व भानगडीचीं कामें करतां येण्यास ज्या शिक्षणाची जरुरी आहे, त्याची आवश्यकता उत्पन्न होण्यापूर्वीं, मनुष्यांच्या गरजा हळूहळू वाढत जाऊन त्यांची कल्पना पोक्त झाली पाहिजे हें उघड आहे. जसजशी सुधारणा होते, तसतसें धंद्यांचें पृथक्करण होऊं लागतें.

निरनिराळ्या लोकांचें वर्गीकरण होणें हेंही सुधारणेचें दर्शक आहे. रानटी स्थितींत असणारे लोकांस दुसऱ्या मनुष्याचे कचाटींत राहण्याचें आवडत नाहीं; त्यांस दुसऱ्याचा अंमल सहन होत नाहीं; व त्यांमध्यें लहान मोठा असा भेद फारसा मा-

---

अर्थीं या दिवसांत ते कांहीं एक काम करीत नसत, किंवा धर्मसंबंधीही विधि करीत नसत. हे दिवस ते गप्पा मारण्यांत व आनंदोत्सवांत घालवीत.

नण्यांत येत नाहीं. मेक्सिकोंत राजा, सरदार व लोक असे निरनिराळे वर्ग होते. राज्यांत एकंदर ३० सरदार होते; शिवाय छोटे सरदार ३ हजार होते.

मांडलीक सरदारांवर दिवाणी व फौजदारी पूर्ण अधिकार हा सरकाराकडे असे; मेक्सिकोंत इनसाफ करण्याकरितां न्यायाधीश असत; राज्यकारभार चालविण्याचा खर्च भागविण्याकरितां जमिनीवर, धंद्यांवर व बाजारांत जो माल विकण्याकरितां येई, त्यावर कर बसविलेला असे; एके ठिकाणची बातमी दुसरे ठिकाणीं पोंचविण्याकरितां राज्यांत ठिकठिकाणीं लोक ठेविलेले असत; व रस्ते झाडण्याकरितां, रस्त्यांतून निरनिराळे ठिकाणीं दिवे लावण्याकरितां व रात्रीस गस्त करण्याकरितां कांहीं लोकांची योजना केली होती. कार्टेज यानें आपला राजा पांचवा चार्लस् याला मेक्सिको शहराची जी हकीकत पत्रद्वारें थोडक्यांत कळविली, तिजवरून मेक्सिकन लोकांची सुधारणा झाली होती किंवा नाहीं हें समजेल. आपण मोठा व श्रीमान् देश जिंकिला, असें राजास वाटावें ह्मणून कार्टेज यानें कदाचित् फुगवून लिहिलें असेल, असें जरी संभवतें, तरी, वर जी हकीकत दिली आहे, तिजवरून त्यानें लिहिलेला मजकूर हा सर्व खोटा असावा असें ह्मणतां येत नाहीं. कार्टेज ह्मणतो कीं, "शहरांतील कांहीं रस्ते रुंद आहेत व कांहीं अरुंद आहेत. येथील बाजारची जागा ही सेव्हिली येथील बाजारचे जागेपेक्षां दुप्पट आहे. यांत सर्व प्रकारच्या व्यापाराच्या जिनसा आहेत. सोन्यारुप्याचे डागिने, इमारतीच्या उपयोगीं कौलें व सागवानाचीं लांकडें हीं येथें दृष्टीस पडतात. येथें वैद्यांचीं दुकानें असून त्यांत तयार केलेलीं औषधें, मलम वगैरे विकत मिळतात. गोंधळ होऊं नये ह्मणून येथील लोक प्रत्येक प्रकारची जिन्नस निरनि-

राळे गल्लींत विकतात. या बाजारचे मोठे चौकांत एक वाडा आहे. ह्याचें नांव मिलाडा एन्शिया हें आहे. यांत १० किंवा १२ गृहस्थ बसलेले असतात. मालाचे विक्रीसंबंधानें जे तंटे उपस्थित होतात, त्यांचा ते निकाल करितात. आह्मांस बाजारचे गर्दीत दुसरे कांहीं गृहस्थ दृष्टीस पडले. ते जिनसांबद्दल योग्य किंमत मागितली आहे किंवा नाहीं हें पाहत होते. व्यापाऱ्यांपासून जीं खोटीं मापें त्यांनीं घेतलीं होतीं, तीं फोडतांना मीं त्यांस पाहिलें."

या हकीकतीवरून मेक्सिकोंत सुधारणा होती, या गोष्टीविषयीं शंका नाहीं. ही सुधारणा सामान्य होती हें खरें आहे. कारण, ज्याप्रमाणें लेखनकला प्राचीन काळच्या सुधारलेल्या राष्ट्रांत होती, त्याप्रमाणें येथें नव्हती. शिवाय परस्परांतील व्यवहार हे नाण्यांच्या योगानें स्वल्प रीतीनें चालवितां येतात, हें येथील लोकांस माहीत नव्हतें. ते वेड्यावांकड्या रीतीनें व्यवहार चालवीत असत. ज्याप्रमाणें मेक्सिकोंत सुधारणा झाली होती, त्याचप्रमाणें पेरूमध्येंही सुधारणा झाली होती. आतां पेरूविषयीं विचार करण्याचे अगोदर आह्मांस हें एक सांगितलें पाहिजे कीं, मेक्सिकोच्या दक्षिणेस पानामा या नांवाचे संयोगीभूमीपर्यंत जमिनीचा जो एक अरुंद तुकडा आपणास नकाशांत दिसून येतो, व जो मध्य अमेरिका या नांवानें प्रसिद्ध आहे, तोही या सुधारलेले देशांत सामील केला असतां चालेल. कारण, या ठिकाणीं देखील जमीन सुपीक असल्यामुळें लोकांस सुधारणा करण्यास सांपडली. कोपन, प्यालेंक व अक्समल या ज्या इमारती येथें दृष्टीस पडतात, त्यांजवरून हा देश सुधारणेचें स्थान असावें, असें मानण्यास कारण आहे.

ज्याप्रमाणें मेक्सिकोविषयीं आह्मीं थोडी हकीकत सांगि-

तली, त्याप्रमाणें पेरूविषयींही हकीकत सांगणें जरूर आहे. कारण, ही माहिती समजल्यापासून पुढें या देशाविषयीं जें आह्मी सांगणार आहों, त्याविषयीं खुलासा होणार आहे. पेरूव्हियन लोक रानटी स्थितींत असतां, त्यांची सुधारणा करण्याकरितां मंकोकप्याक व त्याची पत्नी ममाओकोलो हीं उत्पन्न झालीं. हीं कोण होतीं व कोठून आलीं हें समजत नाहीं; व यांनीं कलाकौशल्य व कायदे कोठून व कसे संपादन केले, हेंही समजण्यास मार्ग नाहीं. पेरूव्हियन लोक हे सूर्योपासक आहेत, असें पाहून आपणांस सूर्यानें सुधारणा करण्यास पाठविलें आहे, असें त्यांनीं लोकांस सांगितलें. यांचें ह्मणणें काय आहे, हें ऐकून घेण्याकरितां निरनिराळ्या जातींचे लोक जमा झाले. ज्या सामाजिक ऐक्यामुळें मानवी श्रमांचें एकीकरण होऊन उद्योग चालतात व सुधारणेस सुरुवात होते, तें सामाजिक ऐक्य प्रथम मंकोकप्याक यानें केलें. मंकोकप्याक यानें लोकांस शेती व दुसऱ्या कला शिकविल्या. ममाओकोलो हिनें स्त्रियांस शिवणकाम व विणकाम करण्यास शिकविलें. मंकोकप्याक यानें इ० स० १०४३ त कजकोटे शहर वसविलें. ही पेरूव्हियन लोकांची राजधानी होती. मंकोकप्याक यानें निरनिराळे नियम करून कोणीं कसें वर्तन करावें हें ठरविलें. अशा रीतीनें राज्याची स्थापना झाली. तात्पर्य ज्याप्रमाणें चिनी लोकांचा कानफ्यूशिअस अथवा इराणी लोकांचा झोरोआस्टर, त्याप्रमाणें पेरूव्हियन लोकांचा मंकोकप्याक होय. मंकोकप्याक ह्याचे मागून जे इंका (अधिपति) आले, त्यांनीं क्विटोपासून चिलीपर्यंत राज्याची हद्द वाढविली. ज्याप्रमाणें आमचे प्राचीन सुधारणेंत धर्माचें प्राबल्य फार असे, त्याचप्रमाणें पेरूव्हियन लोकांत धर्माचें प्राबल्य फार असे. राज्यनीति, कायदे वगैरे सर्व गोष्टी धर्माचे आधारावर

होत्या. इंकाची आज्ञा ही केवळ श्रेष्ठ पुरुषाची आज्ञा ह्मणून पाळावयाची नसून, ती ईश्वरप्रेरित आहे असें समजून लोक तीस बहुमान देत. या योगानें असें झालें कीं, इंकाचा अधिकार अप्रतिबंध चालूं लागला; व याचा हुकूम तोडणें ह्मणजे अधर्म करणें असा समज उत्पन्न झाला. सर्व अपराधांबद्दल देहांत शिक्षा असे. उजेड व सुपीकता ह्यांचें कारण जो सूर्य, त्याची पेरूव्हियन लोक उपासना करीत. लोक ज्या कथा सांगतात त्यांवरून असें कळतें कीं, त्यांवर १२ राजांनीं राज्य केलें; व त्यांपैकीं एकही जुलमी नव्हता. या राजांचे कारकीर्दीत एकही बंड झालें नाहीं. राजे दुसरे प्रांत जिंकीत; परंतु ते सुधारणा करण्याकरितां जिंकीत व आपणांस जो फायदा होई, तो जिंकलेले लोकांस देत. पेरूमध्यें जमिनींतील उत्पन्नाची कांहीं चमत्कारिक व्यवस्था होत असे. ती अशी कीं, एक हिस्सा सूर्यास अर्पण करावयाचा व या उत्पन्नांतून देवळें बांधावयाचीं किंवा दुसरीं सार्वजनिक कृत्यें करावयाचीं. दुसरा हिस्सा इंकाला द्यावयाचा. हा हिस्सा राज्याचे संरक्षणाकरितां द्यावयाचा. तिसरा व मोठा हिस्सा हा लोकांचे पोषणाकरितां काढून ठेवावयाचा. हा हिस्सा प्रत्येक वर्षी योग्यतेप्रमाणें व कुटुंबांतील माणसांचे संख्येप्रमाणें वांटून देण्यांत येत असे. देशांतील जमिनी सर्व जण नांगरीत. सरकारी कामगारानें लोकांस हाक मारल्यावर ते जमा होऊन टोळ्याटोळ्यांनीं शेतांत काम करावयास जात. अशा रीतीनें एकत्र जमण्याची व एकत्र काम करण्याची संवय लागून आपण एका कुटुंबांतले आहों, असा समज त्यांजमध्यें उत्पन्न झाला. पेरूमध्यें ज्या ठिकाणीं पाण्याची कमताई असे, त्या ठिकाणीं कालवे बांधून शेतांत पाणी नेलेलें असे. लोक समुद्रावरील पक्ष्यांचें खत शेतांत घालीत.

ते राहण्याकरितां विटांचीं घरें बांधीत. हीं घरें ठेंगणीं परंतु फार मजबूत असत. राजवाड्याचें काम व देवालयें यांवरून पेरूव्हियन लोकांची कारागिरी दृष्टोत्पत्तीस येऊं लागली होती. प्याकेकम्याकचें देवालय, इंकाचा वाडा व किल्ला हीं फार मोठीं होतीं. कझकोपासून किटोपर्यंत दोन रस्ते १५०० मैल एकसारखे लांब होते. एक डोंगराळ प्रदेशांतून मध्य भागांत गेलेला होता व दुसरा समुद्रकिनाऱ्यावरील मैदानांतून गेलेला होता. हे रस्ते अलीकडील रस्त्यांप्रमाणें होते असें नाहीं. हे १५ फूट रुंद होते. प्रवाशांस मार्ग उमगतां यावा ह्मणून, ठिकठिकाणीं अंतराअंतरावर झाडें लाविलीं होतीं. इंका हे देशांतून फिरत असतां, त्यांचे व त्यांचे बरोबरचे चाकर माणसांचे सोयीकरितां तंबो अथवा मोदिखाने बांधलेले होते.

मेक्सिको व पेरू या दोन देशांत जी सुधारणा झाली, ती कशानें झाली याविषयीं विचार करितां, आपणांस असें दिसून येतें कीं, निर्वाहाचें मुख्य साधन जी जमीन, ती सुपीक असल्यामुळें, या देशांतील लोकांस उपजीविका करावयास सांपडून सुधारणा करितां आली. आतां मेक्सिको व पेरू या देशांत सुधारणा झाली होती व तीस सुपीक जमीन कारण होती असें आह्मीं ह्मटलें, यावरून अमेरिका खंडांत दुसरे ठिकाणीं कोठेंही सुपीक जमीन नव्हती असें नाहीं. ब्रेझील देशांतील जमीन सुपीक आहे; परंतु ब्रेझीलमध्यें सुपीक जमीन असतां तेथें सुधारणा कां झाली नाहीं, याविषयीं मागील एका भागांत आह्मीं खुलासा केला आहे. चिलीमध्यें सुपीक जमीन आहे, परंतु हा देश पेरूचे राज्याचा भाग होता; तेव्हां पेरूविषयीं विचार केला ह्मणजे, त्यांतील भागाविषयीं विचार करण्याचें कारण

१. माल्टीब्रनकृत भूगोल. भा. ३ पृ. २७४.

नाहीं. शिवाय दुसरें हें एक लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, मनुष्याची प्रथम स्थिति ह्मटली ह्मणजे कळप राखून अथवा पारध करून उपजीविका करणें ही होय. या स्थितींत मनुष्यास भटकत फिरावें लागतें. अमेरिकेंतील लोक या स्थितींत असतां, त्यांपैकीं प्रथम मेक्सिकन व पेरूव्हियन लोकांना सुपीक जमीन सांपडून एके ठिकाणीं फार दिवस रहावयास सांपडल्यामुळें, त्यांस सुधारणा करितां आली असावी, व बाकीचे लोक भटकतच फिरत राहिले असावेत.

मेक्सिकोविषयीं हंबोल्ट साहेब असें ह्मणतात कीं, "जो कोणी जमिनीची लागवड करील त्याचें ती पोषण करील असें ह्या देशांतील देखावा प्रवाशांस जणूं काय जाहीर करीत आहे. मेक्सिकन लोकांचा उत्कर्ष हा अशाश्वत परकीय व्यापारावर अथवा युरोपांतील वंडाळीचे राज्यकारस्थानावर अवलंबून नाहीं." पेरूविषयीं रॉवर्टसन साहेब असें लिहितात कीं, "सामाजिक स्थितीस अत्यावश्यक जी शेती तिचा पेरूमध्यें फार विस्तार झाला होता; व अमेरिकेंतील इतर प्रदेशांपेक्षां शेतीचें काम हें या ठिकाणीं मोठ्या कुशलतेनें चालत असे. स्पानिश लोक या देशांत मार्ग क्रमण करीत असतां त्यांस प्रत्येक प्रकारच्या सामुग्रीचा इतका पुरवठा होत असे कीं, मेक्सिको जिंकणारे हे दुष्काळामुळें विपत्तींत होते, अशाविषयीं ज्या प्रकारच्या कथा आपल्या कानीं येतात, त्या प्रकारच्या कथा पेरूचे संबंधानें आढळून येत नाहींत."[1]

बंगाल व चीन यांत ज्याप्रमाणें तांदूळ, अथवा मिसर देशांत ज्याप्रमाणें खारका, त्याप्रमाणें मेक्सिको व पेरू यांमध्यें मका[2]

१. रावर्टसनकृत अमेरिकेचा इतिहास. पृ. ९४६.

२. ज्या वेळेस कोलंबस बार्सिलोना येथें आला, त्या वेळेस त्यानें इसाबेला व फर्डिन्यांड यांना मका नजर केला. यावरून हें धान्य

हें भोज्य होय. ज्याप्रमाणें तांदूळ व खारका हीं थोड्या श्रमानें विपुल व लवकर उपलब्ध असतात, त्याप्रमाणें येथें मका उत्पन्न होण्यास फारसे श्रम पडत नाहींत; व त्याचें पीक पुष्कळ होऊन तें बीं पेरल्यापासून थोड्या कालांत प्राप्त होतें. मका हा तांदूळ व खारका ह्यांप्रमाणें उष्ण देशांत होतो. थंड देशांत हा मुळींच होत नाहीं असें नाहीं; परंतु हवेचें मान जसजसें थंड असतें, तसतसें सरदगरम प्रदेशांत त्याचें पीक वर्षांतून तीनदां जरी काढिलें, तरी तें प्राप्त होतें. मेक्सिकोंत भोज्य किती विपुल प्राप्त होतें याविषयीं हंबोल्ट ह्मणतात कीं, १२० औरस-चौरस यार्ड जमिनीपासून ४००० पाऊंड (अथवा सुमारें ५० मण) पौष्टिक पदार्थ प्राप्त होतो; व इतक्याच जमिनींत जर्मनींत गहूं पेरला असतां, एक बुशेलापेक्षां कमी होतो.

याशिवाय मेक्सिकन लोक व पेरूव्हियन लोक वनांना ह्मणून एक वनस्पति आहे, तिजवर उपजीविका करितात. बनानाचे एका झुबक्यास १६० पासून १८० फळें येतात; व त्यांचें वजन ६० पासून ८० पौंड असतें. युरोपांत दोन मनुष्यांचे निर्वाहाकरितां गव्हाचें पीक उत्पन्न होण्यास जेवढी जमीन लागते, तेवढ्याच जमिनींत बनाना जो उत्पन्न होतो, त्यावर ५० मनुष्यांची जोगवण होते. पेरूमध्यें बटाटेही होतात; व यावरही कित्येक लोकांचा निर्वाह होतो. बटाटे हे येथील मूळचे होते किंवा कसें, याबद्दल कांहीं दिवसपर्यंत वाद होता; परंतु युरोपियन लोक या देशांत जाण्यापूर्वी हे या देशांत होते, ह्याविषयीं

अमेरिकेंतील मूळचें धान्य होय, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. लांबर्डी, हंगारी व सिरिया येथें याची लागवड होऊन त्यावर तेथील लोकांची जोगवण होऊं लागली आहे.

१ ही केळीसारखी आहे.

आतां शंका नाहीं. ३३ पौंड गहूं व ९९ पौंड बटाटे उत्पन्न होण्यास जितकी जमीन लागते, तितक्या जमिनींत ४००० पौंड बनाना उत्पन्न होतो, असें हंबोल्ट ह्यांनीं प्रतीतीअंतीं ठरविलें आहे.

क्यासाव्हा ह्मणून एका प्रकारचें कंदमूळ आहे; याची भाकर बनवून त्यावर कांहीं मेक्सिकन लोकांस उपजीविका करावयास सांपडते; हें बटाट्यासारखें असतें; व ह्याचा हंगाम ७ किंवा ८ महिन्यांनीं असतो.

या हकीकतीवरून मेक्सिको व पेरू या दोन देशांमध्यें निर्वाहाचें साधन किती विपुल व स्वस्त असावें, याविषयीं सहज कल्पना करितां येईल. विपुल अन्नसामुग्रीमुळें हिंदुस्थान व मिसर देशांत जीं कार्यें झालीं, तींच कार्यें या दोन देशांत झालीं. निर्वाहाचें साधन थोडक्यांत उपलब्ध होऊं लागल्यामुळें, धनाचा संचय लवकर होऊन सुधारणा होऊं लागली. परंतु याच साधनामुळें लोकसंख्या वाढून श्रम करणारांची संख्या वाढत गेली, व मजूरीचा दर कमी झाला. एक पक्षीं श्रम करणारांची हीन स्थिति व दुसरे पक्षीं थोड्या लोकांची चांगली स्थिति, असा प्रकार ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत घडून आला, त्याप्रमाणें या दोन देशांतही तोच प्रकार दृष्टीस पडूं लागला. हिंदुस्थान व मिसर देशांत सृष्टपदार्थविषयक कारणांचा विशेष जोर असल्यामुळें, हीं कारणें जरी धनाचे संचयास अनुकूळ होतीं, तरी, तींच धनाचे योग्य वांटणीस प्रतिकूळ होतीं. या कारणामुळें मेक्सिको व पेरू या दोन देशांमध्यें धनाचे वांटणींत अतिशयित न्यूनाधिक्य उत्पन्न झालें. या न्यूनाधिक्यामुळें सुधारणेंतही फारच न्यूनाधिक्य दृष्टीस पडत असे. मेक्सिको व पेरू या देशांत कलांचा फैलावा झाला होता; परंतु श्रीमंत लोकांच्या चै-

नीस उपयुक्त ज्या कला, त्यांचा विशेषेंकरून झाला होता. ज्या कलांच्या योगानें गरीब लोकांची स्थिति सुधारते, त्या कलांच्या फारसा फैलावा झाला नव्हता. वरच्या प्रतीचे लोकांचीं घरें पाहिलीं तर, त्यांत नकशीदार भांडीं व डागडागिने दृष्टीस पडत. त्यांचे खोल्यांतून व दिवाणखान्यांतून शोभायमान बुट्टीदार झालरी टांगलेल्या असून, त्यांचे पोषाक व त्यांचीं आभरणें पाहिलीं असतां, त्यांची संपत्ति अतिशय असली पाहिजे असें वाटे. ज्याप्रमाणें आमच्या इकडे शूद्र अथवा मेक्सिकोंतील स्वामिनीस, त्याप्रमाणें पेरूंत यनकोन हे होते. यांची स्थिति दासांप्रमाणें होती; यांचा पोषाख व घरें हीं स्वतंत्र लोकांचा पोषाक व घरें यांहून भिन्न होतीं; ओझीं वाहण्याचीं व दुसरीं हमालीचीं कामें करण्याकरितां यांची योजना होत असे; व यांचे माथ्यावर कराचें सर्व ओझें होतें. राजघराण्यांतील मंडळी, सरदार, सरकारी कामगार व धर्मप्रवर्तक यांस कर माफ असे. ज्याअर्थी कराचें ओझें लोकांच्या माथ्यावर असे, त्याअर्थी त्यांस धनाचा संचय करितां येत नसे. यामुळें त्यांस नेहमीं परतंत्र राहवें लागे. ज्या वेळेस धनाचा कांहीं संचय होऊं लागतो, त्या वेळेस स्वतंत्रतेविषयीं मनांत विचार येऊं लागतात, हें राज्यप्रवर्तकांस पूर्णपणें अवगत असल्यामुळें, लोकांस संचय करावयांस सांपडणार नाहीं, असा त्यांचा उद्योग नेहमीं चालू असे; व कोणत्याही प्रकारचे कामांत लोकांस स्वतंत्रता दाखवितां येऊं नये, अशाविषयीं नियम असत. शेती व इतर धंदे ह्यांत जरी लोक कसबी झालेले होते, तरी, पैसा ह्मणजे काय याची त्यांस माहिती नव्हती. खासगी मिळकतही त्यांजवळ नव्हती. अमुक प्रकारचे लोकांनीं अमुक धंदा करावा व अमुक प्रकारचे खेळ खेळावे असा निर्बंध असे; व त्याप्रमाणें लोकांस वर्तन

ठेवावें लागत असे. त्यांस सरकारचे परवानगीशिवाय पोषाक अथवा राहण्याचें ठिकाण बदलतां येत नसे. फार तर काय, परंतु लग्न करण्याची मोकळीक देखील त्यांस न्हती; हीस देखील सरकारची संमति लागत असे. हें वाचून खरोखर कित्येकांस आश्चर्य वाटेल; व अशा प्रकारची स्थिति असेल किंवा नाहीं याविषयीं शंका येईल. लोकांना इतका जुलूम सोसवला तरी कसा व त्यांनीं या जुलमाचें निवारण करण्याविषयीं यत्न कसा केला नाहीं, याविषयीं कित्येकांस आश्चर्य वाटेल; परंतु आह्मीं वर जीं कारणें सांगितलीं, त्यांविषयीं विचार केला असतां, अशा प्रकारची स्थिति होणें, किती स्वाभाविक आहे, हें लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. पेरूचें राज्य पिझारोच्या हातीं सहज जावें काय? राजास धरून जिवें मारिलें, तरी देखील लोकांस त्वेष येऊं नये, ही केवढी आश्चर्याची गोष्ट! यावरून लोक किती गांजलेले असावेत, व त्यांची किती निकृष्ट स्थिति असावी! मेक्सिकन लोकांनीं हात तरी हालविले; परंतु पेरूव्हियन लोकांच्या हातून तें सुद्धां झालें नाहीं. पेरूव्हियन लोकांनीं थोडासुद्धां अडथळा केला नाहीं. आपलें स्वातंत्र्य मिळण्याची व आपणांस गांजणारे लोकांचा पाडाव करण्याची उत्तम संधि आली असतां, ती देखील त्यांनीं घालविली, अशी लोकांची हीन स्थिति झाली होती. यांचे वंशजांविषयीं विचार केला असतांही, हीच स्थिति दृष्टोत्पत्तीस येते; हेही दुर्बल व उत्साहहीन आहेत. सर्व अमेरिकेंत असे दुर्बल लोक दृष्टीस पडत नाहींत; व त्यांच्या हातून कांहीं होईल असें दिसत नाहीं.

पेरूमध्यें ज्या प्रकारची स्थिति होती, त्याप्रकारची स्थिति मेक्सिकोमध्येंही होती. ज्या सृष्टपदार्थविषयक कारणांचा पेरू-

१–राबर्टसनकृत अमेरिकेचा इतिहास पृ. ९४९.

मध्यें जोर होता, त्याच कारणांचा मेक्सिकोंत जोर असल्यामुळें, व्यावहारिक गोष्टींत एका देशांत ज्या प्रकारचीं कार्यें घडून आलीं, त्याच प्रकारचीं कार्यें दुसरे देशांत घडून आलीं. मेक्सिकोंतील बहुतेक लोकांची फारच निकृष्ट स्थिति होती. त्यांस टामिनी ह्मणतात. मेक्सिकोंत लोक जनावरें पाळीत नसल्यामुळें, टॉमिनी यांस ओझीं उचलावीं लागत. या देशांतील कुणबी शेतकरी मेयीकी या नांवानें प्रसिद्ध आहेत; व यांची स्थिति आमच्या कुणबी शेतकऱ्यांपेक्षांही वाईट होती. ज्यांवर हे अवलंबून असत, त्यांचे परवानगीशिवाय यांस राहण्याचें ठिकाण बदलतां येत नसे; जमीन विकली असतां तिजबरोबर त्यांचीही विक्री होत असे; जमीन नांगरणें व हलकीं कामें करणें त्यांस भाग पडे; त्यांची स्थिति फारच नीच मानिली होती; त्यांच्या जीवाची कांहींच किंमत नसे; व कोणी एखाद्यानें त्यांपैकीं एकास ठार जरी मारिलें, तरी त्यास शिक्षा होत नसे. ज्या प्रमाणें सरदारांचा पोषाक असे, त्याप्रमाणें पोषाक करण्यास किंवा सरदारांचीं ज्या प्रकारचीं घरें असत, त्या प्रकारचीं घरें बांधण्यास लोकांस मोकळीक नसे. राजा आला असतां लोकांनीं डोळे वर करावयाचे नाहींत किंवा त्याकडे पहावयाचें नाहीं.

यावरून मेक्सिको व पेरू या देशांतील साधारण लोकांची स्थिति किती निकृष्ट असली पाहिजे, व जुलमाचा प्रकार किती जारीनें सुरू असला पाहिजे हें लक्षांत येणार आहे. मिसर देशाविषयीं लिहितांना आह्मीं सांगितलेंच आहे कीं, लोकांस मुळींच स्वतंत्रता नसल्यामुळें व त्यांवर वरचे प्रतीचे लोकांचें पूर्णपणें स्वामित्व असल्यामुळें, त्यांचे श्रमाचा सद्व्यय न होतां, निरुपयोगी कामें उभारण्याकडे व्यय होत असे. त्याचप्रमाणें मेक्सिको व पेरू ह्यांतही

१–राबर्टसनकृत अमेरिकाचा इतिहास पृ. ८६२.

हींच स्थिति बरेच अंशीं दृष्टीस पडत असे. मेक्सिकन व पेरू-व्हिन लोकांनीं पुष्कळ इमारती बांधिल्या. मिसर देशांतील मनोरे व नागमोडी कामें, हीं ज्याप्रमाणें निरुपयोगी होतीं, त्याप्रमाणें येथील बहुतेक इमारती निरुपयोगी होत्या. पेरू येथील राजवाडा बांधण्याचें काम ५० वर्षें चाललें होतें; व या कामावर २०००० लोक लागले होते. मेक्सिकोंतील राजवाडा बांधण्याचे कामाकरितां दोन लाख लोक लागले होते. अशा प्रकारचीं आणखी कांहीं उदाहरणें देतां येतील. मेक्सिकोंत चोचुला शहराजवळ एक टिओक्ली अथवा मनोरा आहे. जिझेजवळ चिआप्स राजानें जो मनोरा बांधिला व ज्याविषयीं आह्मीं मागें उल्लेख केला आहे, त्यापेक्षां हा मनोरा मोठा आहे. या मनोऱ्याचा पाया चिआप्सचे[1] मनोऱ्यापेक्षां दुप्पट आहे; परंतु हा तितका उंच नाहीं. याची उंची १७७ फूट आहे; व पायाची लांबी १४२३ फूट आहे. मिसर देशांतील मनोऱ्यांप्रमाणें हा दगडी नसून, भाजलेल्या विटा व माती यांचा एकावर एक थर देऊन उभारला आहे; यांत पोकळी पुष्कळ आहे; व ही प्रेतें ठेवण्याकरितां केली होती. मेक्सिकोंत जीं देवालयें असत त्यांपेक्षां लोक हे मनोरे अधिक पूज्य मानीत. असो. अशा प्रकारचे कामाकरितां श्रमाचा किती निरर्थक व्यय होत असावा व लोकांची कशी स्थिति असावी, याविषयीं अनुमान करण्यास अडचण पडणार नाहीं.

आतां लोकांची ही जी निकृष्ट स्थिति झाली होती, ती ह्मणजे एक दोन दिवसांत झालेली होती असें नाहीं. ही स्थिति प्राप्त होण्यास वरींच वर्षें लोटलीं असलीं पाहिजेत. लोकांनी फक्त मजूरी करावी, त्यांनीं धनाचा संचय करूं नये व त्यांनीं व-

१–वंडर्स आफ् दि वर्ल्ड ( सृष्टींतील चमत्कार ) पृ. १६२,१६३.

ऱ्या प्रतीच्या लोकांच्या सुखाकरितां नेहमीं शरीर झिजवीत जावें, अशाविषयीं यत्न करणें देशास अनिष्टकारक असतें. सृष्टपदार्थविषयक नियमांचे व्यापारामुळें जी स्वाभाविक रीतीनें एकंदरें लोकांची दुर्बल स्थिति होते, तिजमुळें जुलूम करण्यास सवड सांपडते खरी, व पोटासाठीं लोक जुलूम सोसतात हेंही खरें; परंतु या दुर्बल स्थितीचा प्रतिकार करण्याविषयीं प्रयत्न न केला तर, व लोक जुलूम सोसतात ह्मणून त्यांस अधिकाधिक दडपीत गेलें तर, कांहीं कालपर्यंत कदाचित् विपरित परिणाम घडून येणार नाहींत. परंतु लोक उदासीन असतात; व राज्यावर प्रसंग आला असतां त्यांस त्याचें फारसें वाईट वाटत नाहीं. राज्य परकीयांचे हातीं गेल्यापासून ज्यांचें खरोखर नुकसान होणार, ते मात्र पुढें सरसावतात. परंतु लोकांचें पाठबळ नसल्यामुळें, परकीयांस राज्य घेण्यास अडचण पडत नाहीं. जुलमाची तरी कांहीं इयत्ता असते. इयत्तेबाहेर जुलूम होऊं लागला ह्मणजे, कशीही जरी नवीन स्थिति असली तरी ती लोकांस इष्ट वाटते. हे विचार मेक्सिको व पेरू या देशांचे इतिहासावरून चांगले प्रत्ययास येतात. जोंपावेतों परचक्र नव्हतें, तोंपावेतों राज्याचें यंत्र कसें तरी चालत होतें. परंतु परचक्र आल्याबरोबर, मांटिझूमाचे सरदार एकामागून एक फितूर होऊं लागले. झेंपोलाचा काझिक कार्टेझ याला जाऊन मिळाला. चाणाक्ष कार्टेझ याला तेव्हांच दिसून आलें कीं, मेक्सिकोचें राज्य जरी मोठें आहे, तरी, ज्याअर्थीं एक जण आपणास येऊन मिळत आहे, त्याअर्थीं राज्यांत ऐक्यभाव नसावा; आणखी कांहीं लोक जुलमानें गांजलेले असावेत. ज्याप्रमाणें त्यास वाटलें, त्याप्रमाणेंच खरोखर स्थिति होती. झेंपोला व क्रियाबीस्लान येथील काझिक त्याचे भेटीस आले. लस्कलनचे लोकांनीं प्रथम त्यास अडथळा

केला; परंतु तेही थोड्याच दिवसांत त्यास वश झाले; व तेच आपले देशबंधूंस जिंकण्यास तयार झाले. त्यांच्या व झेंपोलियनांच्या सहाय्यानें कार्टेज याला चोलुला हें शहर घेतां आलें. याठिकाणीं स्प्यानिश लोकांनीं ६००० चोलुलन लोकांची कत्तल उडविली. चोलुला हें मेक्सिकन लोकांच्या मतें पवित्र स्थान होतें. लोकांस वाटे कीं, देवाचे वसतींत परकीयांचा शिरकाव होणार नाहीं. राजाविषयीं विचार केला तर, थोड्या परकीयांनीं भरदोनप्रहरीं खुद्द राजधानींत अडथळ्याशिवाय व रक्तस्राव न होतां त्यास पकडून कैद करून नेलें. अशा प्रकारें मेक्सिकोचें राज्य थोड्याच कालांत लयास गेलें.

हिंदुस्थान, मिसर देश, मेक्सिको व पेरू या चार देशांचीं उदाहरणें घेऊन येथील सुधारणेविषयीं आह्मीं जें निरूपण केलें, त्यावरून या देशांत सृष्टपदार्थविषयक नियमांचा जोर कसा होता, व या नियमांमुळें संपत्तीचा जरी संचय झाला, तरी, तिची वांटणी जशी होणें इष्ट होतें, तशी न झाल्यामुळें कशीं कार्यें झालीं, हें वाचकांचे लक्षांत आलें असेल. या नियमांमुळें एक पक्षीं लोकसमुदायाची दुर्बल स्थिति होऊन त्यांची फार निकृष्ट व निचेतन स्थिति झाली; व दुसरे पक्षीं राजकीय सत्ता व सामाजिक अधिकार हीं थोड्यांचे हातीं येऊन त्यांस जुलूम करण्यास सवड सांपडली. खालच्या प्रतीच्या लोकांना वर डोकें करावयास सांपडूं नये अशाविषयीं प्रयत्न होऊं लागला. या गोष्टींचा असा परिणाम झाला कीं, देशांत जरी संपत्तीचा संचय व सुधारणा हीं झालीं होतीं, तरी, लोकसमुदायास या संपत्तीचा व सुधारणेचा तादृश नफा झाला नाहीं. त्यांची जी स्थिति होती तींत फारसा बदल झाला नाहीं. संपत्ति व सुधारणा यांचा फायदा कांहीं विशेष प्रकारचे लोकांस मात्र होत असे; बाकीचे

लोक केवळ पोटभरू बनलेले होते; त्यांस फारशी स्वतंत्रता नसे; व त्यांस कोणत्याही प्रकारची प्रतिष्ठा नसे. बरें, इतकें अ-सून त्यांस जुलूम सोसावा लागत असे; यामुळें त्यांच्यांवर जे सत्ता चालवीत, त्यांचें व लोकांचें फारसें ऐक्य नसे. जोंपावेतों परचक्र आलें नव्हतें, तोंपावेतों लोकांस दाबांत ठेवितां आलें. परंतु ज्या वेळेस परकीय लोक देशावर स्वाऱ्या करूं लागले, त्या वेळेस संकुचित पायावर जी सुधारणेची इमारत बांधली होती, ती डळमळून खालीं आली. जेव्हां परचक्र आलें तेव्हां वरच्या प्रतीचे लोकांस लढावें लागलें. इतर लोकांची मदत नांवाला मात्र होती. त्यांस केवळ पोटभरू मजूर लोकांप्रमाणें बनवून सोडिलें होतें, ह्मणून त्यांस कोणी थोडीबहुत पैशाची लालूच दाखविली असतां ते फितूर होत. यामुळें हे देश परकीयांचे सत्तेखालीं गेले. या देशांवर परकीयांचें स्वामित्व होण्यापूर्वीं, या देशांस क्षयाची भावना झालेली होती, ह्मणून परकीयांस हे देश जिंकण्यास फारसा त्रास पडला नाहीं, इतकेंच नाहीं, तर, लोक जुलमानें गांजलेले होते ह्मणून परकीयांस उलट मदत मि-ळून देश थोडक्या कालांत धुळीस मिळवितां आले. मेक्सिकोंत राजाचे नांवानें अधिकार चालविण्याविषयीं जो स्पानिश लो-कांनीं घाट घातला व जो हल्लीं कांहीं ठिकाणीं दृष्टीस पडतो, तो निकृष्टस्थितीप्रत प्राप्त झालेल्या मेक्सिकन लोकांस समजला देखील नाहीं. असो. या पूर्वोक्त देशांत संपत्ति, अधिकार व ज्ञान यांची जशी वांटणी होणें देशहितास इष्ट आहे, तशी हो-ऊन सुधारणेचा पाया विशेष विस्तृत असता तर, हे देश स्व-ल्पायासानें परकीय सत्तेखालीं गेले नसते. जे लोक आपले दे-शाची सुधारणा करण्यास उद्युक्त असतात, त्यांनीं हे विचार चां-गले लक्षांत ठेवून त्याप्रमाणें उद्योग चालवावा अशी त्यांस सू-चना करून आह्मी हा भाग समाप्त करितों.